# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२

# जिल्हा परिषद / पंचायत समिती निवडणुकांकरिता मतदान केंद्राध्यक्षांसाठी माहिती पुस्तिका-२०१७

# अनुक्रमणिका


| प्र.क्रमांक | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | प्रारंभिक | १-६ |
| २ | मतदान पथक स्थापन करणे आणि सरावासाठी तालीम घेणे | ७-८ |
| ३ | मतदान यंत्रे आणि मतदानाचे साहित्य ताब्यात घेणे | ९-१० |
| ४ | मतदान केंद्रे स्थापन करणे | ११-१३ |
| ५ | मतदान केंद्राची सुरक्षितता | १४-१५ |
| ६ | मतदान अधिका-यांना कामे वाटून देणे | १६-१७ |
| ७ | मतदान केंद्रात प्रवेशपात्र व्यक्ती आणि केंद्रातील आसन व्यवस्था | १८-२१ |
| ८ | मतदान सुरु करण्यापुर्वी मतदान यंत्र सज्ज करणे | २२-२४ |
| ९ | नियंत्रण विभागाची तयारी | २५-२६ |
| १० | चाचणी (नमुना) मतदान घेणे | २७-३१ |
| ११ | नियंत्रण विभाग पेपरसील व स्पेशल टॅग वापरुन बंद करणे | ३२-३४ |
| १२ | नियंत्रण विभाग A, B, C, D पट्टीसील वापरुन बंद करणे | ३५-३८ |
| १३ | मतदानास सुरुवात करणे | ३९-४० |
| १४ | मुक्त आणि नि:पक्षपाती निवडणुकीची खबरदारी | ४१ |
| १५ | मतदान केंद्राभोवती निवडणूक कायद्यांचा अंमल लागू करणे | ४२-४३ |
| १६ | मतदाराची ओळख पटविणे आणि मतदाराच्या ओळखीस आव्हान दिल्यास अवलंबिण्याची कार्यपध्दती | ४४-४६ |
| १७ | मतदाराला मतदान करु देण्यापूर्वी त्याच्या बोटावर न पुसणारी शाई लावणे आणि त्याची स्वाक्षरी वा अंगठयाचा ठसा घेणे | ४७-४९ |
| १८ | मतदानाची नोंद आणि मतदान सोपस्कार | ५०-५१ |
| १९ | मतदारांनी कुणाला मतदान केले हे गुप्त ठेवावे | ५२ |
| २० | अंध आणि अपंग व्यक्तीचे मतदान | ५३ |
| २१ | मतदान न करण्याचा मतदाराचा निर्णय | ५४ |
| २२ | निवडणूक सेवेवर असलेल्या शासकीय सेवकास मतदानाची सुविधा | ५५ |
| २३ | प्रदत्त (दुबार) मते | ५६-५७ |
| २४ | मतदान यंत्र खराब होणे, मतदान केंद्र ताब्यात घेणे अशाप्रसंगी मतदान स्थगित करणे | ५८-५९ |
| २५ | मतदान बंद करणे | ६० |
| २६ | नोंद झालेल्या मतांचा हिशोब | ६१ |
| २७ | मतदान बंद झाल्यावर मतदान यंत्र सील बंद करणे | ६२ |
| २८ | निवडणूक कागदपत्रे सीलबंद करणे | ६३-६४ |
| २९ | डायरी तयार करणे आणि संग्रह केंद्रात मतदान यंत्रे आणि निवडणूक कागदपत्रे पोहोचविणे | ६५ |
| ३० | मतदान केंद्राध्यक्ष/मतदान अधिकारी यांच्यासाठी थोडक्यात मार्गदर्शन | ६६-६९ |
| ३१ | परिशिष्ट | ७०-१४१ |

## प्रकरण – १
## प्रारंभिक

१.१ मतदान केंद्राध्यक्ष म्हणून तुम्हाला मतदान प्रक्रियेत महत्वाची भूमिका बजावयाची आहे. तुमच्या अधिकाराखालील मतदान केंद्रातील मतदान प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यासाठी तुम्हाला कायदेशीर पूर्ण अधिकार आहेत. तुमच्या मतदान केंद्रात मुक्त आणि नि:पक्षपातीपणे मतदान व्हावे हे पहाणे तुमचे सर्वप्रथम कर्तव्य आहे. त्यासाठी तुम्हाला राज्य निवडणूक आयोगाने घालून दिलेल्या सूचना आणि मार्गदर्शनाची आणि निवडणूक कायदा व प्रक्रियेची पूर्ण माहिती असणे आवश्यक आहे. त्यामुळे तुम्ही नियमानुसार आपले कर्तव्य बजावू शकाल आणि कुणाच्याही वाजवी तक्रारीला वाव राहणार नाही.

१.२ यापूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मतपेटया व मतपत्रिका या पारंपारिक पध्दतीने घेण्यात येत होत्या. आता विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगतीचा उपयोग करुन राज्य निवडणूक आयोग मतदान प्रक्रियेत सुधारणा करण्याचा प्रयत्न करत आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार, इलेक्ट्रॉनिक कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड, हैद्राबाद या केंद्र सरकारच्या अंगिकृत उपक्रम असलेल्या कंपनीने इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे तयार केली आहेत. ही इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे (यापुढे आपण मतदान यंत्रे असे संबोधू) फार विश्वसनीय अशी आहेत. मतपेटया व मतपत्रिका ही सध्याची मतदान पध्दती नजरेसमोर ठेवून ही मतदान यंत्रे तयार केलेली आहेत. त्याबाबतचे सविस्तर आदेश **जोडपत्र-१ व १अ** प्रमाणे आहेत

१.३ मतदान यंत्रे वापरात येणा-या मतदान केंद्रातील तुम्ही केंद्राध्यक्ष आहात. त्यासाठी तुम्हाला मतदान यंत्राद्वारे मतदान प्रक्रिये संदर्भातील कायदे व नियम यांची माहिती असणे आवश्यक आहे. मतदान केंद्रात, मतदान करण्यासंदर्भातील प्रत्येक टप्प्याची तुम्हाला माहिती तर हवीच शिवाय मतदान यंत्राच्या वापरासंदर्भातही माहिती हवी. कायदा वा नियमाच्या वापरात थोडी जरी चूक झाली किंवा मतदान यंत्राच्या वापरासंदर्भात अपुरे ज्ञान असले तर तुमच्या मतदान प्रक्रियेत गोंधळ निर्माण होईल. आपल्या मतदान केंद्रावर कोणते मतदान यंत्र दिले जाणार आहे याची खात्री करावी कारण **राज्य निवडणूक आयोगाने विकसित केलेले मतदान यंत्र लोकसभा / विधानसभा निवडणूकांकरीता वापरण्यात येणाऱ्या मतदान यंत्रापेक्षा वेगळे असल्यामुळे त्याचे योग्य प्रशिक्षण घेणे अत्यावश्यक आहे.**

### १.४ मतदान यंत्राची तोंड ओळख

**१.४.१** मतदान यंत्राचे दोन भाग आहेत. **एक नियंत्रण विभाग (Control Unit) आणि दुसरा मतदान विभाग (Ballot Unit).** हे दोन्ही विभाग परस्पराशी जोडलेले आहेत. जेव्हा मतदान यंत्र सुरु करण्यात येते त्यावेळी त्याच्या केबलचे एक टोक मतदान विभागाशी जोडलेले असते.

राज्य निवडणूक आयोगाच्या मतदान यंत्रात एकापेक्षा जास्त जागांसाठी मतदान घेण्याची सोय असल्याने जिथे जिल्हा परिषद व पंचायत समितीची निवडणूक एकत्र होणार असेल तेथे एक कंट्रोल युनीट व एक किंवा अधिक (आवश्यकतेनुसार) बॅलट युनीट असतील.

### १.४.२ बॅलेट युनिट :

एक **बॅलेट युनिट** जास्तीत जास्त १६ उमेदवारांसाठी (१५ उमेदवार व १ नोटा) (राज्यनिवडणूक आयोगाच्या मतदान यंत्रात १६ वे बटण **"END"**असल्याने तेथे केवळ १५ उमेदवारांसाठी उपयोगात येते ) उपयोगात आणता येते. बॅलेट युनिटमध्ये "डिस्प्ले" हा एक भाग असून, त्यामध्ये मतपत्रिका ठेवण्यासाठी जागा असते. मतपत्रिकेवर मतपत्रिकेचा अनुक्रमांक, निवडणूक कोणत्या स्थानिक स्वराज्य संस्थेची व प्रभागाची आहे त्याविषयीची माहिती आणि निवडणूक लढविणा-या उमेदवारांची नावे, अनुक्रमांक व त्यांची चिन्हे दर्शविलेली असतात. प्रत्येक उमेदवाराच्या नावासमोर एक बटन असून, ते बटन दाबून मतदार आपले

मत संबंधित उमेदवारास देऊ शकतो. सदर बटणा शेजारी एक लाल रंगाचा दिवा (बल्ब) असून, मत देण्यासाठी बटन दाबल्यानंतर सदर दिवा पेटतो. बॅलेट युनिटच्या शेवटी असलेले १६ वे बटन हे **"END"** अक्षरे लिहिलेले असून ते फक्त Cand Set करताना चालू ठेवावे व नंतर बॅलेट युनिट सील करताना पांढ-या आवरणाच्या झाकणाने (White Masking Tab) बंद ठेवावे.चार बॅलेट युनिट एकमेकांशी जोडल्यानंतर सुमारे ६० उमेदवार जरी निवडणूक रिंगणात असले तरी केवळ एका कंट्रोल युनिटच्या सहाय्याने मतदान प्रक्रिया पार पाडता येते.

१.४.३ **कंट्रोल युनिट :**

**कंट्रोल युनिट**च्या अगदी वरच्या भागात वेगवेगळी माहिती दर्शविणा-या तरतुदी आहेत. या माहितीमध्ये निवडणूक लढविणा-या उमेदवारांची संख्या, एकूण नोंदविण्यात आलेली मते, प्रत्येक उमेदवारास मिळालेली मते इत्यादी माहिती दर्शविण्याची तरतूद असते. या भागास कंट्रोल युनिटचे "**डिस्प्ले सेक्शन**" असे म्हटले जाते. डिस्प्ले सेक्शनच्या खालच्या बाजूस एक बॅटरी ठेवण्यासाठी कप्पा असून, त्या बॅटरीवर मतदान यंत्र चालते.

सदर कप्प्याच्या बाजूला एक दुसरा कप्पा असून, त्या ठिकाणी काढता येणारी मेमरी (Detachable Memory) असून, त्याखाली **"Cand. Set"** नावाचे एक बटन आहे, त्याद्वारे कंट्रोल युनिटमध्ये कोणत्याही विशिष्ट निवडणुकीसाठी निवडणूक लढविणा-या उमेदवारांची संख्या निश्चित करता येते. या बटणास "कॅन्ड सेट बटन**"** असे म्हटले जाते. या बटणाच्या वर काढता येणारी मेमरी खोचून लावण्यात आलेली असते. मतमोजणीनंतर सदर मेमरी उपस्थित मतमोजणी प्रतिनिधींसमोर काढून सील करावयाची आहे. या भागास कंट्रोल युनिटचा "**कॅन्ड सेट सेक्शन**" असे म्हटले जाते.

कॅन्ड सेट सेक्शनच्या खालच्या भागास कंट्रोल युनिटचा "**रिझल्ट सेक्शन**" असे म्हटले जाते. या भागात **"Close"** हे बटन असून, ते मतदान बंद करताना वापरले जाते. दुसरे **"RESULT- I"** हे बटन असून, ते मतमोजणीसाठी वापरले जाते (**"RESULT-II"** हे बटन काढता येणा-या मेमरीतील निकाल पडताळणीसाठी असून त्याचा वापर सध्या होणार नाही.) तिसरे **"Clear"** हे बटन असून, त्याद्वारे मतदान यंत्रात नोंदविण्यात आलेली माहिती **(डाटा)** पुसण्यासाठी उपयोगात आणले जाते.

कंट्रोल युनिटच्या सर्वात खालच्या बाजूस दोन बटन असून, एकावर **"Ballot"** असे बटन आहे, ते दाबल्यानंतर "बॅलेट युनिट**"** मत नोंदविण्यासाठी तयार होते आणि दुसरे बटन **"Total"** हे बटन असून, ते दाबल्यानंतर त्या टप्प्यापर्यंत किती मते नोंदविण्यात आलेली आहेत, याची आकडेवारी मिळते. येथे हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, हे बटन दाबल्यानंतर मिळणारे आकडे हे बॅलेट युनिटमध्ये नोंदविण्यात आलेली एकूण मते असून, ती उमेदवारनिहाय मते नसतील. या भागास कंट्रोल युनिटचे "बॅलेट सेक्शन**"** असे म्हटले जाते.

**१.४.४** मतदान यंत्रामध्ये एक आधुनिक सूक्ष्म संगणक (मायक्रो-कॉम्प्युटर) असून, अन्य मोठया प्रमाणावरील इंटिग्रेशन चिप्स असतात, ज्या बॅटरीवर चालतात आणि कोणत्याही ठिकाणी कोणत्याही परिस्थितीत बॅटरीवर चालू शकतात. मतदान यंत्रात कोणत्याही प्रकारे घोटाळे अथवा चुका (टॅम्परिंग) करता येत नाही व ती वापरण्यासाठी सुलभ आहेत. मतदान यंत्रांचे दोन्ही भाग दोन वेगवेगळया बॅगांमधून कोठेही नेता येतात व एकदा नोंदविलेल्या मतांची माहिती बॅटरी काढल्यानंतरदेखील पुसली जात नाही.

**१.४.५** मतदान यंत्र विशेषत: बॅलेट युनिट हे अशारितीने तयार करण्यात आले आहे की, सध्याच्या मतदान पध्दतीचे सर्व आवश्यक घटक त्यामध्ये जसेच्या तसे ठेवण्यात आले आहेत.केवळ बदल इतकाच आहे की,मतदारास मतपत्रिकेवर आपल्याला ज्या उमेदवारास मत द्यावयाचे आहे त्या उमेदवाराच्या नावासमोर

शिक्का मारण्याऐवजी केवळ नावासमोरील बटन दाबावयाचे आहे. मतदान प्रक्रियेची गुप्तता तसेच मतपेटया ताब्यात घेणे यासारख्या पारंपारिक पध्दतींमध्ये असलेली धोक्याचीदेखील जाणीव ठेवून त्याविषयीची उपाययोजना या यंत्रामध्ये करण्यात आली आहे. या पध्दतीद्वारे मतदान करणे अत्यंत सुलभ व गतीमान असून, लोकसभा / विधानसभा निवडणुकीमध्ये मतदान यंत्रे वापरल्यानंतर असा अनुभव आला आहे की, अशिक्षित मतदारसुध्दा कोणत्याही अडचणीविना या मतदान यंत्राद्वारे मतदान करु शकतात. मतदान प्रक्रियेमध्ये नेमण्यात येणारे अधिकारी / कर्मचारीसुध्दा मतदान यंत्र वापरणे व त्याची कार्यपध्दती सहजपणे समजावून घेऊ शकतात. मतदान यंत्राद्वारे केलेल्या मतदानाची गती जास्त असून, पारंपारिक पध्दतीने मतदान करताना लागणा-या वेळेपेक्षा कमी वेळेत मतदान प्रक्रिया पार पाडता येते. विशेषत: मतमोजणी व निकाल जाहीर करणे या बाबी अत्यंत सुलभ होत असून, प्रामुख्याने एखादी मतपत्रिका वैध की अवैध आहे या कारणास्तव जी शंका अथवा वादावादी होऊ शकते, ती पूर्णपणे या मतदान यंत्रामध्ये टाळली जाते आणि केवळ कंट्रोल युनिटचे एक बटन दाबल्यानंतर मतदानाचा निकाल हाती येतो.

## १.५. मतदानासंदर्भातील कायदेशीर तरतुदी

मतदान केंद्राध्यक्ष म्हणून तुमच्यावर येणा-या कायदेशीर जबाबदा-या योग्यप्रकारे समजावून घ्याव्यात. त्या **जोडपत्र-दोन** (चेकलिस्ट) पुनर्मुद्रित करण्यात आल्या आहेत.

## १.६. कामाची व्यापक कल्पना

**१.६.**१ मतदान केंद्राध्यक्ष म्हणून काम करताना तुम्हाला मदत व्हावी म्हणून ही निदेशपुस्तिका तयार करण्यात आली आहे. तथापि, ती सर्वत: परिपूर्ण आहे असे समजू नये. जेथे जेथे आवश्यकता भासेल तेथे तुम्ही कायदेशीर संदर्भ पहावा.

**१.६**.२ या पुस्तिकेतील विविध भागात सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत. परंतु तुमच्या कामाच्या काही महत्वपूर्ण व ठळक गोष्टी मार्गदर्शनासाठी खाली देण्यात येत आहेत.

**१.६.२ अ. मतदान केंद्राध्यक्षांच्या महत्वांच्या कामांची माहिती :-**

१. मतदान यंत्राद्वारे घेण्यात येणा-या मतदानाचे नियम आणि प्रक्रियेसंदर्भात तुम्ही पूर्ण माहिती करुन घ्या.

२. मतदान यंत्राच्या कार्याबद्दल, त्याच्या विविध बटनाची कार्ये आणि ती कशी वापरावी याची माहिती करुन घ्या.

३. तुमच्या मतदान पथकातील प्रत्येक सदस्याची ओळख करुन घ्या आणि केंद्राध्यक्ष म्हणून तुमची नियुक्ती झाल्यापासून तुम्ही त्यांच्याशी सतत संपर्क ठेवा.

४. निर्वाचन अधिका-याच्या सर्व सूचना तुम्ही तुमच्यापाशी सदैव ठेवा.

५. तुमच्या मतदान केंद्राचे ठिकाण आणि तेथे पोचणे व परतीच्या मार्गाची पूर्ण माहिती करुन घ्या.

६. सर्व प्रशिक्षण वर्ग व प्रात्यक्षिकास उपस्थित रहा.

७. मतदानाचे साहित्य घेताना खात्री करा की, तुम्हाला सर्व साहित्य मिळाले आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे मतदान यंत्र (मतदान व नियंत्रण विभाग), प्रदत्त मतपत्रिका (टेंडर्ड बॅलट पेपर्स),

मतदार नोंदवही (नमुना व्हीएम-१), चिन्हांकित मतदार यादी, हे साहित्य तुमच्याच मतदान केंद्राचे आहे. इतर साहित्य जसे कागदी मोहर(पेपर सील), पट्टी सील, वैधानिक फॉर्म, सिलींग वॅक्स आणि मतदारांच्या बोटांना लावावयाची शाई- मार्कर पेन आवश्यकते नुसार आहे.

८. मतदार केंद्रात आल्यानंतर केंद्रात गुप्त मतदानासाठी कशी रचना करावयाची याचा आढावा घ्या, मतदारांची रांग कोठे असावी, मतदान चालू असताना बाहय हस्तक्षेपापासून मतदान प्रक्रियेचे संरक्षण व्हावे म्हणून कोणती खबरदारी घ्यावी याचाही विचार करा. संवेदनशील अतिसंवेदनशील केंद्रावर नेमण्यात येणाऱ्या कर्मचारी अधिकारी यांनी कोणती काळजी घ्यावी याबाबत निर्वाचक अधिकाऱ्याचे मार्गदर्शन घ्यावे.

९. मतदान सुरु होण्यापूर्वी मतदान यंत्राची चाचणी घ्या आणि तेथे उपस्थित असलेल्या मतदान प्रतिनिधींना मतदान यंत्रात मतदानाची नोंदणी झालेली नाही याची खातरजमा करुन द्या. मतदान यंत्र पूर्णपणे दुरुस्त असून ते मतदानास सज्ज आहे याचीही प्रतिनिधींना खात्री पटवा. त्यासाठी प्रत्येक उमेदवाराच्या नावावर नमुना चाचणी **(मॉक पोल**)मतदान करुन दाखवा आणि शेवटी निकाल जाहीर करुन दाखवा.

१०. **असे नमुना मतदान चाचणी (मॉक पोल) कार्य पूर्ण झाल्यानंतर त्याचा निकाल मतदान यंत्रातून पुसून टाका. नंतर मतदान यंत्राचा नियंत्रण विभाग पेपर सील लावून बंद करा. मॉक पोल कोणत्याही परिस्थीतीत करणे अनिवार्य आहे याची कृपया जाण ठेवावी.**

११. निवडणूक आयोगाने ठरविलेल्या वेळेनुसार मतदान सुरु करा. मतदान सुरु होण्यापूर्वी उमेदवार किंवा मतदान प्रतिनिधी आणि मतदान अधिका-यांना मतदानासंदर्भात गुप्तता ठेवण्याचा इशारा द्या आणि संबंधित अधिनियमातील तरतुदीसंदर्भात त्यांना सावध करा.

१२. मतदानास सुरुवात करण्यापूर्वी तुम्ही विहित नमुन्यातील घोषणापत्र द्या की, मतदान यंत्राचे प्रात्यक्षिक घेतले. तसेच उमेदवार वा मतदान प्रतिनिधींना मतदार यादी व मतदार नोंदवही दाखविली. त्यासंदर्भात घोषणापत्रावर त्यांची स्वाक्षरी घ्या.

१३. मतदारांच्या ओळखीची पहिल्या मतदान अधिका-याने खातरजमा करावी यासाठी राज्य निवडणूक आयोगाने भारतनिवडणूक आयोगाच्या मतदार ओळखपत्रा व्यतिरीक्त १६ पुरावे वापरण्याची मुभादिली आहे त्यानुसार ओळख पटवावी. मतदाराने आणलेली ओळखीची अनधिकृत चिठठी सर्रासपणे स्वीकारु नये.

१४. मतदाराची मतदार यादीनुसार ओळख पटल्यानंतर त्याच्या डाव्या हाताच्या तर्जनीवर शाईचे निशाण करा.

१५. मतदाराच्या तर्जनीवरील शाई पूर्णपणे वाळली आहे किंवा नाही? याची खातरजमा करण्यासाठी मतदार, मतदान केंद्राबाहेर पडण्यापूर्वी ती खूण पुन्हा तपासा.

१६. मतदाराची ओळख पटल्यानंतर चिन्हांकित मतदार यादीत त्याचे नाव अधोरेखित करण्यापूर्वी मतदारास मतदानाची माहिती द्या. ज्यावेळी जिल्हा परिषद व पंचायत समिती पदांची निवडणूक एकाचवेळी होत असेल त्यावेळी मतदारांना दोनही (जिल्हा परिषद व पंचायत समिती) पदांकरीता मतदान करणे आवश्यक आहे याची माहिती करुन द्या. महिला मतदार असेल तर टीक ( ✓ ) मार्कही करा.

१७. चिन्हांकित मतदार यादीतील मतदाराचा अनुक्रमांक मतदार नोंदवहीत (नमुना व्हीएम-१) नोंद करा. तसेच वापरण्यात येणाऱ्या पुराव्याची देखील नोंद शेरा कॉलम मध्ये घ्यायची आहे.

१८. मतदार नोंदवहीत (नमुना व्हीएम-१) मतदाराची स्वाक्षरी किंवा अंगठयाचा ठसा घ्या.आणि नंतरच त्याला मतदान करु द्या. जर तो स्वाक्षरी किंवा अंगठयाचा ठसा देण्यास राजी नसेल तर त्याला मतदान करण्यास परवानगी देऊ नका.

१९. मतदाराने मतदार नोंदवहीत स्वाक्षरी केली अथवा अंगठयाचा ठसा केला की, त्याला मतदार पत्र (विहित नमुन्यातील) (मतदार स्लीप) देऊन त्यात मतदार नोंदवहीतील त्याचा अनुक्रमांक लिहावा. मतदार स्लीपचा नमुना प्रकरण १६, परिच्छेद ८.१ मध्ये दिला आहे.

२०. मतदार चिठ्ठी च्या क्रमांकानुसार मतदान यंत्राद्वारे मतदान करण्यास परवानगी द्या. तसे करताना मतदार नोंदवहीतील अनुक्रमांकाचे काटेकोरपणे पालन करा.

२१. विशेष घटनांची तुम्ही मतदान केंद्राध्यक्षाच्या रोजनिशीत नोंद करा. तसेच विशिष्ट घटणांचा अहवाल आवश्यकते नुसार निर्वाचक अधिकाऱ्यास तात्काळ करावा कारण तसे न केल्यास व त्याबाबत नंतर निर्वाचक अधिकाऱ्यास वा आयोगास कळल्यास आपण कारवाईस पात्र होवु शकता.

२२. एखादा मतदार अनावश्यकरित्या मतदान करण्यास जास्त वेळ घेत आहे वा तो मतदान यंत्रास कोणत्याही प्रकारची इजा पोहचवण्याचा प्रयत्न करित आहे वा मतदाराने मतदान केल्यानंतर बॅलेट युनिट मध्ये काही काडी / टाचणी सारख्या वस्तू अडकवुन ठेवल्याने मतदान प्रक्रीयेत अडथळानिर्माण झाला तर तुम्ही मतदान कक्षात प्रवेश करू शकता परंतु त्यावेळी तुम्ही एकटे न जाता मतदान प्रतिनिधीं सोबत जावुन कार्यवाही करू शकता.

२३. मतदार यादीतील नोंद ही संबंधीत मतदार १८ वर्षाचा असल्याचा पुरावा आहे तरीही एखादा मतदार हा खुपच लहान वयाचा वाटत असल्यास त्याच्याकडून वयाबाबत घोषणापत्र घेवुन पुराव्यांच्या आधारे मतदान करण्यास दयावे.

२४. मतदान शांततेने आणि सुरळीत पार पडावे म्हणून मतदान प्रक्रियेवर तुम्हाला नियंत्रण ठेवायला हवे. त्यासाठी तुम्ही शिस्तबध्दता ठेवावी आणि नि:पक्षपाती दृष्टीकोन ठेवावा.

२५. निवडणूक आयोगाने निश्चित करुन दिलेल्या वेळेतच मतदान बंद करावे. काही कारणाने मतदान उशीरा सुरु झालेले असले तरी बंद मात्र वेळीच केले पाहिजे. परंतु मतदानाच्या विहित वेळेत रांगेत उभ्या असलेल्या सर्व मतदारांना मतदान करु द्यावे. मग मतदानाची वेळ संपलेली असली तरी चालेल. मात्र खात्री करुन घ्या की, मतदानाची वेळ संपल्यानंतर कुणीही नवा मतदार रांगेत उभा राहणार नाही. त्यासाठी रांगेत उभ्या असलेल्या मतदारांना तुम्ही चिठया द्या. या चिठया रांगेत शेवटी उभ्या असलेल्या मतदारापासून देण्यास सुरवात करा.

२६. मतदान बंद झाल्यानंतर नमुना व्हीएम-३ मध्ये मतदानाच्या नोंदीचा ताळेबंद द्यावा. या ताळेबंदाची अधिकृत प्रत उपस्थित असलेल्या प्रत्येक उमेदवारास किंवा मतदान प्रतिनिधीला द्यावी.अशी प्रत दिल्याचे प्रतिज्ञापत्र तुम्ही आयोगाने दिलेल्या विहित नमुन्यात द्यावे.

२७. मतदान बंद झाल्यानंतर मतदान यंत्र आणि मतदानाचे इतर साहित्य निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार व्यवस्थित सीलबंद करावे. उपस्थित असलेले उमेदवार अथवा मतदान प्रतिनिधींनाही त्यांची इच्छा असल्यास मतदान यंत्र आणि मतदान कागदपत्रे सीलबंद करताना त्या संदर्भातील सूचनांचे काळजीपूर्वक पालन करावे.

२८. मतदान यंत्र आणि मतदानाशी संबंधित कागदपत्रे योग्यप्रकारे सीलबंद करुन ती जमा करणा-या अधिका-याकडे सुपूर्द करणे आणि त्या संबंधीची पोच पावती घेणे ही तुमची व्यक्तिगत जबाबदारी आहे.

२९. मतदानाच्या विविध प्रक्रिया काळात तुमच्या जबाबदारी संदर्भात पाच वेगवेगळया गटात जबाबदारीची विभागणी केली असून ती जोडपत्र-२ मध्ये देण्यात आली आहे.

## १.७ चेक मेमो

निवडणुकीसंदर्भातील विविध वैधानिक आवश्यकतांची तुम्ही पूर्ती केली आहे किंवा नाही याची खातरजमा करण्यासाठी निवडणूक आयोगाने तुमच्यासाठी 'चेक मेमो' तयार केला आहे. तो चेक मेमो **जोडपत्र-३** मध्ये देण्यात आला आहे. या चेक मेमोचे तुम्ही काटेकोरपणे पालन करावे.

## प्रकरण – २
## मतदान पथक स्थापन करणे आणि सरावासाठी तालीम घेणे

**२.१. मतदान पथक :** स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी तुमच्या मतदान पथकात तुम्ही आणि दोन किंवा तीन मतदान अधिका-यांचा समावेश असेल. मतदान केंद्रात १२०० ते १४०० मतदार असतील. जर त्यापेक्षा जास्त मतदार असतील तर तुमच्या मदतीसाठी अतिरिक्त मतदान अधिकाऱ्याची नेमणूक निर्वाचन अधिकारी करतील. मतदान पथक स्थापन करताना निर्वाचन अधिकारी एका मतदान अधिकाऱ्यास तुमच्या गैरहजेरीत मतदान केंद्राध्यक्षाचे कार्य करण्याची परवानगी देईल. तुम्ही मतदान केंद्रातून अपरिहार्य कारणास्तव गैरहजर राहिल्यास तो तुमचे काम पाहील.

**२. २ मतदान पथकाच्या इतर सदस्यांशी संपर्क :** तुमच्या मतदान पथकातील इतर सदस्य कोण आहेत त्याची माहिती मिळवा. तुमच्या अधिकाराखाली काम करणाऱ्या सर्व मतदान अधिकाऱ्यांचे मोबाईल नंबर, निवासी पत्ते तुम्ही जवळ ठेवायला हवेत. त्यांना तालमीचे वेळी भेटून तुम्ही त्यांना त्यांचे काम समजावून द्यायला हवे. जर सांघिक कामाची पध्दत अवलंबिली नाही तर तुमचे काम कठीण होईल.

### २.३. मतदानाचे प्रशिक्षण:-

**२.३.१** मतदानाचे प्रशिक्षण कोणत्याही परिस्थीतीत टाळू नये. आपल्या पथकातील सर्व मतदानाच्या सर्व प्रशिक्षणास वा प्रात्यक्षिकास उपस्थित रहातील याची काळजी घ्या. मतदान यंत्राची प्रत्येक बाब शिकून घ्या. आवश्यक तितका वेळ हँड्स ऑन ट्रेनिंग घ्या. तसेच मतदान केंद्रातील प्रक्रिया व कायद्याच्या तरतुदी जाणून घ्या, त्यासाठी अशी प्रशिक्षणे आवश्यक आहेत.

**२.३.२** तुमच्या गैरहजेरीत मतदान केंद्राध्यक्ष म्हणून काम करण्यास परवानगी दिलेल्या मतदान अधिका-यास तालमीच्यावेळी सोबत घेऊन जा. तुम्ही मतदान यंत्र प्रत्यक्ष हाताळा केवळ प्रात्यक्षिक बघून चालणार नाही. तुम्ही दोघांनी सील लावणे, पत्त्याचे टॅग लावण्याचे प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे.

**२.३.३** नमुना व्हीएम-३ मध्ये कागदी मोहोरांचा हिशेब आणि नोंदणी झालेल्या मतांचा हिशेब ठेवणे या बाबी तुम्ही समजावून घेणे आवश्यक आहे.

**२.३.४** यापूर्वी जरी तुम्ही मतदान केंद्राध्यक्ष किंवा मतदान अधिकारी म्हणून काम केलेले असले तरी तुम्ही या प्रशिक्षण किंवा प्रात्यक्षिकांना उपस्थित रहावे. कारण तुम्हाला मतदान यंत्रावर काम करण्याचा अनुभव नसेल. त्याचप्रमाणे निवडणुकीचे नियम व कायदे वेळोवेळी बदलतात. त्याचीही तुम्हाला माहिती होणे आवश्यक आहे. कोणत्याही कायद्याची वा नियमांची अद्ययावत माहिती ठेवणे ही सर्वात चांगली गोष्ट आहे.

### २.४. टपाली मतपत्रिका आणि निवडणूक कामाशी संबंधित असल्याचे प्रमाणपत्र

**२.४.१** तुम्ही आणि तुमचे मतदान अधिकारी तुम्ही नियुक्त झालेल्या मतदान केंद्रातील किंवा दुस-या मतदान केंद्रातील मतदाते असाल याची जाणीव ठेवून निर्वाचन अधिकारी तुम्हाला मतदान केंद्राध्यक्ष नियुक्तीचे आदेश देतील आणि त्याबरोबरच पुरेसे विहित नमुन्यातील अर्ज पाठवतील. हे अर्ज तुम्हाला व तुमच्या मतदान अधिकाऱ्यांना टपालाद्वारे मतदान करण्यास व निवडणूक कामावर नियुक्त असल्याचे प्रमाणपत्र मिळविण्यास उपयोगात आणता येतील. जर तुम्ही किंवा तुमच्या पथकातील कुणीही त्याच मतदार संघातील मतदार असाल तर तुम्ही विहित नमुन्यात निवडणूक निर्णय अधिका-याकडे अर्ज करुन निवडणूक कामावर नियुक्त असल्याचे प्रमाणपत्र मिळवा. आणि जर तुम्हाला नियुक्त केलेल्या मतदान केंद्राच्या मतदार संघाचे तुम्ही मतदार नसाल तर विहित नमुन्यात अर्ज करुन टपालाद्वारे मतदान करण्यासाठी मतपत्रिका मिळवा.

प्रशिक्षणा दरम्यान आपल्याला प्राप्त टपाली मतपत्रीका केव्हा, कुठे व कशी भरावी याबाबत सर्व माहिती घ्यावी. त्यासाठी तुम्ही तुम्हाला पाठविलेल्या नियुक्ती आदेशाची नक्कल प्रत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना दाखवुन निवडणूक कामावर नियुक्त असल्याचे प्रमाणपत्र वा टपालाद्वारे मतपत्रिका वेळेत मिळवा जेणेकरून तुम्हाला वेळेत मतदान करणे कठीण जाईल.

**२.४.२** प्रशिक्षण आणि प्रात्यक्षिकांसाठी निर्वाचन अधिकारी प्रत्येक मतदार यादीची नक्कल प्रत निरीक्षणासाठी प्रशिक्षण केंद्रावर वा प्रात्यक्षिक केंद्रात उपलब्ध करुन देईल. त्यामुळे टपालाद्वारे मतदान करण्यासाठी किंवा निवडणूक कामावर असल्याचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज भरण्यास आवश्यक ती माहिती तुम्हाला उपलब्ध होईल.

**२.४.३** राज्य निवडणूक आयोगाकडील टपाली मतपत्रिका आदेशामधील तरतुदीनुसार मतदान करणा-या निवडणूक कर्मचा-यांनी सदर आदेशातील तरतुदींचे पालन करणे आवश्यक आहे. जेणेकरुन त्यांना निवडणूक कर्तव्यार्थ नेमलेल्या मतदान केंद्रावर अथवा टपालाद्वारे मतदान करणे शक्य होईल.

## प्रकरण – ३

## मतदान यंत्रे आणि मतदानाचे साहित्य ताब्यात घेणे

३.१. **मतदानाचे साहित्य :-**मतदानाच्या आदल्या दिवशी अथवा मतदान केंद्राचा ताबा घेण्यासाठी जाताना तुम्हाला मतदानाचे आवश्यक ते सर्व साहित्य देण्यात येईल. या साहित्याबद्दलची यादी **जोडपत्र-चार** मध्ये देण्यात आली आहे. हे सर्व साहित्य तुम्हाला मिळाले आहे याची खात्री करुन घ्या.

३.२.२ **मतदान यंत्राची तपासणी :-**पुढील गोष्टींची विशेष चाचणी करा.

३.२.१ तुम्हाला देण्यात आलेल्या मतदान यंत्राचे (१) नियंत्रण विभाग आणि (२) मतदान विभाग तुमच्या मतदान केंद्रासाठी देण्यात आलेल्या मतदान केंद्राचेच आहेत याची खात्री करा. ही खातरजमा करण्यासाठी यंत्राच्या पृष्ठभागावर निर्वाचन अधिका-याने लावलेली पत्त्याची खूणचिठठी (टॅग) पहावी.

३.२.२ नियंत्रण विभागाचा **कॅन्ड सेट सेक्शन** योग्यप्रकारे **सीलबंद** आहे व त्यावर खूणचिठठी लावली आहे की नाही हे पहावे.

३.२.३ कॅन्ड सेट सेक्शनमधील बॅटरी चालू आहे की नाही याचीही खात्री करा. त्यासाठी यंत्राच्या मागे असलेला वीजेचा स्वीच सुरु (On) करुन पहा. नंतर तो स्वीच बंद (Off) करा.

३.२.४ तुमच्या निवडणूक विभागात / निर्वाचक गणात किती उमेदवार आहेत त्यांच्या संख्येनुसार तुम्हाला आवश्यक तेवढे बॅलेट युनीट देण्यात आले आहे की नाही याची खात्री करा आणि मतपत्रिका स्क्रीन खाली तुमच्याच मतदान केंद्राशी निगडीत निवडणूक विभागात / निर्वाचक गणाची मतपत्रिका लावण्यात आली आहे की नाही हेही तपासून घ्या.

३.२.५ भारत निवडणूक आयोगाचे मतदान यंत्र वापरत असल्यास, जेव्हा निवडणूक लढविणा-या नोटासह उमेदवारांची संख्या १६ (राज्यनिवडणूक आयोगाच्या मतदान यंत्रात १५) पर्यंत असेल तेव्हा एकच बॅलेट युनिट वापरावे लागेल व त्यावेळी आतल्या बाजूचा स्लाईड स्वीच **१** वर ठेवावा लागेल. जेव्हा निवडणूक लढविणाऱ्या नोटासह उमेदवारांची संख्या **१७** आणि **३**२ (राज्य निवडणूक आयोगाच्या मतदान यंत्रात १६ ते ३०) यामध्ये असेल तेव्हा **२** बॅलेट युनिट वापरावे लागतील, तेव्हा पहिल्या बॅलेट युनिटमध्ये **१** ते **१**६ उमेदवार असल्यामुळे त्या युनिटमधील स्लाईड स्वीच **१** वर ठेवावा लागेल. तर दुसऱ्या बॅलेट युनिटमधील स्लाईड स्वीच उमेदवार **१७** ते ३२ पर्यंत असल्यामुळे **२** वर ठेवावा लागेल. अशा तऱ्हेने जर तीन बॅलेट युनिट वापरावयाची असतील व उमेदवारांची संख्या **३३** ते **४८** (राज्य निवडणूक आयोगाच्या मतदान यंत्रात ३१ ते ४५) च्या मध्ये असेल तर पहिल्या बॅलेट युनिटमधील स्लाईड स्वीच **१** वर,दुसऱ्या बॅलेट युनिटमधील स्लाईड स्वीच **२** वर तर तिसऱ्या बॅलेट युनिटमधील स्लाईड स्वीच **३** वर ठेवावा लागेल. अशाच रितीने उमेदवारांची संख्या **४९** ते **६४** च्या दरम्यान असल्यास (राज्य निवडणूक आयोगाच्या मतदान यंत्रात ४६ ते ६० ) व **४** बॅलेट युनिट वापरावयाची असल्यास चौथ्या व शेवटच्या बॅलेट युनिटवरील स्लाईड स्वीच **४** वर ठेवावा लागेल.

टीप:- वरील परिच्छेदात नमूद केलेली स्लाईड स्वीच सेट करण्याची बाब योग्यरीतीने न केल्यास संपूर्ण मतदान यंत्र निरुपयोगी ठरेल. यास्तव बॅलेट युनिटमधील स्लाईड स्वीच सेट करणे ही बाब अत्यंत महत्वाची आहे, हे ध्यानी घ्यावे.

३.२.६ वर म्हटल्याप्रमाणे मतपत्रिका आणि स्लाईड स्वीच योग्यप्रकारे लावण्यात आले आहेत का हे तपासावे. मतपत्रिका अशारीतीने ठेवण्यात आलेली असावी जेणेकरुन प्रत्येक उमेदवाराचे नाव व त्याचे चिन्ह त्याच्या समोरील बटण आणि दिवा यांच्या समोर येईल व दोन्ही उमेदवारांच्या चौकोनावरील जाड रेषा बॅलेट युनिटमधील रेषांशी जुळतील. बॅलेट पेपरची संरेखन (Alignment) जुळलेली असणे महत्वाचे आहे.

३.२.७ जेवढे स्पर्धक उमेदवार असतील तेवढेच बटन मतदान युनिटवर असायला हवेत. बाकीची बटने लपली (Masked) जातील अशी व्यवस्था करावी. **राज्य निवडणूक आयोगाचे मशीन वापरत असल्यास "END" बटण बंद असल्याची खात्री करा**

३.२.८ प्रत्येक मतदान युनिट उजवीकडे वरच्या आणि खालच्या बाजूला सीलबंद आहेत का पहावे. त्यावर निर्वाचन अधिका-याचा सील आणि पत्ता असलेली खूण चिठठी (Tag) आहे की नाही हेही पहावे.

**(राज्य निवडणूक आयोगाच्या मतदान यंत्रात दोन पेक्षा अधिक जागांसाठी निवडणूक घेता येत असल्याने त्याप्रमाणे तपासणी करावी.)**

३.३ **मतदान साहित्याची तपासणी:** -खालील बाबी देखील तपासा.

१) तुम्हाला न मिटणाऱ्या शाईचे मार्कर पेन देण्यात आले असतील तर ते सीलबंद असतात तसेच त्यावर एक्स्पायरी डेट छापलेली असते ती तपासा. त्यामधील शाई सुकलेली नाही हे प्रत्यक्ष वापर करुन तपासा.

२) **मतदार यादीचा** तुमचा भाग संपूर्ण आहे आणि त्याच्या सर्व प्रती एकसारख्याच आहेत का? हे पहा.

अ) मतदार यादीचा जो भाग तुम्हाला आला आहे तो तुमच्या मतदान केंद्राशी संबंधित आहे आणि जोड याद्याही व्यवस्थित आहे की नाही हे पहा.

ब) जोड याद्यांत नावे गाळणे, शब्द शुध्दीकरण आणि इतर चुकांची केलेली दुरुस्ती **तीनही नक्कल** प्रतीवर केलेल्या आहेत किंवा कसे? याची खात्री पटवा.

क) ज्यावर नोंदी करण्यात येणार आहे त्या मतदार यादीच्या प्रत्येक पानावर अनुक्रमांक (१ आकडयाने सुरवात करुन) घातलेले आहे की नाही हे पहा.

ड) मतदारांच्या छापील अनुक्रमांकात खाडाखोड वा दुरुस्ती केलेली नाही आणि नवे क्रमांक घालण्यात आलेले नाहीत याची खात्री करा.

इ) मतदार यादीहि निर्वाचन अधिकारी/ सहा. निर्वाचन अधिकारी यांच्या सहीने अधिप्रमाणित करण्यात आल्या आहेत याची खात्री करा.

३) तुम्हाला देण्यात आलेल्या प्रदत्त मतपत्रिका (टेंडर्ड बॅलेट पेपर) तुमच्या मतदान केंद्राशी संबंधित निवडणूक विभाग / निर्वाचक गणाचेच आहेत आणि त्यात कोणत्याही त्रुटी नाहीत याची खात्री करा. तुम्हाला पुरविण्यात आलेल्या तपशीलाशी प्रदत्त मतपत्रिकांचे अनुक्रमांक जुळतात वा नाही याची खात्री करा.

४) तुमच्या मतदान केंद्राशी निगडीत उमेदवारांच्या व त्यांच्या निवडणूक प्रतिनिधीच्या सहिचा नमुना तुम्हाला पुरविण्यात आला आहे याची खात्री करावी. सदरचा नमुना तुम्हाला मतदान प्रतिनिधीच्या नेमणुकीसाठी आवश्यक असणार आहे.

५) मतदान यंत्र सिल करण्याच्या पट्टी सील,पेपर सील, मार्कर पेन वै सामान तपासून घ्यावे.

३.४. मतदान यंत्रे वा मतदानाच्या साहित्यात काही त्रुटी आढळल्या तर त्याची माहिती लगेच हे साहित्य व यंत्रे पुरविणाऱ्या अधिकाऱ्यास अथवा निवडणूक निर्णय अधिका-यास द्या.

## प्रकरण – ४
## मतदान केंद्रे स्थापन करणे

**४.१ प्रवासः-** तुमच्या मतदान केंद्रात पोचण्यासाठीचा मार्ग, साधन आणि वेळेचा निश्चित आराखडा याची माहिती करुन घ्या. प्रवास मार्ग, साधन आणि वेळेचा सविस्तर तपशील तुम्हाला आगाऊ देण्यात येईल.

**४.२ मतदान केंद्रात आगमनः-**

४.२.१ मतदान साहित्य घेवून आपण आदल्या दिवशी मतदान केंद्रात पोहचणार आहात. मतदान यंत्र व इतर साहित्य याची संपुर्ण जबाबदारी हि मतदान केंद्राध्यक्ष म्हणून आपली आहे. कोणत्याही परिस्थितीत हे साहित्य उघडयावर राहणार नाही तसेच पोलिसांच्या ताब्यात देवून आपल्याला मतदान केंद्र सोडता येणार नाही, सबब आपण वा आपले मतदान अधिकारी हे त्या सामानाची जबाबदारी घेतील.

४.२.२ मतदान केंद्रावर राहणाऱ्या मतदान केंद्राध्यक्ष वा अधिकाऱ्याची राहण्याची योग्य ती सोय करणे निर्वाचक अधिकाऱ्याची जबाबदारी असेल, कोणत्याही परिस्थितीत **तो स्थानीक लोकांच्या आश्रयाला राहणार नाही.**

४.२.३ आपण मतदान सुरु होण्यापूर्वी कमीत कमी ७५ मिनिटे अगोदर मतदान केंद्रात उपस्थित रहाणे आवश्यक आहे तरी त्या दृष्टीने नियोजन करावे.

**४.३ मतदान अधिका-याची अनुपस्थितीः-** जर तुमच्या मतदान केंद्रातील एखादा मतदान अधिकारी अचानक अनुपस्थित राहिला तर त्याच्या जागी नवा मतदान अधिकारी नेमण्याचा तुम्हाला अधिकार आहे. नंतर तुम्ही त्याच्या नियुक्तीची माहिती निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना कळवा. अशी नेमणूक करताना, अशी व्यक्ती उमेदवाराचा सक्रिय पाठीराखा अथवा उमेदवाराचा सक्रिय विरोधक व्यक्तीची नाही याची काळजी घ्या.

**४.४ केंद्राध्यक्षांची कामेः-**

४.४.१ आजारपण किंवा अपरिहार्य कारणास्तव तुम्हाला मतदान केंद्रात गैरहजर रहावे लागले तर निर्वाचन अधिकाऱ्याने पूर्वीच परवानगी दिलेल्या मतदान अधिकाऱ्यास तुमची जागा घ्यावी लागेल. त्याला मतदान केंद्राध्यक्षांचे सर्व अधिकार असतील व त्याच्या सर्व जबाबदाऱ्या त्यास पार पाडाव्या लागतील.

४.४.२ तुमच्या मतदान केंद्रातील कोणत्याही मतदान अधिकाऱ्यास तुमचे एखादे कार्य तुम्ही देऊ शकता. परंतु असे कार्य दुसऱ्या मतदान अधिकाऱ्यास दिले म्हणून तुमची जबाबदारी संपत नाही. केंद्राध्यक्ष म्हणून केंद्रात सुरळीत मतदान घेणे ही सर्वस्वी तुमची जबाबदारी आहे.

**४.५ मतदान केंद्रे स्थापन करणेः-**

४.५.१ जेथे तुमची नियुक्ती केली आहे त्या मतदान केंद्राच्या इमारतीकडे पोचल्यानंतर इमारतीची तपासणी करा. जर मतदान केंद्र स्थापन करण्यात आले असेल तर मतदान केंद्राची तपासणी करा. तीन मतदान अधिकारी असलेल्या मतदान पथक आणि मतदान केंद्राचा आराखडा (एका निवडणुकीसाठी) **जोडपत्र-५** मध्ये दाखविण्यात आला आहे. त्यानुसार मतदान केंद्राची रचना करा. आवश्यक वाटल्यास रचनेत किरकोळ फेरफार तुम्हाला करता येतील. परंतु तसे करताना खालील मुद्दे लक्षात असू द्या.

अ) मतदान केंद्राच्या बाहेर उभे राहण्यासाठी मतदारांना पुरेशी जागा उपलब्ध होईल.

ब) शक्यतो महिला आणि पुरुषांसाठी वेगवेगळया रांगेची व्यवस्था करा.

क) मतदारांना मतदान केंद्रात येण्यासाठी आणि बाहेर जाण्यासाठी वेगवेगळी जागा ठेवा. जर दरवाजा एकच असेल तर शक्य झाल्यास मध्ये दोरी /बांबू बांधून येण्या-जाण्याचा मार्ग निश्चित करा.

ड) मतदारांना मतदान केंद्रात येण्या-जाण्यासाठी सहजता असली पाहिजे. मतदान केंद्रात गर्दी-गोंधळ असू नये.

इ) मतदान प्रतिनिधींना बसण्याची अशी व्यवस्था केलेली असावी की त्यांना मतदान केंद्रात शिरणाऱ्या प्रत्येक मतदाराचा चेहरा स्पष्ट दिसावा. म्हणजे आवश्यकता असेल तर मतदाराच्या ओळखीबद्दल आव्हान देणे त्यांना शक्य होईल. तसेच मतदान यंत्राचा नियंत्रण विभाग ज्या मतदान अधिकाऱ्याकडे असतो त्याच्या पासुन मतदान केंद्राध्यक्षाच्या सर्व हालचाली दिसतील. मतदाराने मतदान विभागात शिरणे व मतदान करुन बाहेर पडेपर्यंतच्या सर्व हालचालींचा मतदान प्रतिनिधींना अंदाज घेता येईल. परंतु मतदार, कुणाला मतदान करतो आहे म्हणजेच बॅलेट युनीट दिसणार नाही अशी व्यवस्था हवी.

फ) मतदान अधिका-यांच्या बसण्याच्या जागेची अशाप्रकारे व्यवस्था करा की, त्यांनाही मतदाराने कोणते बटन दाबून मतदान केले हे दिसणार नाही.

ग) राज्य निवडणूक आयोगाने क्र.रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र.३४/का.५, दि.२४/१२/२००६ **(जोडपत्र-१९)** अन्वये दिलेल्या आदेशानुसार अपंग मतदारांसाठी तळमजल्यावर मतदान केंद्राची/रॅम्पची सुविधा पुरविली असल्यास त्याचा वापर त्यांना करु द्यावा.

ह) मतदान विभाग हा २१"*२१"*२१" ह्या साईजचा असणार आहे तसेच जिथे भारत निवडणुक आयोगाची मशीन्स वापरली जाणार आहेत तिथे जिल्हा परिषद व पंचायत समीतीसाठी स्वतंत्र बॅलेट युनीट वा जिथे १६ पेक्षा जास्त उमेदवार आहेत तिथे एकापेक्षा अधिक बॅलेट युनीट असणार आहेत.त्याप्रमाणे आखणी करणे गरजेचे असणार आहे.

कंट्रोल युनीट व बॅलेट युनीट यांना जोडणारी केबल हि साधारणपणे ५ मीटर इतकी लांब असते, त्यामुळे ती मतदान विभागाच्या पाठच्या बाजुने असणाऱ्या खाचेतून बॅलेट युनीटला जोडताना अनावश्यकरित्या ताणली जाणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच सदरची केबल कापडामध्ये वा इतर रितीने लपवुन ठेवू नये, ती सहज दिसू दयावी जेणेकरून मतदान कक्षात जाताना केबलला मतदार अडखळणार नाही.

४.५.२ जर तुमच्या मतदान केंद्रात बऱ्याच बुरखाधारी महिला येणार असतील तर त्यांची ओळख पटविण्यासाठी आणि त्यांच्या **तर्जनीवर** मतदान शाई लावण्यासाठी महिला मतदान अधिकाऱ्याची आवश्यकता असेल तरी टिममध्ये महिला अधिकारी असेल याची खात्री करा. तसेच या बुरखाधारी महिलांची ओळख पटविताना त्यांच्या नैतीक मुल्यांचा मान राखणेकामी अतिशय सोप्या पद्धतीने आडोसा निर्माण करावा.

४.५.३ जर एकाच इमारतीत एकापेक्षा अधिक मतदान केंद्रे असतील तर मतदारांचा गोंधळ उडू नये म्हणून प्रत्येक मतदान केंद्रासमोर त्या त्या मतदान केंद्राच्या मतदारांना रांगेत उभे राहण्यासाठी पुरेशी जागा आहे किंवा नाही? याची खात्री करा.

४.५.४ जर मतदान केंद्र खाजगी इमारतीत असेल तर ती इमारत आणि तिच्या भोवतीच्या १०० मीटर परीघातील क्षेत्र तुमच्या अधिकाराखाली असेल. प्रेक्षक किंवा इमारतीच्या मालकाशी संबंधित कुणाही व्यक्तिला मग ते हत्यारबंद असो वा नसो त्यांना मतदान केंद्रात वा त्याच्या १०० मीटर परिघात राहण्यास

परवानगी देऊ नका. मतदान केंद्रातील व केंद्राभोवतीच्या १०० मीटर परिघातील सुरक्षा व्यवस्थेची जबाबदारी तुमच्या नियंत्रणाखालील पोलिसांची असेल.

४.५.५ **निवडणुकीवर परिणाम करु शकतील असे राजकीय नेत्यांचे फोटो आणि घोषणा लावण्यात येणार नाही याची खबरदारी घ्या आणि तसे फोटो वा घोषणा पूर्वीच तेथे असतील तर त्या मतदान संपेपर्यंत काढून टाकण्याची व्यवस्था करा.**

४.५.६ मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रात स्वयंपाकासाठी किंवा इतर कोणत्याही कारणासाठी आगीचा वापर करु देऊ नका.

४.५.७ जिथे जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी स्वतंत्र बॅलेट युनीट असणार आहे तिथे जर मतदान कक्ष स्वतंत्र ठेवण्यात येणार असेल तर त्यावर "जिल्हा परिषद निवडणूक"व "पंचायत समीती निवडणूक"साठी असे सूचना फलक असावा

## ४.६ सूचना लावणे

४.६.१ **प्रत्येक मतदान केंद्राबाहेर ठळकपणे पुढील सूचना लावा.**

अ) मतदानाचे क्षेत्र किंवा मतदान केंद्राशी निगडीत मतदार यादीतील कोणत्या अनुक्रमांकापासून कोणत्या अनुक्रमांकापर्यंत मतदारांना मतदान करता येईल याबद्दलच्या सूचना.

ब) निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची नावे दर्शविणारी डमी मतपत्रिका

४.६.२ सदरच्या सूचना या मतपत्रिका ज्या भाषेत असेल त्याच भाषेत असावी आणि नावाचा अनुक्रमांकही या यादीप्रमाणेच असावा.

# प्रकरण -५

## मतदान केंद्राची सुरक्षितता

५.१ मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर काम करणारा कर्मचारी-अधिकारी वर्ग हा राज्य निवडणूक आयोगाच्या अधिक्षण, संचलन व नियंत्रणाखाली काम करेल. सबब मतदान निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याची संपूर्ण जबाबदारी त्याच्यावर आहे.

५.२ मतदान केंद्राचा २०० मीटर परिघ हा मतदान केंद्राध्यक्षाच्या ताब्यात राहील. मतदान केंद्र खाजगी इमारतीत असल्यास सदर मतदान केंद्राच्या २०० मीटर परिघात खाजगी इमारतीचा मालक व त्याचे सुरक्षा रक्षक प्रवेश करणार नाही. तसेच सदर क्षेत्रात कोणत्याही पक्षाचे/प्रतिनिधीचे कार्यालय राहणार नाही.

५.३ मतदान केंद्राच्या १०० मीटर परिघात मतदान केंद्रावर कर्मचारीवृंद/पोलीसांव्यतिरिक्त कोणीही मोबाईल/कॉडलेस फोन/वायरलेस वापरणार नाही.

५.४ मतदान केंद्रावर, मतदानाच्या गोपनियतेचा भंग करणे , मतदान केंद्र ताब्यात घेण्याचा प्रयत्न करणे, मतदान केंद्रात वा केंद्राजवळ बेबंद वर्तणूक करणे यासारख्या वर्तुणूकीला प्रतिबंध करणेकामी मतदान केंद्राध्यक्षाला कार्यकारी दंडाधिकाऱ्याचे अधिकार दिलेले असतात तरी पोलिसांच्या मदतीने योग्य ती कार्यवाही करावी.

५.५ मागील निवडणुकीतील मतदान प्रक्रियेशी निगडित गुन्हे, मतदानाची सरासरी,मतदार यादीतील फोटो, ओळखपत्र प्राप्त मतदारांची सरासरी, कुटुंबविरहित न सापडणाऱ्या मतदारांची संख्या लक्षात घेऊन, भारत निवडणूक आयोगाच्या परिपत्रक क्रमांक- ४६४/INST/२००८-EPS, दिनांक २४/१०/२००८ नुसार संवेदनशील /अतिसंवेदनशील मतदान केंद्रांची निश्चीती पोलीस यंत्रणेशी समन्वय साधून क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या मदतीने जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांचेकडून करण्यात आली असेल.

अशा संवेदनशील/अतिसंवेदनशील मतदान केंद्रात अतिरिक्त पोलीसवृंद, आवश्यकतेनुसार डिजिटल / व्हिडिओ कॅमेरे लावणे, मतदारांची ओळख पटविताना विशेष काळजी घेणे यासारख्या उपाययोजना करण्यात आल्या असतील अशा मतदान केंद्रावर आपण मतदान केंद्राध्यक्ष वा अधिकारी असल्यास विशेष काळजी घ्यावी.

५.६ भारत निवडणूक आयोगाकडील परिपत्रक क्र. ४६४/INST/२००७-PLN-१, दिनांक १२/१०/२००७ नुसार मतदार संघात असणाऱ्या असुरक्षित/कमजोर मतदारांचा समूह/विभाग (Vulnerable Mapping) असल्यास तो शोधून काढणे, त्यांना जोडलेल्या मतदान केंद्रावर विशेष दक्षता घेणेबाबत काही महत्वाच्या सूचना पारित करण्यात आल्या आहेत, त्या सूचनांचे तंतोतंत पालन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांतही करण्यात यावे अशा आयोगाच्या सुचना आहेत

(अ) तहसिलदार/गटविकास अधिकारी/पोलीस यंत्रणा यांच्या संयुक्त प्रयत्नाने असे कमकुवत गट शोधून काढण्यात येतील. अशा विभागात असुरक्षितता निर्माण करणाऱ्या गुंड प्रवृत्तींच्या व्यक्तींविरुध्द प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेबाबत पोलीस यंत्रणेला तात्काळ कळवण्यात आले असेल.

(ब) अशा विभागात संबंधित मतदारांमध्ये विश्वास निर्माण होण्याकामी क्षेत्रीय अधिकारी, निर्वाचन अधिकारी, पोलीस अधिकारी यासारखे अधिकारी वारंवार भेटी देतील. तेथील प्रतिष्ठित व्यक्तींशी संपर्क साधून होणाऱ्या घडामोंडींचा आढावा घेतील.

(क) परंतु मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राध्यक्षांना अशा विभागातून होणाऱ्या मतदानाच्या आकडेवारीवर विशेष लक्ष ठेवील. अशा ठिकाणी मतदान कमी होत असल्याचे निदर्शनास आल्यास तसे तात्काळ निर्वाचन अधिकाऱ्यास कळवेल. आपल्या अहवालानुसार विशेष पथक तात्काळ भेट देऊन मतदारांना मतदान करण्याकामी प्रवृत्त करावे.

५.७ मतदान केंद्रात कुणाला प्रवेश असेल कुणाला नाही याबाबत प्रकरण-६ मधील सूचनांचा अभ्यास करावा व त्याप्रमाणे योग्य ती कारवाई करावी.

५.८ मतदान साहित्य वाटप केंद्र ते मतदान केंद्र तसेच मतदान केंद्र ते मतदान साहित्य स्विकृती केंद्र हा प्रवास व प्रत्यक्ष मतदान केंद्र ताब्यात घेतले पासून मतदान प्रक्रीया पुर्ण होईस्तोवर मतदान केंद्रावर मतदान केंद्राध्यक्ष व त्याच्या टिम सोबत पोलिस बंदोबस्त असेल.

# प्रकरण – ६

## मतदान अधिकाऱ्यांना कामे वाटून देणे

### ६.१ मतदान केंद्रातील मतदान प्रक्रिया आणि मतदान अधिका-यांची कामे

तुमच्या मतदान केंद्रातील मतदान सुरळीत व कार्यक्षमपणे पार पडावे म्हणून मतदार तुमच्या केंद्रात आल्यापासून तो मतदान करुन बाहेर पडेपर्यंतच्या सर्व मतदान सोपस्काराची तुम्हाला पूर्ण माहिती असणे आवश्यक आहे. अशा मतदानाची प्रक्रिया आणि मतदान अधिकाऱ्याने पार पाडावयाची कार्ये संबंधित भागात चर्चिण्यात आली आहेत. तथापि, मतदान अधिकाऱ्यांना करावयाची कार्ये ढोबळरित्या पुढीलप्रमाणे असतील.

एक मतदान केंद्राध्यक्ष तीन मतदान अधिकाऱ्यांचा समावेश असलेल्या मतदान पथकाच्या निवडणुकीसाठी मतदान अधिकाऱ्याची कार्ये.

### ६.२. प्रथम मतदान अधिकारी

६.२.१ प्रथम मतदान अधिकाऱ्याकडे चिन्हांकित मतदार यादी असेल आणि मतदाराची ओळख पटविण्याची त्याची जबाबदारी असेल. मतदान केंद्रात शिरल्यानंतर मतदार प्रथम मतदान अधिकाऱ्याकडे जाईल. मतदाराची तो ओळख पटवील. **(जोडपत्र-१२ मधील पुरावे विचारात घेणे.)** जेव्हा **जिल्हा परिषद व पंचायत समिती या दोनही पदांची निवडणूक एकाचवेळी होत असेल तेव्हा** हा मतदान अधिकारी चिन्हांकीत मतदार यादीमध्ये मतदाराच्या नावावर खूण करण्यापूर्वी त्याला जिल्हा परिषद व पंचायत समिती **अशी दोनही मते देणे आवश्यक आहे याची जाणीव करुन देईल.**

### ६.३. दुसरा मतदान अधिकारी

६.३.१ दुसऱ्या मतदान अधिकाऱ्याकडे बोटाला लावण्याची पक्की शाई असेल. तो मतदाराच्या डाव्या हाताची **तर्जनी** पाहील आणि त्यावर शाईची निशाणी नाही ना याची खातरजमा करील आणि नंतर त्यावर न मिटणाऱ्या शाईच्या मार्कर पेनने चिन्ह करील. त्याकरिता मार्कर पेन दाबून वापरावा. तसेच मार्कर पेनचा वापर निशाणीसाठी **डाव्या हाताच्या तर्जनीवर ३-४ वेळा घासून** करावा. याबाबत राज्य निवडणूक आयोगाचे निदेश पत्र क्र.रानिआ/मनपा-२०१०/प्र.क्र.१०/का.५, दि.१९/११/२०११ ( **जोडपत्र-१७)** कृपया पहा.

६.३.२ दुसऱ्या मतदान अधिकाऱ्याकडेही **नमुना व्हीएम-१** मध्ये मतदार नोंदवही असेल. तो नोंदवहीत ओळख पटविलेल्या व मतदान केलेल्या मतदारांची नोंद ठेवील व मतदाराला मतदान करु देण्यापूर्वी त्याची नोंदवहीवर स्वाक्षरी अथवा अंगठयाचा ठसा घेण्याची जबाबदारीही या दुसऱ्या मतदान अधिकाऱ्यावर राहील. सदरचा मतदार देत असलेल्या पुराव्याची नोंद शेरा कॉलम मध्ये घेईल तसेच आयोगाकडून साक्षर मतदारांची माहिती मागीतली असल्यास त्याचीही नोंद बरोबरीने ठेवण्यात येईल. मतदाराचा तपशील मतदार नोंदवहीत नोंद केल्यानंतर मतदाराला 'वोटर्स स्लीप' देण्याचे कामही हा अधिकारी करील.

### ६.४ तिसरा मतदान अधिकारी

६.४.१ मतदान यंत्राच्या नियंत्रण विभागाची (Control Unit) जबाबदारी तिसऱ्या मतदान अधिकाऱ्यावर राहील. दुसरा मतदान अधिकारी ज्या टेबलावर असेल त्याच टेबलावर वा त्याच्या पुढे हा मतदान अधिकारीही असेल. दुसऱ्या मतदान अधिकाऱ्याने मतदाराला दिलेली 'वोटर्स स्लीप' पाहूनच तिसरा मतदान अधिकारी मतदाराला त्याच अनुक्रमांकाने मतदान विभागाकडे जाऊ देईल. तसेच मतदान विभागात ठेवण्यात आलेले मतदान युनिट नियंत्रण विभागातील योग्य ते बटन दाबून कार्यरत/सुरु (On) करील. मतदान करु देण्यापूर्वी हा अधिकारी मतदाराच्या तर्जनीवरील शाईचे चिन्हही तपासेल.

६.४.२ ज्या मतदान केंद्रात मतदारांची संख्या कमी आहे तेथे तिसऱ्या मतदान अधिकाऱ्याचे काम केंद्राध्यक्षच करील.

६.५ **मतदान केंद्राध्यक्षानी लक्ष द्यावयाच्या बाबी** :

i. बॅलेट युनीट व कंट्रोल युनीट कोणत्याही परिस्थितीत टेबलावर ठेवणे आवश्यक आहे, जमिनीवर ठेवले जाणार नाही.

ii. २ बॅलेट युनीट व २ कंट्रोल युनीट वापरली जात असतील तेथे कोणते बॅलेट युनीट कोणत्या कंट्रोल युनीटला जोडणे आवश्यक आहे ते तपासावे. व काळजीपुर्वक जोडावे.

iii. कंट्रोल युनीट चालू करून डिस्प्लेवर दिसणारी माहितीची खातरजमा करावी (राज्य निवडणूक आयोगाच्या मतदान यंत्रात २ मतदान एकत्र घेतली जात असल्याने कॅंडीडेट नंबर वै. तपासून घ्यावेत, पण कॅंडसेट सेक्शन ओपन करावयाचा नाही.)

iv. स्वत:ची व मतदान प्रतिनिधींची खात्री करण्यासाठी **मॉक पोल करणे अनिवार्य आहे**. ते चुकवू नये. मतदान प्रतिनिधी उपस्थित नसले तरीही मॉक पोल करणे आवश्यक आहे. मॉक पोल केले नंतर सर्व **निकाल** Clear करावा.

v. मॉक पोल करण्याबाबतचे प्रतिज्ञापत्र तयार करून सही करावे.

vi. मतदान यंत्र सिल करतेवेळी वापरावयाचे पेपर सिल चा नंबर कागदी मोहरांच्या हिशोबामध्ये नोंदवून ठेवणे आवश्यक आहे. तसेच ते कसे सिल करावे याचा तपशील अभ्यासून ठेवला असणे आवश्यक आहे.

vii. मतदान प्रतिनिधींची नेमणूक, त्याच्या बसण्याची व्यवस्था याकडे आपण लक्ष द्यावे, ते इकडे तिकडे फिरणार नाहित, मतदान केंद्रातील शांतता भंग करणार नाहीत याकडे लक्ष द्यावे

viii. मतदानास वेळेत सुरुवात होईल याकडे लक्ष देईल.

ix. प्रत्यक्ष मतदान सुरू झाल्यावर सुद्धा पहिल्या ५ मतदारांनी मतदान करेस्तोवर त्यांना थांबवून ठेवावे, TOTAL बटण दाबून नोंदवल्या गेलेल्या मतांची संख्या तपासून मते योग्यरित्या नोंदवली जात असल्याची खात्री करावी.

x. मतदान अधिकाऱ्यांकडे कामाचे वाटप योग्यरित्या करेल, कामाचे नियोजन योग्यरित्या करेल, आवश्यकते नुसार काही माहिती जसे मतदान केंद्राचे नाव -नंबर वै. अहवालांच्या नमुन्यात लिहून ठेवेल

xi. कोणताही मतदार, मतदान केल्याशिवाय जाणार नाही याची काळजी घेईल. यासाठी कंट्रोल युनीट ज्याच्या हातात असेल तो बॅलेट दिले नंतर BEEP **वर** लक्ष ठेवेल त्याच प्रमाणे मतदान केंद्राध्यक्ष देखील मधीमधी TOTAL बटण दाबून नोंदवले गेलेली मते व मतदार नोंदवहीतील नोंद टॅली करून पाहिल.

xii. मतदान प्रक्रिया संपलेनंतर (मतदान बंद करण्याच्या विहित वेळेला उपस्थित सर्व मतदारांनी मतदान केलेनंतर) मतदान केंद्राध्यक्ष CLOSE बटण दाबेल.

xiii. आवश्यक सर्व सांविधनीक व असांविधनीक लिफाफे तयार करून सुचनांनुसार आवश्यक लिफाफे सिल करेल

xiv. मतदानाचा हिशोबाच्या आवश्यक तेवढ्या प्रती करून संबंधीत मतदान प्रतिनिधींना देईल

xv. २ बॅलेट युनीट व २ कंट्रोल युनीट वापरली जात असतील तेथे ती योग्य त्या पेटीतच ठेवली जातील याची खात्री करेल

xvi. पुरेशा बंदोबस्तात मतदान साहित्य व मतदान यंत्र, मतदान साहित्य स्विकार केंद्रावर आणून निर्वाचन अधिकाऱ्याच्या स्वाधीन करेल.

# प्रकरण – ७

# मतदान केंद्रात प्रवेशपात्र व्यक्ती आणि केंद्रातील आसन व्यवस्था

## ७.१ मतदान केंद्रात प्रवेशपात्र व्यक्ती

७.१.१ तुमच्या मतदान केंद्रात मतदान करणाऱ्या मतदारा व्यतिरिक्त पुढील व्यक्तिंना मतदान केंद्रात प्रवेश असेल.

(अ) मतदान अधिकारी

(ब) उमेदवार, त्याचा निवडणूक प्रतिनिधी व प्रत्येक उमेदवाराचा एक मतदान (एकावेळी एकच) प्रतिनिधी

(क) राज्य निवडणूक आयोगाने परवानगी दिलेली व्यक्ती जसे प्रेस, किंवा सुक्ष्म निरीक्षक

(ड) निवडणूक कामावरील सरकारी सेवक (लोकप्रतिनीधी किंवा पोलीस कर्मचारी नव्हे)

(इ) राज्य निवडणूक आयोगाने नियुक्त केलेले निवडणूक निरीक्षक

(ई) मतदारा सोबत येणारे बालक/लहान मूल

(प) मदती विना चालू न शकणाऱ्या अंध व अपंग मतदारासोबत येणारी व्यक्ती

(फ) तुम्ही मतदाराची ओळख पटविण्यासाठी अथवा मतदानाच्या कामात तुम्हाला मदत करण्यासाठी तुम्ही मतदान केंद्रात प्रवेश दिलेली व्यक्ती

७.१.२ निवडणूक रिंगणात असलेल्या उमेदवारांना निर्वाचन अधिकारी त्यांचे छायाचित्र असलेले ओळखपत्र देईल. आवश्यकता भासल्यास असे ओळखपत्र सादर करण्यास तुम्ही उमेदवाराला सांगू शकता. त्याचप्रमाणे उमेदवाराच्या निवडणूक प्रतिनिधींनाही तुम्ही त्यांचे छायाचित्र असलेले ओळखपत्र जे निर्वाचन अधिकाऱ्याने त्यांना दिलेले असेल ते सादर करण्यास सांगू शकता.

७.१.३ निवडणुकीसंदर्भात कामावरील सरकारी नोकर ही संज्ञा सर्वसाधारणपणे पोलिस अधिकाऱ्यास लागू होत नाही. गणवेषातील किंवा साध्या वेषातील पोलिसांना मतदान केंद्राच्या आत येण्यास परवानगी देऊ नये. परंतु कायदा व सुव्यवस्था अथवा अशाच दुसऱ्या कारणासाठी तुम्ही त्यांना आत बोलविण्याचा निर्णय घेऊ शकता. कारण मतदान केंद्रातील पोलीस उपस्थितीला उमेदवार अथवा राजकीय पक्ष आक्षेप घेऊ शकतील आणि आपल्या प्रतिनिधींना पोलीस शक्तिचा अनावश्यक धाक दाखविला अशी तक्रार करु शकतील.

७.१.४ तसेच एखाद्या मतदाराच्या किंवा उमेदवाराच्या किंवा त्यांच्या निवडणूक प्रतिनिधी किंवा मतदान प्रतिनिधीच्या सोबत सुरक्षा कर्मचाऱ्यानाही मतदान केंद्रात प्रवेश देऊ नका.

७.१.**५** **निवडणुकीसंदर्भात कामावरील लोकसेवक** ही व्याख्या **राज्य व केंद्र सरकारचे मंत्री, उपमंत्री आणि राज्यमंत्र्यांना लागू होत नाही आणि त्यासाठी आयोगाच्या सूचनेनुसार त्यांची निवडणूक प्रतिनिधी वा मतदान प्रतिनिधी म्हणून नेमणूक करता येत नाही**. कारण त्यांच्यासोबत सुरक्षा रक्षक असतात आणि त्यांना मतदान केंद्रात प्रवेश देता येत नाही. **खासदार, आमदार व अन्य लोकप्रतिनिधी यांनादेखील मतदान केंद्रात ते संबंधित केंद्रावरील मतदार नसल्यास प्रवेश करता येणार नाही. सदर सुचनांकडे कुठल्याही परिस्थीतीत दुर्लक्ष करण्यात येऊ नये.**

७.१.६ मतदान केंद्रातील प्रवेशावर नियंत्रण ठेवा नाहीतर सुरळीत व शिस्तबध्द मतदान घेण्यात अडथळे निर्माण होऊ शकतील. एकावेळी तीन ते चार मतदारांनाच मतदान केंद्रात घ्या.

७.१.७ जर कुणा व्यक्तीबद्दल तुम्हाला वाजवी संशय असेल आणि मतदान केंद्रातील त्यांच्या उपस्थितीबद्दल शंका घेण्यासारखी परिस्थिती असेल तर त्याच्याकडे मतदान केंद्रात येण्याचे अधिकृत पत्र जरी असले तरी आवश्यक असेल तर तुम्ही त्याची झडती घेऊ शकता.

७.१.८ **तुमचे कर्तव्य बजावताना तुम्ही केवळ निवडणूक आयोगाच्या सूचनांचे पालन करण्यास बांधील आहात. तुम्ही तुमच्या वरीष्ठ अधिकाऱ्याच्या किंवा मंत्र्यासह राजकीय नेत्यांच्या सूचना ऐकू नका की त्यांच्यावर अनुग्रह करु नका. त्यांनी मतदान केंद्रात प्रवेशासाठी तुमच्याकडे मागणी केली तरी तुम्ही त्यांना परवानगी देऊ नका. केवळ निवडणूक आयोगाचे अधिकृतपत्र त्यांच्याकडे असेल तरच त्यांना परवानगी द्या.**

७.१.९ मतदाराची ओळख पटविण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या कागदपत्रांपैकी एक पुरावा मतदाराजवळ असणे अनिवार्य आहे. **(जोडपत्र-१२)**

## ७.२ मतदान प्रतिनिधींची (Polling Agents) उपस्थिती

७.२.१ उमेदवाराच्या मतदान प्रतिनिधींना मतदान सुरु होण्यापूर्वी आणि मतदानाची तुम्ही व्यवस्था करीत असताना उपस्थित राहण्यास सांगावे. मतदान सुरु होण्यापूर्वी कमीतकमी एक तास आधी त्यांना उपस्थित रहाण्यास सांगावे. जरी कुणी उशीरा आले तरी तुम्ही मतदानाची जी प्रारंभिक व्यवस्था व प्रक्रिया केली असेल ती पुन्हापासून करण्याची गरज नाही.

७.२.२ मतदान प्रतिनिधी नेमण्यासाठी कायद्याने कोणतीही वेळ निश्चित केलेली नाही. म्हणून मतदान प्रतिनिधी जर मतदान केंद्रात उशीरा पोचले तर त्यांना मतदान केंद्रातील पुढील कामकाजात भाग घेण्यास परवानगी द्यावी.

## ७.३ मतदान प्रतिनिधींनी नियुक्तीपत्र (जोडपत्र- ३अ ) सादर करणे

७.३.१ प्रत्येक मतदान प्रतिनिधींनी त्यांच्या उमेदवाराने अथवा निवडणूक प्रतिनिधीने त्याची नियुक्ती केल्याचे पत्र सादर करावे. नियुक्तीपत्र तुमच्या मतदान केंद्राचेच आहे की नाही हे तपासा. नंतर मतदान प्रतिनिधीने आवश्यक ती कागदपत्रे तयार करावी आणि तुमच्यासमोर प्रतिज्ञापत्रावर स्वाक्षरी करुन ते तुम्हाला सादर करावे. नंतरच त्याला मतदान केंद्रात प्रवेश द्यावा. अशी सर्व प्रतिज्ञापत्रे तुम्ही राखून ठेवावी आणि मतदान संपल्यानंतर ती इतर कागदपत्रांसह लखोटयात घालून निर्वाचन अधिकाऱ्याकडे पाठवावीत.

७.३ मतदान प्रतिनिधीने सादर केलेल्या नियुक्तीपत्राबद्दल काही शंका असेल तर तुमच्याकडील निर्वाचन अधिकाऱ्याने दिलेल्या उमेदवार व त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या स्वाक्षरीच्या नमुन्याशी नियुक्तीपत्रातील स्वाक्षरी पडताळून पहावी.

## ७.४ मतदान प्रतिनिधींसाठी प्रवेशपत्रे

प्रत्येक मतदान केंद्रासाठी प्रत्येक उमेदवार, एक मतदान प्रतिनिधी आणि एक बदली मतदान प्रतिनिधी नियुक्त करु शकतो. पण एकावेळी केवळ उमेदवाराच्या एकाच मतदान प्रतिनिधीला मतदान केंद्रात प्रवेश मिळेल. मतदान प्रतिनिधींना मतदान केंद्रात आत-बाहेर येण्याजाण्यास सुलभता व्हावी म्हणून त्यांना प्रवेशपत्रे द्या. परंतु त्यांना त्यांचेकडे असणाऱ्या मतदार यादीची चिन्हांकीत (Marked) केलेली प्रत बाहेर घेवुन जाण्यास परवानगी देऊ नये तसेच मतदान प्रक्रीया संपणेपूर्वी शेवटच्या १ तासात कोणत्याही मतदान प्रतिनिधीस बाहेर जाता येणार नाही याची पूर्व कल्पना दयावी.

मतदान केंद्रामध्ये मतदान प्रतिनिधी मोबाईल, कॉडलेस फोन, वायरलेस, कॅमेरा घेवून जाऊ शकत नाही. तरी सदर साहित्य आणल्यास ते बाहेर ठेवण्यास सांगावे वा ते घेवून मतदान केंद्रात प्रवेश देऊ नये.

## ७.५ मतदान प्रतिनिधींची आसन व्यवस्था

७.५.१ मतदान प्रतिनिधींची त्यांची आसन व्यवस्था अशी असावी जेणेकरून त्यांना मतदान केंद्रात प्रवेश करणाऱ्या मतदाराचा चेहरा पहाता येईल आणि मतदाराच्या ओळखीबद्दल काही संशय असेल तर त्याबद्दल त्यांना आव्हान देता येईल. त्यासाठी मतदार यादीची चिन्हांकित प्रत ज्या मतदान अधिकाऱ्याकडे असेल त्याच्या मागे मतदान प्रतिनिधींची बसण्याची व्यवस्था करा. परंतु मतदान केंद्रातील दार वा इतर अंतर्गत व्यवस्थेमुळे अशी व्यवस्था करता येत नसेल तर मतदान प्रतिनिधींची आसन व्यवस्था सदर मतदान अधिकाऱ्याच्या समोर करा. मात्र त्यांना मतदान केंद्रात फिरण्यास परवानगी देऊ नका.

७.५.२ ज्यावेळी मतदान केंद्र लहान असेल व उमेदवारांची संख्या जास्त असेल त्यावेळी आसन व्यवस्था कशी असावी याबाबत निर्वाचन अधिकारी व आयोगाचे निवडणूक निरिक्षक उपस्थीत असल्यास त्यांचेशी चर्चा करावी.

७.५.३ शक्यतो आयोगाकडे नोंदणीकृत मान्याताप्राप्त राजकीय पक्ष, नोंदणीकृत अमान्याताप्राप्त राजकीय पक्ष नंतर अपक्ष उमेदवाराचा मतदान प्रतिनिधी अशारितीने बसविण्यात यावे

## ७.६ मतदान केंद्रात धूम्रपानास बंदी

मतदान केंद्रात धुम्रपान करण्यास सक्त बंदी असून तशा सूचना संबंधीताना द्याव्यात व त्या पाळल्या जातील याची दक्षता घ्यावी. धुम्रपान करू इच्छिणाऱ्या मतदान प्रतिनिधीस मतदान केंद्राच्या बाहेर पाठवावे.

## ७.७ वृत्तपत्र प्रतिनिधी आणि छायाचित्रकारांना सुविधा

७.७.१ मतदान केंद्राबाहेर रांगेत उभ्या असलेल्या मतदारांची छायाचित्रे छायाचित्रकारांना घेता येतील. मात्र त्यांनी शांततापूर्ण व शिस्तबध्द मतदान व्यवस्थेत बाधा पोचवू नये.

७.७.२ मतदार नसलेल्या कुणाही व्यक्तीस मतदान केंद्रात प्रवेश करण्यास, निर्वाचन अधिकारी परवानगी देऊ शकत नाही. आयोगाचे अधिकृत प्रवेशपत्र असल्याशिवाय कुणाही व्यक्तिला मतदान केंद्रात प्रवेश देऊ नका मग तो राज्य सरकारचा अथवा स्थानिक स्वराज्य संस्थेचा प्रसिध्दी अधिकारी असला तरी. **तसेच कोणत्याही परिस्थितीत मतदार प्रत्यक्ष मतदान करताना छायाचित्र काढू देऊ नका.**

७.७.३ संवेदनशील व अतिसंवेदनशील मतदानकेंद्रात करावयाच्या छायाचित्रीकरणात देखील गोपनियतेचा भंग होईल असे **छायाचित्रण म्हणजेच** मतदार प्रत्यक्ष मतदान करतानाचे छायाचित्र काढू नये

## ७.८ आयोगाने नियुक्त केलेल्या समन्वयकांसाठी सुविधा

७.८.१ राज्य निवडणूक आयोग सर्वसाधरणपणे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी आपले निरीक्षक पाठविते.

७.८.२ मतदानाच्या दिवशी सदर निवडणूक निरीक्षक तुमच्या मतदान केंद्रास भेट देऊ शकतात. कदाचित तुमच्या मतदार संघातील दौरा ते तुमच्या मतदान केंद्राच्या भेटीनेच सुरु करतील. तुम्ही मतदान केंद्र स्थापन करतानाही ते कदाचित उपस्थित असतील. तुमच्या मतदान केंद्रात ते आले तर त्यांचा योग्य तो आदर राखा आणि आयोगाला अहवाल पाठविण्यासाठी आवश्यक असलेली माहिती तुम्ही त्यांना पुरवा. ते तुम्हाला कोणतीही सुचना वा मार्गदर्शन न करता तुमच्या मतदान केंद्रातील मतदान पाहतील. परंतु तुमच्या मतदान केंद्रातील मतदारांना सुविधा पुरविण्याबाबत अथवा सुरळीत मतदानासंदर्भात जर त्यांनी काही सूचना केल्या तर त्याकडे योग्य ते लक्ष पुरवा. जर तुम्हाला मतदान केंद्रात काही विशिष्ट अडचण आली किंवा तुम्हाला तसे वाटू लागले तर तुम्ही ती अडचण या निवडणूक निरीक्षकांच्या नजरेत आणा. कदाचित तुम्हाला ते यासंदर्भात

मदत करु शकतील किंवा त्या समस्या वा अडचणी निर्वाचन अधिकाऱ्याच्या वा संबंधित अधिका-याच्या नजरेत आणतील.

७.८.३ निर्वाचन अधिकाऱ्याने पुरविलेले बिल्ले या निवडणूक निरीक्षकांनी लावलेले असतील. तसेच त्यांनी दिलेली अधिकारपत्रे वा नियुक्तीपत्रे त्यांच्याकडे असतील.

७.८.४ **आपल्या मतदान केंद्रावर येणाऱ्या** निवडणूक निरीक्षक वा निर्वाचन अधिकारी वा सहायक निर्वाचन अधिकारी वा अन्य आयोगाने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने भेट दिल्यास त्यांना नम्रपणे खालील नमुन्यातील VISIT SHEET वर सहि करण्यास सांगावे. सदरची VISIT SHEET आपल्या दैनंदिनी बरोबर जोडून निर्वाचन अधिकाऱ्याकडे द्यावी.

VISIT SHEET

Day of Poll :

Name & Number of Electoral Division & Electoral College .....................................................
**(निवडणूक विभाग व निर्वाचक गणाचे नाव व क्रमांक)**

Name & Number of Polling Station :..........................................................
**(मतदान केंद्राचे नाव व क्रमांक)**

Total Number of Electors :.......................................................................
**(एकूण मतदार)**

| Sr. No | Name & Designation of the Officer Visiting (Observer/RO/ARO /ZO/etc) | Time of Visit | Brief description of polling process ( Peaceful / Incidents, if any) | Number of votes polled till the time of visit | % polled till the time of visit | Remarks if any | Signature of officer |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

Signature of Presiding Officers (with date)

### ७.९ मतदान केंद्राच्या आत बिल्ले / निशाणी न लावण्याबाबत

७.९.१ मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्राच्या १०० मीटर परिघाअंतर्गत कुणालाही उमेदवाराचे वा राजकीय पुढाऱ्याचे नाव, निशाणी असलेले बिल्ले वा छायाचित्र लावण्यास देऊ नका.

७.९.२ मतदान प्रतिनिधी ते ज्या उमेदवाराचे प्रतिनिधी आहेत त्याचे **नाव** असलेले बिल्ले लावू शकतात.

# प्रकरण – ८
# मतदान सुरु करण्यापुर्वी मतदान यंत्र सज्ज करणे

## ८.१ मतदानापूर्वी प्रारंभिक तयारी

८.१.१ मतदान केंद्रात मतदान यंत्र कार्यरत करण्यापूर्वी निर्वाचन अधिकाऱ्यांच्या पातळीवर केलेल्या तयारी व्यतिरिक्त आणखी काही तयारी मतदान केंद्रात करणे आवश्यक आहे. ही तयारी मतदान केंद्राध्यक्षांनी उमेदवार अथवा त्यांच्या निवडणूक प्रतिनिधींच्या समक्ष प्रत्यक्ष मतदान सुरु होण्यापूर्वी करायला हवी.

८.१.२ मतदान सुरु करण्याच्या निश्चित वेळेआधी एक तास ही प्रारंभिक तयारी तुम्ही सुरु करायला हवी. **जर** त्यावेळी **कुणीही मतदान प्रतिनिधी उपस्थित नसेल तरी तुम्ही काम थांबवू नये किंवा मतदान प्रतिनिधी उशीरा आला तर केलेली तयारी पुन्हा सुरुवातीपासून करण्याची आवश्यकता नाही.**

## ८.२ मतदान विभागातील तयारी (बॅलट युनिट)

८.२.१ मतदान यंत्राचा मतदान विभाग निर्वाचन अधिकारी पातळीवर सर्वदृष्टया सज्ज केलेला असतो. मतदान केंद्रात जर कोणती गोष्ट करावयाची असते ती म्हणजे या मतदान विभागाची केबल नियंत्रण विभागास जोडावी (कंट्रोल युनिट)


८.२.२ मतदान यंत्राचा आणि मतदानाच्या इतर साहित्याचा ताबा घेताना तुम्ही **बॅलट युनिट व** कंट्रोल युनिट दोहोंची तपासणी केली असणार. या तपासणीनुसार तुम्हाला पुरेसे मतदान विभाग (बॅलट युनिट) देण्यात आले आहेत का? त्यावर मतपत्रिका योग्यप्रकारे चिकटविण्यात आल्या आहेत का, प्रत्येक युनिटचा स्लाईड स्वीच आवश्यक त्या ठिकाणी स्थिर करण्यात आला का, मतदान विभाग सील करण्यात आला आहे का, पत्त्याची खूणचिठठी उजव्या बाजूला वर आणि उजव्या बाजूला खाली लावण्यात आली आहे का याची खात्री करा.

## ८.३ मतदान विभाग आणि नियंत्रण विभाग परस्परांना सांधणे


८.३.१ जेथे निवडणूक लढविणारे उमेदवार १५ पेक्षा अधिक असतील तेथे **'मतदान विभाग'** एकापेक्षा अधिक म्हणजे निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या संख्येनुसार असतील. एकापेक्षा अधिक मतदान विभाग असतील तर ते एकमेकांना जोडले पाहिजेत आणि केवळ पहिला मतदान विभाग (बॅलट युनिट) नियंत्रण विभागाशी जोडायला हवा.

८.३.२ एकापेक्षा अधिक असलेले मतदान विभाग परस्परांना असे जोडले पाहिजेत की, दुसरा मतदान विभाग (Slide Switch २ असणारा) पहिल्या क्रमांकाच्या मतदान विभागाशी जोडावा. जेथे तीन मतदान विभाग वापरण्यात येणार आहेत, तेथे दुसऱ्या क्रमांकाच्या मतदान विभागास तिसऱ्या क्रमांकाचा मतदान विभाग (Slide Switch ३ असणारा) जोडावा तर दुसरा मतदान विभाग पहिल्या क्रमांकाच्या मतदान विभागाला जोडावा, जेथे चार मतदान विभाग वापरण्यात येणार असतील तेथे चौथ्या क्रमांकाचा मतदान विभाग (Slide Switch ४ असणारा) तिसऱ्या क्रमांकाच्या मतदान विभागाशी जोडण्यात यावा. तिसऱ्या क्रमांकाचा दुसऱ्या क्रमांकाशी आणि दुसऱ्या क्रमांकाचा पहिल्या क्रमांकाशी जोडण्यात यावा. (Diagram खालील प्रमाणे असेल)

भारत निवडणूक आयोगाचे EVMs जिथे वापरणार तिथे :-




राज्य निवडणूक आयोगाचे EVMs जिथे वापरणार तिथे :-




८.३.३ हे मतदान विभाग परस्परांना जोडण्यासाठी मतदान विभागाच्या अगदी पाठच्या भागात असलेल्या कंपार्टमेंटमध्ये 'सॉकेट' आहेत. वर दर्शविल्याप्रमाणे, दुसऱ्या विभागाचा दुसऱ्या क्रमांकाच्या मतदान विभागाचा परस्परांना जोडणाऱ्या केबलचा 'जोड' (कनेक्टर) पहिल्या मतदान विभागाच्या सॉकेटमध्ये बसवावा. त्याचप्रमाणे तिसऱ्या क्रमांकाच्या मतदान विभागाचा 'जोड' (कनेक्टर) दोन क्रमांकाच्या मतदान विभागाच्या सॉकेटमध्ये लावावा. त्याचप्रमाणे चौथ्या क्रमांकाच्या मतदान विभागाचा 'जोड' (कनेक्टर) तिसऱ्या क्रमांकाच्या मतदान विभागाच्या सॉकेटमध्ये जोडावा.

८.३.४ वर म्हटल्याप्रमाणे केवळ पहिला मतदान विभागच नियंत्रण विभागाला जोडण्यात यावा. त्यासाठी नियंत्रण विभागाच्या मागील भागातील कप्प्यात सॉकेटची जागा आहे.

८.३.५ नियंत्रण विभागाच्या मागील भागातील कप्प्यात वीजेचा स्वीच आहे. आणि जेव्हा हा स्वीच तुम्ही सुरु (On) कराल त्यावेळी मतदान यंत्रातील बॅटरी काम करु लागेल. तसेच नियंत्रण विभाग आणि मतदान विभागास विद्युत पुरवठा सुरु होईल.

**टीप :** १) जेव्हा एकापेक्षा अधिक मतदान विभाग वापरणार असाल तेव्हा वरील उतारा ८.३.२ मध्ये वर्णन केल्याप्रमाणे त्यांचे क्रम लावा. चुकीचा क्रम लावल्यास मतदान यंत्र काम करणार नाही आणि नियंत्रण

विभागाचे कोणतेही  बटन दाबल्यास नियंत्रण विभागाच्या दर्शनी काचेवर “**LE**” ( Link Error) (चुकीची जोडणी) दर्शविणारी अक्षरे दिसेल. मतदान विभाग योग्य प्रकारे जोडल्यानंतरच ही अक्षरे दिसेनाशी होतील.

२) परस्परांना जोडणाऱ्या केबलचा कनेक्टर हा मल्टिपीन कनेक्टर (अधिक जोडणारा) असतो, हा कनेक्टर मतदान विभाग किंवा नियंत्रण विभागाच्या सॉकेटमध्ये एकाच दिशेने आत जाऊ शकतो. हे 'पीन' कडे पाहिल्यानंतर त्याच्या संख्येवरुन व कनेक्टरच्या आकारावरुन सहज समजून येते. कनेक्टरवर “**TOP**” अक्षरे लिहिलेली असतात ही अक्षरे नियंत्रण विभागाच्या (कंट्रोल युनिटच्या) दिशेने करुन कनेक्टर आत ढकलावा यावेळी कनेक्टरच्या क्लिप दाबण्याची आवश्यकता नाही. कनेक्टरची 'पीन' फार नाजूक असते. म्हणून सॉकेटमध्ये कनेक्टर बसविताना तो जोराने ढकलू नये नाहीतर ती 'पीन' वाकडी होण्याची शक्यता असते. मतदान यंत्राचे भाग परस्परांना योग्यप्रकारे जोडल्या नंतरच यंत्र सुरु होईल.

३)  कनेक्टर, केबल नियंत्रण विभाग वा मतदान विभागापासून वेगळी करताना कनेक्टरची क्लिप आतल्या बाजूला हळू दाबावी व नंतर कनेक्टर बाहेर ओढावा.

४)  मतदान विभाग आणि नियंत्रण विभाग जोडण्यासाठी चांगला सराव असायला हवा. नाहीतर मतदान यंत्राला नुकसान पोचू शकेल. ही बाब लक्षात ठेवून तुम्ही स्वत:च मतदान विभाग आणि नियंत्रण विभाग परस्परांना सांधावे.

# प्रकरण – ९
# नियंत्रण विभागाची तयारी

## ९.१ नियंत्रण विभाग तपासणे

९.१.१ साहित्य प्राप्तीच्या दिवशी (मतदान केंद्रात जाण्यापूर्वी ) प्राप्त मतदान यंत्राचा नियंत्रण विभाग तपासा.

९.१.२ सदर नियंत्रण विभागाचा 'कॅन्ड सेट सेक्शन' योग्यप्रकारे सीलबंद केला आहे का? आणि त्यावर पत्त्याची खूणचिठठी लावली आहे का? सदर नियंत्रण विभाग तुमच्याच मतदान केंद्रासाठी तयार करण्यात आले आहे याची खात्री करा. तसेच या विभागातील 'बॅटरी' पूर्णपणे चालू आहे का हे ही पहा.

## ९.२ नियंत्रण विभागाची तयारी

९.२.१ मतदान केंद्रात नियंत्रण विभागाचा वापर सुरु करण्यापूर्वी निर्वाचन अधिकाऱ्याने त्यात बॅटरी बसविणे आणि स्पर्धक उमेदवारांची संख्या दर्शविण्याच्या तयारी बरोबरच मतदान केंद्रात पुढील काही तयारीही करणे आवश्यक आहे.

९.२.२ मतदान केंद्राध्यक्षानी नियंत्रण विभागासाठी करावयाची तयारी पुढीलप्रमाणे :-

१) नियंत्रण विभाग मतदान विभागाशी जोडणे जेथे एकापेक्षा अधिक मतदान विभाग वापरणार असतील तेथे पहिल्या मतदान विभागाशी दुसरा, दुसऱ्याशी तिसरा व तिसऱ्याशी चौथा मतदान विभाग स्लाईड स्विचचा क्रम पाहून जोडणे. **(मुद्दा ८.३.२ मध्ये दर्शविल्याप्रमाणे)**

२) वीजेचे बटन सुरु (On) करणे.

३) वरील १ व २ मधील कामे केल्यानंतर मागील कप्पा बंद करणे.

४) प्रकरण -१० मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे चाचणी मतदान (Mock Poll) घेणे.

५) **चाचणी मतदान घेतल्यानंतर मतदान यंत्रावरील चाचणी मतदानाचे आकडे CLEAR करणे आणि ते 'शून्य' अवस्थेत आणणे**. (प्रकरण - १० मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे) वीजेचे बटन बंद (Off) करणे.

६) 'निकाल विभाग' सुरक्षित करण्यासाठी त्यावर पेपर सील लावावे (प्रकरण-१० प्रमाणे) आणि

७) क्लोझ बटणाभोवती तुम्हास पुरविण्यात आलेल्या स्पेशल अड्रेस टॅग मार्फत निकाल विभागी सीलबंद करावा.

८) निकाल विभागाच्या बाहेरील कवच बंद करणे आणि त्यावर A,B,C,D सील लावणे **(प्रकरण-११ मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे)**

## ९.३ नियंत्रण विभाग आणि मतदान विभाग जोडणे

तुम्ही मतदान विभागाची परस्परांना जोडणारी केबल नियंत्रण विभागाच्या मागील भागात असलेल्या सॉकेटच्या कप्प्यात बसवावी. जेथे एकापेक्षा अधिक मतदान विभाग असतील तेथे पहिल्या मतदान विभागास जोडावी. नियंत्रण विभाग मतदान विभागास जोडताना काळजी घ्यावी.

## ९.४ वीजप्रवाह सुरु करणे

मतदान यंत्र वीजेवर चालते. त्यासाठी यंत्राच्या कॅन्ड सेट सेक्शनमध्ये बॅटरी बसविलेली असते. ही बॅटरी निर्वाचन अधिकारी बसवितात. ही बॅटरी सुरु करण्यासाठी नियंत्रण विभागाच्या मागील भागात असलेल्या कप्प्यात स्वीच आहे. नियंत्रण विभाग आणि मतदान विभाग परस्परांना जोडल्यानंतर हा स्वीच सुरु (On) केल्यानंतर नियंत्रण विभागातून 'बीप' असा आवाज येईल. तसेच नियंत्रण विभागाच्या डिस्प्ले सेक्शनवरील दिवा हिरव्या रंगात पेटेल.

## ९.५ मागील कप्पा बंद करणे

नंतर तुम्ही मागील कप्पा बंद करा. **हा मागील कप्पा सीलबंद करु नये,** कारण मतदान पूर्ण झाल्यानंतर वीज प्रवाह बंद  करण्यासाठी मतदान विभाग वेगळा करण्यासाठी तो कप्पा तुम्हाला पुन्हा उघडावा लागेल.

# प्रकरण – १०

# चाचणी (नमुना) मतदान घेणे

## १०.१ मतदान यंत्रात 'मतांची नोंद नसल्याचे पटविणे'

१०.१.१ मतदानास सुरुवात करण्यापूर्वी मतदान यंत्र पूर्णपणे कामास उपयुक्त असल्याचे व त्यात पूर्वीच मतांची नोंद करण्यात आली नसल्याची तुम्ही स्वत: खात्री करुन घ्या आणि मतदान प्रतिनिधींनाही तशी खात्री पटवा.

१०.१.२ वरील खात्री पटविण्यासाठी तुम्ही तेथे उपस्थित सर्वांना “Clear” बटन दाबून दाखवा की गणना 'दर्शक' शून्यावर' ठेवण्यात आला आहे. क्लीअर बटन नियंत्रण विभागाच्या निकाल विभागातील कप्प्यात ठेवण्यात आले आहे.हा कप्पा अंतर्गत द्वार आणि बाहेरील आच्छादनाने झाकलेला असेल. अंतर्गत द्वाराचे आच्छादन क्लीअर बटनाचा कप्पा, निकाल-१ आणि निकाल-२ बटने झाकील. तर अंतर्गत द्वाराच्या व आच्छादनाच्या वर असलेले बाहय आच्छादन 'क्लोज' बटनाचा कप्पा झाकील. क्लीअर बटनाकडे पोचण्यासाठी तुम्ही प्रथम बाहेरील आच्छादन उघडावे.त्यासाठी डाव्या बाजूला असलेले 'लॅच' किंचित आतल्या बाजूला दाबावे. त्यानंतर आतले द्वार उघडण्यासाठी तुम्हाला निकाल-१ आणि निकाल-२ बटनाच्या वरच्या अंगाला असलेल्या दोन छिद्रातून अंगठा आणि बोट घालून आत असलेली 'लॅचेस' हळू हळू आतल्या बाजूला दाबावी. ही आतली दारे 'लॅचेस' दाबूनच उघडावी. जर ती बळाने उघडण्याचा प्रयत्न केला तर यंत्राचे हे महत्वपूर्ण भाग निकामी होण्याची शक्यता आहे.

१०.१.३ जेव्हा तुम्ही **'क्लीअर'** बटन दाबाल तेव्हा नियंत्रण विभागातील डिस्प्ले पॅनलवर खालील माहिती झळकू लागेल. (उदा.जर जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्य अशा दोन पदांकरीता मतदान यंत्र सेट केले असेल व जिल्हा परिषद सदस्य पदाकरीता ५ (including NOTA) व पंचायत समिती सदस्य पदाकरीता ४ (including NOTA) उमेदवार उभे असतील तर पुढील पृष्ठावर दर्शविल्याप्रमाणे डिस्प्ले दिसेल.)

(फ) आता निकाल विभागातील Result-१ हे बटन दाबा. ते दाबताच पुढील माहिती दर्शनी काचेवर येईल.

| Sr.No. | Display | Meaning |
|---|---|---|
| १ | **SL NO - G11227<br>DMM - G58585** | **Serial Number of EVM is G11227<br>Memory Number is G58585** |
| | | |
| २ | **POLL RESULT<br>PDT 04-11-11** | **Poll Result starts<br>Poll Date is 4th November 2011** |
| ३ | **PST 07-30-00<br>PET 17-33-21** | **Poll Start Time 07-30-00<br>Poll End Time 5-33-21** |
| ४ | **NUMBER OF<br>BALLOTS 2** | **Number of Ballot Papers are 2 i.e. one for Zilla parishad and another for Panchayat Samiti** |
| ५ | **TOTAL VOTERS 0** | **Total Number of Voters 0** |
| ६ | **BALLOT 1<br>VOTES 0** | **On First Ballot Paper<br>Total Votes are 0** |
| ७ | **CANDS 5<br>SEATS 1** | **Total No. of Candidates 5<br>Number of Candidates to be elected 1** |
| ८ | **CANDIDATE – 01<br>VOTES – 0** | **First Candidate<br>Obtained 0 votes** |

| | | |
|---|---|---|
| ९ | **CANDIDATE – 02<br>VOTES – 0** | **Second Candidate<br>Obtained 0 votes** |
| १० | **CANDIDATE – 03<br>VOTES – 0** | **Third Candidate<br>Obtained 0 vote** |
| ११ | **CANDIDATE – 04<br>VOTES –0** | **Fourth Candidate<br>Obtained 0 vote** |
| १२ | **CANDIDATE – 05<br>VOTES – 0** | **NOTA BUTTON Obtained 0 votes** |
| १३ | **BALLOT 2<br>VOTES 0** | **On Second Ballot Paper<br>Total Votes are 0** |
| १४ | **TOTAL VOTERS<br>0** | **Total Number of Voters 0** |
| १५ | **CANDS 3<br>SEATS 1** | **Total No. of Candidates<br>Number of Candidates to be elected** |
| १६ | **CANDIDATE – 01<br>VOTES – 0** | **First Candidate<br>Obtained 0 votes** |
| १७ | **CANDIDATE – 02<br>VOTES –0** | **Second Candidate<br>Obtained 0 votes** |
| १८ | **CANDIDATE – 03<br>VOTES – 0** | **Third Candidate<br>Obtained 0 vote** |
| १९ | **CANDIDATE – 04<br>VOTES – 0** | **NOTA BUTTON Obtained 0 votes** |
| २० | **END** | **End of Result Display** |

जर क्लीअर बटण दाबले आणि डिस्प्ले पॅनलवर वरीलप्रमाणे माहिती दिसली नाही तर समजा की यंत्रातील माहिती पुसून टाकण्यासाठी करावयाची मांडणी व्यवस्थित झालेली नाही. म्हणजेच **C-R-C** योग्यरित्या झालेले नाही, त्यासाठी यंत्र क्लीअर करण्यासाठी मतदान विभाग आणि नियंत्रण विभाग परस्परांना योग्यप्रकारे जोडले पाहिजेत. प्रथम क्लोज बटण दाबा. त्याचा डिस्प्ले थांबल्यावर **"Result-1"** बटण दाबा. त्याचा डिस्प्ले थांबल्यावर **"Clear"** बटण दाबा. त्या नंतर डिस्प्ले पॅनलवर वर दाखविलेली माहिती दिसू लागेल.

१०.१.४ ही माहिती मतदान प्रतिनिधीचे समाधान करण्यास पुरेशी आहे. कारण मतदान यंत्रात एकही मत नोंदले गेलेले नाही हे या माहितीवरुन दिसून येईल.

### १०.२ अभिरुप (नमुना चाचणी) मतदान (Mock Poll)

**१०.**२.१ वरीलप्रमाणे यंत्राची चाचणी घेतल्यानंतर तुम्ही अभिरुप अथवा चाचणीसाठी काही समान मते प्रत्येक उमेदवाराच्या नावावर नोंद करा. त्यासाठी खालील कृती करा.

(अ) नियंत्रण विभागाच्या बॅलट सेक्शनवरील " बॅलेट " बटन दाबा. त्याबरोबर दर्शनी काचेवर " बीझी " बत्ती लाल रंगात पेटेल. त्याचबरोबर मतदान विभागातील रेडी लँप म्हणजेच हिरवी बत्तीही पेटेल.

(ब) नंतर तुम्ही कुणाही मतदान प्रतिनिधीला त्याच्या आवडीनुसार कुणाही उमेदवाराच्या निशाणीपुढील (मतदान विभागावरील) बटन दाबण्यास सांगा.

(क) उमेदवाराच्या निशाणीपुढील बटन दाबल्यानंतर मतदान विभागातील रेडी दिवा बंद होईल आणि उमेदवाराच्या नावासमोरील बटनाकडील लाल बत्ती पेटेल. तसेच नियंत्रण विभागातून " बीप

” असा आवाज येईल.  काही क्षणानंतर उमेदवाराच्या नावाकडील लाल बत्ती, “ बिझी ” अक्षराची लाल बत्ती आणि “ बीप ” असा येणारा आवाज बंद होईल. याचा अर्थ ज्या उमेदवाराला मतदान करण्यात आले आहे त्याची मतदान यंत्रात नोंद झाली आहे. आणि आता मतदान यंत्र दुसरे मतदान नोंदण्यास तयार आहे.

(ड)	वरील उतारे अ, ब आणि क मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणेच पुन्हा कृती करा आणि दुसऱ्या उमेदवाराच्या नावाचे मतदान करा.  प्रत्येक उमेदवाराच्या नावापुढे केलेल्या मतदानाची अचूक नोंद ठेवा. उमेदवाराचा मतदान प्रतिनिधी नसला तरी प्रत्येक उमेदवाराला किमान एकदा तरी मतदान करून पहा.

(इ)	असे मतदान चालू असताना झालेले मतदान आणि यंत्रात नोंदविलेल्या मतदानाची गोळाबेरीज जुळते की नाही हे जाणून घेण्यासाठी मतदान विभागातील “ टोटल ” हे बटण दाबा.

टीप :- मतदानाची नोंद झाल्यानंतर आणि डिस्प्ले सेक्शनवरील “बिझी” बत्ती विझल्यानंतर “टोटल” बटण दाबावे.

(ई)	अभिरुप मतदानानंतर निकाल विभागातील “बंद” (क्लोज) बटन दाबावा.  तेव्हा डिस्प्ले सेक्शनच्या दर्शनी काचेवर पुढीलप्रमाणे माहिती येईल. (जर मतदान केलेल्या मतांची संख्या ५ असेल तर)

| Sr.No. | Display | Meaning |
|---|---|---|
| १ | **CLOSING** | **CLOSING** |
| २ | **DTE 04-11-11**<br>**TME 18-36-01** | **Current Date is 4 November 2011**<br>**Current Time is 06:36:01 p.m.** |
| ३ | **SL NO - G11226**<br>**DMM - G58585** | **Serial Number of EVM is G11226**<br>**Memory Number is G58585** |
| ४ | **NUMBER OF BALLOTS 2** | **Number of Ballot Papers are 2 i.e. one for Zilla Parishad and another for Panchyat Samiti** |
| ५ | **TOTAL VOTERS 5** | **Total Number of Voters are** 5 |
| ६ | **POLL CLOSED** | **Polling is closed** |


टीप :- जर पुरेसा वेळ असेल तर आणखी अभिरुप मतदान घेण्यास हरकत नाही. प्रत्येक उमेदवाराला सारखेच मतदान करणेही आवश्यक आहे.

१०.२.२  आता निकाल विभागातील Result-१ हे बटन दाबा. ते दाबताच पुढील माहिती दर्शनी काचेवर येईल

| **Sr.No.** | **Display** | **Meaning** |
|---|---|---|
| **1** | **SL NO – G11227**<br>**DMM - G58585** | **Serial Number of EVM is G11227**<br>**Memory Number is G58585** |
| **2** | **POLL RESULT**<br>**PDT 04-11-11** | **Poll Result starts**<br>**Poll Date is 4th November 2011** |
| **3** | **PST 18-20-53**<br>**PET 18-33-21** | **Poll Start Time 6-20-53**<br>**Poll End Time 6-33-21** |

| | | |
|---|---|---|
| **4** | **NUMBER OF BALLOTS 2** | **Number of Ballot Papers are 2 i.e. one for Zilla parishad and another for Panchayat Samiti** |
| **5** | **TOTAL VOTERS** 5 | **Total Number of Voters** -5 |
| **6** | **BALLOT 1**<br>**VOTES** 5 | **On First Ballot Paper**<br>**Total Votes are** 5 |
| **7** | **CANDS 5**<br>**SEATS** 1 | **Total No. of Candidates**<br>**Number of Candidates to be elected** |
| **8** | **CANDIDATE - 01**<br>**VOTES -** 1 | **First Candidate**<br>**Obtained** 1 **votes** |
| **9** | **CANDIDATE - 02**<br>**VOTES -** 1 | **Second Candidate**<br>**Obtained** 1 **votes** |
| **10** | **CANDIDATE - 03**<br>**VOTES -** 1 | **Third Candidate**<br>**Obtained** 1 **vote** |
| **11** | **CANDIDATE - 04**<br>**VOTES** -1 | **Fourth Candidate**<br>**Obtained** 1 **vote** |
| **12** | **CANDIDATE - 05**<br>**VOTES -** 1 | NOTA BUTTON Obtained **1** votes |
| **13** | **BALLOT 2**<br>**VOTES** 5 | **On Second Ballot Paper**<br>**Total Votes are** 5 |
| 14 | **TOTAL VOTERS** 5 | **Total Number of Voters** 5 |
| 15 | **CANDS** 4<br>**SEATS 1** | **Total No. of Candidates** 4<br><br>**Number of Candidates to be elected 1** |
| 16 | **CANDIDATE - 01**<br>**VOTES -** 1 | **First Candidate**<br>**Obtained** 1 **votes** |
| 17 | **CANDIDATE -02**<br>**VOTES** -1 | **Second Candidate**<br>**Obtained** 1 **votes** |
| 18 | **CANDIDATE - 03**<br>**VOTES -** 1 | **Third Candidate**<br>**Obtained** 1 **vote** |
| 19 | **CANDIDATE – 04**<br>**VOTES –** 2 | NOTA BUTTON Obtained **2** votes |
| 20 | **END** | **End of Result Display** |

फ) Result दिसण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आता आपल्याला प्रत्यक्ष मतदानासाठी मतदान यंत्र तयार करावयाचे असल्याने मॉकपोलमध्ये नोंदविलेली मते Clear करणे जरूरीचे असल्याने Result सेक्शनमधील पांढ-या रंगाचे Clear हे बटण दाबा. म्हणजे एकाच वेळी Beep आवाजासह खालील सूचना दर्शकपट्टीवर येईल.




(All votes polled are being deleted)

Beep आवाज थांबल्यावर प्रस्तूत सूचना निर्देशपट्टीवर दिसण्याचे बंद होइल आणि तद्नंतर पुढीलप्रमाणे सूचना क्रमाक्रमाने दर्शकपट्टीवर दिसू लागतील.

1. NO. OF BALLOT 2
2. TOTAL VOTER 0
3 BALLOT - 1 VOTE- 0
4 CANDIDATE - 5 SEAT – 1

| | | |
|---|---|---|
| 5 | CANDIDATE - 1 | VOTE 0 |
| 6 | CANDIDATE - 2 | VOTE 0 |
| 7 | CANDIDATE - 3 | VOTE 0 |
| 8 | CANDIDATE - 4 | VOTE 0 |
| 9 | NOTA BUTTON - 5 | VOTE 0 |
| 10 | BALLOT - 2 | VOTE 0 |
| 11 | CANDIDATE - 4 | SEAT - 1 |
| 12 | CANDIDATE - 1 | VOTE 0 |
| 13 | CANDIDATE - 2 | VOTE 0 |
| 14 | CANDIDATE - 3 | VOTE 0 |
| 15 | NOTA BUTTON - 4 | VOTE 0 |
| 16 | END | |

दर्शकपट्टीवर सर्व निर्देश येण्याचे बंद झाल्यानंतर आपले कंट्रोल युनिट मागील बाजूने स्वीच Off करा व नंतर प्रत्यक्ष मतदानासाठी कंट्रोल युनिट सीलबंद करा.


## प्रकरण – ११

## नियंत्रण विभाग पेपरसील व स्पेशल टॅग वापरुन बंद करणे

### ११.१. कंट्रोल युनिट पेपरसीलने सीलबंद करणे:-

(१) मतदान यंत्र सील करण्याकरिता सुरुवात करण्यापूर्वी ते नियंत्रण विभाग मागून बंद (off) करणे अत्यावश्यक आहे. मतदान यंत्र मागून बंद केल्यानंतर सिलींग करण्यास सुरुवात करावी व सील पूर्ण झाल्याशिवाय मतदान यंत्र सुरु करण्यात येऊ नये. पारंपारिक मतदान पध्दतीमध्ये जेथे मतपत्रिका व मतपेटया वापरल्या जात होत्या तेव्हा मतपेटया आयोगाने विहित केलेल्या पेपरसीलद्वारे सीलबंद करण्यात येत असत. अशाच प्रकारची कार्यपध्दती मतदान यंत्राबाबत देखील विहित करण्यात आली आहे. त्यासाठी कंट्रोल युनिटमध्ये खाली नमूद केल्यानुसार आयोगाने विहित केलेले पेपर सील वापरुन ते सीलबंद करावयाचे आहे.

(२) कंट्रोल युनिटच्या रिझल्ट सेक्शनच्या आतल्या कप्प्याच्या झाकणाच्या आतल्या बाजूस पेपरसील घालण्यासाठी एक चौकट ठेवलेली आहे. इलेक्ट्रॉनिक कार्पोरेशन ऑफ इंडिया लि. या कंपनीने तयार केलेल्या मतदान यंत्राच्या बाबतीत एक पेपर सील वापरण्याची तरतूद करण्यात आली आहे. सदर सील अशाप्रकारे घट्ट बसवावयाचे आहे, जेणेकरुन त्याचा वरील भाग दिसू शकेल. पेपरसीलचा वरचा भाग दुमडल्यानंतर त्यावरील अनुक्रमांक वरील बाजूस येईल.




(रिझल्ट सेक्शनच्या आतील कप्प्यास असलेल्या खाचेमध्ये पेपरसील व आधारासाठी पुठ्ठा दिलेला असल्यास तो वर दर्शविल्याप्रमाणे घालावा जेणेकरुन रिझल्ट सेक्शनचे दोन्ही कप्पे बंद केल्यावर त्यामधून वरील बाजूने बाहेर येणारा पेपरसीलचा भाग पट्टीसीलच्या दिशेने दुमडल्यावर अनुक्रमांक वरच्या बाजूला दिसेल.)

(३) वर नमूद केल्याप्रमाणे पेपर सील आपल्या जागी घट्ट बसून राहावे व ते विहित जागेवरुन हलू नये यासाठी एका पातळ पुठ्ठयाचा आधार पेपर सीलला द्यावा. जेणेकरून पेपर सील आपल्या जागेवरुन हलणार नाही, याची खात्री करण्यासाठी ते एका बाजूने हळूच ओढून ते घट्ट बसल्याची खात्री करताना ते सील खराब होणार नाही, याची दक्षता घ्यावी व पेपर सील खराब झाल्यास त्वरित दुसरे पेपरसील वापरण्यात यावे.

(४) पेपरसील घट्ट बसविल्यानंतर कंट्रोल युनिटच्या आतल्या कप्प्याचे झाकण घट्ट दाबून बंद करावे. सदर झाकण अशारीतीने बंद करावे की पेपर सीलच्या दोन्ही बाजूची टोके आतल्या कप्प्याच्या बाहेर राहतील. त्यानंतर पेपर सीलच्या पांढ-या बाजूवर मतदान केंद्राध्यक्षांनी पेपरसीलच्या अनुक्रमांकाखाली आपली पूर्ण स्वाक्षरी करावी. मतदान केंद्रात उपस्थित असलेले उमेदवार अथवा त्यांचे मतदान प्रतिनिधी जर

पेपरसीलवर स्वाक्षरी करु इच्छित असतील तर त्यांनाही तशी अनुमती द्यावी. मतदान केंद्राध्यक्षांनी मतदान प्रतिनिधींच्या स्वाक्षऱ्या त्यांच्या नेमणूक पत्रावरील स्वाक्षऱ्यांशी जुळतात किंवा कसे, याची खात्री करावी.

**११.२ पेपरसीलचा हिशेब ठेवणे:-** मतदान केंद्रावर मतदान केंद्राध्यक्षास पुरविण्यात आलेल्या व वापरण्यात आलेल्या पेपरसीलचा हिशोब त्याने ठेवणे आवश्यक आहे. सदर हिशोब नमुना व्हीएम-**३** मध्ये ठेवणे आवश्यक आहे. मतदान केंद्राध्यक्ष, उमेदवार अथवा त्यांचे मतदान प्रतिनिधी यांना पेपरसीलवरील अनुक्रमांक लिहून घेण्याची अनुमती देईल.

### ११.३. कंट्रोल युनिट स्पेशल टॅगने सीलबंद करणे

११.३.१ पेपरसील घट्ट बसविल्यानंतर व आतल्या कप्प्याचे झाकण घट्ट दाबून बंद केल्यानंतर मतदान केंद्राध्यक्षांनी आतल्या झाकणाच्या डाव्या बाजूस ठेवलेल्या दोन छिद्रांमधून एक दोरा ओवून तो स्पेशल टॅग वापरुन सीलबंद करावा. स्पेशल टॅग लावताना “Close” बटनाला धक्का लागणार नाही, याची विशेष काळजी घ्यावी. (जर हा स्पेशल टॅग लावताना “Close” बटन दाबले गेले तर मतदान सुरू करताना “Ballot” बटन दाबल्यावर “invalid option” असा मेसेज येईल. यासाठीच कंट्रोल युनीट सिलींग करतेवेळी बंद राखणे आवश्यक आहे) स्पेशल टॅग हा विशिष्ट आकाराचा असून त्याच्या खाचेमध्ये “Close” बटन येईल याची खात्री करून तो लावावा, जेणेकरून सायंकाळी **५.३०** वाजता मतदान संपल्यावर “Close” बटनावरील कॅप काढून ते दाबणे सहज शक्य होईल. याकरीता स्पेशल टॅग एका विशिष्ट आकाराचा बनविण्यात आला आहे. याला असलेल्या खाचेमुळे मतदान संपल्यावर रिझल्ट सेक्शन बंद असतानादेखील Close बटन दाबणे शक्य होते. या टॅगवर कंट्रोल युनीट क्रमांक टाकणे तसेच स्पेशल टॅगवर असणाऱ्या क्रमांकाची नोंद ठेवणे आवश्यक आहे. तसेच स्पेशल टॅगच्या मागील बाजुवर मतदान केंद्राध्यक्ष, इच्छुक मतदान प्रतिनिधी यांनी स्वाक्ष-या कराव्यात व विभेदक चिन्ह मारावे.




### ११.४ कंट्रोल युनिटचे रिझल्ट सेक्शन बंद करुन सीलबंद करणे

**११.४.१** कंट्रोल युनिटच्या रिझल्ट सेक्शनच्या आतला कप्पा बंद करुन तो स्पेशल टॅगने सीलबंद केल्यानंतर रिझल्ट सेक्शनच्यावरील झाकण बंद करावे. असे करताना आतील पेपरसील व्यवस्थीतपणे (न फाटता) दोन्ही बाजूने झाकणाच्या वर राहिल याची काळजी घ्यावी.

११.४.२ वरील झाकण बंद केल्यानंतर रिझल्ट सेक्शन पुढीलप्रमाणे सीलबंद करावे.

(अ) वरील झाकणाच्या डाव्या बाजूस पुरविण्यात आलेल्या दोन छिद्रांमधून दोरा ओवावा.

(ब) दो-याची गाठ मारुन त्यास मतदान केंद्राध्यक्षाचे सील लावावे. आणि, पत्त्याची खूणचिठ्ठी दो-याच्या टोकास बांधावी. ज्याप्रमाणे कॅन्ड सेट सेक्शनमध्ये निवडणूक निर्णय अधिका-यांच्या स्तरावर पत्त्याची खूणचिठ्ठी वर बांधलेली असेल त्याच धर्तीवर ही खूणचिठ्ठी असेल. या पत्त्याच्या खूणचिठ्ठीवर उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधींना त्यांची इच्छा असल्यास त्यांना स्वाक्षरी करण्याची संधी द्यावी.


## प्रकरण-१२

## नियंत्रण विभाग A. B. C. D पट्टीसील वापरुन बंद करणे


### १२.१ ABCD पट्टीसील वापरुन कंट्रोल युनिट सीलबंद करणे:-

रिझल्ट सेक्शनच्या कप्प्याच्या खालील बाजूने पेपरसीलचा जो भाग बाहेर येतो, त्याला ABCD अक्षरे असलेली पट्टी सील वापरुन कंट्रोल युनिट सील करावे, पट्टी सील हे क्लोज बटनाच्या खालून येईल याची काळजी घेऊन ते डावीकडून कंट्रोल युनिटच्या भोवती गुंडाळून सील करावयाचे आहे.

**टप्पा क्र.**१:- रिझल्ट सेक्शनच्या कप्प्याच्या खालील बाजूने पेपरसीलचा जो भाग बाहेर येतो, तो खालीलप्रमाणे दुमडावा.





**टप्पा क्र.** २ :- त्यानंतर ABCD अक्षरे असलेली पट्टी सील वापरुन कंट्रोल युनिट सील करावे. असे करताना "A" भाग रिझल्ट सेक्शनच्या कप्प्याच्या खालील बाजूने पेपरसीलचा जो भाग बाहेर येतो. तेथे खालीलप्रमाणे




ठेवावा


(निकाल विभागाच्या बाहय दरवाजाच्या आतील बाजूने बाहेर आलेल्या गुलाबी कागदी मोहोरेच्या आतील पट्टीच्या तळाजवळ पूर्वीच डिंक लावलेला "ए"भाग येईल. अशाप्रकारे पट्टी मोहोर (सील) ठेवा. "ए" वरील मेणकागद काढा.)

**टप्पा क्र. ३ :-** त्यावर पेपरसीलचा खालील भाग खाली दर्शविल्याप्रमाणे दुमडून चिटकवावा.




( या डिंक लावलेल्या भागावर गुलाबी कागदी मोहोरेची आतील घडी दाबा आणि चिटकवा)


**टप्पा क्र. ४ :-** त्यानंतर -B भाग उलट दुमडून पेपरसील वर चिटकवावा.



(पूर्वीच डिंक लावलेल्या "बी" भागावरील मेणाचा कागद काढा आणि हा डिंक लावलेला भाग गुलाबी कागदी मोहोरेच्या बाहेरील घडीवर दाबा) आता C अक्षर असलेला भाग दिसु लागेल.


**टप्पा क्र. ५ :-** त्यानंतर -C भागावर पेपरसीलची वरील पट्टी चिटकवावी.




(गुलाबी कागदी मोहोरेवर “बी°° भाग चिटकवल्यावर “सी” हा भाग सर्वात वर येईल. “सी°° भागावरील मेणकागद काढा. बाहय दरवाजाच्या सर्वात वरच्या भागापासून बाहेर आलेल्या गुलाबी कागदी मोहोरेला दाबा. जेणेकरुन गुलाबी कागदी मोहोर “सी” भागावर घटटपणे चिटकवली जाईल.)

**टप्पा क्र. ६ :-** त्यानंतर पट्टी सील कंट्रोल युनिटभोवती गोल फिरवून -D भाग जेथे -A “B” C चिटकविलेले आहेत, त्या ठिकाणी आणून चिटकवावा.










(पट्टी मोहोर (सील) क्लोज (बंद) बटनाच्या खालून येईल याची काळजी घेऊन पट्टी सीलचा ऊर्वरित भाग डावीकडून नियंत्रण युनिटच्या भोवताली गुंडाळा. पट्टी सीलचे दुसरे टोक, कंट्रोल युनिटच्या उजव्या बाजूस बाहय दरवाजाच्या सर्वात वरच्या भागात जेथे पूर्वीच डिंक लावलेले “ए” “बी”“सी” भाग चिटकवलेले आहेत, तेथे आणा, पूर्वीच डिंक लावलेल्या “डी”भागावरील आवरण असलेला मेणकागद काढा आणि दरवाजाच्या सर्वात वरच्या भागातून बाहेर आलेल्या गुलाबी कागदी मोहोरेवर तो भाग घट्टपणे दाबा. पूर्वीच डिंक लावलेला “डी” भाग क्लोज बंद बटनाच्या खाली पट्टी सीलवर चिकटतो. हा चिकटणारा “डी” चा भाग पट्टी सीलवर घट्टपणे दाबा.)

अशा रितीने मतदान यंत्र आता मतदानास तयार आहे, आता नियंत्रण विभाग आता सुरु (On) करा.

## प्रकरण – १३

## मतदानास सुरुवात करणे

१३.१ निश्चित केलेल्या वेळीच मतदानास सुरुवात करा. त्यापूर्वी तुमची प्रारंभिक तयारी पूर्ण झाली पाहिजे. जर दुर्दैवाने प्रारंभिक तयारी पूर्ण झाली नाही तर मतदान सुरु करण्याच्या निश्चितवेळी तीन-चार मतदारांना मतदान केंद्रात घ्या आणि मतदान अधिकाऱ्याला त्यांची ओळख आदी माहिती गोळा करु द्या आणि या काळात तुमची प्रारंभिक तयारी पूर्ण करा. मात्र शक्य तो असे प्रसंग टाळा. समजा काही अपरिहार्य कारणास्तव तुम्हाला मतदानाच्या निश्चित वेळेस मतदान सुरु करता आले नाही तर मतदान बंद करण्याची वेळ वाढवू नका. प्रकरण २५ मध्ये स्पष्ट केलेल्या बाबतीतच अपवाद केला जाईल.

१३.२ **गोपनियतेचे महत्व :** मतदानास प्रत्यक्ष सुरूवात करणे पुर्वी उपस्थित उमेदवार वा त्याचे मतदान प्रतिनिधी तसेच मतदान अधिकारी यांना मतदान प्रक्रीयाअंतर्गत राखावयाच्या गोपनियते बाबतची तरतूद **(कलम ३२)** समजून सांगावी.

१३.३ **मार्कर पेन :** राज्य निवडणूक आयोगाकडून न मिटणाऱ्या शाई एवजी मार्कर पेन पुरविण्यात येतात, तरी सदर पेनचे सिल उघडून वापरासाठी तयार ठेवावे.

१३.४ **मतदार यादीची चिन्हांकित प्रत:-** मतदानास सुरुवात करण्यापूर्वी मतदान प्रतिनिधी आणि तेथे उपस्थित सर्वांची खात्री पटवा की मतदार यादीची जी प्रत चिन्हांकित मतदार यादी म्हणून वापरण्यात येणार आहे त्यावर कुठल्याही प्रकारची खूण वा नोंदी नाहीत. असल्या तर त्या केवळ '**इडीसी**' (म्हणजे निवडणूक कामावर असल्याचे प्रमाणपत्र) आणि '**पीबी**' (म्हणजे टपालाद्वारे मतदानपत्रिका दिल्याची खूण) या दोनच खूणा असतील.

**१३.५ मतदार नोंदवही (नमुना व्हीएम-१ ):-** मतदार नोंदवहीत **(नमुना व्हीएम-१)** पुर्वीपासून मतदाराच्या नावापुढे कोणत्याही प्रकारची खूण अथवा नोंद केलेली नाही, याची मतदान प्रतिनिधी आणि मतदान केंद्रात उपस्थित असलेल्या इतरांना खात्री पटवा त्यासाठी त्यांना मतदार नोंदवही दाखवा. याच मतदान नोंदवहीत प्रत्येक मतदाराला मतदान करण्यास परवानगी देण्यापूर्वी आपली स्वाक्षरी अथवा अंगठयाचा ठसा उमटवायचा असतो.

**१३.६ मतदान केंद्रात मतदारांच्या प्रवेशावर नियंत्रण:-** शक्यतो महिला आणि पुरुष मतदारांसाठी वेगवेगळी रांग करा. रांगेवर नियंत्रण ठेवणाऱ्या व्यक्तीने तुमच्या निर्देशानुसार एकावेळी केवळ तीन ते चारच मतदार, मतदान केंद्रात सोडावे. इतरांना रांगेत उभे राहण्याची सूचना करावी. अशक्त किंवा लेकुरवाळया (हातात मूल असलेल्या) महिलांना रांगेतून पुढे येऊ द्यावे. रांग सोडताना एकदा महिला आणि एकदा पुरुष असे मतदान केंद्रात मतदारांना आत सोडावे. महिला किंवा पुरुषांसाठी एकापेक्षा अधिक रांगा करु देऊ नका.

राज्य निवडणूक आयोगाने आदेश क्र. **आदेश क्रमांक- रानिआ-२०१५/प्र.क्र.९/प्रकल्प कक्ष दि.२७/०५/२०१५ व रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र.०४/ का.५ दि. ९/३/२०१६** (जोडपत्र–१८) अन्वये आदर्श मतदान केंद्र निर्मीतीच्या दृष्टीने, तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदानाची टक्केवारी वाढवण्याच्या दृष्टीने मतदारांना जास्तीत जास्त सोई सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता सुचीत करण्यात आले आहे. जसे वयोवृध्द व्यक्ती, अंध व अपंग मतदार, गरोदर स्त्रिया अथवा तान्ह्या मुलासह असणा-या स्त्रिया यांना मतदानाची रांग लांब असल्यास मतदानासाठी त्या रांगेत उभे राहून बराच काळ

प्रतिक्षा करावी लागते. यास्तव, असे बरेच मतदार मतदानास जाणे टाळतात. पर्यायाने मतदानाची टक्केवारी घटते. सबब **मतदान केंद्राबाहेर वयोवृद्ध व्यक्ती, अंध व अपंग मतदार व त्याचा सोबती, गरोदर स्त्रिया अथवा तान्ह्या मुलासह असणा-या स्त्रिया मतदानाच्या रांगेत उभ्या असतील तर अशा मतदारांना प्राधान्याने मतदान करण्याची संधी संबंधित मतदान केंद्राध्यक्षांनी उपलब्ध करून द्यावी. यासंदर्भात तशी स्पष्ट सूचना मतदान केंद्राबाहेर फलकावर लावण्यात यावी.**

१३.७ **मतदान केंद्रात प्रवेश करू शकणाऱ्या व्यक्तींवर निर्बंध :** मतदान केंद्रात कोणत्या कोणत्या व्यक्तीस प्रवेश देता येईल याबाबत प्रकरण ७ मध्ये सविस्तर सूचना देण्यात आल्या आहेत त्याचा अभ्यास करावा.

# प्रकरण – १४
# मुक्त आणि नि:पक्षपाती निवडणुकीची खबरदारी

१४.१ मतदान यंत्र, मतदार यादीची चिन्हांकित प्रत, यासंदर्भात मागील प्रकरणात दिलेल्या सूचनांचे तुम्ही काटेकोरपणे पालन केलेले असावे. मुक्त आणि नि:पक्षपातीपणे निवडणूक घेण्यासाठी या सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे. त्या संदर्भात **जोडपत्र-सहा मध्ये दिलेल्या प्रतिज्ञापत्राचे तुम्ही वाचन करुन दाखवावे. प्रतिज्ञापत्राचे मोठया आवाजात वाचन करावे आणि त्यावर आपली स्वाक्षरी करावी.** तसेच तेथे उपस्थित असलेले आणि स्वाक्षरी व आपला शिक्का उमटविण्यास राजी असलेल्या मतदान प्रतिनिधीची त्यावर स्वाक्षरी घ्यावी. प्रतिज्ञापत्रावर आपली स्वाक्षरी करण्यास नकार देणाऱ्या मतदान प्रतिनिधीची नावे तुम्ही नोंद करुन ठेवावी.

### १४.२ नव्या मतदान यंत्राच्या वापरावेळी करावयाचे सोपस्कार वा कार्यपध्दती

मतदान चालू असताना जर अशी परिस्थिती आली की तुम्हाला नवे मतदान यंत्र वापरात घेणे आवश्यक आहे तर तुम्हाला **जोडपत्र ६-अ** मधील प्रतिज्ञापत्राचे पुन्हा वाचन करावे लागेल. (मतदान संपल्यानंतर तुम्हाला पुन्हा **जोडपत्र-७** च्या प्रतिज्ञापत्राची नोंद करावी लागेल) हे प्रतिज्ञापत्र वेगळया लिफाफ्यात घालून निर्वाचन अधिकाऱ्याकडे झालेले मतदानाचा हिशोब आणि नमुना व्हीएम-३ मध्ये कागदी मोहरांचा हिशेब आदी आवश्यक कागदपत्रांसह सुपूर्द करावे.

# प्रकरण – १५
# मतदान केंद्राभोवती निवडणूक कायद्यांचा अंमल लागू करणे

**१५.१ नि:पक्षपातीपणा आवश्यक:-** मतदान काळात शांततेचा भंग होऊ नये म्हणून तुमचे कौशल्य, शिस्तबध्दपणा आणि सर्वात महत्वाचे म्हणजे नि:पक्षपातीपणा आदी महत्वाचे आहे. सर्व पक्ष आणि उमेदवारांना सारखाच न्याय द्या. कोणताही वादाचा मुद्दा सोडविताना न्यायोचित व नि:पक्षपातीपणे निर्णय घ्या. तुम्ही राज्य निवडणूक आयोगाच्या प्रतिनियुक्तीवर आहात सबब तुमची प्रतिष्ठा-मान कमी होईल अशी कोणतीही कृती जसे उमेदवाराशी हात मिळवणे, त्यांचे सोबत फोटो काढणे वै., तुम्ही किंवा तुमच्या मतदान केंद्रातील कुणीही मतदान अधिकाऱ्याने करु नये की, इतरांना असे वाटेल की तुम्ही एका विशिष्ट उमेदवाराकडेच झुकते माप देत आहात.

**१५.२ प्रचारावर बंदी :-** मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात मतदानाच्या दिवशी प्रचार करणे हा गुन्हा आहे. जी व्यक्ती असा प्रचार करील त्यास पोलीस, वॉरंटशिवाय अटक करु शकतील ( कलम २९)

**१५.३ उमेदवारांचा निवडणूक मंडप (Booth):-** मुक्त, नि:पक्षपाती आणि सुरळीत निवडणूक घेण्यासाठी उमेदवाराच्या निवडणूक बूथचा अनेक प्रकारे अडथळा निर्माण होत असल्याने मतदान केंद्रापासुन २०० मीटरच्या परिसरात निवडणूक आयोगाने उमेदवारांचे निवडणूक बूथ उभारण्यास परवानगी देऊ नये अशी सूचना दिली आहे. असे बूथ उभारल्यास आपण पोलीसांच्या सहाय्याने ते काढावयास लावावेत.

तथापि, उमेदवार मतदारांना मदत करणेकामी मतदान केंद्राच्या २०० मीटर परिघाच्या बाहेर आपल्या प्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांसाठी एक टेबल आणि दोन खुर्च्या घालून देऊ शकतो. परंतु, सदर केंद्रास स्थानिक प्राधिकरणाकडून परवानगी घ्यावी लागेल. सदर केंद्रावर ३ x ४ १/२ फुटापेक्षा जास्त लांबी रुंदी नसणारा फलक लावू शकतील. त्यावर उमेदवाराचे नाव, चिन्ह, पक्षाची माहिती असेल. त्याव्यतिरिक्त कोणताही अनधिकृत फलक लावल्यास तो फलक काढून टाकण्यात येईल. प्रतिनिधी वा कार्यकर्त्यांचे ऊन आणि पावसापासून रक्षण करण्यासाठी या टेबलावर छत्री अथवा तारपोलीन घालता येईल.

या टेबलाभोवती गर्दी होऊ देऊ नये. जर या सूचनांचे उल्लंघन झाल्याचे तुम्हाला दिसले तर त्याची माहिती तुम्ही विभाग न्यायदंडाधिकाऱ्यास अथवा मतदान केंद्राभोवती कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी असलेल्या इतर अधिकाऱ्यांना द्या म्हणजे ते आवश्यक उपाय योजतील.

मतदानाच्या दिवशी या केंद्रावर उमेदवाराचे नाव/चिन्ह नसलेल्या केवळ मतदाराचा मतदान क्रमांक, मतदान केंद्राचा तपशील दर्शविणाऱ्या चिठ्ठया दिल्या जाऊ शकतील. परंतु त्यावर इतर कोणताही तपशील असणार नाही.

**१५.४ मतदान केंद्रात किंवा जवळ बेबंद वर्तणूक:-** जर कुणी व्यक्ती बेबंदवृत्तीने वागत असल्यास त्या व्यक्तीला पोलिसांकरवी अटक करु शकता व त्याच्यावर आयपीसीमधील संबंधित कलमाखाली खटला भरु शकता. पोलिसांना त्या व्यक्तीला अटक करण्याची व त्याची बेबंद वर्तणूक थांबविण्यास पुरेसा बळाचा वापर करण्याचा अधिकार आहे. परंतु त्यापूर्वी त्या व्यक्तीला पोलिसांनी ताकीद द्यावी व समजावण्याचा प्रयत्न करावा.जर मेगाफोन अथवा लाऊडस्पिकरचा मतदान प्रक्रियेत अडथळा येत असेल तर तुम्ही त्याचा वापर थांबविण्याचा आदेश द्या. त्यासाठी १०० मीटर अंतराची मर्यादा लागू नाही. तुमच्या मतदान कामात अडथळा निर्माण होत असल्याचे तुम्हाला जाणवले तर कितीही अंतरावरील हा अडथळा तुम्ही दूर करु शकता.

**१५.५ बेशिस्त व्यक्तीला मतदान केंद्रातून बाहेर काढणे:-** मतदान काळात जर कुणी व्यक्ती तुमचा कायदेशीर आदेश मानीत नाही किंवा गैरवर्तणूक करीत असेल तर पोलिस अधिकाऱ्याच्या वा तुम्ही अधिकार दिलेल्या कुणाही व्यक्तीमार्फत त्या व्यक्तीला मतदान केंद्राबाहेर काढू शकता.

**१५.६ मतदारांना आणण्यासाठी बेकायदेशीर वाहनांचा वापर:- (कलम ३३-अ)**

१५.६.१ मतदाराच्या घरापासुन मतदान केंद्रापर्यंत आणण्यासाठी गाड्या पुरविणे व त्याद्वारे मतदारांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करणे यासारखी बेकायदेशीर वाहतुक यासारख्या बाबी ह्या लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ कलम १२३ अंतर्गत करप्ट प्रॅक्टिसेस मध्ये येत असून जर तुमच्याकडे यासंदर्भात कुणी तक्रार केली तर तुम्ही त्याला दोषीविरुध्द खटला भरण्याचा सल्ला द्या किंवा योग्य त्या न्यायालयात दोषीविरुध्द निवडणूक याचिका दाखल करण्यास सांगा. तुमच्याकडे दाखल केलेली कोणतीही तक्रार अशा तक्रारींची दखल घेण्याचे कार्यक्षेत्र असलेल्या विभागीय न्यायदंडाधिकारी अथवा इतर अधिकाऱ्याकडे पाठवा. त्या तक्रारीवर तुम्ही स्वत:चे मत व तुम्हाला त्यासंदर्भात असलेल्या माहितीचा शेरा द्या.

१५.६.२ मतदानाच्या दिवशी गाडयांच्या वाहतुकीसंदर्भात निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचना व मार्गदर्शनांचे पालन करा.

**१५.७ मतदान केंद्रातून मतदान यंत्र हलविणे हा गुन्हा आहे (कलम ३५)** कोणत्याही निवडणुकीत कोणत्याही व्यक्तीने गैरमार्गाने अथवा अनधिकृतपणे मतदान केंद्रातून मतदान यंत्र हलविणे अथवा हलविण्याचा प्रयत्न करणे हा गुन्हा असून संबंधित व्यक्तीवर आयपीसी अंतर्गत कारवाई होऊ शकते.

**१५.८ निवडणूक अधिका-यांनी कर्तव्यभंग केल्यास (कलम ३४):-** जर मतदान केंद्राध्यक्षाने अथवा मतदान अधिका-याने आपल्या कर्तव्यात कोणतीही कसुर केल्यास वा निष्काळजीपणा दाखवल्यास तो निवडणूक कायद्याचा भंग ठरेल व कर्तव्यात कसूर करणे या गुन्हयासाठी त्याच्यावर कारवाई होऊ शकते.

**१५.९ मतदान केंद्राकडे अथवा परिसरात हत्यारे घेऊन जाणे:-** अनधिकृत व्यक्तींनी मतदानाच्या दिवशी, शस्त्रास्त्र कायदा १९५९ मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे सशस्त्र होऊन मतदान केंद्राच्या परिसरात फिरणे हा गुन्हा असून, जी व्यक्ती या तरतुदींचा भंग करील ती दोन वर्षेपर्यंत कारावास किंवा दंड किंवा कारावासासह दंडास पात्र ठरेल. हा दखलपात्र गुन्हा असेल.

**१५.१०** राज्य निवडणूक आयोगाच्या मतदान केंद्राबाबतच्या आदेशात नमुद केलेप्रमाणे मतदान केंद्राच्या १०० मीटर परिघात मतदान केंद्रावर कर्मचारीवृंद/पोलीसांव्यतिरिक्त **कोणीही मोबाईल/कॉडलेस फोन/वायरलेस वापरणार नाही.**

## प्रकरण – १६

## मतदाराची ओळख पटविणे आणि मतदाराच्या ओळखीस आव्हान दिल्यास अवलंबिण्याची कार्यपध्दती

### १६.१ मतदाराच्या ओळखीची शहानिशा करणे:-

**१६.१.१ प्रकरण-६** मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे मतदार मतदान केंद्रात शिरल्यानंतर थेट पहिल्या मतदान अधिकाऱ्यांकडे जाईल. हा अधिकारी चिन्हांकित मतदार यादी हाताळेल आणि मतदाराची ओळख पटविण्याची जबाबदारी त्याच्यावर असेल. मतदान अधिकारी मतदाराची मतदार यादीनुसार ओळख पटवील. ज्यावेळी जिल्हा परिषद व पंचायत समिती पदांची निवडणूक एकाचवेळी होत असेल त्यावेळी मतदारांना दोनही (जिल्हा परिषद व पंचायत समिती) पदांकरीता मतदान करणे आवश्यक आहे याची माहिती करुन द्यावी.

१६.१.२ सर्वसाधारणपणे प्रत्येक मतदार, उमेदवार अथवा त्याच्या प्रतिनिधीने दिलेले अनधिकृत ओळखपत्र घेऊन येतो. हे ओळखपत्र पांढऱ्या कागदावर असते आणि त्यावर मतदाराचे नाव, त्याचा यादीतील अनुक्रमांक, मतदार यादीचा भाग क्रमांक आणि मतदान केंद्राचे नाव व क्रमांक असतो. या ओळखपत्रावर उमेदवाराचे नाव किंवा पक्षाचे नाव किंवा त्यांना देण्यात आलेले निवडणूक चिन्ह असू नये. एखाद्या उमेदवाराने वा त्याच्या पक्षाने असे ओळखपत्र जारी केले तर ही बाब उमेदवाराच्या मतदान केंद्रातील मतदान प्रतिनिधींच्या लक्षात आणावी आणि त्यांना असे प्रकार ताबडतोब थांबविण्यास सांगावे. झोनल ऑफीसरला सांगावे जेणेकरून अशा उमेदवाराच्या बुथवर कारवाई करता येईल.

१६.१.३ राज्य निवडणूक आयोगाने मतदाराची ओळख पटविण्यासंदर्भात कोणकोणत्या कागदपत्रांचा उपयोग पुरावा म्हणून होऊ शकेल या याविषयी क्र.रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.१६/का.५, दि.८ नोव्हेंबर, २०११ व दि.२९/०३/२०१० रोजी आदेश निर्गमित केले आहेत **(जोडपत्र-१२),** त्यामध्ये नमुद १७ पैकी कोणताही एक पुरावा ओळख पटविण्यासाठी मतदाराने सोबत आणणे अनिवार्य आहे.

१६.१.४ पहिल्या मतदान अधिकाऱ्याने केवळ ओळखपत्रावरील मतदार यादीचा अनुक्रमांक मोठयाने वाचावा. नंतर संबंधित मतदारास आपले नाव मोठयाने सांगण्यास सांगावे. आवश्यकता भासल्यास ओळखपत्रावरील इतर माहितीही त्याला सांगण्यास सांगावी. म्हणजे ओळखपत्र घेऊन आलेली व्यक्ती ही तीच आहे का? याची पक्की खात्री पटेल.जर मतदार आपली ओळख पूर्णपणे पटवू शकला नाही तर त्याला मतदान केंद्राध्यक्षाकडे जाण्यास सांगावे. मतदान केंद्राध्यक्ष आपल्यापरीने त्या मतदाराच्या ओळखीबद्दल समाधान करुन घेईल. जर मतदार भोंदू आढळल्यास त्याला पोलिसांच्या स्वाधीन करण्यास मतदान केंद्राध्यक्षाने मागे-पुढे पाहू नये.

१६.१.५ जर तुमच्या मतदान केंद्रात मतदान करण्यासाठी मोठया प्रमाणात **बुरखाधारी महिला** येणार असतील तर त्यांची ओळख पटविण्यासाठी **प्रकरण-४** मध्ये वर्णन केल्याप्रमाणे वेगळा कक्ष आणि एका महिला मतदान अधिकाऱ्यांची नेमणूक करावी.

१६.१.६ सर्वसाधारणपणे मतदान केंद्रात मतदान करण्यास येणारा मतदार हा खरा मतदार असतो असे गृहित धरले जाते. परंतु गृहित धरण्याच्या विश्वासाला तडा जाऊ शकतो. मतदाराचे मतदान यादीतील वय आणि प्रत्यक्ष दिसणाऱ्या मतदाराचे वय यात फरक आढळला किंवा इतर कोणत्याही सभोवतालच्या परिस्थितीवरुन संशय आला तर मतदान अधिकाऱ्याने आपले पूर्ण समाधान करुन घ्यावे आणि मतदाराची खरी ओळख पटवावी. केवळ अनधिकृत ओळखपत्र खरे मानून मतदाराची ओळख पटवू नये तर संशय आल्यास मतदान केंद्राध्यक्षाच्या नजरेस ही बाब आणावी.

**१६.२ मतदाराच्या ओळखीस आव्हान देणे:-** ज्या व्यक्तीचे नाव मतदार यादीत आहे, त्याला मतदान करण्याचा अधिकार आहे. मात्र उमेदवार अथवा त्याच्या प्रतिनिधीने मतदाराच्या ओळखीस आव्हान दिले

नाही आणि तुम्हाला तो मतदार बनावट असल्याची खात्री पटली नाही, तर तो ओळखपत्र घेऊन आलेला मतदार हा खरा मतदार आहे असे गृहीत धरावे. परंतु एखाद्या मतदाराच्या ओळखीबद्दल आव्हान देण्यात आले आहे आणि तुम्हाला बाहय परिस्थितीवरुनही ती व्यक्ती बनावट मतदार दिसली तर तुम्ही संक्षिप्त चौकशी करुन निर्णय घ्यावा.

**१६.३ आव्हानित मते:-** एखाद्या मतदान प्रतिनिधीने मतदाराच्या ओळखीस आव्हान दिल्यास संबंधीत प्रतिनीधीकडून रु.२.०० इतकी अनामत रक्कम ठेवून घ्यावी व त्याची पोहोच द्यावी **(यासंदर्भातील पावतीचा नमुना जोडपत्र-१४).** मतदाराची चौकशी केल्यानंतर सदर मतदार खरा असल्याचे निष्पन्न झाल्यास सदर मतदारास मतदान करु द्यावे. तथापि, मतदार खरा नसल्याचे निष्पन्न झाल्यास व तो बोगस असल्याचे निदर्शनास आल्यास त्यास पोलिसांच्या स्वाधीन करावे व त्याबाबतची लेखी तक्रार पोलिसात द्यावी. सदर तक्रारीची पोलिसांनी गंभीर दखल घेऊन गुन्हेगाराविरुध्द गुन्हा शाबित होईल, याद्दष्टीने आवश्यक ती सर्व कार्यवाही करावी.

**१६.४ संक्षिप्त चौकशी:-** मतदाराच्या ओळखीसंदर्भात आव्हान देणाऱ्याला तो खरा मतदार नाही याबद्दल पुरावा देण्यास सांगा. जर आव्हान देणारा प्रथमदर्शनी पुरावा देण्यास असमर्थ ठरल्यास त्याचे आव्हान अमान्य करा आणि ज्या व्यक्तिच्या ओळखीबद्दल आव्हान देण्यात आले आहे त्याला मतदान करु द्या. जर आव्हान देणारा प्रथमदर्शनी पुरावा सादर करु शकला तर आव्हान देण्यात आलेल्या व्यक्तीला बोलावून त्याच्याविरुध्दचा पुरावा फेटाळणारा पुरावा सादर करण्यास सांगा, जर तो मतदार असण्याबाबत योग्य पुरावा सादर करु शकला तर त्याला मतदान करु द्या. जर तो पुरावा सादर करु शकला नाही तर त्याच्याविरुध्द दिलेले आव्हान मान्य करा. चौकशीच्या काळात तुम्ही ग्राम अधिकारी, बनावट म्हणून संशय आसलेल्या मतदाराच्या शेजारच्या मतदाराकडे त्याच्या खरे-खोटेपणाबद्दल चौकशी करू शकता. पुरावा घेताना तुम्ही **आव्हान दिलेल्या व्यक्तिकडून किंवा पुरावा देणाऱ्या इतर व्यक्तिकडून शपथेवर पुरावा घ्या.** जर आव्हान खरे ठरले तर बनावट मतदारास पोलिसांच्या स्वाधीन करा व तुमची त्याच्याविरुध्दची तक्रार पोलिसाला द्या. ही तक्रार तुमचे मतदान केंद्र असलेल्या भागातील पोलिस ठाणे अधिकाऱ्याला द्या. **(जोडपत्र-१५)**

**१६.५ आव्हान शुल्क परत करणे**

संबंधीत मतदार खरा आहे किंवा कसे? याविषयी चौकशी केल्यानंतर जर मतदान केंद्राध्यक्षास संबंधीत खरा मतदार नसल्याचे निदर्शनास आल्यास त्यास मतदान करु देणार नाही तसेच आव्हान करणाऱ्या मतदान प्रतिनिधीला त्याने भरलेली रक्कम रु.२/- (आव्हान शुल्क) परत करण्यात येईल. तशी पोहोच आक्षेप फी पुस्तिकेच्या काउंटर फॉईलवर घ्यावी तसेच हरकत घेण्यात आलेल्या मतांची यादी मधील संबंधीत रकान्यात सही देखील घेईल.

तथापि, मतदाराच्या खरेपणाविषयी घेण्यात आलेले आव्हान चांगल्या उद्देशाने केलेले नाही व नाहक केले आहे असे आढळून आल्यास आव्हान शुल्क जप्त करण्यात यावे व तशी नोंद घेण्यात यावी.

**१६.६ मतदार यादीतील मुद्रणदोष अथवा कार्यालयीन चुका दुर्लक्षित करणे:-** काही वेळा मतदार यादीत नोंदविलेली मतदाराची माहिती छापण्यात मुद्रण दोष असतो तर काही वेळा ती माहिती कालबाहय ठरलेली असते उदा. मतदाराचे वयासंदर्भातील माहिती. अशावेळी कालबाह्य माहिती दुर्लक्षित करावी. तथापि, मतदार यादीत नोंदविलेल्या इतर माहितीच्या आधारे तसेच मतदाराने सादर केलेल्या पुराव्या आधारे तुम्ही मतदाराच्या ओळखी संदर्भात खात्री करुन घ्या.

**१६.७ मतदाराच्या पात्रतेला आव्हान देऊ नका-** तुमचे समाधान होईल अशाप्रकारे मतदाराची ओळख पटली तर त्याला मतदान करण्याचा हक्क आहे, अशा मतदाराच्या पात्रतेबद्दल मतदान केंद्रात शंका

उपस्थित करता येणार नाही. उदाहरणार्थ मतदार १८ वर्षाचा आहे का वा तो संबंधित मतदार संघातील रहिवासी आहे का याबाबत चौकशी करु नये.

परंतु एखादा मतदार १८ वर्ष वयापेक्षा खुपच लहान वाटत असेल तर संबंधीत मतदार यादीच्या प्रकाशनाच्या वर्षी १ जानेवारीला सदर मतदार १८ वर्षाचा होता याबाबत त्याच्याकडून घोषणापत्र घ्या, असे करीत असताना बोगस मतदान करणे हा कायद्याने गुन्हा आहे याची कल्पना त्यांना द्या. तसेच त्याचे पुरावे व्यवस्थीत तपासा. असे घोषणापत्र देणाऱ्या वा घोषणापत्र देण्यास नकार देणाऱ्या व मतदान न करणाऱ्या मतदारांची यादी स्वतंत्रपणे तयार करून निर्वाचन अधिकाऱ्यास सादर करा.

..........जिल्हा परिषद व/...........पंचायत समिती निवडणूक २०..

निवडणूक विभाग क्रमांक......./ निर्वाचक गण क्रमांक............

मतदान केंद्र क्रमांक व नाव..........................................

भाग-१

**वयाबाबत घोषणपत्र सादर करणाऱ्या मतदारांची यादी**

| अ.क्र. | मतदाराचे नाव | मतदार यादी मधील अ.क्र | मतदार यादीत दर्शविण्यात आलेले वय | मतदान केंद्राध्यक्षाच्या मते दिसून येणारे वय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १<br>२<br>३<br>४<br>..... | | | | |

**भाग-२**

**वयाबाबत घोषणपत्र सादर करणास नकार देणाऱ्या मतदारांची यादी**

| अ.क्र. | मतदाराचे नाव | मतदार यादी मधील अ.क्र | मतदार यादीत दर्शविण्यात आलेले वय | मतदान केंद्राध्यक्षाच्या मते दिसुन येणारे वय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १<br>२<br>३<br>४<br>..... | | | | |

**दिनांक.....................................** **मतदान केंद्राध्यक्षाची सही**

## प्रकरण – १७

## मतदाराला मतदान करु देण्यापूर्वी त्याच्या बोटावर न पुसणारी शाई लावणे आणि त्याची स्वाक्षरी वा अंगठयाचा ठसा घेणे

### १७.१ मतदाराची डाव्या हाताची तर्जनी तपासणे आणि त्यावर शाई लावणे

१७.१ मतदाराची पहिल्या मतदान अधिका-याने ओळख पटविली आणि त्या मतदाराबद्दल कुणीही आव्हान दिले नाही तर दुसरा मतदार अधिकारी त्याच्या डाव्या हाताच्या तर्जनीवर मतदानाची शाई **प्रकरण-६ (३)** मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे लावेल. जर एखाद्या मतदाराने शाई लावून घेण्यास नकार दिला किंवा त्याच्या डाव्या हाताच्या तर्जनीवर शाईची खूण असेल किंवा शाईची खूण पुसण्याचा त्याने प्रयत्न केला तर त्याला मतदान करु देऊ नका.

१७.२ जर मतदाराने मतदानाची शाई लागू नये म्हणून तर्जनीवर तेलकट पदार्थ लावला असेल तर तो तेलकट अथवा 'ग्रीस' चा पदार्थ मतदान अधिका-याने कापडाच्या तुकडयाने अथवा चिंधीने तो पुसावा आणि त्यानंतरच मतदानाची शाई त्याच्या तर्जनीवर लावावी. राज्य निवडणूक आयोगाचे निदेश पत्र क्र. मनपा२०१०/प्र.क्र.१०/का.५, दि.१९/११/२०११ अनुसार मार्कर पेनच्या वापराबाबत सूचना दिल्या आहेत. **(जोडपत्र-१७)**

१७.३ पूर्वी मतदाराची स्वाक्षरी किंवा अंगठयाचा ठसा घेतल्यानंतर मतदानाची शाई त्याच्या तर्जनीवर लावण्यात येईल. परंतु निवडणूक आयोगाच्या नव्या सूचनेनुसार मतदानाची शाई मतदाराच्या बोटावर लावल्यानंतर त्याची स्वाक्षरी किंवा अंगठयाचा ठसा घ्यावा. त्यामुळे सदर मतदार स्वाक्षरी करणे आणि त्यानंतर मतदान करीपर्यंत बराच कालावधी जाईल. आणि दरम्यानच्या काळात त्याच्या बोटावरील मतदानाची शाई पूर्णपणे वाळेल आणि शाईचा ठळक ठसा बोटावर उमटेल.

१७.४ मतदार मतदान विभागात जाण्यापूर्वी नियंत्रण विभागाचा प्रमुख असलेल्या मतदान अधिका-याने अथवा मतदान केंद्र प्रमुखाने मतदाराच्या बोटावरील शाई पुन्हा एकदा तपासावी. जर मतदाराने शाई पुसली किंवा त्याच्या बोटावरील शाई अस्पष्ट असेल तर त्याच्या बोटावर पुन्हा शाई लावावी. सर्वसाधारणपणे हे काम मतदान पथकाबरोबर असलेल्या 'ड' वर्गीय कर्मचाऱ्याकडे सोपवावे. तो मतदार मतदान विभागात जाण्यापूर्वी व मतदान करुन मतदान केंद्राबाहेर पडण्यापूर्वी मतदाराच्या बोटावरील शाई तपासेल.

**१७.५ प्रत्येक मतदान केंद्रावर नियुक्त करण्यात येणा-या अधिकारी/कर्मचारी यांची संख्या वेगवेगळी असण्याची शक्यता असल्यामुळे वर नमूद केलेली कामे सोपविण्याचे अथवा त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार मतदान केंद्राध्यक्षांना राहतील.**

### १७.६ नव्याने मतदान अथवा स्थगित मतदानाच्या वेळी शाई लावण्याची पध्दत

नव्याने मतदान घेण्यात आले किंवा स्थगित मतदान पुन्हा घेण्यात आले तर पहिल्या मतदानाच्यावेळी मतदाराच्या बोटावर लावलेल्या मतदानाच्या शाईकडे दुर्लक्ष करावे आणि नवी शाई मतदाराच्या डाव्या हाताच्या **मधल्या बोटावर** नख आणि नखाला धरुन असलेल्या त्वचेच्या कडेवर लावावी. म्हणजे शाईची ठळक खूण दिसून येईल.

### १७.७ मतदाराला जर डाव्या हाताची तर्जनी नसेल तर शाई लावण्याची पध्दत

जर मतदाराला डाव्या हाताची तर्जनी नसेल तर त्याच्या डाव्या हाताच्या कोणत्याही बोटावर शाई लावावी. जर त्याच्या डाव्या हाताला बोटेच नसतील तर शाई त्याच्या उजव्या हाताच्या तर्जनीवर लावावी आणि जर त्याला उजव्या हाताची तर्जनी नसेल तर तर्जनीपासून नंतरच्या कोणत्याही बोटावर शाई लावावी.

जर त्याच्या डाव्या अथवा उजव्या हाताची बोटेच नसतील तर मतदानाची शाई त्याच्या डाव्या अथवा उजव्या हाताच्या थोटकावर लावावी.

### १७.८ मतदाराचा मतदार नोंदवहीतील मतदार क्रमांक नोंद करणे

१७.८.१ मागील उताऱ्यात नमूद केलेप्रमाणे, दुसऱ्या मतदान अधिका-याने मतदाराच्या बोटावर शाई लावल्यानंतर त्याने मतदाराची नोंद, मतदार नोंदवहीत **(नमुना व्हीएम-१)** मध्ये करावी आणि त्यावर मतदाराची स्वाक्षरी अथवा अंगठयाचा ठसा घ्यावा.

१७.८.२ ही नोंद दुसऱ्या मतदान अधिकाऱ्याने मतदार नोंदवहीत पुढील पध्दतीने करावी.

१) पहिल्या रकान्यात दुसरा मतदान अधिकारी मतदाराचा अनुक्रमांक लिहिल. सुरुवात १ क्रमांकाने करील. नोंदवहीच्या (रजिस्टर) प्रत्येक पानावर (पाठपोट) २० अनुक्रमांक लिहिता येतील. मतदान सुरु होण्यापूर्वी सदर मतदान अधिकाऱ्याने नोंदवहीच्या काही पानावर असे अनुक्रमांक आगाऊ लिहून ठेवावे.

२) दोन क्रमांकांच्या रकान्याने मतदान अधिकारी मतदाराचा यादीतील अनुक्रमांक लिहिल.

उदा. मतदानासाठी मतदान केंद्रात प्रथम आलेल्या मतदाराचा चिन्हांकित मतदार यादीतील अनुक्रमांक २५६ असेल तर दुसरा मतदान अधिकारी नोंदवहीतील पहिल्या रकान्यात १ अनुक्रमांक लिहिल आणि दुस-या रकान्यात २५६ हा अनुक्रमांक लिहिल.

त्याचप्रमाणे दुसऱ्या मतदाराचा मतदार यादीतील क्रमांक १३८ असेल तर दुसरा मतदान अधिकारी मतदार नोंदवहीत पहिल्या रकान्यात २ क्र.लिहिल आणि दुसऱ्या रकान्यात १३८ हा मतदार यादीचा अनुक्रमांक लिहिल त्याचप्रकारे पुढील मतदारांची नोंद करीत जावे.

३) वरील दोन रकान्यात योग्य ती माहिती भरल्यानंतर दुसऱ्या मतदान अधिकाऱ्याने संबंधित मतदारांची ३ क्रमांकाच्या रकान्यात स्वाक्षरी अथवा अंगठयाचा ठसा घ्यावा.

### १७.९ मतदाराची स्वाक्षरीची व्याख्या :

१७.९.१ मतदाराने मतदार नोंदवहीत स्वाक्षरी करताना स्वत:चे पूर्ण नाव, मधले नाव आणि आडनाव असे लिहीणे अपेक्षीत आहे किमान आडनाव व पहिल्या नावाची आद्याक्षरे लिहावीत. जर साक्षर मतदाराने स्वाक्षरी म्हणून कोणतीही खूण केली आणि ती खूण म्हणजे आपली स्वाक्षरी मानावी असे सांगितले तर तसे मान्य करु नये. त्याला त्याचे पूर्ण नाव लिहिण्यास सांगावे. कारण साक्षर मतदाराने आपल्या पूर्ण नावाची स्वाक्षरी करणे म्हणजे मतदार नोंदवहीतील त्याची नोंद प्रमाणित करणे असे मानले जाते. जर त्याने आपले पूर्ण नाव लिहिण्याचे नाकारले तर त्याला अंगठयाचा ठसा उमटविण्यास सांगावे. जर त्याने अंगठयाचा ठसाही उमटविण्यास नकार दिल्यास मतदान करु देऊ नका.

१७.९.२ स्वाक्षरी करणाऱ्या मतदारांची नोंद, आयोगाकडून साक्षर व निरक्षर मतदारांची संख्या मागितली असल्यास त्यानुसार अहवालासाठी ठेवण्यात यावी.

### १७.१० मतदाराच्या अंगठयाचा ठसा

१७.१०.१ जर मतदार स्वाक्षरी करण्यास असमर्थ असल्यास मतदार नोंदवहीत त्याच्या डाव्या अंगठयाचा ठसा घ्यावा. मतदाराच्या डाव्या अंगठयाचा ठसा मतदान केंद्राध्यक्ष अथवा इतर कोणत्याही मतदान अधिकाऱ्याने मतदार नोंदवहीत तो प्रमाणित करण्याची गरज नसते.

१७.१०.२ जर मतदारास डाव्या हाताचा अंगठा नसेल तर उजव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा घ्यावा. उजव्या हाताला देखील अंगठा नसेल तर डाव्या हाताच्या अंगठ्याच्या बाजुने अस्तित्वात असणाऱ्या कोणत्याही बोटाचा ठसा घ्यावा. डाव्या हाताला एकही बोट नसल्यास, उजव्या हाताच्या अंगठ्याच्या बाजुने अस्तित्वात असणाऱ्या कोणत्याही बोटाचा ठसा घ्यावा. परंतु दोन्ही हाताला एकही बोट नसल्यास तो मतदान करू शकणार नाही सबब परिच्छेद १७.११ मध्ये नमुद केलेप्रमाणे सदर मतदाराबरोबर उपस्थित जोडीदाराची मतदार नोंदवहीत स्वाक्षरी वा अंगठयाचा ठसा घ्यावा.

१७.१०.३ मतदार नोंदवहीतील डाव्या अंगठयाचा ठसा हा स्पष्ट असा असावा. अंगठयाचा ठसा ठळक असावा म्हणून स्टॅम्प पॅडमधील शाई मतदाराच्या डाव्या अंगठयावर चांगली बसेल अशी लावावी. त्याचप्रमाणे ठसा अगदी गडद उठू नये म्हणून स्टॅम्प पॅडमध्ये अंगठा अगदी खोलवर बुडवू नये.

१७.१०.४ मतदाराच्या अंगठयाचा ठसा घेतल्यानंतर त्याचा अंगठा ओल्या कापडाच्या तुकडयाने पुसण्याची व्यवस्था मतदान केंद्रात करावी.

**१७.११ मतदार नोंदवहीत अंध/अशक्त अथवा कुष्ठरोग्याची स्वाक्षरी वा अंगठयाचा ठसा घेणे**

अंध अथवा कुष्ठ रोग झालेल्या मतदाराच्या अंगठयाचा ठसा मतदान नोंदवहीत घ्यावा. जर अशा मतदारापैकी कुणी साक्षर असेल तर त्याला अंगठयाच्या ठशाऐवजी स्वाक्षरी करु द्यावी. जर असा मतदार अंगठयाचा ठसा वा स्वाक्षरी करु शकत नसल्यास त्याच्या जोडीदारास मतदान नोंदवहीत स्वाक्षरी वा अंगठयाचा ठसा उमटू द्यावा.

१७.१२ **मतदारास, मतदार स्लीप देणे**

१७.१२.१ मतदाराच्या तर्जनीवर शाईची खूण केल्यानंतर त्याची स्वाक्षरी वा अंगठयाचा ठसा मतदार नोंदवहीत पहिला मतदान अधिकारी घेईल. तर दुसरा मतदान अधिकारी खालील नमुन्यात मतदार स्लीप तयार करील.

**मतदार स्लीप**

| |
|---|
| मतदाराचा अनुक्रमांक (मतदार नोंदवहीच्या रकाना १ प्रमाणे) ........................<br>मतदाराचा, मतदार यादीतील अनुक्रमांक ...............................................<br>मतदान अधिका-याची संक्षिप्त स्वाक्षरी ....................................................... |

१७.१२.२ या मतदार स्लीप निर्वाचन अधिकारी पोस्ट कार्डाच्या निम्म्या आकाराएवढी छापून घेईल. आणि तुम्हाला मतदानाच्या साहित्याबरोबर पुरवील. १०० स्लीपचे एक बंडल किंवा ५० स्लीपचा एक बंडल याप्रकारे तुमच्या केंद्रातील मतदारांच्या संख्येनुसार देण्यात येतील.

१७.१२.३ वरील १७.१२.१ उताऱ्यानुसार तयार करण्यात आलेली मतदार स्लीप दुसरा मतदान अधिकारी मतदाराला देईल. ही स्लीप घेऊन मतदाराला मतदान यंत्राच्या नियंत्रण विभागाचा ताबा असलेल्या तिस-या मतदान अधिका-याकडे वा मतदान केंद्राध्यक्षाकडे जाण्यास सांगावे.

## प्रकरण – १८

## मतदानाची नोंद आणि मतदान सोपस्कार

### १८.१ मतदार नोंदवहीत मिळालेल्या अनुक्रमांकानेच मतदान करणे

१८.१.१ मतदान यंत्राचा, नियंत्रण विभाग (CU) प्रमुख म्हणून, मतदार "मतदार स्लीप" घेऊन तुमच्याकडे किंवा तिसऱ्या मतदान अधिकाऱ्याकडे येईल. ही मतदार स्लीप पाहूनच मतदानासाठी कंट्रोल युनीट कार्यान्वीत करण्यात येईल.

१८.१.२ मतदार नोंदवहीत नोंदविलेल्या क्रमांकानेच मतदाराना मतदान यंत्रावर मतदान करण्यास द्यावे. त्यासाठी नियंत्रण विभागाचे प्रमुख असलेल्या मतदान अधिकाऱ्याने मतदारांना त्यांच्या मतदार स्लीपवरील अनुक्रमांकानुसार मतदान कक्षात पाठवावे.

१८.१.३ काही अपवादात्मक परिस्थितीत अथवा काही अपरिहार्य कारणास्तव वा आकस्मिक कारणाने जर अनुक्रमांकाने मतदान करण्याची पध्दत तोडावी लागली तर त्याबद्दल योग्य ती नोंद म्हणजे मतदाराने प्रत्यक्षात कोणत्या अनुक्रमांकावर मतदान केले ते त्याच्या अनुक्रमांकाच्या समोर शेऱ्याच्या रकान्यात लिहिण्यात यावे. त्याचप्रमाणे ज्या मतदाराच्या अनुक्रमांकावर उपरोक्त मतदाराने मतदान केले त्याच्या अनुक्रमांकापुढेही योग्य ती नोंद करावी.

### १८.२ मतदारास मतदान करण्यास परवानगी देणे

१८.२.१ "मतदार स्लीप" घेऊन मतदार तुमच्याकडे किंवा नियंत्रण विभागाचा प्रमुख असलेल्या तिसऱ्या मतदान अधिकाऱ्यांकडे येईल तेव्हा त्याच्याकडून मतदार स्लीप घेऊन, कंट्रोल युनीट कार्यान्वीत करण्यात यावे व मतदारास मतदान करु द्यावे.

१८.२.२ मतदारांकडून परत घेतलेल्या सर्व मतदार स्लीप काळजीपूर्वक जपून ठेवाव्या आणि मतदानाशेवटी त्या एका लिफाफ्यात बंद कराव्यात. त्यासाठी निर्वाचन अधिकारी खास लिफाफा देईल.तो **प्रकरण–२८** मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे सील करावा.

१८.२.३ मतदाराकडून मतदार स्लीप घेतल्यानंतर त्याच्या तर्जनीचे बोट तुम्ही किंवा या तिस-या मतदान अधिकाऱ्याने (नियंत्रण विभाग प्रमुख ) तपासावे. तर्जनीवर लावलेली मतदानाची शाई पुसली गेलेली असेल किंवा अंधूक झालेली असेल तर त्यावर पुन्हा शाईची ठळक खूण करावी. (हे काम नंतर तुमच्या मतदान पथकात असलेल्या ड वर्गाच्या कर्मचाऱ्यास मतदार, मतदान करुन मतदान कक्षात बाहेर आल्यावर व मतदान केंद्रातून बाहेर पडण्यापूर्वी करण्यास सांगावे)

१८.२.४ नंतर मतदाराला मतदान करण्यासाठी मतदान कक्षात पाठवावे.

### १८.३ मतदान पध्दत

१८.३.१ मतदाराला मतदान करता यावे म्हणून नियंत्रण विभागावरील "बॅलट" बटन तुम्ही किंवा तिस-या मतदान अधिकाऱ्याने दाबावे. त्यामुळे मतदान कक्षात ठेवलेले मतदान युनिट मत नोंदणीसाठी सज्ज होईल. ज्यावेळी "बॅलट" बटन दाबण्यात येईल, यावेळी नियंत्रण विभागातील "**बिझी" दिवा (लाल दिवा )पेटेल** आणि त्याचबरोबर मतदान कक्षातील प्रत्येक मतदान युनिटवरील (रेडी) **हिरवा दिवा पटेल.**

१८.३.२ मतदार मतदान युनिटवर उमेदवाराचे नाव व निशाणीपुढे असलेले निळे बटन दाबून आपल्या मताची नोंद करील. **ज्यावेळी जिल्हा परिषद व पंचायत समिती या दोनही पदांची निवडणूक एकाचवेळी होत असेल**

**त्यावेळी जिल्हा परिषदेकरीता पांढ-या रंगाच्या मतपत्रिकेवरील व पंचायत समितीकरीता गुलाबी रंगाच्या मतपत्रिकेवरील उमेदवारांच्या नावासमोरील एक बटन दाबून मतदान करावे.** ज्यावेळी मतदार बटन दाबील त्यावेळी उमेदवाराचे नाव आणि निशाणी पुढे असलेला लाल दिवा पेटेल आणि मतदान युनिटवरील हिरवा दिवा बंद होईल. त्याचप्रमाणे नियंत्रण विभागातून बीप असा आवाज येईल. जिल्हा परिषद व पंचायत समिती या दोनही पदांकरीता मतदान पूर्ण झाल्यानंतरच बीप आवाज येतो. काही क्षणातच नियंत्रण विभागातील बीप आवाज आणि बिझी तांबडा दिवा बंद होईल. (भारत निवडणूक आयोगाच्या मतदान यंत्रात बहुसदस्यीय निवडणूक पद्ध्तीची तरतुद नसल्याने तुम्हाला २ कंट्रोल युनीट पुरविण्यात आले असतील तरी वरील दिव्यांची स्थिती दोन्ही कंट्रोल व बॅलट युनीट बाबतची चेक करावी)

१८.३.३ ही दृक् आणि श्राव्य खूण मतदाराचे मत नोंदविण्यात आल्याची आहे. त्याचबरोबर मतदाराने मतदान कक्षातून बाहेर येऊन मतदान केंद्राबाहेर पडावे.

१८.३.४ पुढील प्रत्येक मतदारास मतदान करण्यास परवानगी दिल्यानंतर ही पध्दत वापरावी. येथे एक बाब लक्षात ठेवा की, एकावेळी एकच मतदार, मतदान कक्षात जाईल.तसेच पहिला मतदार, मतदान कक्षातून बाहेर पडल्यानंतरच नियंत्रण कक्षातील बॅलट बटन/मतदान बटन दाबावे.

## १८.४ **झालेले मतदान नियमितपणे तपासावे.**

१८.४.१ एका विशिष्ट वेळेपर्यन्त झालेले मतदान तपासायचे असल्यास TOTAL बटन दाबावे. म्हणजे त्यावेळेपावेतो झालेले मतदान कळेल तसेच सदर टोटलचा मतदार नोंदवहीतील मतदारांच्या संख्येशी ताळमेळ घ्यावा व मतदार नोंदवहीत स्वाक्षरी वा अंगठा लावलेल्या मतदारांची संख्या मतदान यंत्रात नोंद झालेल्या मतांशी जुळते का हे जाणून घेणे.

ही तपासणी नियमितपणे करावी

१८.४.२ काही असले तरी मतदान केंद्राध्यक्षानी प्रत्येक दोन तासानंतर झालेले मतदान तपासावे आणि त्याची नोंद आपल्या रोजनिशीत (डायरी) करावी.

१८.४.३ जेव्हा बिझी दिवा चालू नसेल तेव्हाच टोटल बटन दाबावा. म्हणजे एका मतदाराने आपले मत नोंदविल्यानंतर आणि दुसऱ्या मतदारास मतदानाची परवानगी देण्यापूर्वी टोटल बटन दाबावे.

## **१८.५ मतदान काळात मतदान केंद्राध्यक्षाचा मतदान कक्षात (Voting Compartment) प्रवेश**

१८.५.१ काही वेळा मतदान केंद्राध्यक्षास असा संशय येऊ शकतो की, मतदान कक्षात ठेवण्यात आलेले बॅलेटींग युनिट योग्यप्रकारे काम करीत नाही किंवा मतदान कक्षात गेलेला मतदार बॅलट युनिटमध्ये ढवळाढवळ वा हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न करीत आहे किंवा मतदार आवश्यकतेपेक्षा अधिक काळ मतदान कक्षात रेंगाळला तर मतदान केंद्राध्यक्षास इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतच्या आदेशामधील परिच्छेद १५ व २० खाली मतदान कक्षात प्रवेश करण्याचा आणि बॅलटिंग युनिटमध्ये कुणी ढवळाढवळ करु नये आणि मतदान सुरळीतपणे पार पडावे म्हणून आवश्यक ती पावले उचलण्याचाही अधिकार आहे.

१८.५.२ जेव्हा जेव्हा मतदान केंद्राध्यक्षास मतदान कक्षात प्रवेश करावा लागेल तेव्हा तेथे उपस्थित असलेले मतदान प्रतिनिधी त्यांच्यासोबत मतदान कक्षात येण्यास इच्छुक असतील तर त्याने या मतदान प्रतिनिधींना तशी परवानगी द्यावी.

१८.५.३ परंतु अशिक्षीत मतदारांना मतदान कसे करावे हे दाखविण्यासाठी मात्र मतदान कक्षात प्रवेश करू नये यासाठी निर्वाचन अधिकाऱ्याकडून पुरविण्यात आलेले डमी मतदान यंत्र वापरावे.

## प्रकरण – १९
## मतदारांनी कुणाला मतदान केले हे गुप्त ठेवावे

### १९.१ मतदान पध्दतीचे काटेकोरपणे पालन करा

प्रत्येक मतदाराने मतदान केंद्राच्या आत मतदाना संदर्भात संपूर्ण गुप्तता पाळावी. त्याने प्रकरण १८ मध्ये नमूद केलेल्या मतदान पध्दतीचे काटेकोरपणे पालन करावे.

### १९.२ मतदान पध्दत वा सोपस्कार मानण्यास नकार

१९.२.१ मतदान केंद्राध्यक्षानी इशारा देऊनही एखादा मतदार मतदान पध्दतीचे पालन करण्यास नकार देत असेल तर मतदान केंद्राध्यक्षानी अथवा मतदान केंद्राध्यक्षांच्या आदेशाने मतदान अधिकाऱ्याने अशा मतदारास मतदान करण्यास परवानगी देऊ नये. ही कृती इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतचे आदेशाच्या परिच्छेद १६ (६) नियमाखाली योग्य ठरेल. जर मतदाराला मतदार स्लीप दिलेली असेल तर ती त्याच्याकडून परत घ्यावी आणि ती रद्द करावी.

१९.२.२ मतदान प्रक्रियेचे पालन न करणाऱ्या ज्या मतदारास मतदान करु दिले नाही त्याची माहिती शेऱ्याच्या स्वरुपात मतदार नोंदवहीत **(नमुना व्हीएम-१)** सदर मतदाराच्या नावापुढे मतदान केंद्राध्यक्षांनी करुन त्या शेऱ्याच्या पुढे आपली पूर्ण स्वाक्षरी करावी. या घटनेमुळे सदर मतदाराच्या नोंदवहीतील रकाना १ मधील अनुक्रमांकात बदल करण्याची गरज नाही.तसेच नंतर येणा-या मतदाराच्या अनुक्रमांकातही बदल करण्याची गरज नाही.

## प्रकरण – २०
## अंध आणि अपंग व्यक्तीचे मतदान

२०.१ जर तुम्हाला पटले की अंधत्वामुळे किंवा शारिरीक अपंगत्वामुळे एखादा मतदार मतदान युनिटवरील उमेदवाराची निवडणूक निशाणी, ओळखू शकत नाही, किंवा योग्य बटन दाबून आपल्या निवडीच्या उमेदवारास मतदान करु शकत नाही तर इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतचे आदेशाच्या परिच्छेद १७ नुसार तुम्ही त्याला **१८ वर्षापेक्षा कमी नसलेला** सहायक घेण्यास परवानगी द्या आणि त्याला मतदान कक्षात जाऊन मतदाराच्या इच्छेनुसार मतदान करु द्या.

२०.२ एका मतदान केंद्रावर एकाच दिवशी एका सहाय्यकास एकपेक्षा अधिकवेळा सहाय्यक म्हणून मतदान करु देऊ नका.

२०.३ कुणाही व्यक्तिला "**सहाय्यक**" म्हणून मतदान करु देण्यापूर्वी त्याला घोषित करायला लावा की तो मतदाराच्यावतीने करणार असलेले मतदान गुप्त ठेवील. तसेच त्याने त्यादिवशी दुसऱ्या कुठल्याही मतदाराचा सहाय्यक म्हणून आधी मत नोंदणी केलेली नाही. हे प्रकटीकरण तुम्ही विहित नमुन्यात घ्या.

२०.४ तुम्ही अशा मतदानाची नोंद नमुना व्हीएम-५ यात ठेवा.

# प्रकरण – २१

## मतदान न करण्याचा मतदाराचा निर्णय

२१.१ मतदाराचा मतदार यादी क्रमांक मतदार नोंदवहीत नमुना व्हीएम-१ मध्ये नोंद केल्यानंतर आणि मतदाराने या नोंदवही आपली स्वाक्षरी किंवा अंगठयाचा ठसा उमटविल्यानंतर जर त्याने मतदान न करण्याचा निर्णय घेतल्यास त्याला मतदान करण्यास जबरदस्ती करु नका.

२१.२ मतदाराने मतदान न करण्याचा घेतलेला निर्णय मात्र तुम्ही मतदार नोंदवहीत त्या मतदाराच्या शेऱ्याच्या रकान्यात नोंद करुन त्या शेऱ्याखाली तुम्ही तुमची पूर्ण स्वाक्षरी करावी.

२१.३ इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतचे आदेशाच्या परिच्छेद १८ व्हीएम-१ या नमुन्यातील मतदार नोंदवहीत सदर शेऱ्याखाली त्या मतदाराची स्वाक्षरी घ्यावी.

२१.४ या कारणासाठी मतदाराच्या अनुक्रमांकात अथवा मतदार नोंदवहीत पहिल्या रकान्यात पुढील मतदारांच्या अनुक्रमांकात बदल करण्याची गरज नाही.

# प्रकरण – २२
# निवडणूक सेवेवर असलेल्या शासकीय सेवकास मतदानाची सुविधा

## २२.१ निवडणूक सेवेवर असलेल्या शासकीय सेवकास मतदान सुविधा

२२.१.१ निवडणूक सेवेवर असलेल्या व्यक्तीच्या मतदानाची तरतूद टपाली मतपत्रिका आदेश, २००१ मध्ये करण्यात आलेली आहे.

२२.१.२ मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी अथवा इतर सरकारी सेवक, त्यांचे मतदार म्हणून नाव ज्या मतदार संघात नोंद झालेले आहे त्याच मतदार संघातील मतदान केंद्रावर जर ते निवडणूक कर्तव्यार्थ सेवेत असतील तर त्यांना त्याच मतदान केंद्रात इच्छा असल्यास मतदान करता येते. अशावेळी त्यांना सदर संधी उपलब्ध होण्यासाठी विहित नमुन्यात (PB२ ) निर्वाचन अधिकाऱ्यास अर्ज करावा लागेल.

२२.१.३ अशा व्यक्तीची ओळख पटविण्याची आवश्यकता नाही त्यांना मतनोंदणी करण्यास परवानगी देता येईल, जर

अ) निवडणूक सेवा दाखला (EDC)(PB ३) सादर केल्यानंतर, सादर करणाऱ्या व्यक्तीची त्यावर स्वाक्षरी घ्यायला हवी.

ब) दाखल्यात दर्शविल्याप्रमाणे त्या व्यक्तीचे नाव आणि मतदार यादी क्रमांक घ्या, मतदार यादीच्या **चिन्हांकीत प्रतीवर शेवटी** त्याची नोंद करा.

क) त्यांना मतदान यंत्रावर मतनोंदणी करायला द्या जसे मतदान केंद्रावर इतर मतदारांना मतदान करण्यास देण्यात येते.

२२.२. **निवडणूक सेवा दाखला** अशा मतदारांना देण्यात येतो की, जे निवडणूक सेवा/आरक्षित सेवा यात असतात आणि ज्यांना व्यक्तिशः मतदान केंद्रावर, जिथे त्यांची नेमणूक झालेली आहे तिथे मतदान करायला दिले जाते. जर कुठल्याही कारणामुळे निवडणूक सेवा दाखल्यात नोंद केल्यानंतर, आणि त्या नावाची नोंद मतदान यादींच्या चिन्हाकीत प्रतीवर झाल्यानंतर, एखाद्या व्यक्तीची नेमणूक, निवडणूक सेवा/आरक्षित सेवा म्हणून रद्द झाली तरी त्याला मतदानाच्या हक्कापासून परावृत्त करता येत नाही. अशा व्यक्तीस मग तो निवडणूक अधिकारी असो अथवा इतर सरकारी सेवक, ज्याला निवडणूक सेवा दाखला दिलेला आहे असा मतदार, ज्या मतदान केंद्रासाठी (ज्या मतदान केंद्रामध्ये त्याचे मतदार म्हणून नाव आहे) त्याला EDC देण्यात आली आहे ते मतदान केंद्र वगळून त्याला कुठल्याही मतदान केंद्रात मतदान करू शकतो.

## प्रकरण – २३
## प्रदत्त (दुबार) मते

**२३.१. प्रदत्त मत :–** असे होवू शकते कि एखादा मतदार मतदान केंद्रावर आपले मत नोंदविण्याकरिता जातो व त्या ठिकाणी गेल्यावर कोणीतरी भलतीच व्यक्ति तिच्या नावे मतदान करुन गेल्याचे तुमच्या निदर्शनास येते. अशावेळी सदर मतदाराच्या ओळखी विषयी त्याने सादर केलेले आवश्यक पुरावे व तुमची खात्री झाली तर त्याला विचारण्यात आलेल्या प्रश्नांची उत्तरे तुम्हाला समाधानकारक मिळून त्याची ओळख पटली म्हणजे त्याला प्रदत्त (दुबार) मतपत्रिकेवर मतदान करण्यास परवानगी द्यावी. पण मतदान यंत्रावर नव्हे.

**२३.२.१ प्रदत्त (दुबार) मतपत्रिकेचा आराखडा:–** इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतचे आदेशाच्या परिच्छेद–१९ खाली प्रदत्त (दुबार) मतपत्रिका अशा पध्दतीने तयार केलेली असेल आणि त्यावरील तपशील राज्य निवडणूक आयोगाकडील आदेशानुसार असेल.

२३.२.२ त्यासाठी प्रत्येक मतदान केंद्रावर २० मतपत्रिका पाठविण्यात येतील. ज्या मतपत्रिका मतदान यंत्रातील मतदान युनिटवर वापरण्यासाठी छापून घेतलेल्या आहेत, त्याचाच वापर त्यामागे “प्रदत्त मतपत्रिका” असा शिक्का मारुन प्रदत्त मतपत्रिका म्हणून केला जाईल. जर कुठल्याही मतदान केंद्रावर वरील कारणामुळे जर अधिक मतपत्रिकांची आवश्यकता भासली तर त्या मतदान केंद्रावरील मतदान केंद्राध्यक्षाकडे त्या मतदान केंद्राच्या झोनल ऑफिसर यांचेमार्फत पाठविण्याची व्यवस्था करण्यात येईल.

२३.२.३ वरील प्रमाणे प्रदत्त मतपत्रिका वापरायची तुम्हाला आवश्यकता भासली तर प्रदत्त / दुबार मतपत्रिकांची वापर करायला हवा. जर अगोदर पासुन मतपत्रिकेवर प्रदत्त (दुबार) शब्दांचा शिक्का मारलेला नसेल तर तुम्ही मतपत्रिकेच्या मागील बाजूने तुमच्या स्वतःच्या हस्ताक्षराने प्रदत्त (दुबार) मतपत्रिका असे स्पष्ट अक्षरांनी लिहायला हवे.

**२३.३ प्रदत्त (दुबार) मतपत्रिकांचा हिशोब** (व्हीएम–३)

तुम्ही सर्व मतपत्रिकांचा अचूक हिशोब ठेवायला हवा.

(१) किती प्रदत्त / दुबार मतपत्रिका वापरण्यासाठी आणल्या

(२) किती मतदाराना देण्यात आल्या.

(३) किती न वापरता परत केल्या.

हा हिशोब नमुना व्हीएम–३ च्या मुद्दा क्रमांक ८ नुसार असेल.

**२३.४ प्रदत्त (दुबार) मतपत्रिका देण्यात आलेल्या मतदारांची नोंद:–**ज्यांना प्रदत्त/दुबार मतपत्रिका देण्यात आलेल्या आहेत त्या मतदारांची संपूर्ण नोंद नमुना व्हीएम–२ मध्ये ठेवायला हवी. तुम्ही मतदारांना प्रदत्त/दुबार मतपत्रिका देण्यासाठी त्या नमुन्याच्या रकाना (५) वर मतदाराची स्वाक्षरी अथवा आंगठयाचा ठसा घ्यावा.

**२३.५ प्रदत्त (दुबार) मतपत्रिकेवर मत नोंदणी :–**

**२३.५.१** मतदारास प्रदत्त / दुबार मतपत्रिका देत असताना त्याला त्या समवेत शाई लावलेला बाणाकृती क्रॉस असलेला रबरी स्टॅम्प देण्यात येईल. सदर स्टॅम्प म्हणजे तोच असेल ज्याचा वापर पारंपारिक मतपत्रिका आणि मतपेटयांची निवडणूक घेण्यात येत असताना करण्यात येत होता आणि त्याचा पुरवठा मतदान केंद्रावर मतदान साहित्यांतील एक घटक म्हणून करण्यात येईल.

२३.५.२ प्रदत्त/दुबार मतपत्रिका मिळाल्यानंतर सदर मतदार, मतदान कक्षात जाऊन, त्याला ज्या उमेदवारासाठी मतदान करावयाचे आहे त्याच्या निशाणीवर त्या रबरी स्टॅम्पने बाणाकृती क्रॉसची खूण करील.

२३.५.३ मतदार त्यानंतर ही प्रदत्त / दुबार मतपत्रिकेची घडी करुन मतदान कक्षातून बाहेर येत असताना तुमच्या स्वाधीन करील.

२३.५.४ तुम्ही सर्व प्रदत्त / दुबार मतपत्रिका आणि **व्हीएम-२** या नमुन्यातील यादी त्यासाठी देण्यात आलेल्या पाकीटात घालून मतदान बंद झाल्यावर पाकीट सीलबंद करायला हवे.

२३.५.५ अंधपणामुळे अथवा शारिरीक अपंगत्वामुळे एखादा मतदार आपले मत कोणाच्या मदतीशिवाय नोंद करु शकत नसल्यास मतदान केंद्राध्यक्षांनी त्याला त्याच्या सोबतीला सहकारी नेण्याची परवानगी द्यायला हवी. या विषयाची पध्दत **प्रकरण-२०** मध्ये स्पष्ट केलेली आहे.

## प्रकरण २४

## मतदान यंत्र खराब होणे, मतदान केंद्र ताब्यात घेणे अशाप्रसंगी मतदान स्थगित करणे

### २४. १ मतदान केंद्र ताब्यात घेण्याच्या प्रसंगी मतदान यंत्र बंद करणे :-

२४.१.१ इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतच्या आदेशाच्या परिच्छेद २५ मध्ये केलेल्या तरतुदीनुसार मतदान केंद्रावरील मतदान केंद्राध्यक्षास कळून आले की, मतदान केंद्र ताब्यात घेण्याचा प्रकार घडत आहे तेव्हा त्याने विनाविलंब मतदान यंत्राचे नियंत्रण युनिट बंद करायला हवे आणि पुढील मते नोंद करता येणार नाही याची खात्री करुन त्याने मतदान युनिट नियंत्रण युनीटपासून वेगळे करायला हवे.

२४.१.२ मतदान केंद्र ताब्यात घेण्यात येते याची पूर्ण खात्री झाल्यास वर सांगितल्याप्रमाणे मतदान यंत्र बंद करायला हवे. फक्त मतदान केंद्र ताब्यात घेणार आहेत या संशयाने अथवा कल्पनेने नव्हे. कारण एकदा नियंत्रण युनीटवरील बंद करण्याचे बटन दाबून नियंत्रण युनिट बंद केले म्हणजे मतदान युनिट, पुढील मतनोंदणी त्यामध्ये करु शकणार नाही आणि विनाकारण मतदान एका दिवसासाठी अथवा त्या मतदान केंद्रावर पुढील मतदान पूर्ण करण्यासाठी नवीन मतदान यंत्र उपलब्ध करेपर्यंत मतदान स्थगित करावे लागेल.

२४.१.३ वरील प्रमाणे मतदान स्थगित झाल्यास मतदान यंत्र आणि सर्वप्रकारची मतदान कागदपत्रे सीलबंद करुन सुरक्षित करावी जशी मतदान संपुष्टात आल्यानंतर केली जातात.

२४.१.४ इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतच्या आदेशाच्या परिच्छेद २६ नुसार तुम्ही मतदान यंत्र बंद केल्यावर विनाविलंब सदर प्रकरण संपूर्ण घटनेसह निर्वाचन अधिकाऱ्यास कळवायला हवे. निर्वाचन अधिकारी अशाप्रसंगी, संपूर्ण परिस्थिती लक्षात घेऊन संपूर्ण घटना शक्यतो लवकर संपर्क साधता येईल अशा उपलब्ध संपर्क माध्यमातून राज्य निवडणूक आयोगासमोर कळवील.

२३.१.५ राज्य निवडणूक आयोग, निर्वाचन अधिकाऱ्याकडून आलेला अहवाल मिळाल्यानंतर, एकंदर परिस्थितीची पडताळणी केल्यानंतर:-

i) स्थगित झालेले मतदान खराब झालेले नाही याची खात्री केल्यानंतर, ते जेथून स्थगित झाले होते तेथून नवीन मतदान यंत्रावर मतदान घेण्याची परवांगी देईल, किंवा

ii) जर झालेल्या मतदानात खराबी निर्माण झाल्याची खात्री झाल्यास त्या मतदान केंद्रावरील मतदान निष्फळ झाल्याचे जाहीर करावे आणि त्या मतदान केंद्रावर नव्याने मतदान घेण्याचा आदेश देईल.

२३.१.६ स्थगित करण्यात आलेले मतदान पुढे सुरु करताना ते ज्या टप्प्यावर थांबविण्यात आले होते त्या टप्प्यावर सुरु होईल. म्हणजेच ज्या मतदारांनी मतदान केले नाही त्यांनाच फक्त मतदान करता येईल.

२३.१.७ मतदान केंद्राध्यक्षास, मतदान स्थगित करतेवेळी जी पाकीटे सीलबंद करण्यात आली होती म्हणजेच चिन्हांकित मतदार यादी, व्हीएम-१ या नमुन्यातील मतदानाची नोंद व नवीन मतदान यंत्र इ. पुरविण्यात येईल. मतदार रजिस्टर सीलबंद लिफाफा तिथे उपस्थित असलेल्या उमेदवारांसमोर अथवा त्यांच्या प्रतिनिधींसमोर फिरुन उघडायला हवा आणि या अगोदर चिन्हांकीत केलेली मतदार यादीची प्रत आणि मतदार रजिस्टर स्थगित केलेले मतदान पूर्ण करण्यास त्याचा वापर केला पाहिजे. मतदान सुरु होण्यापूर्वी स्थगित केलेले मतदान घेण्यासाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतच्या दि.०३/०५/२००५ च्या आदेशामधील परिच्छेद २२ ते २५ आणि २६ आणि यात असलेल्या तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

२३.१.८ जेथे मतदान कर्मचारी उपस्थित होऊ न शकल्यामुळे अथवा इतर कारणांमुळे मतदानास आरंभच होऊ शकला नव्हता ते परत सुरु करण्यासाठी मूळ मतदानात जशी पद्धती अवलंबली जाते तशी अवलंबली जाईल.

२३.१.९ इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतच्या आदेशामधील परिच्छेद २५ मध्ये मतदान स्थगित करण्याची कार्यपध्दती नमूद केलेली असून त्यामधील तरतुदीनुसार, मतदान केंद्रावरील झालेले मतदान रद्द करून, नव्याने मतदान घ्यायचे जाहीर करण्यात येते, जर मतदान केंद्रावर

i) एखाद्या अनधिकृत व्यक्तीने एखादे मतदान यंत्र बेकायदेशीरपणे नेल्यास, अथवा

ii) एखादे मतदान यंत्र अपघाती अथवा जाणूनबुजून खराब केले गेले अथवा हरवले असल्यास अथवा त्यात हस्तक्षेप अथवा ते नष्ट केल्यास आणि ज्यामुळे त्या मतदान केंद्रावरील मतदानाच्या निकालाची खात्री करता येत नसल्यास, अथवा

iii) मतनोंदणी चालू असताना मतदान यंत्रात तांत्रिक बिघाड झाल्यास अथवा

iv) जर एखाद्या चुकीमुळे अथवा अनियमित पध्दतीमुळे मतदानात खराबी घडून येत असल्यास अथवा

v) मतदान केंद्र ताब्यात घेण्याची घटना घडून आल्यास

२३.१.१० जर मतदान केंद्रावर अशाप्रकारची कुठलीही घटना घडली तर संपूर्ण प्रकार विनाविलंब निर्वाचन अधिकाऱ्यास कळवायला हवा ज्यामुळे ते सदर प्रकरण पुढील मार्गदर्शनासाठी राज्य निवडणूक आयोगापुढे पाठवतील.

२३.१.११ जर एकंदर परिस्थितीचा आढावा घेऊन निर्वाचन आयोगाने एखाद्या मतदान केंद्रावर नव्याने मतदान घेण्याची सूचना केल्यास सदर नवीन मतदान मूळ मतदान घेण्यात येणाऱ्या पध्दतीनेच घ्यावे.

२३.१.१२ नव्याने मतदान घेताना, पात्र ज्या सर्व पात्र मतदारांनी त्या मतदान केंद्रावर मतदान केले होते ते सर्व मतदार नव्याने, मतदान करण्यास असतील. अशावेळी मूळ मतदानात त्यांच्या हाताच्या बोटावर मतदान शाईची असलेली खूण दुर्लक्षित करावी. ज्यांनी मूळ मतदानात, मतदान करताना जी शाईची खूण करुन घेतलेली आहे, त्यांनी नव्या मतदानातही ती परत करुन घ्यायला हवी. अशाप्रसंगी सदर शाईची खूण मतदाराच्या डाव्या हातावरील मधल्या बोटावर लावावी असे सूचित करण्यात येत आहे.

# प्रकरण – २५

## मतदान बंद करणे

### २५.१ मतदान केंद्रावर मतदान बंद करतेवेळी उपस्थित असलेल्या व्यक्तीचे मतदान

२५.१.१ मतदानास प्रारंभ काही कारणाने निश्चित केलेल्या वेळेनंतर झालेला असला तरी निश्चित केलेल्या वेळीच मतदान बंद करायला हवे. तरीसुध्दा निश्चित केलेल्या मतदान बंद करण्याच्यावेळी जे मतदार, मतदान केंद्रावर हजर आहेत त्यांना मतदानाची परवानगी द्यायला हवी.

२५.१.२ मतदान बंद करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेआधी काही मिनिटे, त्या मतदान केंद्रासमोर मतदारांच्या रांगेत हजर असणाऱ्या सर्वांना मतदानाची संधी देण्यात येईल असे जाहीर करायला हवे. तुम्ही तुमची संपूर्ण स्वाक्षरी केलेली स्लीप जे कोणी रांगेत आहेत त्या सर्व मतदारांना द्यायला हव्यात. त्या स्लीपवर रांगेत जेवढे मतदार आहेत त्यानुसार १,२,३ असे अनुक्रमांक लिहायला हवेत व रांगेतील शेवटच्या मतदारापासुन सुरवातीपर्यन्त स्लीप वाटप करावे .

मतदान बंद करण्यास निश्चित केलेला वेळ संपुष्टात आल्याबरोबर सदर रांगेत नवीन मतदार उभा राहणार नाही याची काळजी घेण्यास पोलिस अथवा तुमच्या कर्मचारी पथकामधील एखाद्याला नेमावे.

**२५.२ मतदान बंद करणे:-** त्या मतदान केंद्रावर उपस्थित असलेल्या सर्व मतदारांनी, मतदान बंद करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळी, वर दिलेल्या परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे मतदान केल्यानंतर तुम्ही मतदान बंद झाल्याचे औपचारिकपणे जाहीर करायला हवे आणि त्यानंतर कुठल्याही परिस्थितीत मतदान बंद करुन त्यापुढे मतदान करायला कुणालाही परवानगी देऊ नये.

### २५.३ मतदान यंत्राचे नियंत्रण युनिट बंद करणे:-

२५.३.१ मतदान बंद करण्यासाठी शेवटच्या मतदाराने आपले मत नोंद केल्यानंतर मतदान यंत्र बंद करायला हवे, ज्यामुळे त्या यंत्रात आणखी मते नोंद होऊ शकणार नाही. त्यासाठी तुम्ही नियंत्रण युनिटवरील **“क्लोज”** बटन दाबावे, त्यावेळी मतदान संपेपर्यन्त त्या यंत्रात जेवढया मतांची नोंद झाली त्यांची एकूण संख्या प्रदर्शनी भागावर दिसेल. यंत्रात नोंद झालेल्या एकूण मतांची संख्या व्हीएम-३, भाग-१, मुद्दा-५ यात विनाविलंब नमूद करायला हवी.

२५.३.२ सदर **“क्लोज”** बटन निकाल विभागाच्या कप्प्यात, बाहेरील आवरणावर असलेल्या सफेद रंगाच्या झाकणाखाली असते. हे झाकण काढल्यावर ते सापडते. “**क्लोज**”बटन दाबून मतदान बंद केल्यानंतर झाकण बंद करायला हवे.

२५.३.३ एकदा “**क्लोज”** बटन दाबले म्हणजे मतदान यंत्र त्यामध्ये पुढे आणखी पुढील मते स्विकारणार नाही. त्यासाठी तुम्ही पूर्णपणे सावध राहून खात्री करायला हवी की, मतदान बंद करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळी रांगेमधील एकसुध्दा मतदार, मतदानाचा हक्क बजावल्याशिवाय राहिलेला नाही. अशी खात्री झाल्यावरच सदर “**क्लोज”** बटन दाबायला हवे.

२५.३.४ तुम्ही लक्षात ठेवायला हवे की, “**क्लोज**” बटन तेव्हाच चालेल जेव्हा नियंत्रण युनिटवरील बिझी दिवा चालू नसेल. शेवटच्या मतदाराने आपले मत नोंद करुनसुध्दा समजा “मतदान” बटन चुकून दाबले गेले अथवा शेवटच्या मतदाराने त्याच्यासाठी “मतदान” बटन दाबल्यानंतर ही मतनोंदणी करण्यास नकार दिला आणि बिझी दिवा चालूच राहिला तर नियंत्रण युनिटच्या मागच्या कप्प्यात असलेले पॉवर बटन बंद (Off) करुन आणि मतदान युनिट, नियंत्रण युनिटपासून वेगळे करुन तो बिझी दिवा बंद करता येतो. मतदान युनिट नियंत्रण युनिटपासून वेगळे केल्यानंतर पॉवर बटन परत सुरू (On) म्हणजे चालू करावे. बिझी दिवा आता बंद होईल आणि “**क्लोज”** बटन चालू होईल.

## प्रकरण – २६
## नोंद झालेल्या मतांचा हिशोब

### २६.१ नोंद झालेल्या मतांचा हिशोब तयार करणे

२६.१.१ मतदान बंद झाल्यानंतर तुम्हाला इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याच्या आदेशाच्या परिच्छेद २२ खाली मतदान यंत्रात नोंद झालेल्या मतांचा हिशेब तयार करावा लागेल. सदर हिशेब तुम्ही नमुना व्हीएम-३ च्या भाग १ मध्ये करायला हवा.

२६.१.२ याआधीच्या प्रकरणात स्पष्ट केल्याप्रमाणे मतदान बंद झालेल्यावेळी मतदान यंत्रात नोंद झालेल्या एकूण मतांची -**टोटल** बटन दाबून खात्री करुन घ्यायला हवी. जर आवश्यकता भासल्यास तेच बटन हवी असलेली माहिती मिळविण्यासाठी परत दाबता येते.

२६.१.३ मतदान यंत्रात नोंद झालेल्या मतांची संख्या आणि मतदार नोंदवहीवर रकाना क्रमांक (१) **(नमुना व्हीएम-१)** यात नोंद झालेल्या मतदारांची संख्या, वजा ज्यांनी मतदान करण्यास नकार दिला (त्यात नोंदवहीवर असलेल्या शेरा रकान्याप्रमाणे) त्यांची संख्या, तसेच तुम्ही मतदानात गुप्तता न पाळल्या कारणाने ज्यांना मतदान करायला परवानगी दिली नाही (याच नोंदवहीवरील शेरा रकान्याप्रमाणे) त्यांची संख्या वजा करुन त्यांची तुलना होते तर तसे पाहायला तुम्ही विसरु नये.

### २६.२ नोंद झालेल्या मतांच्या हिशेबाची प्रमाणित प्रत मतदान प्रतिनिधींना देणे

२६.२.१ उपरोक्त आदेशाच्या परिच्छेद २२ खाली, मतदान बंद होते वेळी जे मतदान प्रतिनिधी उपस्थित होते त्या प्रत्येकास तुम्ही नमुना व्हीएम-३ वर तयार केलेल्या, नोंद झालेल्या मतांच्या हिशेबाची प्रमाणित प्रत द्यायला हवी व तशी पोहोच त्यांच्याकडून घ्या. हिशेबाच्या प्रती प्रत्येक मतदान प्रतिनिधीस त्याने मागणी केली नसली तरीसुध्दा त्यांना द्यायला हवी.

२६.२.२ आवश्यक त्या संख्येने तुम्हाला नोंद झालेल्या मतांच्या हिशेबाच्या प्रती तयार करणे शक्य व्हावे म्हणून तुम्हाला नमुना व्हीएम-३ च्या छापील प्रती, उमेदवारांच्या संख्येपेक्षा एक दोन अधिकच मूळ हिशेबासाठी देण्यात येईल. जर शक्य असल्यास तुम्ही मूळ हिशेब लिहिताना आवश्यक त्या प्रती तयार करण्यासाठी कार्बन पेपरची मदत घेतल्यास मतदान प्रतिनिधींना दिलेल्या प्रती आणि मूळ प्रत यात सर्व प्रकारचे साम्य राहील.

### २६.३ मतदान बंद झाल्यानंतर करावयाचे घोषणापत्र

२६.३.१ नोंद झालेल्या मतांच्या हिशेबाच्या प्रती परिच्छेद-२२ प्रमाणे तुमच्याकडून सर्व मतदान प्रतिनिधींना मिळालेल्या आहेत याची खात्री करुन घेतल्यानंतर **जोडपत्र- सात** मधील मतदान बंद झाल्यानंतर करावयाचे घोषणापत्र, तुम्ही पूर्ण करणे आवश्यक आहे.

# प्रकरण – २७

## मतदान बंद झाल्यावर मतदान यंत्र सील बंद करणे

२७.१.१ मतदान समाप्त झाल्यानंतर आणि मतदान यंत्रात नोंद झालेल्या मतांचा हिशेब नमुना व्हीएम-३ मध्ये तयार करुन उपस्थित मतदान प्रतिनिधींना त्याच्या प्रती दिल्यानंतर, मतदान यंत्र मतमोजणी /संग्रह केंद्रावर नेण्यासाठी सीलबंद करून सुरक्षित करायला हवे.

२७.१.२ मतदान यंत्र सीलबंद आणि सुरक्षित करण्यासाठी प्रथम मतदान युनिट आणि नियंत्रण युनिट एकमेकांपासून वेगळी करायला हवी आणि नियंत्रण युनिटमधील पॉवर बटन बंद (Off) करायला हवे. मतदान युनिट आणि नियंत्रण युनिट त्यांच्या संबंधीत आपापल्या पेटीत परत ठेवायला हवे.

२७.१.३ प्रत्येक पेटी, दोनही टोकावर असलेल्या दोन छिद्रात दोरा घालून पुरविलेले ऍ़ड्रेस टॅग तेथे लावण्यात यावेत व मतदान केंद्राध्यक्षांनी त्यावर स्वाक्षरी करून आपली मोहर लावावी. उमेदवार अथवा त्यांच्या हजर असलेल्या मतदान प्रतिनिधीची इच्छा असेल तर त्यांनाही त्यांची स्वाक्षरी / मोहर लावण्यास परवानगी द्यावी.

२७.१.४ उमेदवार/मतदार प्रतिनिधी ज्यांनी आपली मोहर मतदान युनिट आणि नियंत्रण युनिट यंत्राच्या पेटीवर लावलेली आहे त्यांची नावे तुम्ही घोषणापत्रावर नोंद करायला हवी. हे घोषणापत्र तुम्ही **जोडपत्र-आठ** प्रमाणे मतदान बंद होतेवेळी करायला हवे.

# प्रकरण - २८

# निवडणूक कागदपत्रे सीलबंद करणे

## २८.१ **निवडणूक कागदपत्रे लिफाफ्यात सीलबंद करणे**

२८.१.१ मतदान बंद झाल्यानंतर मतदानाशी संबंधित सर्व निवडणूक कागदपत्रे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १०-अ व ५८-अ अन्वये विहित केल्यानुसार निरनिराळया लिफाफ्यात आवश्यकतेप्रमाणे घालून मोहरबंद करायला हवी.याव्यतिरिक्त इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतच्या आदेशाच्या परिच्छेद-२४ मध्ये विहित केल्यानुसार निरनिराळी पाकिटे सीलबंद करणे आवश्यक आहे.

२८.१.२ अशाप्रकारे सील बंद केलेले सर्व लिफाफे, फक्त ज्यात (i) नोंद झालेल्या मतांचा हिशेब आणि कागदी मोहर (नमुना व्हीएम-३) (ii) मतदान केंद्राध्यक्षाने मतदानाच्या आरंभास, मतदान सुरु असताना आणि मतदान बंद झाल्यावर (परिशिष्ट- सहा ते आठ) केलेली घोषणापत्रे आणि (iii) मतदान केंद्राध्यक्षांची डायरी आहे ते लिफाफे वगळून खाली दिलेल्या वस्तू परिच्छेद ३ ते ६ मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे चार मोठया लिफाफ्यात घालून ते सीलबंद लिफाफे निर्वाचन अधिकाऱ्याकडे पाठवावेत.

## २८.२ **लिफाफे ज्यात (i) नोंद झालेल्या मतांचा हिशेब आणि पेपरसील हिशोब (ii) मतदान केंद्राध्यक्षांची घोषणापत्रे आणि (iii) मतदान केंद्राध्यक्षाची डायरी मतदान यंत्रासोबत वेगळी स्वीकार केंद्रावर पाठवावी.**

## २८.३ **लिफाफे आणि पाकिटे यावर मोहोर लावणे:-**

**तुम्ही मतदान केंद्रावर उपस्थित असलेल्या प्रत्येक उमेदवारास अथवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीस अथवा त्याच्या मतदान प्रतिनिधीस खालील कागदपत्रे अंतर्भूत असलेले लिफाफे आणि पाकिटे यावर आपापल्या मोहोरा लावण्यास अनुमती द्यावी,** --

(एक) मतदार यादीची चिन्हांकित प्रत.

(दोन) मतदार नोंदवही

(तीन) मतदार चिठ्ठी

(चार) वापरलेल्या प्रदत्त मतपत्रिका आणि नमुना-१७-बी मधील प्रदत्त मतपत्रिकांची यादी.

(पाच) न वापरलेल्या प्रदत्त मतपत्रिका.

(सहा) आक्षेपित मतांची यादी

(सात) निवडणूक निर्णय अधिका-याने मोहोरबंद पाकिटात ठेवण्याचा निदेश दिला आहे अशी अन्य कोणतीही कागदपत्रे.

### २८.३.१ **पहिले पाकिट -सांविधीक लिफाफे** (Statutory Covers)

पहिला लिफाफा वैधानिक पाकिट (Statutory Covers) हा असून, तुम्ही प्रत्येक उमेदवारास अथवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीस अथवा त्याच्या मतदान प्रतिनिधीस जे कोणी मतदान केंद्रावर उपस्थित असतात त्यांना खालील कागदपत्रे असलेले लिफाफे आणि पाकिटांवर त्यांचे मोहर लावण्यास अनुमती द्यावी.

i) मतदान यादीची चिन्हांकीत प्रत असलेला मोहोरबंद लिफाफा

ii) मतदार नोंदवही असलेला मोहोरबंद लिफाफा

iii) मतदार स्लिप असलेला मोहोरबंद लिफाफा

iv) वापरलेल्या प्रदत्त मतपत्रिका आणि नमुना व्हीएम-२ मध्ये प्रदत्त मतांची यादी

v) वापर करण्यात न आलेल्या प्रदत्त मतपत्रिका असलेला मोहोरबंद लिफाफा

जर वर उल्लेख केलेले कुठलेही साहित्य पाकिटात घालण्यास उपलब्ध नसले तरीसुध्दा एका चिटो-यावर निवेदन अथवा नोंद काही नाही असे लिहून पाकिटात घालावे आणि अशी पाच पाकिटे तयार करावी म्हणजे ती स्विकारताना, कोणतीही अधिक स्पष्टीकरणे करण्याची आवश्यकता भासणार नाही.

२८.३.२ **दुसरे पाकीट -असांविधिक लिफाफे** (Non-Statutory Covers)

दुसरा लिफाफा खाली दिलेले साहित्य असलेले आणि त्यावर -वैधानिक नसलेली पाकिटे असे स्पष्ट लिहायला हवे.

i) मतदार यादी अथवा याद्या (चिन्हांकीत सोडून) असलेले पाकीट
ii) मतदान प्रतिनिधीचे नेमणूक पत्र असलेले पाकीट
iii) टपाली मतपत्रिका आदेशानुसार नमुना पीबी-३ मधील निवडणूक कार्य प्रमाणपत्र असलेले पाकीट
iv) आव्हानित मतांची यादी असलेले सीलबंद पाकीट
v) अंध आणि अपंग मतदारांची यादी आणि त्यांच्या सहकाऱ्याचे घोषणापत्र असलेले पाकीट
vi) जर आव्हान मते असतील तर पावती पुस्तक आणि रोकड असलेले पाकीट
vii) वापरात न आलेली आणि खराब झालेले कागदी मोहर असलेले पाकीट, आणि
viii) वापरात न आलेल्या मतदान स्लीप्स असलेले पाकीट
ix) वापरात न आलेली आणि खराब झालेले स्पेशल टॅग असलेले पाकीट, आणि
x) वापरात न आलेली आणि खराब झालेले A, B, C, D पट्टी सील असलेले पाकीट, आणि

**८.३.३ तिसरे पाकीट -निदेश/नियमपुस्तिका व इतर वस्तू असलेले पाकिट**

१. मतदान केंद्राध्यक्षासाठी माहिती पुस्तिका
२. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राची नियमावली
३. मतदारांच्या बोटांना शाई लावण्यासाठी मार्कर पेन
४. शाईचे पॅड
५. मतदान केंद्राध्यक्षाचा धातूचे सील
६. दुबार मतपत्रिकेवर लावण्यासाठी चक्राकार बाणाकृती रबरी स्टॅम्प

**२८.३.४ चौथे पाकीट - इतर उरलेले साहित्य असलेले पाकिट**

जर वरील साहित्याशिवाय उर्वरित सर्व मतदान साहित्य असेल तर ते चौथ्या लिफाफ्यात बंद करावे.

२८.४ सांविधिक अथवा वैधानिक पाकिटे म्हणून चिन्हांकित केलेली प्रत्येकी पाच लहान पाकीटे, पहिल्या लिफाफ्यात ज्यावर वैधानिक पाकीटे असे लिहिलेले आहे त्यात घालून मोहरबंद करायला हवे.

२८.५ इतर लहान पाकीटे ज्यात निरनिराळी वैधानिक नसलेली कागदपत्रे निवडणुकीस आवश्यक असलेले इतर साहित्य दुसऱ्या लिफाफ्यात ज्यावर वैधानिक नसलेली पाकीटे लिहिलेले आहे ती वेगळी तयार करावीत. परंतु मोहरबंद करायची आवश्यकता नसल्यामुळे वेळेचा अपव्यय होत नाही. ही सर्व मोहरबंद न केलेली आणि ज्यात आव्हानित मतांची यादी आहे ते सीलबंद पाकीट त्या त्या मोठया लिफाफ्यामध्ये ठेवावे आणि मतदान केंद्राध्यक्षाने निशाणी केलेला चेक मेमोसुध्दा त्यात ठेवावा. हे तीन लिफाफे मोहरबंद करण्याची आवश्यकता नाही. परंतु पीन अथवा दोरीने व्यवस्थित बांधावी ज्यामुळे साहित्य स्विकार करण्यात येणाऱ्या केंद्रावर त्या वस्तू तपासता येतील.

२८.६ पहिला लिफाफा ज्यावर वैधानिक पाकीट असे लिहिलेले आहे ते स्विकार केंद्रावर आतील बाबी तपासून झाल्यानंतर मतदान केंद्राध्यक्षाने मोहरबंद करावे.

## प्रकरण – २९
## डायरी तयार करणे आणि संग्रह केंद्रात मतदान यंत्रे आणि निवडणूक कागदपत्रे पोहोचविणे

### २९.१ डायरी तयार करणे

२९.१.१ मतदान केंद्रात मतदान घेण्याचे काम चालू असताना त्या कामाची नोंद करण्यासाठी डायरीचा वापर करायला हवा.सदर डायरीचा नमुना **जोडपत्र-११** मध्ये परत छापलेला आहे. तरीसुध्दा आवश्यक त्या डायरीचा नमुना तुम्हाला दिला जाईल ज्याचा वापर तुम्ही करायला हवा.

२९.१.२ जेव्हा जेव्हा घटना घडत असतात तेव्हा त्यासंबंधीच्या घटनांची नोंद तुम्ही त्या डायरीमध्ये करत जायला हवे. त्यात तुम्ही सर्व महत्वाच्या घटनाची नोंद करायला हवी.

२९.१.३ बहुतेक प्रकरणात असे दिसून आलेले आहे की, मतदान केंद्राध्यक्ष संबंधीत रकान्यांमध्ये वेळोवेळी घडलेल्या घटनांची नोंद न करता मतदान संपल्यांनतर सगळया नोंदी एकदमच भरुन डायरी पूर्ण करतात सदरहू बाब ही हरकत घेण्यासारखी आहे. तरी तुम्ही ध्यानात ठेवायला हवे की, मतदानाचे काम चालत असताना प्रत्येक मुद्यांची नोंद डायरीवर करत असताना तुम्ही थोडे जरी बेजबाबदार राहिलात तरी त्याची आयोग गंभीर दखल घेईल.

### २९.२ मतदान यंत्र आणि निवडणूक कागदपत्रांचे निर्वाचन अधिकाऱ्याकडे वितरण

२९.२.१ प्रकरण २७ आणि २८ मध्ये सांगितल्याप्रमाणे मतदान बंद झाल्यावर तुम्ही मतदान यंत्र आणि निवडणूक कागदपत्रे सीलबंद करुन सुरक्षित केल्यानंतर ते सर्व निर्वाचन अधिकाऱ्याने सांगितलेल्या ठिकाणी आणि त्याने केलेल्या व्यवस्थेनुसार वितरणाची व्यवस्था करायला हवी.

२९.२.२ मतदान यंत्र आणि निवडणूक कागदपत्रे विनाविलंब संग्रह केंद्रावर वितरीत करायला हवे अथवा वितरणाची व्यवस्था करायला हवी. यात जर थोडासुध्दा उशीर झाला तर त्याची पाहणी आयोगाकडून केली जाईल आणि जो कोणी यास जबाबदार आहे त्याच्यावर शिस्तभंगाची कडक कारवाई होऊ शकते.

### २९.३ संग्रह केंद्रावर ताबा असलेल्या अधिका-याच्या स्वाधीन करण्याकरीता, तुम्हाला खालील निवडणूक नोंदी आणि साहित्य यांच्या संबंधित बारा बाबी तयार करायला हव्यात आणि त्याची पावती घ्यायला हवी.

- i) मतदान यंत्राचे नियंत्रण युनिट आणि मतदान युनिट त्यांच्या मोहरबंद पेटयांसह
- ii) नोंद केलेल्या मतांचा हिशेब आणि कागदी मोहर हिशेब असलेला लिफाफा
- iii) मतदान केंद्राध्यक्षाची घोषणापत्रे असलेले पाकीट
- iv) मतदान केंद्राध्यक्षाची डायरी असलेले पाकीट
- v) ज्यावर वैधानिक पाकीटे (पाच पाकिटे असलेले) असे लिहिलेले आहे ते प्रथम पाकीट
- vi) ज्यावर वैधानिक नसलेली पाकीटे (दहा पाकिटे असलेले) असे लिहिलेले आहे ते दुसरे पाकीट
- vii) तिसरे पाकीट ज्यात निवडणूक साहित्याचे सात घटक आहेत
- viii) मतदान कक्षासाठी आवश्यक बाबी
- ix) कंदील, जर देण्यात आलेला असेल तर
- x) कचरा पेटी
- xi) प्लास्टीक पिशवी/गोणपाट निवडणूक साहित्य नेण्यासाठी
- xii) इतर सर्व बाबी असलेले चौथे पाकीट (असल्यास) वर सांगितल्याप्रमाणे सगळया गोष्टी संग्रह केंद्रावर तुमच्या उपस्थितीत वितरण स्विकारणारा अधिकारी स्विकार करील आणि तुम्हाला कार्यमुक्त करील.

## प्रकरण - ३०
## मतदान केंद्राध्यक्ष/मतदान अधिकारी यांच्यासाठी थोडक्यात मार्गदर्शन

१.१ जर सांघिक कार्य नसेल तर तुमचे काम कठीण होईल.

२.१ खात्री करुन घ्या की, -

अ) तुम्हाला मतदान यंत्राचे नियंत्रण युनिट आणि आवश्यक त्या संख्येने मतदान यंत्रे दिलेली आहेत आणि ती तुमच्याच मतदान केंद्रात वापरण्याची आहेत.

ब) आवश्यक त्या मतदानपत्रिका बसवून प्रत्येक मतदान युनिट व्यवस्थित आहेत.

क) मतदान युनिटवरील 'स्लाईड स्वीच' योग्य त्या पध्दतीने बसवलेला आहे.

ड) नियंत्रण युनिटवरील 'उमेदवार ठरविणे विभाग' आणि प्रत्येक मतदान युनिट नीट मोहरबंद आहे आणि प्रत्येकावर पत्त्याचा टॅग नीट लावलेला आहे.

२.२ मतदानास लागणा-या सर्व बाबी/वस्तू तुम्हाला दिलेल्या आहेत याची खात्री करा.

२.३ विशेषत: मतदार नोंदवही, मतदार स्लीप, दुबार मतांसाठी आवश्यक असलेल्या मतपत्रिका, दुबार मतांवर खूण करण्यासाठी आवश्यक असलेला बाणाकृती चक्राकार रबरी स्टॅम्प, कागदी मोहर, सीलबंद करण्यासाठी लाख, मतदान शाई यासारख्या बाबींची बारकाईने तपासणी करावी.

२.४ चिन्हांकित मतदार यादीची इतर यादीकडे तुलना करुन पाहा आणि सगळया तंतोतंत आहेत की नाही हे पहा. फक्त चिन्हांकित केलेल्या मतदार यादीवर '**पीबी**' आणि '**इडीसी**' ही खूण सोडून दुसरी कोणतीही खूण नसेल.

२.५ खात्री करा की,

१) मतदार यादीतील वगळलेली नावे आणि पुरवणीत केलेली सुधारणा व्यवस्थित आहे.

२) मतदार यादीच्या चालू प्रतीवरील पानाचे अनुक्रमांक व्यवस्थित आहेत.

३) मतदाराचे अुनक्रमांक सुधारलेले नाहीत आणि त्याठिकाणी दुसरे काही अंतर्भूत केलेले नाही.

३.१ मतदान केंद्रावर मतदानास निश्चित केलेल्या वेळेआधी ७५ मिनिटे आधी पोहोचा.

३.२ मतदान केंद्राची आखणी व्यावहारीकदृष्टया करा.

३.३ मतदान केंद्रावर मतदारांना आत-बाहेर जाण्यास वेगळया दारांची व्यवस्था असल्याची खात्री करा.

४. मतदानाच्या दिवशी तुमच्या मतदान केंद्राबाहेर मतदान क्षेत्र दाखविणारा आणि निवडणुकीस उभे राहिलेल्या उमेदवारांची नावे असलेली नोंद प्रदर्शित करा.

५. जर एखादा मतदान अधिकारी गैरहजर असेल तर आवश्यकतेनुसार स्थानिक मतदान अधिकारी नेमण्यात यावा.

६. मतदानास आरंभ करण्यास ठरविलेल्या वेळेआधी विहित कालावधीत मतदान यंत्र तयारीत ठेवा.

७.१ मतदान युनिट आणि नियंत्रण युनिट एकमेकांना व्यवस्थित जोडा.

७.२ नियंत्रण युनिटच्या मागील कप्प्यातील पॉवर स्वीच सुरु (On) करा.

७.३ नियंत्रण युनिटामागील कप्पा बंद करा.

७.४ मतदान यंत्र 'क्लिअर' आहे आणि त्यात याअगोदर मत नोंदणी झालेली नाही याची उपस्थित असलेल्या मतदान प्रतिनिधींना खात्री करुन द्या.

७.५ प्रत्येक उमेदवारासाठी काही मतांची नोंदणी करायला मतदान प्रतिनिधींना सांगा आणि अभिरुप मतदान घ्या.

७.६ अभिरुप मतदान झाल्यानंतर सदर मतदानाचा निकाल उपस्थितांना दाखवा आणि नंतर यंत्र क्लिअर करा.

८.१ नियंत्रण युनिटच्या निकाल विभागाच्या आतील कप्प्यात असलेल्या चौकटीवर कागदी मोहर बसवा.

८.२ निकाल विभागाच्या आतील कप्प्याचे दार अशारितीने बंद करा की, कागदी मोहरेची दोन उघडी टोके आतील कप्प्याच्या बाजूने बाहेर दिसतील.

८.३ कागदी मोहरेच्या सफेद भागावर छापील अनुक्रमांकाखाली तुम्ही तुमची संपूर्ण स्वाक्षरी करा.

८.४ उपस्थित असलेल्या इच्छुक मतदान प्रतिनिधींनाही त्यावर स्वाक्षरी करायला सांगून त्यांना कागदी मोहरेचा अनुक्रमांक नोंद करुन घेण्यास सांगावे.

८.५ नियंत्रण युनिटमधील निकाल विभागाच्या आतील कप्पा स्पेशल टॅग वापरुन मोहरबंद करावा **(असे करताना क्लोज बटनाला धक्का लागणार नाही याची खबरदारी घ्यावी).**

९.१ नियंत्रण युनिटातील निकाल विभागाचे बाहेरील आवरण बंद करुन मोहरबंद करावे. त्यावर तपशीलाचा कागद घट्टपणे चिकटविण्यात यावा.

९.२ नियंत्रण युनिटमधील निकाल विभागाच्या आतील आवरणावर त्यांची मोहर लावण्यास मतदान प्रतिनिधींना अनुमती द्यावी.

१०.१ मतदान यंत्र मतदान खोलीत ठेवा. नियंत्रण युनिट तुमच्या टेबलवर ठेवा.

१०.२ त्यांना एकमेकांना जोडणारी केबल अशारितीने जोडा की, मतदार मतदान खोलीत आत बाहेर होत असताना त्यांच्या पायाखाली ती केबल येणार नाही.

११.१ उपस्थित असलेल्या मतदान प्रतिनिधींना चिन्हांकित मतदार यादी दाखवून त्यावर **पीबी** आणि **इडीसी** याशिवाय इतर कोणतीही नोंद नसल्याची खात्री करु द्या.

११.२ मतदार नोंदवही (नमुना व्हीएम-१) यावरही कुठलीही नोंद नाही हे दाखवा.

१२. मतदानाच्या आरंभास घोषणा पत्रावर स्वाक्षरी करा व ते सर्वांना वाचून दाखवा.

१३. निश्चित केलेल्या वेळेवरच मतदानास प्रारंभ करा.

१४. उमेदवाराच्या एकाच मतदान प्रतिनिधीस कुठल्याही वेळी मतदान केंद्रात अनुमती द्या.

१५. मुक्त आणि सुरळीत मतदानाची खात्री करा.

१६. राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक निरीक्षक नियुक्त केले असल्यास त्यांचेशी आपलेपणा राखा आणि त्यांना आवश्यक माहिती देऊन सहकार्य करा.

१७. मतदान केंद्राच्या शंभर मीटरच्या आत प्रचार करणे गुन्हा आहे.

१८. मतदान केंद्रात धूम्रपान वर्ज्य आहे.

१९.१ जेथे तीन मतदान अधिकारी आहेत त्या मतदान अधिका-यांचे कर्तव्य -

पहिल्या मतदान अधिका-याजवळ मतदार यादी असेल आणि तो मतदारांची ओळख/छाननी करील. त्या यादीवरील छपाई आणि कारकुनी चुका दुर्लक्ष करील.

दुसरा मतदान अधिकारी मतदान शाई आणि मतदार नोंदवही घेऊन बसेल. तो मतदारांच्या डाव्या हाताच्या तर्जनीस मतदान शाईची खूण करील आणि मतदार नोंदवहीच्या रकाना (२) मध्ये मतदाराचा भाग क्रमांक आणि अनुक्रमांक यांची नोंद करुन त्यापुढे मतदाराची स्वाक्षरी अथवा अंगठा घेईल. तो मतदार स्लीप तयार करुन मतदारांना देईल.

तिस-या मतदान अधिका-याच्या ताब्यात नियंत्रण युनिट असेल तो मतदाराकडून मतदार स्लीप घेऊन तो मतदाराच्या डाव्या हाताच्या तर्जनीवरील मतदान शाईची तपासणी करील आणि त्याला नियंत्रण युनिटवरील 'मतदान' बटन दाबून त्याला मत नोंदणी करण्यास अनुमती देईल.

१९.२ मतदाराने मतदार नोंदवहीत ज्या अनुक्रमांकाने नोंदणी केलेली आहे त्याच अनुक्रमाने मत नोंदणी करण्यास त्यांना अनुमती द्या. त्यांनी मतदार नोंदवहीवर स्वाक्षरी/अंगठा नोंदविल्याशिवाय मतनोंदणी करण्यास अनुमती देऊ नये.

२०. मतदाराच्या ओळखीसंबंधी आव्हान देऊ इच्छिणा-यास त्यांच्याकडून प्रत्येक आव्हानामागे **दोन रुपये फी** घेतल्याशिवाय प्रकरण हाती घेऊ नका. सदर आव्हान मतांची नोंद, मतदान केंद्राध्यक्षांनी आव्हानित मतांची यादी नियमातील तरतुदीनुसार ठेवावी.

२१. अंध आणि अपंग मतदारांच्या सहका-यांकडून घोषणापत्र घ्या आणि अशा मतदारांची नोंद **व्हीएम-५** मध्ये ठेवा.

२२. तुम्हाला एखादा मतदार वयापेक्षा खूपच लहान वाटला म्हणजे १८ वर्षापेक्षा कमी वयाचा दिसला तरी त्याची ओळख समाधानकारक दिसून आली तर त्याच्या पात्रतेविषयी मुद्दा उपस्थित करु नका.

२३.१ मतदार नोंदवहीमध्ये मतदाराचा तपशील लिहून घेतल्यानंतर जरी एखाद्या मतदाराने **मतदान करावयास नकार दिल्यास** व्हीएम-१ मधील शेरा या रकान्यात आवश्यकती नोंद घ्यावी.

[ २३.२ जर एखाद्याने मतदान करण्यास नकार दिल्यास मतदार नोंदवही (नमुना व्हीएम-१ च्या रकाना १) मध्ये कुठल्याही अनुक्रमाकात बदल करु नये.

२४.१ जर एखाद्या मतदाराच्या नावाने त्याच्या अगोदरच कोणी मतदान करुन गेले असल्यास आणि सदर मतदाराने आपल्या दिलेल्या ओळखीने तुमचे समाधान होत असल्यास त्याला प्रदत्त/दुबार मतपत्रिकेवर मतदान करण्यास अनुमती द्यावी. **त्याला मतदान यंत्रावर मतदान करण्याची परवानगी देऊ नये.**

२४.२ ज्यांना दुबार मतपत्रिका दिलेली आहे त्यांची नोंद नमुना व्हीएम-२ मध्ये ठेवा. प्रदत्त मतपत्रिका आणि त्यांची यादी नमुना व्हीएम-२ मध्ये नोंद करुन वेगळया लिफाफ्यात ठेवा.

२५.१ तुम्ही ताकीद देऊनसुध्दा निश्चित केलेली मतदान गुप्तता पाळण्यास एखादा मतदार तयार झाला नाही तर त्याला मतदानाची अनुमती देऊ नये.

२५.२ अशा मतदारांची नोंद, मतदार नोंदवहीमध्ये जेथे केलेली आहे त्या नोंदीसमोरील रकान्यात त्याबाबतचा शेरा लिहा. अशा मतदारासाठी त्या नोंदवहीमधील रकाना १ मधील अनुक्रमांकात बदल करु नये.

२६. मतदान बंद करण्यासाठी निश्चित केलेला वेळ संपल्यानंतर मतदार स्लीप दिलेले मतदार, रांगेत असले तर त्यांचे मतदान करुन संपेपर्यंत मतदान चालू ठेवावे.

२७. नियंत्रण युनिटवरील “क्लोज” बटन दाबून मतदान यंत्र बंद करा. ते दाबल्यानंतर 'क्लोज' बटनवरील निळे आवरण बदला.

२८.१ मतनोंदणीचा हिशेब नमुना व्हीएम-३ मध्ये तयार करा.

२८.२ नोंद झालेल्या मतांच्या हिशेबांच्या प्रमाणित प्रती, मतदान प्रतिनिधींना द्या. त्यासंबंधी निश्चित केलेल्या घोषणापत्राच्या नमुन्यावर घोषणापत्र तयार करा.

२९.१ मतदान बंद झाल्यानंतर मतदान युनिट व नियंत्रण युनिट एकमेकांपासून वेगवेगळी करा.

२९.२ नियंत्रण युनिट आणि मतदान युनिट त्यांच्या संबंधीत पेटीत ठेवा.

३०.१ पेटया दोन्ही टोकावर मोहरबंद करा. प्रत्येक पेटीवर तपशीलाचा टॅग लावा.

३०.२ सर्व मतदान प्रतिनिधींनी आपली मोहर सदर पेटयांवर लावायला हवी.

३१.१ वेगवेगळया पाकिटांतून सर्व निवडणूक कागदपत्रे आणि साहित्य मोहरबंद करा.

३१.२ तुमचा मोहर (१) चिन्हांकित मतदार यादीची प्रत (२) मतदार नोंदवही (३) मतदार स्लीप (४) वापरलेल्या दुबार मतपत्रिका आणि नमुना व्हीएम-२ वरील यादी आणि (५) वापरण्यात न आलेल्या दुबार मतपत्रिका असलेल्या लिफाफ्यावर लावा.

३१.३ सदर लिफाफ्यावर सर्व मतदान प्रतिनिधींना त्यांची मोहर लावण्यास सांगा.

३२.१ निवडणुकीसंबंधीची सर्व कागदपत्रे आणि साहित्य चार मोठया लिफाफ्यात ठेवा.

३२.२ पहिल्या मोहरबंद पाकिटात ज्यावर 'वैधानिक पाकीटे' असे स्पष्ट लिहिलेले आहे त्यात पाच मोहरबंद पाकिटे असायला हवीत.

३२.३ तिसऱ्या लिफाफ्यात सात नमुने असायला हवेत.

३२.४ इतर सर्व नमुने चौथ्या लिफाफ्यात बंद करायला हवे.

३३. वेगळया लिफाफ्यात (१) नोंद झालेल्या मतांचा हिशेब (नमुना व्हीएम-३), (२) मतदानास आरंभ होण्याआधी आणि मतदान बंद झाल्यानंतर तुम्ही केलेली घोषणापत्रे, आणि (३) मतदान केंद्राध्यक्षांची डायरी ठेवायला हवी.

३४. मतदान केंद्रावर दंगल अथवा हिंसाचार सुरु झाल्यास मतदान तहकूब करा. संपूर्ण अहवाल निर्वाचन अधिकाऱ्यास व आवश्यकतेनुसार राज्य निवडणूक आयोगास पाठवावा.

३५. जर मतदान केंद्र ताब्यात घेणे अथवा मतदान यंत्र अथवा मतदान नोंदवही, मतदार यादीची चिन्हांकित प्रत यासारखे निवडणूक साहित्य अनधिकृतपणे तुमच्या ताब्यातून नेण्यात आले, खराब झाले अथवा त्यात हस्तक्षेप केला तर मतदान बंद करुन त्याबाबतचा संपूर्ण अहवाल निर्वाचन अधिकाऱ्यास कळवा.

## अनुक्रमणिका


| जोडपत्र क्रमांक | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | जि.प.पं.स निवडणुकी मध्ये EVM वापर करण्याबाबतचे आदेश | ७१-८१ |
| १अ | दि.३/५/२००५ च्या आदेशास अंशत: दुरूस्ती | ८२ |
| २ | मतदान केंद्राध्यक्षांनी वेगवेगळया पातळीवर करावयाच्या कामाचा आराखडा | ८३-८९ |
| ३ | मतदान केंद्राध्यक्षांसाठी चेकमेमो | ९० |
| ३ अ व ३ ब | मतदान प्रतिनिधींची नियुक्तीपत्र | ९१-९२ |
| ४ | जेथे राज्य निवडणूक आयोगाकडील इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर होईल त्या मतदान केंद्रासाठी मतदान साहित्याची यादी | ९३-९४ |
| ५ | मतदान केंद्राचा आराखडा | ९५ |
| ६ | मतदान केंद्राध्यक्षाने मतदान सुरू करतेवेळी करावयाचे प्रतिज्ञापत्र | ९६-९७ |
| ६अ | मागाहून दुसऱ्या मतदान यंत्राचा वापर करताना मतदान केंद्राध्यक्षाने करावयाचे प्रतिज्ञापन | ९८ |
| ७ | मतदान समाप्तीचे प्रतिज्ञापत्र | ९९ |
| ८ | मतदान यंत्र मोहोरबंद केल्यानंतर करावयाचे प्रतिज्ञापन | १०० |
| ९ | अंध आणि अपंग मतदाराच्या सहकाऱ्याचे घोषणापत्र | १०१ |
| १० | नमुना व्हीएम-३ | १०२-१०३ |
| १० अ | नमुना व्हीएम-४ | १०४ |
| ११ | मतदान केंद्राध्यक्षांची डायरी | १०५-१०७ |
| १२ | मतदार ओळखपत्र अथवा अन्य १७ पुरावे | १०८-११० |
| १३ | हरकत घेण्यात आलेल्या मतांची यादी | १११ |
| १४ | आक्षेप फी पावती पुस्तिका नमुना | ११२ |
| १५ | पोलीस ठाणे अधिका-यास पाठवावयाचे तक्रारपत्र | ११३ |
| १६ | इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र वापरताना घ्यावयाची दक्षता. | ११४ |
| १७ | मार्कर पेन वापराबाबतच्या सूचना | ११५-११६ |
| १८ | मतदान केंद्राबाबतचे दि.२७/५/२०१५ चे आदेश | ११७-१२७ |
| १९ | अपंग मतदारांसाठी रॅंप ची सोय करणेबाबतचे आदेश दि.२४/१२/२००५ | १२८ |
| २० | NOTA ची सोय उपलब्ध करून देणेबाबत दि.१२/११/२०१३, २६/११/२०१३ चे आदेश | १२९-१४१ |

जोडपत्र - एक

असा क्र. २३

रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**मंगळवार, मे ३, २००५/वैशाख १३, शके १९२७**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## *भाग एक-अ—मध्य उप-विभाग*

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

### राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ मे २००५

**जिल्हा परिषद व पंचायत समिती क्षेत्रात इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करणेबाबतचे आदेश, २००५**

**जिल्हा परिषद व पंचायत समिती क्षेत्रात राज्य निवडणूक आयोगाने घेतलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांचा वापर करून मतदान करण्यासंदर्भातील सविस्तर कार्यपद्धती ठरवून देण्याबाबतचे आदेश.**

**भारताचे संविधान.**

क्रमांक रानिआ. २००५/प्र.क्र. २४/का-७.—ज्याअर्थी, भारतीय संविधान संविधानाच्या अनुच्छेद २४३ के मधील तरतुदीनुसार पंचायतीच्या सर्व निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन आणि नियंत्रण राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेले आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम १०अ व ५८अ याद्वारे इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे करता येईल अशी तरतूद करण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याची तरतूद महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमाद्वारे करण्यात आलेली आहे, तथापि, त्यासंदर्भातील सविस्तर कार्यपद्धती ठरवून देण्याबाबत नियम अद्याप तयार करण्यात आलेले नाहीत आणि अशी सविस्तर कार्यपद्धती ठरवून देणे अत्यावश्यक झाले आहे.

त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के अन्वये तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील कलम ९अ(४) अन्वये यासंदर्भात प्राप्त झालेल्या सर्व अधिकारांचा वापर करून राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र खालीलप्रमाणे आदेश देत आहे :—

१. **संक्षिप्त नाव, व्याप्ती आणि प्रारंभ.**—(१) जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक या आदेशास " जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये राज्य निवडणूक आयोगाने घेतलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांचा वापर करण्याबाबतची सविस्तर कार्यपद्धती ठरवून देणारे आदेश " असे नाव राहील.

(२) या आदेशाची व्याप्ती महाराष्ट्र राज्यभर राहील आणि सदर आदेश राज्यातील सर्व जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी लागू राहतील.

(३) सदर आदेश शासकीय राजपत्रात छापल्याच्या तारखेपासून अंमलात येतील.

२. **व्याख्या आणि अर्थविवरण.**—या आदेशात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(१) " इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र " म्हणजे जिल्हा परिषद व पंचायत समिती यांच्या निवडणुकांमध्ये मतदान करण्यासाठी मतपेटी व मतपत्रिका यांऐवजी मत नोंदविण्यासाठी वापरले जाईल असे कोणतेही मशिन किंवा यंत्र जे इलेक्ट्रॉनिक अथवा अन्य पद्धतीने चालविले जाईल.

(२) " मतदारसंघ " म्हणजे जिल्हा परिषद निवडणुकीसाठी मतदार गट व पंचायत समिती निवडणुकीसाठी मतदार गण.

(३) " निवडणूक " म्हणजे हे आदेश लागू होणारी जिल्हा परिषद अथवा पंचायत समितीची निवडणूक होय. यामध्ये पोट-निवडणुकीचा समावेश होतो.

(४) " टपाली मतपत्रिका आदेश, २००१ " म्हणजे राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचेकडील दिनांक १६ जानेवारी २००१ चे आदेश.

३. **इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राची रचना.**—प्रत्येक इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रात (यापुढे मतदान यंत्र असा उल्लेख केलेले) एक कंट्रोल युनिट आणि एक किंवा अनेक बॅलटिंग युनिट असतील ज्याची रचना राज्य निवडणूक आयोगाने मान्यता दिल्याप्रमाणे असेल.

४. **निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी मतदान यंत्राची तयारी करणे.**—(१) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या प्रत्येक बॅलटिंग युनिटमध्ये राज्य निवडणूक आयोग विहित करील तो तपशील राज्य निवडणूक आयोगाने ठरविलेल्या भाषेमध्ये अथवा भाषांमध्ये असेल.

(२) निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीमध्ये ज्या क्रमाने उमेदवारांची नावे नमूद करण्यात येतील त्याच क्रमाने सदर नावे बॅलटिंग युनिटवर नमूद करण्यात येतील.

(३) जेव्हा दोन किंवा अधिक उमेदवारांची नावे समान असतील तेव्हा त्यामधील फरक स्पष्ट करण्यासाठी सदर उमेदवारांचा व्यवसाय अथवा पत्ता किंवा अन्य एखादी बाब त्यांच्या नावासमोर नमूद केली जाईल.

(४) खालील तरतुदींच्या अधीन राहून निवडणूक निर्णय अधिकारी यांनी,—

(अ) निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची नावे व चिन्हे नमूद केलेली खूणचिठ्ठी (मतपत्रिका) बॅलटिंग युनिटमध्ये योग्य जागी घट्ट बसवील आणि स्वतःची सही करून सीलबंद करील. त्याशिवाय, उपस्थित असलेले उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी जे सीलवर सही करू इच्छितात त्यांच्या स्वाक्षऱ्या घेईल.

(ब) निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या कंट्रोल युनिटमध्ये सेट करील आणि अशी संख्या निश्चित करावयाच्या मशिनचा विभाग बंद करून तो सीलबंद करील व त्यावर स्वतःची स्वाक्षरी करील. त्याशिवाय, उपस्थित असलेले उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी जे सीलवर सही करू इच्छितात त्यांच्या स्वाक्षऱ्या घेईल.

५. **मतदान केंद्रातील व्यवस्था.**—(१) प्रत्येक मतदान केंद्राबाहेर खालील गोष्टी ठळकपणे दिसतील अशा रीतीने लावण्यात येतील :—

(अ) संबंधित मतदान केंद्रावर जे मतदार मतदान करण्यास पात्र आहेत त्या मतदान केंद्राच्या अंतर्गत येणारे क्षेत्र तसेच संबंधित क्षेत्रामध्ये एकापेक्षा जास्त मतदान केंद्रे असतील तर त्या मतदान केंद्रावर जे मतदार मतदान करण्यास पात्र आहेत त्या क्षेत्राचा तपशील दर्शविणारी सूचना ;

(ब) निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी.

(२) प्रत्येक मतदान केंद्रात एक किंवा अधिक मतदान कक्ष ठेवण्यात येतील जेणेकरून, मतदाराने केलेले मतदान कोणीही अन्य व्यक्ती पाहणार नाही, अशा रीतीने नोंदवू शकतील.

(३) निवडणूक निर्णय अधिकारी प्रत्येक मतदान केंद्रावर मतदान यंत्र आणि मतदार यादीच्या संबंधित भागाची प्रत आणि मतदानासाठी आवश्यक ते अन्य निवडणूक साहित्य पुरविल.

६. **मतदान केंद्रात प्रवेश.**—जिल्हा परिषदा निवडणूक नियम, १९६२ मधील नियम ३७ व पंचायत समित्या निवडणूक नियम, १९६२ मधील नियम ३५ मधील तरतुदीनुसार मतदान केंद्राध्यक्ष/मतदान अधिकारी मतदान केंद्रात एकावेळी प्रवेश देण्यासाठी मतदारांची संख्या विनियमित करील. तसेच सदर नियमात नमूद केलेल्या अधिकृत व्यक्तींव्यतिरिक्त अन्य कोणालाही मतदान केंद्रात प्रवेश देणार नाही.

७. **मतदानासाठी मतदान यंत्र तयार करणे.**—(१) मतदान केंद्रात वापरण्यासाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचे कंट्रोल युनिट व बॅलटिंग युनिट अथवा युनिट्स वर खालील तपशील नमूद केलेली खूणचिठ्ठी लावलेली असेल :—

(अ) मतदारसंघाचा अनुक्रमांक आणि मतदारसंघाचे नाव, असल्यास ;

(ब) मतदारसंघाचा अनुक्रमांक आणि मतदार केंद्राचे अथवा केंद्रांची नावे/क्रमांक ;

(क) मतदान यंत्राचा अनुक्रमांक ; आणि

(ड) मतदानाची तारीख.

(२) मतदानास सुरुवात करण्यापूर्वी मतदान केंद्राध्यक्ष मतदान प्रतिनिधी आणि इतर उपस्थित अधिकृत व्यक्ती यांना मतदान यंत्रामध्ये कोणत्याही मतदाराने आपले मत नोंदविलेले नाही व उपरोक्त परिच्छेद ४(४) मध्ये नमूद केलेली खूणचिठ्ठी मतदान यंत्रावर लावलेली आहे हे दाखवील.

(३) मतदान यंत्राचे कंट्रोल युनिट सुरक्षित करण्यासाठी कागदी मोहोर (पेपर सील) वापरली जाईल, आणि मतदान केंद्राध्यक्ष आपली स्वतःची सही करील. तसेच उपस्थित मतदान प्रतिनिधी जे कागदी मोहोरवर सही करण्यास इच्छुक असतील त्यांच्याही सह्या घेईल.

(४) मतदान केंद्राध्यक्ष त्यानंतर मतदान यंत्राच्या कंट्रोल युनिटमध्ये विहित केलेल्या जागी वरीलप्रमाणे सह्या केलेले कागदी मोहोर घट्ट चिकटवील आणि ते सुरक्षित व मोहोरबंद करील.

(५) कंट्रोल युनिट सुरक्षित करण्यासाठी वापरण्यात येणारे कागदी मोहोर अशा रीतीने घट्ट चिकटविण्यात येईल, जेणेकरून कागदी मोहोर तोडल्याशिवाय " रिझल्ट " बटन दाबता येणार नाही.

(६) वरीलप्रमाणे बंद केलेले आणि सुरक्षित केलेले कंट्रोल युनिट मतदान केंद्राध्यक्ष तसेच मतदान प्रतिनिधी या सर्वांना दिसेल अशा रीतीने ठेवण्यात येईल आणि बॅलटिंग युनिट अथवा युनिट्स मतदान कक्षात ठेवण्यात येतील.

८. **चिन्हांकित मतदार यादी.**—मतदान सुरुवात करण्यापूर्वी मतदान केंद्राध्यक्ष, सर्व मतदान प्रतिनिधी व इतर उपस्थितांना चिन्हांकित मतदार यादीमध्ये पुढील बाबींव्यतिरिक्त अन्य कोणत्याही खुणा केल्या नसल्याचे दाखवून देईल :—

(अ) टपाली मतपत्रिका आदेश, २००१ मधील परिच्छेद ३ उप परिच्छेद २ मधील तरतुदीनुसार केलेल्या खुणेव्यतिरिक्त अन्य कोणतीही खूण करण्यात आलेली नाही ; आणि

(ब) टपाली मतपत्रिका आदेश, २००१ मधील परिच्छेद ५(२) मधील तरतुदीनुसार केलेल्या खुणेव्यतिरिक्त अन्य कोणतीही खूण करण्यात आलेली नाही.

९. **महिला मतदारांसाठी सुविधा.**—(१) जेव्हा एखाद्या मतदान केंद्रात महिला व पुरुष असे दोन्ही मतदार असतील तेव्हा आवश्यकता असल्यास मतदान केंद्राध्यक्ष पुरुष व महिला यांच्या वेगवेगळ्या रांगा करून काही पुरुष व त्यानंतर काही महिला अशाप्रकारे मतदानासाठी पाठवील.

(२) निवडणूक निर्णय अधिकारी अथवा मतदान केंद्राध्यक्ष एखाद्या मतदान केंद्रावर महिला मतदारांना सहाय्य करण्यासाठी एखादी महिला सहायक नियुक्त करील. जेणेकरून, ती मतदान केंद्राध्यक्षास सर्वसाधारणपणे मतदान प्रक्रियेमध्ये अनुज्ञेय मदत करू शकेल. विशेषतः आवश्यकता भासल्यास एखाद्या महिला मतदारास मदत करणे अथवा तिची झडती घेणे यामध्ये मदत करू शकेल.

१०. **मतदारांची ओळख पटविणे.**—जिल्हा परिषदा निवडणूक नियम, १९६२ च्या नियम ४० व पंचायत समित्या निवडणूक नियम, १९६२ च्या नियम ३७ मधील तरतुदीनुसार विहित केलेली पद्धती यासंदर्भात अवलंबिली जाईल.

११. **मतदान कर्तव्यार्थ नेमलेल्या लोकसेवकांना टपाली सुविधा.**—(१) टपालाने मतदान करू इच्छिणाऱ्या निवडणूक कर्तव्यार्थ नियुक्त केलेल्या मतदाराने टपाली मतपत्रिका आदेश, २००१ अन्वये विहित केलेल्या पीबी-१ या प्रपत्रात निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे मतदानाच्या तारखेपूर्वी कमीत कमी ७ दिवस अगोदर अथवा निवडणूक निर्णय अधिकारी ठरवतील अशा मुदतीपूर्वी पोहोचेल अशा बेताने अर्ज करावा आणि निवडणूक निर्णय अधिकारी यांची अर्जदार हा निवडणूक कर्तव्यार्थ नियुक्त केलेला मतदार आहे, अशी खात्री झाल्यास अशा अर्जदारास टपाली मतपत्रिका देण्यात येईल.

(२) ज्या ठिकाणी मतदाराची नेमणूक त्याच्याच मतदारसंघात मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी किंवा मतदान कर्मचारी म्हणून वा अन्य निवडणूक कामासाठी करण्यात आली असेल तर असा मतदार टपालाद्वारे मतदान करण्याऐवजी ज्या केंद्रावर त्याला नेमणूक देण्यात आली आहे त्याच मतदान केंद्रावर मतदान करू शकतो. परंतु, यासाठी त्याने विहित नमुन्यातील निवडणूक कार्य प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. यासंदर्भात जिल्हा परिषदा निवडणूक नियमातील नियम, ३३-अ व ४०-अ आणि पंचायत समित्या निवडणूक नियमातील नियम, ३१-अ व ३७-अ लागू होतील. मतदान केंद्राध्यक्ष निवडणूक कार्य प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर,—

(क) मतदान केंद्राध्यक्ष त्यावर सदर प्रमाणपत्र सादर करणाऱ्या संबंधित व्यक्तीची स्वाक्षरी घेईल ;

(ख) मतदान केंद्राध्यक्ष निवडणूक कार्य प्रमाणपत्रात नमूद केल्यानुसार संबंधित व्यक्तीचे नाव व त्याचा मतदार यादीतील अनुक्रमांक चिन्हांकित मतदार यादीच्या शेवटी नमूद करील ; आणि

(ग) संबंधित मतदान केंद्रावर मतदान करण्यास पात्र असलेल्या अन्य कोणत्याही मतदाराने ज्याप्रमाणे मतदान केले असते त्याप्रमाणे त्यास मतदान करू देईल.

१२. **मतदाराच्या ओळखीस आव्हान.**—यासंदर्भात जिल्हा परिषदा निवडणूक नियम, १९६२ मधील नियम ४१ व पंचायत समित्या निवडणूक नियम, १९६२ मधील नियम ३८ मधील विहित केलेल्या तरतुदी यासंदर्भात लागू राहतील.

१३. **तोतयेगिरीस प्रतिबंध करणे.**—यासंदर्भात जिल्हा परिषदा निवडणूक नियम, १९६२ च्या नियम ४२ व पंचायत समित्या निवडणूक नियम, १९६२ च्या नियम ३८-अ अंतर्गत विहित केलेले नियम व राज्य निवडणूक आयोगाने निर्गमित केलेले आदेश यासंदर्भात लागू राहतील.

१४. **मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याची कार्यपद्धती.**—(१) एखाद्या मतदारास मतदान करण्याची अनुमती देण्यापूर्वी मतदान केंद्राध्यक्ष,—

(अ) चिन्हांकित मतदार यादीमध्ये नमूद केलेला मतदाराचा अनुक्रमांक व्हीएम-१ या नमुन्यातील मतदार नोंदवहीत नमूद करील ;

(ब) मतदाराची स्वाक्षरी घेईल अथवा अंगठ्याचा ठसा उपरोक्त नमूद मतदार नोंदवहीत उमटवील ; आणि

(क) चिन्हांकित मतदार यादीमध्ये संबंधित मतदाराच्या नावासमोर खूण करील, जेणेकरून त्यास मतदान करण्याची अनुमती देण्यात आलेली आहे :

परंतु, कोणत्याही मतदारास त्याने व्हीएम-१ या नमुन्यातील मतदार नोंदवहीत स्वाक्षरी केल्याशिवाय अथवा अंगठ्याचा ठसा उमटविल्याशिवाय त्यास मतदान करण्याची अनुमती देणार नाही.

(२) एखाद्या व्यक्तीने उपरोक्त नमूद मतदार नोंदवहीत अंगठ्याचा ठसा उमटविल्यास मतदान केंद्राध्यक्ष अथवा मतदान अधिकारी अथवा अन्य कोणताही अधिकारी यांनी अंगठ्याचा ठसा साक्षांकित करणे आवश्यक राहील.

१५ **बॅलेटिंग युनिटवरील " End " बटनाचा वापर.**—(१) जेथे जिल्हा परिषद व पंचायत समिती अशा दोन्ही निवडणुकांमध्ये मतदान होते तेथे " End " बटन उघडून (Unmask) ठेवण्यात यावे. साधारणपणे मतदाराकडून दोन्ही पदांसाठी मतदान केल्यावर " End " बटनाचा वापर करण्याची आवश्यकता नाही. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र दोन मतांसाठी सेट केले असेल, अपवादात्मक परिस्थितीमध्ये जर एखाद्या मतदाराने दोन

पदांपैकी एका पदाकरिता किंवा कोणत्याही पदासाठी मतदान केले नाही व मतदार मतदान कक्षामधून बाहेर निघाला तर केंद्राध्यक्षांना ही गोष्ट त्यांच्याकडे असलेल्या " Control Unit " वर लाल दिवा न विझल्यामुळे लक्षात येईल व अशावेळी मतदाराने एकच मत नोंदले तर मतदान यंत्र पुढील मतदारासाठी तयार होणार नाही. अशा परिस्थितीत केंद्राध्यक्षांनी संबंधित मतदाराला त्याचे मतदान पूर्ण न झाल्याबाबतची कल्पना देणे आवश्यक राहील व मतदाराने मतदान पूर्ण करण्याबाबत विनंती करावी. जर मतदाराने पुन्हा मतदान कक्षात जाऊन दोन्ही पदांकरिता मतदान नोंदविले तर या बटनाचा वापर करण्याची आवश्यकता भासणार नाही. पण जर मतदाराने दोन्ही पदांपैकी एका पदासाठी किंवा दोन्ही पदांकरिता कोणालाही मतदान करावयाचे नसेल तेव्हा त्या मतदाराने " End " बटन दाबण्याबाबत विनंती करण्यात यावी. जेणेकरून त्याची मतदानाची प्रक्रिया पूर्ण होईल व केंद्राध्यक्षांकडे असलेल्या " Control Unit " वरील लाल दिवा विझून जाईल व इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र पुढील मतदानासाठी तयार करता येईल. अपवादात्मक प्रकरणांपैकी कधी एखादा मतदार " End " बटन दाबण्यासाठी नकार देईल तेव्हा मतदान केंद्राध्यक्षांनी केंद्रात उपस्थित असलेल्या सर्व मतदान प्रतिनिधींना बरोबर घेऊन त्यांच्या साक्षीने " End " बटन दाबावे व याबाबतची योग्य ती नोंद मतदान केंद्राध्यक्षांच्या डायरीमध्ये घ्यावी.

(२) पोट-निवडणुकांच्यावेळी जर एकच मत द्यावयाचे असेल तर " End " बटनाला झाकून (Masked) ठेवावे. जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक व पोट-निवडणुकांमध्येसुद्धा एकच मत द्यावयाचे असते त्यावेळीदेखील " End " बटनाला झाकून ठेवावे.

१६. **मतदारांनी मतदान केंद्रात मतदानाबाबत तसेच मतदान पद्धतीबाबत गुप्तता पाळणे.**—(१) प्रत्येक मतदाराने त्यास उपरोक्त परिच्छेद १४ मध्ये विहित केल्याप्रमाणे मतदान करण्यास अनुमती दिल्यानंतर मतदानाबाबत मतदान केंद्रात गुप्तता पाळणे आवश्यक असून, आणि त्या दृष्टीने मतदान करताना खाली नमूद केल्याप्रमाणे कार्यपद्धती अनुसरणे आवश्यक आहे.

(२) मतदान करण्यास अनुमती दिल्यानंतर मतदार तात्काळ ज्यांच्या अखत्यारित कंट्रोल युनिट आहे अशा मतदान अधिकाऱ्याकडे अथवा मतदान केंद्राध्यक्षाकडे जाईल व संबंधित मतदान अधिकारी अथवा मतदान केंद्राध्यक्ष कंट्रोल युनिटचे योग्य ते बटन दाबून मतदारास मतदान करता यावे यासाठी बॅलटिंग युनिट सुरू (Activate) करील.

(३) त्यानंतर तात्काळ मतदार,—

(अ) मतदान कक्षाकडे जाईल ;

(ब) बॅलटिंग युनिटवर उमेदवारांची नावे व चिन्हे ज्या ठिकाणी दर्शविली आहेत, तेथे त्याला हव्या असलेल्या उमेदवारासमोरील बटन दाबून आपले मत नोंदविल ; आणि

(क) मतदान कक्षाच्या बाहेर येईल आणि मतदान केंद्राबाहेर पडेल.

(४) कोणताही मतदार मत नोंदविण्यासाठी अनावश्यक उशीर लावणार नाही.

(५) एखादा मतदार मतदान कक्षात असल्यास अन्य कोणत्याही मतदारास मतदान कक्षात जाण्याची अनुमती देण्यात येणार नाही.

(६) वरील नमूद परिच्छेद १४ आणि १९ मधील तरतुदीनुसार एखाद्या मतदारास मतदान करण्याची अनुमती देण्यात आल्यानंतर वरील उप परिच्छेद (३) मध्ये विहित केलेली कार्यपद्धती अनुसरण्यास एखाद्या मतदाराने मतदान केंद्राध्यक्षाने ताकीद दिल्यानंतरही सूचनांचे पालन करण्यास नकार दिल्यास मतदान केंद्राध्यक्ष अथवा मतदान अधिकारी मतदान केंद्राध्यक्षांच्या आदेशानुसार अशा मतदारास मतदान करू देणार नाही.

(७) वरील उप परिच्छेद (६) मध्ये नमूद केल्यानुसार एखाद्या मतदारास मतदान करण्याची अनुमती नाकारण्यात आल्यास " मतदान प्रक्रियेचा भंग " असा अभिप्राय नमुना व्हीएम-१ या मतदारांच्या नोंदवहीत मतदान केंद्राध्यक्षाच्या स्वाक्षरीसह नमूद करण्यात यावा.

१७. **अंध अथवा अपंग मतदारांनी मत नोंदविणे.**—(१) एखादा मतदार त्याच्या अंधत्वामुळे अथवा अन्य शारीरिक अपंगत्वामुळे त्याला सहाय्य मिळाल्याशिवाय बॅलटिंग युनिटवरील चिन्हे ओळखून योग्य ते बटण दाबून मत नोंदविण्यास असमर्थ आहे, अशी मतदान केंद्राध्यक्षांची खात्री झाल्यास मतदारास २१ वर्षांपेक्षा कमी वय नसलेला सहायक त्याच्यासोबत मतदान कक्षात घेऊन जाण्यास व त्याच्या इच्छेनुसार मतदान करण्यास अनुमती देईल :

परंतु, मतदानाच्या दिवशी कोणतीही व्यक्ती अंध अथवा अपंग मदारास मदत करण्यासाठी एकापेक्षा जास्त मतदाराची सहायक म्हणून काम करण्यास अनुमती देण्यात येणार नाही :

परंतु, आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीस या नियमाखाली वरीलप्रमाणे सहायक म्हणून काम करण्याची अनुमती देण्यापूर्वी संबंधित व्यक्ती असे जाहीर करील की, ती व्यक्ती मतदाराच्या वतीने नोंदविलेले मत गुप्त ठेवील, तसेच त्याने एकाच दिवशी एकापेक्षा जास्त मतदाराचा सहायक म्हणून काम केलेले नाही.

(२) मतदान केंद्राध्यक्ष अशा सर्व बाबींच्या नोंदी व्हीएम-५ या नमुन्यात ठेवील.

१८. **मतदान करण्याची इच्छा नसलेला मतदार.**—एखाद्या मतदाराने त्याचा मतदार यादीतील क्रमांक नमुना व्हीएम-१ मधील मतदार नोंदवहीत नोंदविल्यानंतर तसेच या आदेशाच्या परिच्छेद १४(१) मधील तरतुदीनुसार त्यामध्ये स्वाक्षरी केल्यानंतर अथवा अंगठ्याचा ठसा उमटवल्यानंतर मतदान करावयाचे नाही असे ठरविल्यास त्याच्या नावासमोर नमुना व्हीएम-१ मधील मतदार नोंदवहीत तसा अभिप्राय मतदान केंद्राध्यक्ष लिहील आणि अशा अभिप्रायासमोर संबंधित मतदाराची स्वाक्षरी घेईल अथवा त्याच्या अंगठ्याचा ठसा उमटवील.

१९. **प्रदत्त मते.**—(१) एखादा मतदार मतदान करण्यास आल्यानंतर त्याच्या वतीने अन्य एखाद्या व्यक्तीने मतदान केले आहे असे आढळून आल्यास अशा मतदारास त्याची ओळख पटविण्यासंदर्भातील प्रश्नांची उत्तरे त्याने समाधानकारकरित्या मतदान केंद्राध्यक्षास दिल्यास त्यास बॅटलिंग युनिटवर मतदान करण्यास अनुमती देण्याऐवजी, त्यास राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या नमुन्यानुसार व नावेतील अथवा नावांतील तपशील समाविष्ट असलेली प्रदत्त मतपत्रिका देण्यात येईल.

(२) प्रत्येक मतदार त्यास प्रदत्त मतपत्रिका देण्यापूर्वी नमुना व्हीएम-२ मध्ये स्वतःचे नाव लिहिल.

(३) प्रदत्त मतपत्रिका मिळाल्यानंतर असा मतदार त्वरित,—

(अ) मतदान कक्षाकडे जाईल;

(ब) त्याला देण्यात आलेल्या मतपत्रिकेवर त्याला देण्यात आलेल्या उपकरणाच्या साहाय्याने त्याला ज्या उमेदवारास मतदान करावयाचे आहे त्याच्या नावासमोर " x " अशी खूण करील;

(क) स्वतःचे मत उघड होणार नाही, अशा रीतीने मतपत्रिकेची घडी करील ;

(ड) मतदान केंद्राध्यक्षास आवश्यक वाटल्यास मतपत्रिकेवरील विभेदक चिन्हाची खूण दाखविल ;

(ई) मतदान केंद्राध्यक्षास मतपत्रिका देईल व ती मतपत्रिका त्यासाठी ठेवलेल्या विशिष्ट पाकिटात ठेवण्यात येईल ; आणि

(फ) मतदान केंद्राबाहेर पडेल.

(४) एखादा मतदार अंधत्व अथवा अन्य शारीरिक अपंगत्वामुळे मतदान करण्यास साहाय्य मिळाल्याशिवाय मत नोंदविण्यास असमर्थ असल्यास मतदान केंद्राध्यक्ष त्याला वरील पद्धती अनुसरून परिच्छेद १७ मध्ये विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार त्याच्या इच्छेनुसार साहाय्यक देऊन मतदान करण्याची अनुमती देईल.

२०. **मतदान सुरू असताना मतदान कक्षात मतदान केंद्राध्यक्षाने प्रवेश करण्याबाबत.**—(१) मतदान केंद्राध्यक्ष त्याला जेव्हा जेव्हा आवश्यकता वाटेल अशा वेळी, मतदान सुरू असताना मतदान कक्षात प्रवेश करील आणि बॅलटिंग युनिट अथवा युनिट्स सुरक्षित असून, त्यास कोणत्याही प्रकारे बिघडविण्यात आलेले नाही याची खात्री करील.

(२) एखादा मतदार मतदान कक्षात प्रवेश केल्यानंतर तो बॅलटिंग युनिट अथवा युनिट्स बिघडविण्याचा प्रयत्न करीत आहे अथवा मतदान कक्षात आवश्यकतेपेक्षा जास्त वेळ थांबलेला आहे, असे मतदान केंद्राध्यक्षास आढळून आल्यास तो मतदान कक्षात प्रवेश करील आणि मतदान प्रक्रिया सुरळीतपणे व विहित पद्धतीनुसार सुरू राहण्याच्या दृष्टीने योग्य ती पावले उचलील.

(३) मतदान केंद्राध्यक्ष ज्या ज्या वेळी मतदान कक्षात या नियमाखाली प्रवेश करील तेव्हा तो आपल्या सोबत मतदान प्रतिनिधींना त्यांची इच्छा असल्यास सोबत येण्याची अनुमती देईल.

२१. **मतदान बंद करणे.**—(१) राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या वेळेस मतदान बंद करण्याची दक्षता मतदान केंद्राध्यक्ष घेईल आणि त्यानंतर कोणत्याही मतदारास मतदान केंद्रात प्रवेश करण्याची अनुमती देणार नाही.

परंतु, मतदान बंद होण्याच्या वेळेस जितके मतदार मतदान केंद्रात असतील त्या सर्वांना आपले मत नोंदविण्याची अनुमती देण्यात येईल.

(२) मतदान बंद होण्याच्यावेळी एखादा मतदार मतदान केंद्रात होता किंवा कसे, या विषयी कोणताही प्रश्न निर्माण झाल्यास त्याबाबतचा निर्णय मतदान केंद्राध्यक्ष घेईल व त्याचा निर्णय अंतिम असेल.

२२. **नोंदविलेल्या मतांचा हिशेब.**—(१) मतदान केंद्राध्यक्ष नमुना व्हीएम-३ मध्ये मतदान बंद झाल्यानंतर नोंदविल्या गेलेल्या मतांचा हिशेब तयार करील आणि " नोंदविलेल्या मतांचा हिशेब " असे लिहिलेल्या वेगळ्या पाकिटात तो ठेवील.

(२) मतदान केंद्राध्यक्ष प्रत्येक मतदान प्रतिनिधीस व्हीएम-३ या नमुन्यातील मतदान बंद झाल्यानंतर नोंदविल्या गेलेल्या मतांच्या हिशेबाच्या नमुन्याची स्वतः साक्षांकित केलेली सत्यप्रत देईल आणि ती दिल्याची पोहोच संबंधित मतदान प्रतिनिधींकडून घेईल.

२३. **मतदान बंद झाल्यानंतर मतदान यंत्र मोहोरबंद (Seal) करणे.**—(१) मतदान बंद झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर मतदान केंद्राध्यक्ष कंट्रोल युनिट बंद करील व ते बॅलटिंग युनिट अथवा युनिट्सपासून वेगळे करील, जेणेकरून बॅलटिंग युनिट अथवा युनिट्समध्ये आणखी कोणतीही मते नोंदविली जाणार नाहीत.

(२) राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनांनुसार कंट्रोल युनिट आणि बॅलटिंग युनिट अथवा युनिट्स त्यानंतर मोहोरबंद केली जातील आणि सुरक्षित ठेवली जातील, तसेच ती मोहोरबंद करण्यासाठी अशा प्रकारे सील चिकटविण्यात येतील, जेणेकरून सील तोडल्याशिवाय कोणतेही युनिट उघडता येणार नाही.

(३) मतदान केंद्रात उपस्थित असलेले जे मतदान प्रतिनिधी अशा सीलवर सही करण्यास इच्छुक असतील त्यांना सीलवर सही करण्याची अनुमती देण्यात येईल.

२४. **इतर पाकिटे मोहोरबंद करणे.**—(१) मतदान केंद्राध्यक्ष वेगवेगळ्या प्रकाराच्या पाकिटात खालील बाबी ठेवील :—

(अ) चिन्हांकित मतदार यादी;

(ब) नमुना व्हीएम-१ या नमुन्यातील मतदार नोंदवही ;

(क) नमुना व्हीएम-२ मधील प्रदत्त मते व त्यांची यादी ठेवण्यात आलेले पाकीट ;

(ड) विहित नमुन्यात आव्हानित मतांची यादी; आणि

(ई) राज्य निवडणूक आयोगाने सूचना दिल्यानुसार सीलबंद करावयाचे अन्य कोणतेही कागदपत्र ठेवलेले पाकीट.

(२) मतदान केंद्राध्यक्ष शिक्का (सील) वापरून वरील सर्व पाकिटे मोहोरबंद करण्यात येतील आणि त्यावर उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी अथवा मतदान प्रतिनिधी यांपैकी जे उपस्थित असतील व त्यावर स्वाक्षरी करू इच्छित असतील त्यांना स्वाक्षरी करण्याची अनुमती देण्यात येईल.

२५. **निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे मतदान यंत्रे पाठविणे.**—(१) मतदान केंद्राध्यक्ष त्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे त्यांनी सूचना दिलेल्या स्थळी खालील बाबी पाठवील किंवा पाठविण्याची व्यवस्था करील :—

(अ) मतदान यंत्र ;

(ब) नमुना व्हीएम-३ मधील नोंदविलेल्या मतांचा हिशेब ;

(क) या आदेशाच्या परिच्छेद २३ मध्ये नमुद केलेली मोहोरबंद पाकिटे ; आणि

(ड) मतदान केंद्रावर वापरण्यात आलेली सर्व कागदपत्रे.

(२) निवडणूक निर्णय अधिकारी मतमोजणीस सुरुवात होईपर्यंतच्या कालावधीत मतदान यंत्रे, पाकिटे व अन्य कागदपत्रे सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने त्यांच्या वाहतुकीची योग्य ती व्यवस्था करील.

२६. **मतदान स्थगित करण्याची कार्यपद्धती.**—(१) जिल्हा परिषदा निवडणूक नियम, १९६२ च्या नियम ५३ मधील व पंचायत समित्या निवडणूक नियम, १९६२ च्या नियम ४९ मधील तरतुदींच्या अनुषंगाने एखाद्या मतदान केंद्रावरील मतदान स्थगित करावे लागल्यास वरील परिच्छेद २२ ते २५ मधील तरतुदी, शक्य असेल तोवर, वरील तरतुदीनुसार मतदान बंद झाले असे समजून लागू होतील.

(२) उपरोक्त तरतुदींमध्ये शिफारस केल्यानुसार मतदान सुरू झाल्यानंतर ज्या मतदाराने मतदान स्थगित होण्यापूर्वी मतदान केले आहे त्यांना उपरोक्त नियमांच्या तरतुदीनुसार पुन्हा मतदान करता येणार नाही.

(३) जेव्हा वरीलप्रमाणे स्थगित केलेले मतदान पुन्हा सुरू होईल त्यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी प्रत्येक मतदान केंद्रावरील मतदान केंद्राध्यक्षास चिन्हांकित मतदार यादी, नमुना व्हीएम-१ या नमुन्यातील मतदार नोंदवही इत्यादी सीलबंद केलेली कागदपत्रे व नवीन मतदान यंत्र पुरवील.

(४) मतदान केंद्राध्यक्ष उपरोक्त नमूद सीलबंद पाकिटे मतदान प्रतिनिधींच्या उपस्थितीत उघडील आणि चिन्हांकित मतदार यादीचा स्थगित केलेले मतदान पुन्हा सुरू करताना मतदारांच्या नावावर खुणा करण्यासाठी वापर करील.

(५) या आदेशाचे परिच्छेद ४ ते २५ मधील तरतुदी स्थगित केलेले मतदान पुन्हा घेण्यासाठी स्थगितीपूर्वी जशा लागू होत्या तशा लागू होतील.

२७. **मतदान यंत्राची तपासणी व निरीक्षण.**—(१) ज्या मतदान केंद्रावर एकापेक्षा जास्त मतदान यंत्रे वापरण्यात आलेली आहेत अशा मतदान केंद्रावरील कंट्रोल युनिट्सची निवडणूक निर्णय अधिकारी तपासणी व निरीक्षण करील आणि अशा यंत्रावरील मतमोजणी एकत्रितरित्या करण्यात येईल.

(२) वरील उप परिच्छेद (१) मधील तरतुदीनुसार एखाद्या कंट्रोल युनिटवरील नोंदविण्यात आलेल्या मतांची मतमोजणी करण्यापूर्वी उमेदवार त्यांचे निवडणूक प्रतिनिधी अथवा मतमोजणी प्रतिनिधी यांना मतमोजणी टेबलवर मतदान यंत्राचे पेपर सील तसेच अन्य महत्त्वपूर्ण सील यांची तपासणी करून ती समाधानकारकरित्या सुरक्षित आहेत, याबाबत त्यांची खात्री करून घेता येईल.

(३) निवडणूक निर्णय अधिकारी कोणतेही मतदान यंत्र बिघडविण्यात आलेले नाही, याची खात्री करून घेईल.

(४) एखादे मतदान यंत्र बिघडविण्यात आले आहे अशी निवडणूक निर्णय अधिकारी यांची खात्री झाल्यास तो अशा बिघडविण्यात आलेल्या मतदान यंत्राच्या मतांची मतमोजणी करणार नाही, आणि जिल्हा परिषदा निवडणूक नियम, १९६२ च्या नियम ५५ मधील व पंचायत समित्या निवडणूक नियम, १९६२ च्या नियम ५१ मधील तरतुदीनुसार नव्याने घेण्याची कार्यपद्धती अनुसरील.

२८. **मतमोजणी.**—(१) कोणतेही मतदान यंत्र बिघडविण्यात आलेले नाही, याची खात्री झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी संबंधित मतदान यंत्राच्या कंट्रोल युनिटवरील " रिझल्ट-१ " हे योग्य ते बटण दाबून त्या यंत्रावर किती मते नोंदविण्यात आलेली आहेत, याची संख्या पाहील आणि त्या मतदान यंत्रावर प्रत्येक उमेदवाराच्या संदर्भात नोंदविण्यात आलेली मते त्यासाठी योजना करण्यात आलेल्या मतदान यंत्राच्या डिस्प्ले पॅनेलवर दाखवील.

(२) प्रत्येक उमेदवारास मिळालेली मते वरीलप्रमाणे मतदान यंत्राच्या कंट्रोल युनिटवरील डिस्प्ले पॅनेलवर दाखविण्यात आल्यानंतर,—

(अ) व्हीएम-४ या नमुन्यात प्रत्येक उमेदवाराच्या संदर्भात नोंदविण्यात आलेली मते वेगळ्याने नमूद करण्यात येतील ;

(ब) व्हीएम-४ या नमुन्यातील प्रपत्र पूर्णपणे लिहून झाल्यानंतर आणि त्यावर मतमोजणी पर्यवेक्षक आणि उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी अथवा मतदान प्रतिनिधी यांच्या त्यावर स्वाक्षऱ्या घेण्यात येतील ; आणि

(क) व्हीएम-४ या नमुन्यात सर्व संबंधित बाबी भरून झाल्यानंतर रिझल्ट्स शीटमधील निर्णय जाहीर करण्यात येईल.

२९. **काढता येणारी मेमरी सीलबंद करणे.**—(१) मतदान यंत्राच्या कंट्रोल युनिटमध्ये नोंदविलेली उमेदवारनिहाय मते किती आहेत, याची खात्री करून ती व्हीएम-४ या विहित नमुन्यात नमूद करण्यात आल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी कंट्रोल युनिटमधील काढता येणारी मेमरी **(Detachable Memory)** सीलबंद करील व त्यावर स्वाक्षरी करून स्वतःचा शिक्का उमटवील. तसेच उपस्थित उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी ज्यांना त्यावर सही करावयाची इच्छा असेल अथवा अंगठ्याचा ठसा उमटविण्याची इच्छा असेल त्यांना तशी परवानगी देईल. परंतु, काढता येणाऱ्या मेमरीमधील मते पुसली जाणार नाहीत याची दक्षता घेईल.

(२) निवडणूक निर्णय अधिकारी वरीलप्रमाणे सीलबंद केलेल्या काढता येणाऱ्या मेमरीला त्यासाठी विशेषतः तयार केलेल्या खोक्यामध्ये ठेवील. तसेच खोक्यावर खालील तपशील नमूद करण्यात येईल :—

(क) जिल्हा परिषद व पंचायत समितीचे नाव व मतदार संघ (गट/गण क्रमांक)

(ख) मतदान केंद्र क्रमांक अथवा नाव जेथे ती काढता येणारी मेमरी उपयोगात आणली गेली आहे ;

(ग) काढता येणाऱ्या मेमरीचा अनुक्रमांक ;

(घ) मतदानाची तारीख ; आणि

(ड) मतमोजणीची तारीख.

३०. **इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रातील काढता येणारी मेमरी व निवडणुकीशी संबंधित कागदपत्रे यांचा ताबा.**—(१) निवडणुकीमध्ये वापरण्यात आलेली इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रातील काढता येणारी मेमरी संबंधित जिल्हाधिकारी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या ताब्यात राहतील.

(२) जिल्हाधिकारी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी हे त्यांच्या ताब्यात खालील बाबी सुरक्षितपणे ठेवतील :—

(अ) चिन्हांकित मतदार यादी असलेले पाकीट.

(ब) नमुना व्हीएम-१ मध्ये ठेवलेली मतदार नोंदवही असलेले पाकीट.

(क) नमुना व्हीएम-४ या नमुन्यात प्रत्येक मतदारासमोर नोंदविण्यात आलेल्या मतांचा हिशेब ठेवलेले पाकीट.

(ड) निवडणूक संदर्भातील अन्य कागदपत्र.

३१. **इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रातील काढता येणारी मेमरी व निवडणुकीसंबंधी अन्य कागदपत्रे सादर करणे अथवा त्यांचे निरीक्षण.**—
(१) जिल्हाधिकारी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या ताब्यात असलेल्या खालील बाबी :—

(अ) चिन्हांकित मतदार यादी ठेवलेले पाकीट.

(ब) नमुना व्हीएम-१ या नमुन्यात ठेवलेल्या मतदार नोंदवही असलेले पाकीट.

या बाबी सक्षम न्यायालयाच्या आदेशाशिवाय अन्य कोणत्याही व्यक्तीस उघडता येणार नाहीत अथवा त्यांचे निरीक्षण करता येणार नाही अथवा कोणासमोर सादर करता येणार नाहीत.

(२) उपरोक्त परिच्छेद २९ मधील तरतुदीनुसार सीलबंद केलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या काढता येणाऱ्या मेमरी जिल्हाधिकारी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या ताब्यात राहील व ती शासकीय कोषागार किंवा उप कोषागारामध्ये ठेवण्यात येईल व सक्षम न्यायालयाच्या आदेशाशिवाय अन्य कोणत्याही व्यक्तीस उघडता येणार नाही, त्याचे निरीक्षण करता येणार नाही अथवा कोणासमोर सादर करता येणार नाही.

(३) राज्य निवडणूक आयोग आदेश देईपर्यंत जिल्हाधिकारी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी यांच्या ताब्यात असलेली इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राची काढता येणारी मेमरी जशीच्या तशी ठेवली जातील व ती अन्य कोणत्याही निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोगाच्या अनुमतीशिवाय वापरता येणार नाहीत. जरी सील केलेली मेमरी ज्या प्रभागाशी संबंधित असेल त्या प्रभागामध्ये कोणतीही निवडणूक याचिका दाखल न झाल्यास ही मेमरी तीन महिन्याच्या अवधीनंतर राज्य निवडणूक आयोग निदेश देईल अशा ठिकाणी परत केल्यानंतर या मेमरीमधील माहिती नष्ट करण्यात येईल.

(४) ज्या मतदार संघाच्या (प्रभागाच्या/जागेच्याबाबत) कोणतीही निवडणूक याचिका अथवा अन्य कोणत्याही न्यायालयात रिट याचिका प्रलंबित नसल्यास अन्य निवडणूक कागदपत्र ठेवलेली पाकीटे संबंधित नियमांतील तरतुदीनुसार नष्ट करता येतील.

३२. **या आदेशानुसार विहित करण्यात आलेले सर्व नमुने खालील अनुसूचीमध्ये दिल्याप्रमाणे राहतील :—**

**अनुसूची**

**नमुना व्हीएम-१**

(पहा परिच्छेद १४)

**मतदार नोंदवही**

........................................ जिल्हा परिषद/पंचायत समिती निवडणूक/पोट निवडणूक (जिल्हा ........................................)

गट/गण क्रमांक ........................................ मतदान केंद्राचा क्रमांक व नाव ........................................

| अनुक्रमांक | मतदाराचा मतदार यादीतील अनुक्रमांक | मतदाराची स्वाक्षरी अथवा अंगठ्याचा ठसा | अभिप्राय |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |
| इत्यादी | | | |

दिनांक : मतदान केंद्राध्यक्षाची सही



७८

नमुना व्हीएम-२

(पहा परिच्छेद १९)

प्रदत्त मतांची यादी

.................................... जिल्हा परिषद/पंचायत समिती निवडणूक/पोट निवडणूक (जिल्हा .................................... )

गट/गण क्रमांक .................................... मतदान केंद्राचा क्रमांक व नाव ....................................

| अनुक्रमांक | मतदाराचे नाव | मतदाराचा मतदार यादीतील अनुक्रमांक | मतदान नोंदवहीत (नमुना व्हीएम-१) मधील संबंधित मतदाराच्या जागी ज्याने मतदान केले आहे तो अनुक्रमांक | मतदाराची स्वाक्षरी अथवा अंगठ्याचा ठसा |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |
| ६ | | | | |
| ७ | | | | |
| ८ | | | | |
| ९ | | | | |
| १० | | | | |

दिनांक :

मतदान केंद्राध्यक्षाची सही

नमुना व्हीएम-३

(पहा परिच्छेद २२)

भाग एक-नोंदविलेल्या मतांचा हिशेब

........................ ........................ जिल्हा परिषद/पंचायत समिती निवडणूक/पोट निवडणूक (जिल्हा ........................ )

गट/गण क्रमांक ........................ मतदान केंद्राचा क्रमांक व नाव ........................

मतदान केंद्राचा क्रमांक व नाव ........................
कंट्रोल युनिटचा क्रमांक ........................
मतदान केंद्रावर वापरलेल्या बॅलटिंग युनिटची संख्या ........................

१. मतदान केंद्रावर नेमून दिलेल्या मतदारांची संख्या.
२. मतदार नोंदवहीत (नमुना व्हीएम-१) नोंद झालेल्या एकूण मतदारांची संख्या.
३. परिच्छेद १८ नुसार ज्या मतदारांनी मतदान न करण्याचे ठरविले त्यांची संख्या.
४. परिच्छेद १६ नुसार मतदानास अनुमती न दिलेल्या मतदारांची संख्या.
५. मतदान यंत्रामध्ये नोंदविल्या गेलेल्या एकूण मतदारांची संख्या.
६. वरील अनुक्रमांक ५ मध्ये दाखविलेल्या एकूण मतांची संख्या (अनुक्रमांक-२ वजा अनुक्रमांक-३ वजा अनुक्रमांक-४) ही आकडेवारी जुळते किंवा कसे अथवा काही फरक पडतो किंवा कसे.
७. परिच्छेद १९ नुसार प्रदत्त मतपत्रिका दिलेल्या मतदारांची संख्या.
८. प्रदत्त मतपत्रिकांची संख्या.

| | अनुक्रमांक पासून | अनुक्रमांक पर्यंत |
|---|---|---|
| (अ) उपयोगासाठी मिळालेल्या | ........................ | ........................ |
| (ब) मतदारांना दिलेल्या | ........................ | ........................ |
| (क) उपयोगात न आणलेल्या व परत केलेल्या | ........................ | ........................ |

९. कागदी मोहोरांचा (पेपर सील) हिशेब—

अनुक्रमांक

पासून पर्यंत

मतदान प्रतिनिधींच्या स्वाक्षऱ्या

(१) ........................

१. पुरविल्या गेलेल्या कागदी मोहोरांचे अनुक्रमांक पासून ........................ पर्यंत ........................ (२) ........................

(३) ........................

२. एकूण पुरविलेल्या कागदी मोहोरांची संख्या (४) ........................

३. उपयोगात आणलेल्या कागदी मोहोरांची संख्या (५) ........................

४. न वापरलेल्या कागदी मोहोरांचा क्रमांक जे निर्वाचन अधिकाऱ्यास परत केले. (क्रमांक २ वजा ३)

५. खराब झालेल्या कागदी मोहोरांची संख्या, असल्यास

दिनांक ........................
ठिकाण ........................

मतदान केंद्राध्यक्षाची सही
मतदान केंद्र क्रमांक ........................

७०

नमुना व्हीएम-४

(पहा परिच्छेद २९)

भाग दोन-मतमोजणीचा निकाल

..................................... जिल्हा परिषद/पंचायत समिती निवडणूक/पोट निवडणूक (जिल्हा .............................. )

गट/गण क्रमांक ........ ............................. मतदान केंद्राचा क्रमांक व नाव ......................................................

मतदान केंद्राचा क्रमांक व नाव ..............................................

कंट्रोल युनिटचा क्रमांक ..............................................

काढता येणाऱ्या मेमरीचा क्रमांक ..............................................

मतदान केंद्रावर वापरलेल्या बॅलटिंग युनिटची संख्या ......................

| अनुक्रमांक (१) | उमेदवाराचे नाव (२) | नोंदविलेल्या मतांची संख्या (३) |
|---|---|---|
| १ | | |
| २ | | |
| ३ | | |
| ४ | | |
| ५ | | |
| ६ | | |
| एकूण | | |

वर नमूद केलेल्या एकूण मतांची संख्या भाग-१ मधील अनुक्रमांक-५ येथे नमूद केलेल्या एकूण मतांच्या संख्येशी जुळते किंवा कसे अथवा काही फरक येतो किंवा कसे,

ठिकाण ........ ..............

दिनांक ......................

मतमोजणी पर्यवेक्षकाची सही ........................

उमेदवाराचे/मतदान प्रतिनिधीचे ......................

मतमोजणी प्रतिनिधीचे नाव ..........................

व पूर्ण सही ..........................................

१

२

३

४

५

६

ठिकाण ......................

दिनांक ......................

निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची सही

80

नमुना व्हीएम-५

(पहा परिच्छेद १७)

अंध व अपंग मतदारांची यादी

........................ जिल्हा परिषद/पंचायत समिती निवडणूक/पोट निवडणूक (जिल्हा ........................)

गट/गण क्रमांक ........................ मतदान केंद्राचा क्रमांक व नाव ........................

| मतदाराचा अनुक्रमांक व मतदान केंद्र क्रमांक | मतदाराचे पूर्ण नाव | साथीदाराचे पूर्ण नाव | साथीदाराचा पत्ता | साथीदाराची स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | | | |

दिनांक ........................

मतदान केंद्राध्यक्षाची सही

नन्द लाल,
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र.

जोडपत्र-एक-अ

RNI No. MAHBIL/2009/31748

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

वर्ष २, अंक १८(२)] शनिवार, जून १९, २०१०/ज्येष्ठ २९, शके १९३२ [पृष्ठे १, किंमत : रुपये २०.००

**असाधारण क्रमांक ७७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

### राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२, दिनांक १० जून २०१०

**जिल्हा परिषद व पंचायत समिती क्षेत्रात इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करणेबाबतचे सुधारणा आदेश, २०१०**

**भारताचे संविधान.**

क्रमांक. रानिआ/जिपपंस-२०१०/प्र.क्र. ३/का ७.—ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के आणि २४३ झेडए मधील तरतुदीनुसार पंचायती व नगरपालिका यांच्या सर्व निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन आणि नियंत्रण करण्याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने क्रमांक रानिआ. २००५/प्र.क्र. २४/का.७, दिनांक ३ मे २००५ च्या आदेशान्वये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर करून जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांमध्ये मतदान करण्यासंदर्भातील कार्यपद्धती ठरवून देणारे आदेश निर्गमित केले आहेत ;

आणि ज्याअर्थी, सदर आदेश व मतदान केंद्राध्यक्षांची नियम पुस्तिका यामध्ये असलेली विसंगती दूर करण्याच्या दृष्टीने आदेशामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के अन्वये तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ मधील कलम ९-अ अन्वये प्राप्त झालेल्या सर्व अधिकारांचा वापर करून राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक रानिआ. २००५/प्र.क्र. २४/का.७, दिनांक ३ मे २००५ च्या आदेशान्वये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :—

१. परिच्छेद क्रमांक १४ (२) वगळण्यात येत आहे.

२. परिच्छेद क्रमांक १७ मधील सुरुवातीच्या परिच्छेदाऐवजी,-

**१७ अंध अथवा अपंग मतदारांनी मत नोंदविणे.**— (१) " एखादा मतदार त्याच्या अंधत्वामुळे अथवा अन्य शारीरिक अपंगत्वामुळे त्याला सहाय्य मिळाल्याशिवाय बॅलेटिंग युनिटवरील चिन्हे ओळखून योग्य ते बटन दाबून मत नोंदविण्यास असमर्थ आहे, अशी मतदान केंद्राध्यक्षांची खात्री झाल्यास मतदारास १८ वर्षांपेक्षा कमी वय नसलेला सहायक त्याच्यासोबत मतदान कक्षात घेऊन जाण्यास व त्याच्या इच्छेनुसार मतदान करण्यास अनुमती देईल. "

असा मजकूर समाविष्ट करण्यात येत आहे.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

श. मा. भुते,
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.



ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI

८२

## जोडपत्र - दोन

### मतदान केंद्राध्यक्षांनी वेगवेगळया पातळीवर करावयाच्या कामाचा आराखडा

i) नेमणुकीच्यावेळी
ii) मतदान अधिकारी -कर्मचारी प्रशिक्षणावेळी
iii) मतदानाच्या आदल्या दिवशी
iv) मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर पोहोचल्यावर
v) मतदान चालू असताना
vi) मतदान संपल्यानंतर

I) **<u>नेमणुकीच्यावेळी</u>**

१.१ तुम्हाला नियुक्ती पत्र मिळाल्यानंतर कृपया ते काळजीपूर्वक तपासा आणि लक्षात ठेवा :

१.२ तुमच्या नियुक्ती पत्रात नमूद तारीख व वेळेवर तुम्ही सर्व प्रशिक्षण वर्गाला उपस्थित रहा ज्यामुळे तुम्हाला मतदान यंत्राशी अधिकाधिक जवळीक होईल. केवळ तुमच्या स्मृतीवर आणि मागच्या अनुभवावर विसंबून राहू नका कारण निवडणूकविषयक सूचना सातत्याने वेळोवेळी बदलत असतात, सर्व संघाने एकत्र प्रशिक्षण घेण्याचा प्रयत्न करा जेणेकरून कामाची विभागणी करणे सोपे जाईल.

१.३ त्याच आदेशात तुमच्या संघातील मतदान अधिकाऱ्यांची नावे मिळतील. त्यांच्याशी संपर्क साधून त्यांचा मोबाईल नंबर, घरचे आणि कार्यालयाचे पत्ते तुमच्याकडे ठेवा आणि तुमचा मोबाईल नंबर, घरचा आणि कार्यालयाचा पत्ता त्यांना द्या. तुमच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या संपर्कात रहा त्यांचे मार्गदर्शन घ्या.

१.४ एखादा मतदान अधिकारी कर्मचारी / अधिकारी गैरहजर असेल तर त्याच्या जागी बदली कर्मचारी तात्काळ मागून घ्या.

१.५ खाली नमूद केलेल्या पुस्तिका आणि पत्रिका काळजीपूर्वक वाचा.

अ) मतदान केंद्राध्यक्षांसाठीची माहिती पुस्तिका
ब) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राची हाताळणी
क) निर्वाचन अधिकाऱ्याचे, मतदान केंद्राध्यक्षास महत्वाच्या सूचना करुन लिहिलेले पत्र.

१.५ तुमच्या कार्यक्षेत्राचा तपशील अचूक घ्या :

अ) तुमच्या मतदान केंद्राचा क्रमांक आणि नाव,
ब) ज्यात ते मतदान केंद्र आहे त्या जिल्हा परिषद निवडणूक विभाग / पंचायत समिती निर्वाचक गणाचे नाव व क्रमांक
क) तुमच्या मतदान केंद्राची अचूक जागा, जाण्या-येण्याचा मार्ग

१.६ **जोडपत्र-चार** यात दिलेल्या निवडणूक साहित्याच्या कोष्टकाशी म्हणजेच सांविधनिक-असांविधनिक लिफाफे व इतर साहित्य याच्याशी संपूर्णपणे सुपरिचित राहा.

१.७ नियंत्रण युनिट आणि मतदान युनिट कसे जोडतात, कसे वेगळे करतात आणि नियंत्रण युनिट बंद करुन सील कसे करतात याची संपूर्ण पध्दत काळजीपूर्वक अभ्यासायला हवी.

१.८ इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबातचे आदेशाचे परिशिष्ट-१ मध्ये दिले आहेत ते आणि निवडणूक नियम काळजीपूर्वक वाचा. जर तुम्हाला एखादी शंका असेल तर निर्वाचन अधिका-याशी संपर्क साधून तुमची शंका दूर करून घ्या. मनात कोणत्याही प्रकारचा गोंधळ ठेवू नका.

१.९ टपाली मतपत्रिका/ निवडणूक प्रमाणपत्र यासाठी आवश्यक नमुन्यात व वेळेत निर्वाचन अधिकाऱ्याकडे अर्ज करा

१.१० टपाली मतपत्रिकेद्वारे योग्यरित्या मतदान करा.

**२) मतदान अधिकारी -कर्मचारी प्रशिक्षण**

२.१ मतदान केंद्राध्यक्ष हा त्या मतदान केंद्रासाठीच्या टिमचा प्रमुख असणार आहे तरी आपल्या टिममधील प्रत्येकजण प्रशिक्षण योग्यरित्या घेईल याची दक्षता तो घेईल.

२.२ निर्वाचन अधिकाऱ्याकडून प्राप्त मार्गदर्शक सुचनांच्या पुस्तीकेचे तो व्यवस्थीत वाचन करेल व टिममधील सर्वांना विशेष तरतुदी , प्रत्येकाच्या जबाबदाऱ्या अवगत करून देईल.

२.३ मतदान यंत्राच्या Hands on Training वर विशेष भर दिला जाईल तसेच प्रशिक्षणा दरम्यान देण्यात येणाऱ्या सूचनांचा अभ्यास करून पालन केले जाईल.

**३) मतदानाच्या दिवसाचा पूर्वदिन**

३.१ मतदान दिनाच्या पूर्वदिनी तुम्हाला मतदान केंद्रावर आवश्यक मतदान साहित्याचा स्वीकार करण्यास सांगण्यात येईल. सदर सामानाची कृपया त्यावेळी खात्री करा.

अ) तुमच्या मतदान केंद्रास लागणारे कंट्रोल युनिट आणि बॅलट युनिट हे तुमच्याच मतदान केंद्रासाठी तयार करण्यात आली आहे याची खात्री करा. ॲड्रेस टॅगवरील नंबर चेक करा.

ब) कंट्रोल युनिटचा "कॅंडीडेट सेटिंग विभाग" व्यवस्थित सील केलेला असून, त्याला ॲड्रेस टॅग स्पष्टपणे लावलेला आहे.

क) कंट्रोल युनिटमधील बॅटरी पूर्ण चालू स्थितीत आहे. बॅटरी चेक केल्यानंतर पुन्हा कंट्रोल युनिट बंद करायला विसरू नका

ड) मतदान युनिट व्यवस्थित सील केले असून, त्याच्यावर आणि खाली उजव्या बाजूने ऍ़ड्रेस टॅग स्पष्टपणे लावलेला आहे.

ई) प्रत्येक मतदान युनिटवर योग्य ती मतपत्रिका बसवलेली आहे आणि ती स्क्रीनखाली व्यवस्थित मांडलेली आहे.

फ) प्रत्येक मतदान युनिटमध्ये स्लाईड स्वीच योग्य त्या अवस्थेत आहे.

ग) जोडपत्र-४ यात नमूद केलेल्या मतदान साहित्यातील सगळे घटक आवश्यक त्या प्रमाणात आहेत.

ह) पेपर सीलवरील अनुक्रमांक तपासणी करा.

य) मतदार यादीची तपासणी करुन याची खात्री करा -

i) पुरवणीच्या प्रती दिलेल्या आहेत,

ii) मतदार यादीचे भाग क्रमांक आणि पुरवण्या योग्य तऱ्हेने दिलेल्या आहेत.

iii) मतदार यादीच्या चिन्हांकीत प्रतीच्या पानांचे अनुक्रमांक अनुक्रमाने दिलेले आहेत.

iv) मतदारांचे छापील क्रमांक दुरूस्त करुन त्या जागी नवीन क्रमांक हाती घातलेले नाहीत.

v) नावे वगळणे आणि कारकुनी सुधारणा अथवा इतर चुका पुरवणीनुसार अंतर्भूत करुन घेतलेले आहेत.

ज) तुम्हाला देण्यात आलेल्या निवडणूक उमेदवारांची यादी तपासा आणि त्या यादीत दिलेली नावे आणि निशाणी मतदान युनिटवरील मतपत्रिकेनुसार आहे आणि त्याच अनुक्रमांकानुसार असायला हवी.

ख) तुम्हाला देण्यात आलेले मार्करपेन्स सिल्ड आहेत

ल) बाणाकृती क्रॉस-खूण असलेला रबर स्टॅम्प आणि पितळेचा सील तपासा. रबर स्टॅम्पच्या दोन्ही बाजूने बाणाकृती क्रॉस खुणेला सील लावलेले आहे आणि स्टॅम्प पॅड सुकलेले नाही याची खात्री करा. जर तुमचे मतदान केंद्र तात्पुरत्या स्वरूपाचे असेल तर वेगवेगळया आकाराचे लोखंडी बॉक्स निवडणूक कागदपत्रे ठेवण्यासाठी घ्या.

म) मतदान केंद्रावर जाण्या-येण्याच्या मार्गाबाबत काही शंका असल्यास शंकानिरसन करून घ्या आणि मतदान केंद्रावर जाण्यासाठी लागणारा वेळ, वाहतूक याविषयी खात्री करा.

न) तुमच्या निवडणूक विभाग, निर्वाचक गणासाठी च्या प्रदत्त मतपत्रिका तुम्हास मिळाल्या याची खात्री करा.

प) उमेदवाराच्या तसेच त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या सहीचा नमुना प्राप्त झाल्याची खात्री करावी

३.२ (अ) तुमच्या मतदान केंद्रावर, मतदान दिनाच्या पूर्वदिनी निदान संध्याकाळी ४ वाजेपर्यंत पोहचून पुढील बाबींची खात्री करुन घ्या.

i) मतदारांना मतदान केंद्राबाहेर उभे राहण्यासाठी पुरेशी जागा आहे आणि महिला-पुरुषांना वेगळी रांग करता येऊ शकते वा कसे हे पहा.

**ii)** मतदारांना मतदान केंद्रात येण्या-जाण्यासाठी सहजता असली पाहिजे. मतदान केंद्रात तसेच बाहेर गर्दी-गोंधळ असू नये. विशेषत: ज्या इमारतीत एकापेक्षा अधिक मतदान केंद्र आहेत तिथे अधिक काळजी घ्यावी.

**iii)** मतदारांना मतदान केंद्रात येण्यासाठी आणि बाहेर जाण्यासाठी वेगवेगळी जागा ठेवा. जर दरवाजा एकच असेल तर शक्य झाल्यास मध्ये दोरी /बांबू बांधून येण्या-जाण्याचा मार्ग निश्चित करा.

iv) मतदारांना मतदान करण्यासाठी मतदान कक्षात आवश्यक उजेड आहे.

v) मतदान केंद्र क्रमांक आणि तपशील याची नोटीस ठळकपणे दिसेल अशी लावलेली आहे.

vi) निवडणूक परिसर आणि उमेदवारांची यादी ठळकपणे दिसेल अशी लावलेली आहे.

(ब) मतदान केंदावर महिला मतदार जास्त असल्यास, एक महिला सहकारी देण्यात येईल. महिला मतदारांना ओळखण्यासाठी तुम्ही तिचे सहकार्य घेवू शकता. तुमच्या मतदान केंद्रात बऱ्याच बुरखाधारी महिला येणार असतील तर त्यांची ओळख पटविण्यासाठी आणि त्यांच्या तर्जनीवर मतदान शाई लावण्यासाठी महिला मतदान अधिकाऱ्याची आवश्यकता असेल तरी टिममध्ये महिला अधिकारी असेल याची खात्री करा. तसेच या बुरखाधारी महिलांची ओळख पटविताना त्यांच्या नैतीक मुल्यांचा मान राखणेकामी अतिशय सोप्या पद्धतीने आडोसा निर्माण करावा.

(क) तुम्ही, तुमचे मतदान अधिकारी, उमेदवाराचे मतदान प्रतिनिधी कुठे बसतील आणि मतदान यंत्राचे नियंत्रण युनिट कुठे ठेवाल हे नक्की करा.

(ड) मतदान केंद्रावर एखाद्या राजकीय पक्षाच्या नेत्याचा फोटो लावलेला असल्यास काढून टाका अथवा तो संपूर्ण झाका.

**३.३ प्रत्येक मतदान केंद्राबाहेर ठळकपणे पुढील सूचना लावा.**

i) मतदानाचे क्षेत्र किंवा मतदान केंद्राशी निगडीत मतदार यादीतील कोणत्या अनुक्रमांकापासून कोणत्या अनुक्रमांकापर्यंत मतदारांना मतदान करता येईल याबद्दलच्या सूचना.

ii) निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची नावे दर्शविणारी डमी मतपत्रिका

३.४ मतदान साहित्य घेऊन आपण आदल्या दिवशी मतदान केंद्रात पोहचणार आहात. मतदान यंत्र व इतर साहित्य याची संपुर्ण जबाबदारी हि मतदान केंद्राध्यक्ष म्हणून आपली आहे. कोणत्याही परिस्थितीत हे साहित्य उघडयावर राहणार नाही तसेच पोलिसांच्या ताब्यात देवुन आपल्याला मतदान केंद्र सोडता येणार नाही, सबब आपण वा आपले मतदान अधिकारी हे त्या सामानाची जबाबदारी घेतील.

**४) मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर पोहोचल्यावर :- तुमच्या मतदान केंद्राचा २०० मिटरचा परिसर निश्चीत करा. तेथे आवश्यक सुरक्षितता राखली जाईल याची काळजी घ्या. कोणताही अनधिकृत बुथ (मतदारांना चिठ्ठी वाटप करणेकामी) असेल तर काढून टाका. कोणीही सशस्त्र येणार नाही याची काळजी घ्या.**

४.१.१ तुम्ही आणि तुमच्या मतदान गटातील इतर सदस्य मतदानास आरंभ करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेअगोदर ७५ मिनिटे आधी मतदान केंद्रावर पोहोचतील याची खात्री करा.आल्याबरोबर मतदान यंत्र आणि मतदान साहित्याची छाननी करा.

४.१.२ मतदान प्रतिनिधीची नियुक्ती पत्रे तपासा आणि इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबातचे आदेशाच्या तरतुदींची माहिती द्या. त्यांना बसण्यास आसन आणि आत-बाहेर जाण्यासाठी प्रवेशिका द्या. प्रकरण-१४ मध्ये सांगितलेले घोषणापत्र मोठयाने वाचा.

४.१.३ तुमच्या केंद्रावर अनपेक्षितपणे तुमचा सहकारी गैरहजर राहिल्यास तुम्ही स्थानिक व्यक्तिची मतदान अधिकारी म्हणून नियुक्ती करू शकता, परंतु तसा अहवाल तात्काळ तुम्हाला निर्वाचन अधिकारी व जिल्हाधिकाऱ्यांना करावा लागेल. अशी नेमणूक करताना, अशी व्यक्ती उमेदवाराचा सक्रिय पाठीराखा अथवा उमेदवाराचा सक्रिय विरोधक व्यक्तीची नाही याची काळजी घ्या.

४.१.४ मतदानास आरंभ होण्यापूर्वी एक तास आधी मतदान यंत्र तयार करण्यास आरंभ करा.

४.१.५ प्रथम **अभिरुप मतदान** घ्या, तदनंतर मतदान यंत्र **"क्लिअर"** करा. मतदान यंत्रात एकही मत नसल्याची स्वत:ची व मतदान प्रतिनिधींची खात्री करून द्या. कंट्रोल युनीट **बंद** करून सिलींगला सुरूवात करा,

४.१.६ पेपरसील नियंत्रण युनिटमधील निकाल विभागात बसवा आणि बंद करुन सील लावा. स्पेशल टॅग, पट्टी सिल व्यवस्थीत लावून **मतदान यंत्र सुरू करा**

४.१.७ मतदान अधिकाऱ्यांना व मतदान प्रतिनिधींना आपल्या जागांवर बसवा. मतदान प्रतिनिधींना बसण्याची अशी व्यवस्था केलेली असावी की त्यांना मतदान केंद्रात शिरणा-या प्रत्येक मतदाराचा चेहरा स्पष्ट दिसावा. म्हणजे आवश्यकता असेल तर मतदाराच्या ओळखीबद्दल आव्हान देणे त्यांना शक्य होईल. तसेच मतदान यंत्राचा नियंत्रण विभाग ज्या मतदान अधिकाऱ्याकडे असतो त्याच्या पासुन मतदान केंद्राध्यक्षाच्या सर्व हालचाली दिसतील. मतदाराने मतदान विभागात शिरणे व मतदान करुन बाहेर पडेपर्यंतच्या सर्व हालचालींचा मतदान प्रतिनिधींना अंदाज घेता येईल. परंतु मतदान अधिकाऱ्यांना व मतदान प्रतिनिधींना, मतदार कुणाला मतदान करतो आहे म्हणजेच बॅलेट युनीट दिसणार नाही अशी व्यवस्था हवी.

४.१.८ कंट्रोल युनीट व बॅलेट युनीट यांना जोडणारी केबल हि साधारणपणे ५ मीटर इतकी लांब असते, त्यामुळे ती मतदान विभागाच्या पाठच्या बाजुने असणाऱ्या खाचेतून बॅलेट युनीटला जोडताना अनावश्यकरित्या ताणली जाणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच सदरची केबल कापडामध्ये वा इतर रितीने लपवून ठेवू नये, ती सहज दिसू दयावी जेणेकरून मतदान कक्षात जाताना केबलला मतदार अडखळणार नाही.

४.**१**.९ मतदान विभाग/कक्ष अशा ठिकाणी असेल जिथे पुरेसा प्रकाश असेल. परंतु तो खिडकी वा दरवाज्याजवळ नसेल, जिथून कोणलाही मतदान यंत्रावर नोंदविले जाणारे मत पाहता येईल व गोपनियतेचा भंग होईल. जर खिडकी मतदान केंद्रात असेल तर ती योग्यरित्या बंद केलेली असावी.

४.२ मतदान केंद्राचा २०० मीटर परिघ हा मतदान केंद्राध्यक्षाच्या ताब्यात राहील. मतदान केंद्र खाजगी इमारतीत असल्यास सदर मतदान केंद्राच्या २०० मिटर परिघात खाजगी इमारतीचा मालक व त्याचे सुरक्षा रक्षक प्रवेश करणार नाही. तसेच सदर क्षेत्रात कोणत्याही पक्षाचे/प्रतिनिधीचे कार्यालय राहणार नाही.

**४.३** मतदान केंद्राच्या १०० मीटर परिघात मतदान केंद्रावर कर्मचारीवृंद/पोलीसांव्यतिरिक्त कोणीही मोबाईल/कॉडलेस फोन/वायरलेस वापरणार नाही.

## ५) मतदानाच्या वेळी

५.१ निश्चित केलेल्या वेळी मतदान सुरु होईल याची खात्री करा. जरी सर्व औपचारिकपणा पूर्ण झालेला नसला तरी निश्चित केलेल्या वेळी काही मतदारांना मतदान केंद्रांत घ्या.

५.२ मतदारांव्यतिरीक्त आयोगाने परवांगी दिलेल्या व्यक्तीच मतदान केंद्राला भेंट देतील व मतदान केंद्राला भेट देणाऱ्या अधिकारी/उमेदवार /वा निवडणूक प्रतिनिधींचीनोंद Visit Sheet मध्ये घ्या.

५.३ मतदारांची ओळख पटविणे, त्याची नोंद मतदार नोंदवहित घेणे, मतदारांच्या बोटावर शाई लावणे, लावलेली शाई पुसली जाणार नाही याची दक्षता घेणे, कोणताही मतदार मतदान न करता जाण्णर नाही, मतदान यंत्र खराब करणार नाही, गोपनियतेचा भंग होणार नाही यासर्वाची काळजी तुम्ही व तुमची टिम घेईल.

५.४ कोणतीही व्यक्ती मतदान केंद्रात मोबाईल, कॉडलेस फोन वै. आणणार नाहीत याची काळजी घ्यावी, तसेच मतदान प्रतिनिधी देखील मतदार यादी घेवून बाहेर जाणार नाहीत याची काळजी घ्यावी.

५.४ मतदान सुरु असताना काही नेहमीपेक्षा वेगळया गुंतागुंतीच्या घटना घडण्याची शक्यता असते. अशाप्रसंगी तुम्ही तुमच्या मतदान अधिकाऱ्यांना काम चालू ठेवण्यास सांगून तुम्ही अशा घटना हाताळावयास हव्या त्या म्हणजे :

अ) मतदारांना आव्हान (प्रकरण-१६)
ब) अल्पवयीन मतदाराकडून मतदान (प्रकरण १६)
क) अंध अथवा अपंग मतदारांकडून मतदान (प्रकरण-२०)
ड) मतदान करु न इच्छिणारे मतदार (प्रकरण-२१)
इ) निवडणूक कार्य प्रमाणपत्राच्या आधारे मतदान (प्रकरण २२)
फ) प्रदत्त (दुबार) मते (प्रकरण २३)
ग) मतदान गुप्ततेचा भंग (प्रकरण १९)
ह) मतदान केंद्रात बेशिस्त वागणे आणि बेशिस्त वागणा-यांना हाकलणे (प्रकरण-२४)
य) दंगल अथवा इतर कारणामुळे मतदान तहकूब करणे (प्रकरण- २३)

५.५ तुमच्या डायरीवर मतदानाविषयी कोणत्याही महत्वाच्या प्रसंगाची नोंद वेळोवेळी करणे तसेच मतदानाची आकडेवारी दर दोन तासानंतर नोंद घेणे.

५.६ निश्चित केलेल्या वेळी मतदान उशीरा सुरु झालेले असले तरी बंद करण्याच्या निश्चित वेळीच ते बंद करा. त्यावेळी जे कोणी मतदार रांगेत असतील त्यांना तुमची संपूर्ण स्वाक्षरी केलेली स्लीप द्या. निश्चित केलेल्या वेळेनंतर आणखी कोणी रांगेत सामील होणार नाही याची खात्री करा.

**V) मतदान पूर्ण झाल्यावर**

५.१ प्रकरण २५ आणि २७ यात स्पष्ट केल्यानुसार मतदान यंत्र बंद करुन सील करा.

५.२ ज्यांनी मतदान केलेले आहे त्या महिला मतदारांच्या संख्येची खात्री करा.

५.३ नमुना व्हीएम-३ पूर्ण करा (नोंद झालेल्या मतांचा हिशेब आणि पेपरसील हिशेब) मतदान बंद होण्याच्यावेळी हजर असलेल्या प्रत्येक मतदान प्रतिनिधीस नमुना व्हीएम-३ ची प्रमाणित प्रत, प्रकरण-२५ मध्ये दिलेल्या घोषणापत्र नमुन्यावर पावती घेऊन त्यांना द्या नंतर इतर बाबतीत घोषणापत्र पूर्ण करा.

५.४ तुमची डायरी पूर्ण करा.

५.५ प्रकरण २८-मध्ये सुचविल्याप्रमाणे सगळी निवडणूक कागदपत्रे सील करा.

५.६ पाच वैधानिक पाकीटांचे पहिले पाकीट तयार करा.

५.७ दहा पाकीटांचे दुसरे पाकीट तयार करा.

५.८ सात बाबींचे तिसरे पाकीट तयार करा.

५.९ इतर सर्व बाबींचे चौथे पाकीट तयार करा.

५.१० संग्रह केंद्रावर सीलबंद मतदान यंत्र आणि निवडणूक कागदपत्रांची सीलबंद पाकीटे जमा करण्यासाठी जाण्याच्या परतीच्या कार्यक्रमाची ओळख करुन घ्या. मतदान यंत्र आणि इतर पाकीटे संग्रह केंद्रावर व्यवस्थित पोचवून त्याची पावती घेण्याची तुमची व्यक्तिगत जबाबदारी आहे. लक्षात ठेवा तुम्हाला आठ वेगवेगळया बाबी तिथे द्यायला हव्यात.

१. मतदान यंत्र
२. नोंद झालेल्या मतांचा हिशेब आणि पेपर सील हिशेब असलेले पाकीट
३. मतदान केंद्राध्यक्षांचे घोषणापत्र असलेले पाकीट
४. मतदान केंद्राध्यक्षांची डायरी असलेले पाकीट + Visit Sheet
५. पाच पाकीटे असलेले ज्यावर **"वैधानिक पाकीटे"** असे लिहिलेले आहे ते पहिले पाकीट
६. दहा पाकीटे असलेले ज्यावर **"वैधानिक नसलेली पार्कीटे"** असे लिहिलेले आहे ते दुसरे पाकीट
७. निवडणूक साहित्याच्या सात बाबी असलेले तिसरे पाकीट
८. इतर सर्व बाबी (जर असल्यास) असलेले चौथे पाकीट

# जोडपत्र - तीन
## मतदान केंद्राध्यक्षांसाठी चेकमेमो

| अ.क्र. | करण्याची कारवाई | शेरा |
|---|---|---|
| १ | निर्वाचन अधिका-याकडून सर्व संबंधित सूचना घेतल्या? | घेऊन संग्रही ठेवले |
| २ | आपल्या संघातील मतदान अधिकाऱ्यांशी /कर्मचाऱ्यांशी व झोनल ऑफिसरशी ओळख करून घेवुन, त्यांचे मोबाईल नंबर व पत्यांची देवाण-घेवाण करण्यात आली. | केले आहेत? |
| ३ | निवडणूक साहित्यांचा संग्रह- सर्व निवडणूक साहित्य आपल्याच मतदान केंद्राचे व आवश्यक त्या संख्येने घेतले आहे याची खात्री | खात्री केली ? |
| ४ | मतदान यंत्राचे नियंत्रण युनिट, मतदान यादीची चिन्हांकित प्रत, बाणाकृती क्रॉस खूण असलेला रबर स्टॅम्प, पेपरसील,मतदार नोंदवही, मतदार चिठ्ठ्या तपासणे | तपासले ? |
| ५ | मतदान केंद्रावर मतदारांसाठी आत-बाहेर येण्यासाठी वेगळी दारे | खात्री केली ? |
| ६ | मतदान प्रवेश आणि मतदारांची संख्या आणि उमेदवारांची यादी यांची नोटीस लावणे | लावली ? |
| ७ | नियंत्रण युनिट आणि मतदान युनिट एकमेकांना जोडणे आणि बॅटरी सुरु (On) करणे | केली ? |
| ८ | अभिरुप मतदान घेणे (Mock Poll) | घेतले ? |
| ९ | नियंत्रण युनिटमधील निकाल विभागात गुलाबी पेपर सील बसवणे | बसविले ? |
| १० | नियंत्रण युनिटमधील निकाल विभाग सील करणे | केले ? |
| ११ | मतदानाच्या आरंभास घोषणापत्र करणे | केले ? |
| १२ | मतदान प्रतिनिधींना व अधिकाऱ्यांना मतदानाच्या गोपनियतेबाबत दक्ष करणे | केले ? |
| १३ | मतदान प्रतिनिधींना, मतदान युनिट आणि नियंत्रण युनिट आणि पेपरसीले यांचे अनुक्रमांक नोंद करण्यास मान्यता देणे | दिली ? |
| १४ | डाव्या तर्जनीस मतदान शाईची खूण करणे आणि त्यांची निशाणी/अंगठा मतदार नोंदवहीवर (नमुना व्हीएम-१)घेणे | घेतला ? |
| १५ | मतदान केंद्राध्यक्षांची डायरी मध्ये योग्य त्या नोंदी घेणे | प्रसंग जसे घडले त्याप्रमाणे वेळोवेळी नोंद केले? |
| १६ | निश्चित केलेल्या वेळी मतदान बंद करणे | केले? |
| १७ | मतदान केंद्रांला भेट देणाऱ्या व्यक्तींची नोंद Visit Sheet मध्ये वेळोवेळी घेण्यात आली. | वेळोवेळी घेण्यात आली? |
| १८ | नमुना व्हीएम-३ भाग-१ वर नोंदणी झालेल्या मतांचा हिशोब तयार केला व सर्व मतदान प्रतिनिधींना देणे | दिल्या |
| १९ | मतदान बंद करण्यावेळी घोषणापत्र तयार करणे | केले? |
| २० | मतदान यंत्र आणि निवडणूक कागदपत्रे सील करणे | सुचनेनुसार केले ? |

## जोडपत्र - तीन-अ

## नमुना ६

(नियम २५ व २४ पहा)

## मतदान प्रतिनिधींची नेमणूक

-------------- जिल्हा परिषदेच्या ------------------- निवडणूक विभागातील निवडणूक

निर्वाचन अधिकारी, निवडणूक विभाग ----------------------------
मतदान केंद्राध्यक्ष, मतदान केंद्र----------------
यांस,

मी, ------------------------- प्रस्तुत निवडणूक लढविणारा उमेदवार ---------------------- यांचा निवडणूक प्रतिनिधी असून याद्वारे, अशी नोटीस देतो की, ---------------- मतदान केंद्रात, मतदान केंद्रातील मंडप क्र.---------------येथे मतदान अभिकर्ता म्हणून हजर राहण्यासाठी श्री. ----------------- --------------------- यांची नेमणूक केली आहे.

दिनांक                                        उमेदवाराची / निवडणूक प्रतिनिधीची सही

मी, असा मतदान प्रतिनिधी म्हणून काम करण्याचे मान्य करतो.

दिनांक :                                        मतदान प्रतिनिधीची सही

**निर्वाचन अधिकारी/मतदान केंद्राध्यक्ष यांजसमोर सही करुन मतदान प्रतिनिधीने द्यावयाचे प्रतिज्ञापन**

मी, याद्वारे, जाहीर करतो की, ------- निवडणूक विभागाच्या प्रस्तुत निवडणुकीत मी सदरहू अधिनियम किंवा तदन्वये केलेले नियम याद्वारे जी गोष्ट निषिध्द ठरविण्यात आली असेल अशी कोणतीही गोष्ट करणार नाही.

मतदान प्रतिनिधीची सही
माझ्या समक्ष सही केली.

दिनांक                                        निर्वाचन अधिकारी/मतदान केंद्राध्यक्ष

# जोडपत्र – तीन-ब

## नमुना ६

(नियम २४ पहा)

## मतदान प्रतिनिधींची नेमणूक

-------------- जिल्हा परिषदेच्या ------------------ निवडणूक विभागातील या निर्वाचक गणाच्या -----------पंचायत समितीची निवडणूक

निर्वाचन अधिकारी, ---------------------------- निर्वाचक गण
मतदान केंद्राध्यक्ष, --------------- मतदान केंद्र यांस,

मी, ------------------------ प्रस्तुत निवडणूक लढविणारा उमेदवार/ प्रस्तुत निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराचा निवडणूक प्रतिनिधी असून याद्वारे, अशी नोटीस देतो की, श्री. ---------------- यांची मतदान केंद्रात, उपस्थित राहण्यासाठी मतदान प्रतिनिधी नेमणूक केली आहे.

दिनांक उमेदवाराची / निवडणूक प्रतिनिधीची सही

मी, असा मतदान प्रतिनिधी म्हणून काम करण्याचे मान्य करतो.

दिनांक : मतदान प्रतिनिधीची सही

**मतदान प्रतिनिधीने निर्वाचन अधिकारी/मतदान केंद्राध्यक्ष यांच्यापुढे ही सही करुन द्यावयाचे प्रतिज्ञापन**

मी, याद्वारे असे प्रतिज्ञापन करतो की, ------- निर्वाचक गणाच्या------------ मतदार विभागातून होणाऱ्या प्रस्तुत निवडणुकीत मी संबंधित अधिनियम किंवा त्यान्वये केलेले नियम याद्वारे जी गोष्ट निषिध्द ठरविण्यात आली असेल अशी कोणतीही गोष्ट करणार नाही.

दिनांक: मतदान प्रतिनिधीची सही

माझ्या समक्ष सही केली.

दिनांक निर्वाचन अधिकारी/मतदान केंद्राध्यक्ष

# जोडपत्र - चार

## जेथे राज्य निवडणूक आयोगाकडील इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर होईल त्या मतदान केंद्रासाठी मतदान साहित्याची यादी

| | | |
|---|---|---|
| १. | नियंत्रण युनिट (कंट्रोल युनिट) | १ |
| २. | मतदान युनिट (बेलेट युनिट्स) | १ (उमेदवारांच्या संख्येवर अवलंबून) |
| ३. | मतदारांची नोंदवही (नमुना व्हीएम-१) | १ |
| ४. | मतदार स्लीप | मतदारांच्या संख्येवर अवलंबून |
| ५. | मतदार यादीच्या कार्यप्रती | ३ |
| ६. | मतपत्रिका (प्रदत्त मतांसाठी) | २० |
| ७. | मार्कर पेन | |
| ८. | कंट्रोल युनिटसाठी खूण चिठ्ठी (ॲड्रेस टॅग) | ५ |
| ९. | बेलेट युनिटासाठी खूण चिठ्ठी (ॲड्रेस टॅग) | ४ |
| १०. | स्पेशल टॅग | ३ |
| ११. | इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रासाठी गुलाबी कागदी मोहोर | ४ |
| १२. | पट्टी सील (स्ट्रीप सील) | ३ |
| १३. | बाणफुली चिन्ह असलेला रबरी शिक्का | १ |
| १४. | शाई असलेले पॅड (जांभळी) | १ |
| १५. | मतदान केंद्राध्यक्षांसाठी धातूची मोहोर | १ |
| १६. | आगपेटी | १ |
| १७. | मतदान केंद्राध्यक्षाची दैनंदिनी | १ |
| १८. | विभेदक चिन्ह असलेला रबरी शिक्का | १ |
| **१९.** | **नमुने-** | |
| | १) निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी | १ |
| | २) आक्षेपित मतांची यादी | २ |
| | ३) अंध व अपंग मतदारांची यादी (नमुना व्हीएम-५) | २ |
| | ४) प्रदत्त मतांची यादी (नमुना व्हीएम-२) | २ |
| | ५) नोंद झालेल्या मतांचा हिशेब (नमुना व्हीएम-३-भाग-१) | १० (किंवा उमेदवारांची संख्या अधिक ३) |
| | ६) वापरण्यात आलेल्या कागदी मोहोरांचा अभिलेख | २ |
| | ७) आक्षेपित मतांची फी जमा करण्यासाठी पावती | १ पुस्तक |
| | ८) पोलिस ठाणे अंमलदाराला पत्र | ४ |
| | ९)मतदान केंद्राध्यक्षाद्वारे करण्यात येणारी घोषणापत्रे मतदान सुरु होण्यापूर्वी, मतदान संपल्यावर, दुसरे मतदान यंत्र वापरताना, यंत्र सील करताना | २ |
| | १०) मतदारांना त्यांच्या वयाविषयी घोषणापत्र करण्यासाठी फॉर्म | २ |
| | ११) घोषणापत्र दिल्यावर मतदान करण्यासाठी दिलेल्या वयाविषयी घोषणापत्र देण्यास नकार दिलेल्यानंतर मतदा मतदारांची यादी | २ |
| | १२) अंध व विकलांग मतदाराच्या सहकाऱ्याचे घोषणापत्र | ४ |
| | १३) मतदान प्रतिनिधींसाठी पासेस | १० |
| **२०.** | **लिफाफे-** | |
| | १) लहान लिफाफयांकरीत (सांविधिक लिफाफे) (एस.ई.८) | १ |
| | २) मतदार यादीच्या चिन्हांकीत प्रतीसाठी )(एसई-८) | १ |
| | ३) मतदार यादीच्या इतर प्रतीसाठी (एसई-८) | १ |
| | ४) प्रदत्त मतदानपत्रिका व प्रदत्त मतदाराच्या यादीसाठी | १ |

| | |
|---|---|
| ५) मतदान सुरु होण्यापूर्वी व मतदान संपल्यावर मतदान केंद्राध्यक्षाद्वारे करण्यात येणाऱ्या घोषणापत्र करीता (एसई ७) | १ |
| ६) नोंद केलेल्या मतांच्या हिशेबासाठी (नमुना व्हीएम-३) (एसई ५) | २ |
| ७) आक्षेपित मतांच्या यादीसाठी (एसई-५) | १ |
| ८) न वापरलेल्या व खराब झालेल्या कागदी मोहोरांसाठी (एसई ५) | १ |
| ९) मतदान प्रतिनिधींच्या नेमणूक पत्रांसाठी (एसई-६) | १ |
| १०) अंध व विकलांग मतदारांच्या यादीसाठी(एसई५) | १ |
| ११) मतदान केंद्राध्यक्षाच्या दैनंदिनीच्या अहवालाकरीता (एसई ६) | १ |
| १२) निवडणूक कार्य प्रमाणपत्राकरीता (एसई.५) | १ |
| १३) पावती पुस्तके व समपहरण केलेल्या रकमेसाठी(एसई ६) | १ |
| १४) सहका-याच्या घोषणापत्रासाठी (एसई.५) | १ |
| १५) लहान लिफाफे (इतर) (एसई.७) | १ |
| १६) मतदारांची स्वाक्षरी असलेल्या मतदारांच्या नोंदवही-करीता (नमुना व्हीएम-१) (एसई ८) | १ |
| १७) इतर संबंधित कागदपत्रांसाठी (एसई-५) | १ |
| १८) लहान लिफाफे (एसई-८) | १ |
| १९) केंद्राध्यक्षाच्या दैनंदिनीकरीता लिफाफा (एसई ६) | १ |
| २०) कोरे लिफाफे (एई-७)-२, (एसई-८)-३ | ५ |
| २१) न वापरलेल्या मतपत्रिकांसाठी (एसई-७) | १ |
| २२) निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने, मोहोरबंद असलेल्या लिफाफयामध्ये अन्य कोणतेही पेपर ठेवण्याचे ठरविले आहे, त्यासाठी | १ |
| २३) न वापरलेल्या व खराब झालेल्या विशेष टॅगसाठी लिफाफा (एसई-७) | १ |
| २४) न वापरलेल्या / खराब पट्टीसीलसाठी(स्ट्रीप सील) लिफाफा (एसई-७) | १ |
| २५)मतदार स्लीप्स ठेवण्याकरीता (एसई-७) | १ |

(जेथे जेथे लहान आकाराचे लिफाफे आहे तेथे तेथे वेष्टन पेपरचा वापर करावा आणि जेथे जेथे संबंधित मुद्रित लिफाफे उपलब्ध नसतील तेथे तेथे कोऱ्या लिफाफ्याचा वापर करता येऊ शकेल आणि त्यावर वापरण्याचा हेतू लाल शाईने दर्शवता येईल.)

**२१.सूचना फलक-** (अ) मतदान केद्राध्यक्ष (ब) मतदान अधिकारी(क) प्रवेश(ड) बाहेर(इ) मतदान प्रतिनिधी (फ) संकीर्ण सूचना विनिर्दिष्ट करणारे


**२२.लेखनसामग्री-** १.साधी पेन्सिल-१, २) बॉलपेन-३ निळे+ १ लाल, ३) कोरेकागद ८ मोठे तुकडे (शिट्स),
४) टाचण्या (पीन्स) २५ नग, ५) लाख -६ कांडया, ६) मतदान कक्षासाठी साहित्य - २ +२ = ४
७) डिंक (गम पेस्ट) १ बाटली, ८) ब्लेड- १, ९) मेणबत्त्या -४, १०) धातूची पट्टी-१
११) जाड दोरा (Thin Twine Thread)-२० मीटर, १२) कार्बन पेपर -३, १३) पॅकेजिंग कागद-२ शीट
१४) तेल इत्यादी पुसण्यासाठी कापड किंवा चिंधी-३, १५) पक्क्या शाईची बाटली ठेवण्यासाठी कप-१
१६) ड्रॉईंग पिन-२४ नग, १७) पडताळणी सूची-२, १८) रबर बॅन्ड्स-२०, १९) सेलो टेप-१

**मतदान केंद्राध्यक्षाने क्षेत्रीय अधिकाऱ्याकडे स्वतंत्रपणे परत करावयाच्या साहित्याच्या याद्या, असा क्षेत्रीय अधिकारी ते साहित्य मुख्य निर्वाचन अधिकारी/ निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयातील भांडारात जमा करील.**

१) बाणफुली चिन्ह रबर स्टॅम्प
२) मतदान केंद्राध्यक्षाची धातूची मोहोर
३) पुढील लेखनसामग्री अंतर्भूत असलेली पिशवी

(एक) शाईचे पॅड (दोन) मतदान कक्षातील साहित्य (तीन) धातूची पट्टी (चार) पक्की शाई ठेवण्यासाठी असलेला प्लॅस्टिकचा बॉक्स (पाच) न वापरलेल्या इतर सर्व वस्तू

## जोडपत्र-पाच
## इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या मतदान केंद्राचा नमुना
## मतदान केंद्राची आखणी




सूचना : मतदान युनिटला जोडलेली केबल मतदान खोलीतल्या उघडया असलेल्या मागील भागातून बाहेर यायला हवी आणि मतदान केंद्राध्यक्ष आपल्या जागेवरुन या केबलची मतदान युनिटास जोडलेली लांबी पाहू शकेल ज्यामुळे मतदान खोलीत आतून कुठलाही मतदार केबलकडे हस्तक्षेप करु शकणार नाही हे न तपासता मतदान केंद्राध्यक्षास कळून येईल. मतदान खोलीची उघडी जागा जास्त मोठी असू नये की ज्यामुळे मतदान युनिटचा वरील भाग उघडा पडेल.

## जोडपत्र-सहा

## मतदान केंद्राध्यक्षाने करावयाचे प्रतिज्ञापत्र

## मतदानास प्रारंभ होण्यापूर्वी मतदान केंद्राध्यक्षाने करावयाचे घोषणापत्र

**मतदान केंद्र क्रमांक.........** **मतदानाची तारीख............**

मी, याद्वारे असे घोषित करतो की-

मी मतदान प्रतिनिधी आणि तेथे उपस्थित असलेल्या इतर व्यक्ती यांच्यासमोर असे प्रात्यक्षिक करुन दाखविले आहे की,-

(अ) अभिरुप मतदान घेऊन, मतदान यंत्र हे व्यवस्थित काम करण्याच्या स्थितीत आहे आणि त्यात या आधीच कोणतीही नोंदविलेली मते नाहीत.

(ब) मतदानाच्या वेळी वापरण्यात येणाऱ्यामतदार यादीच्या चिन्हांकीत प्रतीवर टपाल मतपत्रिका आणि निवडणूक कामावर असल्याचे प्रमाणपत्र देताना केलेल्या खुणांव्यतिरिक्त इतर कोणत्याही खुणा नाहीत.

(क) मतदानाच्या वेळी वापरण्यात येणा-या मतदार नोंदवहीमध्ये (नमुना व्हीएम-१) कोणत्याही मतदाराच्या संबंधात कोणतीही नोंद नाही.

२. मी, मतदान नियंत्रण युनिटचा निकाल विभाग सुरक्षित करण्यासाठी लावलेल्या कागदीमोहारांवर स्वत:ची स्वाक्षरी केली आहे आणि तेथे उपस्थित असलेल्या व स्वाक्षरी करण्याची इच्छा असलेल्या मतदान प्रतिनिधींच्या त्यावर स्वाक्षऱ्या घेतल्या आहेत.

३. मी, विशेष खुणचिठ्ठीवर नियंत्रण विभागाचा (युनिट) अनुक्रमांक लिहिला आहे, आणिमी विशेष खूण चिठ्ठीच्या मागील बाजूवर माझी स्वाक्षरी केली आहे आणि तेथे उपस्थित असलेल्या व स्वाक्षरी करण्याची इच्छा असलेलया उमूदवारांच्या/मतदानप्रतिनिधीच्या त्यावर स्वाक्षऱ्या घेतल्या आहेत.

४. मी, पट्टी मोहोरवर माझी स्वाक्षरी केली आहे आणि तसेच तेथे उपस्थित असलेल्या व स्वाक्षरी करण्याची इच्छा असलेल्या उमेदवारांच्या/मतदान प्रतिनिधींच्या त्यावर स्वाक्ष-या घेतल्या आहेत.

५. मी, विशेष खूण चिठ्ठीचा पूर्ण मुद्रीत अनुक्रमांक वाचला आहे आणि तेथे उपस्थित असलेल्या उमेदवारांना मतदान प्रतिनिधींना सदर अनुक्रमांक लिहून घेण्यास सांगितले आहे.

मतदान प्रतिनिधींची स्वाक्षरी: **स्वाक्षरी...................... (मतदान केंद्राध्यक्ष)**

(१).................या उमेदवाराचा (२).................या उमेदवाराचा

(३).................या उमेदवाराचा (४).................या उमेदवाराचा

(५).................या उमेदवाराचा (६).................या उमेदवाराचा

(७).................या उमेदवाराचा (८).................या उमेदवाराचा

(९).................या उमेदवाराचा

मतदान संपल्यावर उपस्थित असलेल्या खालील मतदान प्रतिनिधींनी नमुना व्हीएम-३ च्या भाग-१ ची प्रमाणित प्रत घेण्यास आणि त्याची पावती देण्यास नकार दिला म्हणून त्यांना त्या फॉर्मची प्रमाणित प्रत दिली नाही:-

(१)..................या उमेदवाराचा (२)..................या उमेदवाराचा

(३)..................या उमेदवाराचा (४)..................या उमेदवाराचा

(५)..................या उमेदवाराचा (६)..................या उमेदवाराचा

(७)..................या उमेदवाराचा (८)..................या उमेदवाराचा

(९)..................या उमेदवाराचा

**दिनांक** **स्वाक्षरी....................... (मतदान केंद्राध्यक्ष)**

## जोडपत्र-सहा-अ

**मागाहून दुसऱ्या मतदान यंत्राचा वापर करताना मतदान केंद्राध्यक्षाने करावयाचे प्रतिज्ञापन**

**..................जिल्हा परिषद निवडणूक विभाग क्र........./.............पंचायत समिती निर्वाचक गण क्र........सार्वत्रिक/ पोटनिवडणूक सन..........................**

**मतदान केंद्र क्रमांक.........** **मतदानाची तारीख............**

मी, याद्वारे असे घोषित करतो की-

मी मतदान प्रतिनिधी आणि तेथे उपस्थित असलेल्या इतर व्यक्ती यांच्यासमोर असे प्रात्यक्षिक करुन दाखविले आहे की,-

१. अभिरुप मतदान घेऊन, मतदान यंत्र हे व्यवस्थित काम करण्याच्या स्थितीत आहे आणि त्यात या आधीच कोणतीही नोंदविलेली मते नाहीत.

२. मी, मतदान यंत्रातला नियंत्रण युनिटचा निकाल विभाग सुरक्षित करण्यासाठी लावलेल्या कागदी मोहोरांवर स्वत:ची स्वाक्षरी केली आहे आणि तेथे उपस्थित असलेल्या व स्वाक्षरी करण्याची इच्छा असलेल्या मतदान प्रतिनिधींच्या त्यावर स्वाक्ष-या घेतल्या आहेत.

३. मी, विशेष खूणचिठ्ठीवर नियंत्रण विभागाचा (युनिट) अनुक्रमांक लिहिला आहे, आणि मी विशेष खूण चिठ्ठीच्या मागील बाजूवर माझी स्वाक्षरी केली आहे आणि तेथे उपस्थित असलेल्या व स्वाक्षरी करण्याची इच्छा असलेल्या उमेदवारांच्या/मतदान प्रतिनिधीच्या त्यावर स्वाक्षऱ्या घेतल्या आहेत.

४. मी, पट्टी मोहोरवर माझी स्वाक्षरी केली आहे आणि तसेच तेथे उपस्थित असलेल्या व स्वाक्षरी करण्याची इच्छा असलेल्या उमेदवारांच्या/मतदान प्रतिनिधींच्या त्यावर स्वाक्ष-या घेतल्या आहेत.

५. मी, विशेष खूण चिठ्ठीचा पूर्ण मुद्रीत अनुक्रमांक वाचला आहे आणि तेथे उपस्थित असलेल्या उमेदवारांना मतदान प्रतिनिधींना सदर अनुक्रमांक लिहून घेण्यास सांगितले आहे.

मतदान प्रतिनिधींची स्वाक्षरी: **स्वाक्षरी...................... (मतदान केंद्राध्यक्ष)**

(१).................या उमेदवाराचा (२).................या उमेदवाराचा

(३).................या उमेदवाराचा (४).................या उमेदवाराचा

(५).................या उमेदवाराचा (६).................या उमेदवाराचा

(७).................या उमेदवाराचा (८).................या उमेदवाराचा

(९).................या उमेदवाराचा

मतदान संपल्यावर उपस्थित असलेल्या खालील मतदान प्रतिनिधींनी नमुना व्हीएम-३ च्या भाग-१ ची प्रमाणित प्रत घेण्यास आणि त्याची पावती देण्यास नकार दिला म्हणून त्यांना त्या फॉर्मची प्रमाणित प्रत दिली नाही:-

(१).................या उमेदवाराचा (२).................या उमेदवाराचा

(३).................या उमेदवाराचा (४).................या उमेदवाराचा

(५).................या उमेदवाराचा (६).................या उमेदवाराचा

(७).................या उमेदवाराचा (८).................या उमेदवाराचा

(९).................या उमेदवाराचा

**दिनांक** **स्वाक्षरी...................... (मतदान केंद्राध्यक्ष)**

## जोडपत्र-सात

## मतदान समाप्तीचे प्रतिज्ञापन

**.......... जिल्हा परिषद निवडणूक विभाग क्र ....... /........पंचायत समिती निर्वाचक गण क्र.........**
**सार्वत्रिक / पोट निवडणूक सन ..............**
**मतदान केंद्र क्र. ................**

मी, मतदान संपल्यावर मतदान केंद्रावर जे मतदान प्रतिनिधी हजर होते आणि ज्यांनी खाली स्वाक्ष-या केलेल्या आहेत त्यांना इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतच्या आदेशाच्या नियम-२१ नुसार व्हीएम-३ भाग-एक मध्ये नोंदविलेल्या मतांचा हिशेब यामधील प्रत्येक नोंदीची प्रमाणित प्रत दिलेली आहे.

दिनांक............ स्वाक्षरी...........

वेळ........... मतदान केंद्राध्यक्ष

नोंदविलेल्या मतांचा हिशेब (व्हीएम -३ भाग-एक) यामधील नोंदीची प्रमाणित प्रत मिळाली.

(१).................या उमेदवाराचा (२).................या उमेदवाराचा

(१).................या उमेदवाराचा (२).................या उमेदवाराचा

(३).................या उमेदवाराचा (४).................या उमेदवाराचा

(५).................या उमेदवाराचा (६).................या उमेदवाराचा

(७).................या उमेदवाराचा (८).................या उमेदवाराचा

(९).................या उमेदवाराचा

मतदान संपल्यावर उपस्थित असलेल्या खालील मतदान प्रतिनिधींनी नमुना व्हीएम-३ च्या भाग-१ ची प्रमाणित प्रत घेण्यास आणि त्याची पावती देण्यास नकार दिला म्हणून त्यांना त्या नमुन्याची प्रमाणित प्रत दिली नाही:-

(१).................या उमेदवाराचा (२).................या उमेदवाराचा

(३).................या उमेदवाराचा (४).................या उमेदवाराचा

(५).................या उमेदवाराचा (६).................या उमेदवाराचा

(७).................या उमेदवाराचा (८).................या उमेदवाराचा

(९).................या उमेदवाराचा

दिनांक स्वाक्षरी................. (मतदान केंद्राध्यक्ष )

## जोडपत्र-आठ

## मतदान यंत्र मोहोरबंद केल्यानंतर करावयाचे प्रतिज्ञापन

**............. जिल्हा परिषद निवडणूक विभाग क्र ....... /..........पंचायत समिती निर्वाचक गण क्र........**

**सार्वत्रिक / पोट निवडणूक सन .............**

**मतदान केंद्र क्र. .................**

मी, मतदान यंत्राचे नियंत्रण युनिट व मतदान युनिट यांच्या वहन पेटयांवर माझी मोहोर लावली आहे व मतदान संपल्यावर मतदान केंद्रावर जे मतदान प्रतिनिधी हजर होते त्यांना त्यांची मोहोर लावण्यास परवानगी दिली.

दिनांक............ स्वाक्षरी...........

वेळ........... मतदान केंद्राध्यक्ष

खालील मतदान प्रतिनिधींनी त्यांची मोहोर लावली:-

मतदान प्रतिनिधींची स्वाक्षरी

(१).................या उमेदवाराचा (२).................या उमेदवाराचा

(३).................या उमेदवाराचा (४).................या उमेदवाराचा

(५).................या उमेदवाराचा (६).................या उमेदवाराचा

(७).................या उमेदवाराचा (८).................या उमेदवाराचा

(९).................या उमेदवाराचा

खालील मतदान प्रतिनिधींनी त्यांची मोहोर लावण्यास नकार दिला अथवा त्यांची मोहोर लावण्याची इच्छा नव्हती:-

(१).................या उमेदवाराचा (२).................या उमेदवाराचा

(३).................या उमेदवाराचा (४).................या उमेदवाराचा

(५).................या उमेदवाराचा (६).................या उमेदवाराचा

(७).................या उमेदवाराचा (८).................या उमेदवाराचा

(९).................या उमेदवाराचा

दिनांक स्वाक्षरी......................

मतदान केंद्राध्यक्ष

## जोडपत्र-नऊ

## अंध आणि अपंग मतदाराच्या सहकाऱ्याचे घोषणापत्र

**............... जिल्हा परिषद निवडणूक विभाग क्र ......../..........पंचायत समिती निर्वाचक गण क्र......**

**सार्वत्रिक / पोट निवडणूक सन ...............**

**मतदान केंद्र क्र. .................**

मी, ............................................, श्री. .............................. यांचा मुलगा वय .............................मी........................................................................................ ...............इथे वास्तव्य करणारा * येथे जाहीर करतो की,

(अ) आज दिनांक ........................................ रोजी मी कुठल्याही दुसऱ्या मतदान केंद्रावर इतर कुठल्याच दुसऱ्याचा मतदाराचा सहकारी म्हणून काम केलेले नाही

(ब) मी, ............................................................ यांच्यावतीने नोंद केलेल्या मताची गुप्तता पाळीन.

...........................................

सहकाऱ्याची स्वाक्षरी

**जोडपत्र - दहा**
**नमुना व्हीएम-३**
**(पहा परिच्छेद २२)**
**भाग-एक- नोंदविलेल्या मतांचा हिशेब**

...................... जिल्हा परिषद / ........... पंचायत समिती निवडणूक सार्वत्रिक / पोट निवडणूक (जिल्हा-.........) निवडणूक विभाग क्र ......./ निर्वाचक गण क्र....... असल्यास.......... मतदान केंद्राचा क्रमांक व नाव ................................

मतदान केंद्राचा क्रमांक व नाव ....................................................
कंट्रोल युनिटचा क्रमांक.............................................................
मतदान केंद्रावर वापरलेल्या बॅलट युनिटची संख्या व क्र. ..........................

१. मतदान केंद्रावर नेमून दिलेल्या मतदारांची संख्या
२. मतदार नोंदवहीत (नमुना व्हीएम-१) नोंद झालेल्या एकूण मतदारांची संख्या
३. नियम १७ नुसार ज्या मतदारांनी मतदान न करण्याचे ठरविले त्यांची संख्या
४. नियम १५ नुसार मतदानास अनुमती न दिलेल्या मतदारांची संख्या
५. मतदान यंत्रामध्ये नोंदविलेल्या एकूण मतदारांची संख्या
६. वरील अनुक्रमांक-५ मध्ये दाखविलेल्या एकूण मतांची संख्या = (अनुक्रमांक-२ वजा अनुक्रमांक-३ वजा अनुक्रमांक-४) ही आकडेवारी जुळते किंवा कसे अथवा काही फरक पडतो किंवा कसे,
७. नियम १८ नुसार प्रदत्त मतपत्रिका दिलेल्या मतदारांची संख्या
८. प्रदत्त मतपत्रिकांची संख्या

| | अनुक्रमांक पासून | अनुक्रमांक पर्यंत |
|---|---|---|
| (अ) उपयोगासाठी मिळालेल्या | ............... | ............. |
| (ब) मतदारांना दिलेल्या | ............... | ............. |
| (क) उपयोगात न आणलेल्या व परत केलेल्या | ............... | .............. |

९. कागदी मोहोरांचा (पेपर सील) हिशेब

१. पुरविलेल्या कागदी मोहोरांचे अनुक्रमांक - पासून............पर्यंत..............

२. एकूण पुरविलेल्या कागदी मोहोरांची संख्या

३. उपयोगात आणलेल्या कागदी मोहोरांची संख्या
अनुक्रमांक - पासून............पर्यंत..............

४. न वापरलेल्या कागदी मोहोरांचा क्रमांक
जे निर्वाचन अधिका-यास परत केले.
(क्रमांक - २ वजा ३) अनुक्रमांक - पासून...........पर्यंत.............

५. खराब झालेल्या कागदी मोहोरांची संख्या,
असल्यास अनुक्रमांक - पासून...........पर्यंत.............

मतदान प्रतिनिधींच्या स्वाक्ष-या

१..............................
२..............................
३..............................
४..............................
५..............................
६..............................
७..............................

दिनांक- ..................... मतदान केंद्राध्यक्षाची स्वाक्षरी
ठिकाण- ..................... मतदान केंद्र क्रमांक..........

## जोडपत्र - दहा-अ
## नमुना व्हीएम-४
## (पहा परिच्छेद२८)
## भाग- दोन - मतमोजणीचा निकाल

............ जिल्हा परिषद निवडणूक विभाग क्र........ /............ पंचायत समिती निर्वाचक गण क्र ......... सार्वत्रिक निवडणूक / पोटनिवडणूक (जिल्हा-.........)/असल्यास.........मतदान केंद्राचा क्रमांक व नाव ..............

मतदान केंद्राचा क्रमांक व नाव ...................................

कंट्रोल युनिटचा क्रमांक ..........................................

काढता येणा-या मेमरीचा क्रमांक..............................................................

मतदान केंद्रावर वापरलेल्या बॅलट युनिटची संख्या ............................

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | नोंदविलेल्या मतांची संख्या |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १. | | |
| २. | | |
| ३. | | |
| ४. | | |
| ५. | | |
| ६. | | |
| एकूण | | |

वर नमूद केलेल्या एकूण मतांची संख्या भाग-१ मधील अनुक्रमांक-५ येथे नमूद केलेल्या एकूण मतांच्या संख्येशी जुळते किंवा कसे? अथवा काही फरक येतो किंवा कसे?,

ठिकाण- .....................

दिनांक- .......................

मतमोजणी पर्यवेक्षकाची

स्वाक्षरी................

उमेदवाराचे/मतदान प्रतिनिधींचे/.............

मतमोजणी प्रतिनिधीचे नाव व................

पूर्ण स्वाक्षरी................

१.

२.

३.

४.

५.

६.

ठिकाण- ..................

दिनांक- .................

निवडणूक निर्णय अधिका-याची स्वाक्षरी

## जोडपत्र - अकरा
## मतदान केंद्राध्यक्षांची डायरी

१. जिल्हा परिषद / पंचायत समितीचे नाव ........ ........ ........ ........ ........

२. सार्वत्रिक निवडणूक / पोटनिवडणूक तसेच जिल्हा परिषद निवडणूक विभाग क्र. ..........
पंचायत समिती निर्वाचक गण क्र. ........

३. मतदानाची तारीख :

४. मतदान केंद्राचा क्रमांक :
या जागी आहे-
(१) सरकारी इमारत
(२) खासगी इमारत
(३) तात्पुरता निवारा

५. स्थानिक मतदान अधिका-यांना नेमले त्यांची संख्या :-

६. मूळ मतदान अधिकारी गैरहजर असल्यास त्याच्या जागी नेमणूक केलेल्या मतदान अधिकाऱ्याची नेमणूक आणि गैरहजेरीचे कारण

७. मतदान यंत्र
(१) वापरलेल्या नियंत्रण युनिटांची संख्या :
(२) वापरलेल्या नियंत्रण युनिटांचे अनुक्रमांक :
(३) वापरलेल्या मतदान युनिटांची संख्या :
(४) वापरलेल्या मतदान युनिटांचे अनुक्रमांक :

७. (१) वापरलेल्या कागदी मोहरांची संख्या :
(२) वापरलेल्या कागदी मोहरांचे अनुक्रमांक :

८. मतदान प्रतिनिधींची संख्या आणि उशीरा पोचलेल्या मतदान
प्रतिनिधींची संख्या :

९. मतदान केंद्रावर मतदान प्रतिनिधी नेमलेल्या उमेदवारांची संख्या :

१०. (१) मतदान केंद्राला दिलेले एकूण मतदार
(२) मतदार यादीच्या चिन्हांकीत केलेल्या प्रतीनुसार मतदान करण्यास परवानगी दिलेल्या मतदारांची संख्या :
(३) मतदार नोंदवहीत (नमुना व्हीएम-३) नुसार प्रत्यक्ष मतदान केलेल्या मतदारांची संख्या :
(४) मतदान यंत्रानुसार नोंद झालेल्या मतांची संख्या :

पहिल्या मतदान अधिकाऱ्याची
स्वाक्षरी

मतदान अधिकाऱ्याची स्वाक्षरी
मतदार नोंदवहीचा इनचार्ज

११. ज्यांनी मतदान केले त्या मतदारांची संख्या

पुरुष..................

महिला...............

एकूण................

१२. आव्हानित मते

परवानगी दिलेल्यांची संख्या.............

परवानगी न दिलेल्यांची संख्या.............

रक्कम फेडली रु......................

१३. निवडणूक सेवा दाखला सादर करुन मतदान केलेल्या मतदारांची संख्या

१४. सहकाऱ्याच्या आधाराने मतदान केलेल्या मतदारांची संख्या

१५. दुबार मतांची संख्या

१६. मतदारांची संख्या

अ) वयाविषयी घोषणापत्रे घेतली ते..........

ब) ज्या कोणी अशी घोषणापत्रे देण्यास नकार दिला ते.............

१७. जर मतदान तहकूब करण्याची खरोखर गरज होती तर तहकुबीचे कारण

१८. नोंदणी केलेल्या मतांची संख्या

स. ७.३० ते ९.३०

स. ९.३० ते ११.३०

स. ११.३० ते १.३०

दु. १.३० ते ३.३०

सां. ३.३० ते ५.३०

१९. मतदान करतेवेळी वाटलेल्या मतदार स्लिपांची संख्या

२०. निवडणूक गुन्हा

प्रकरणाची संख्या

अ) मतदान केंद्राच्या शंभर मीटरच्या आत प्रचार करणे.

ब) मतदाराची तोतयेगीरी

क) मतदान केंद्रावरील नोटीसांची यादी वा इतर कागदपत्रे वाटप, खराब करणे, नष्ट करणे

ड) मतदारांना लाच देणे

इ) मतदारांना वा इतरांना भिती घालणे

फ) मतदान केंद्रे ताब्यात घेणे

२१. मतदानास अडथळा आला

(१) दंगल :

(२) हिंसाचार :

(३) नैसर्गिक आपत्ती :

(४)मतदान केंद्र ताब्यात घेणे :

(५)मतदान यंत्रात बिघाड :

(६)इतर कारणे :

कृपया वरील मुद्दे विस्तृतपणे द्या

२२. मतदान केंद्रावर मतदान यंत्राकडून मतदान खराब झाले.

(अ) मतदान केंद्राध्यक्षांच्या ताब्यातून अनधिकृतपणे बाहेर नेले :

(ब) अपघाती वा जाणीवपूर्वक हरवले वा नष्ट केले :

(क) बिघडले वा हस्तक्षेप केला :

कृपया विस्तृतपणे सांगा:

२३. गंभीर तक्रार जर उमेदवार / प्रतिनिधीने केल्यास:

२४. कायदा आणि सुव्यवस्थेचा भंग करणा-या प्रकरणांची संख्या :

२५. मतदान केंद्रावरील चुका आणि अनियमितपणा घडल्यास :

२६. मतदानास आरंभ होण्याआधी, मतदान चालू असताना गरज पडल्यास (जेव्हा नवे मतदान यंत्र वापरतात) आणि मतदानाच्या शेवटी गरज भासते, तसे घोषणापत्र केले :

स्थळ :

तारीख :

मतदान केंद्राध्यक्ष

ही डायरी मतदान यंत्रे आणि इतर माहोरबंद कागदपत्रांबरोबर निर्वाचन अधिकाऱ्याकडे पाठवायला हवी.

जोडपत्र - बारा

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदान करताना भारत निवडणूक आयोगाकडील मतदार ओळखपत्र अथवा अन्य पुरावा सादर करण्याबाबत...

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
**क्रमांक-रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.१६/का-५.**
**नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.**
**दिनांक- ८ नोव्हेंबर, २०११.**

## आ दे श

राज्य निवडणूक आयोगाने आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.१६/का-५, दिनांक- १९ डिसेंबर, २००९ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये मतदारांची ओळख पटविण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या मतदार ओळखपत्राव्यतिरिक्त अन्य १६ कागदपत्रे सादर करण्यास परवानगी दिली होती. हे आदेश रद्द करुन त्यामध्ये आता सुधारणा करणे गरजेचे झाले असल्यामुळे पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

मतदान केंद्राध्यक्षाने मतदारास आपली ओळख पटविण्याकरिता प्रथम फोटो असलेले निवडणूक ओळखपत्र सादर करण्यास सांगावे. असे ओळखपत्र सदर मतदाराकडे उपलब्ध नसल्यास किंवा त्यावरुन त्या मतदाराची ओळख पटत नसल्यास खालील पुराव्यांपैकी कोणताही पुरावा सादर करण्याची सूचना मतदान केंद्राध्यक्ष मतदारास करेल व त्यानुसार मतदाराची ओळख पटल्यानंतर मतदारास मतदान करु देईल.

१. पासपोर्ट,
२. वाहन चालविण्याचा परवाना
३. आयकर विभागाकडील पॅन ओळखपत्र
४. केंद्र शासन / राज्य शासन / सार्वजनिक उपक्रम / स्थानिक स्वराज्य संस्था यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना फोटोसहित दिलेली ओळखपत्रे
५. राष्ट्रीयकृत बँका अथवा पोस्ट ऑफिस यामधील खातेदाराचे फोटो असणारे पासबुक
६. स्वातंत्र्य सैनिकाचे फोटो असलेले ओळखपत्र
७. राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या आधीच्या तारखेपर्यंत सक्षम प्राधिकाऱ्याने अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती / इतर मागासवर्ग / विमुक्त जाती / भटक्या जमाती / विशेष मागासवर्ग प्रवर्ग इत्यादींना फोटोसहित दिलेले प्रमाणपत्र
८. राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या आधीच्या तारखेपर्यंत सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला फोटोसहित अपंगत्वाचा दाखला
९. मालमत्तेबाबतची कागदपत्रे तसेच नोंदणी खत इत्यादी (फोटोसहित)
१०. राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या आधीच्या तारखेपर्यंत फोटोसहित देण्यात आलेला शस्त्रास्त्राचा परवाना
११. राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या आधीच्या तारखेपर्यंत दिलेले राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेखालील, फोटो असलेले ओळखपत्र
१२. राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या आधीच्या तारखेपर्यंत दिलेले निवृत्त कर्मचा-यांचे फोटो असलेले पासबुक
१३. राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या आधीच्या तारखेपर्यंत दिलेले निवृत्त कर्मचाऱ्यांच्या विधवा / अवलंबित व्यक्ती यांचे, फोटो असलेले प्रमाणपत्र
१४. राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या आधीच्या तारखेपर्यंत दिलेले वयस्कर निवृत्ती वेतनधारक अथवा त्यांच्या विधवा यांचे, फोटो असलेले प्रमाणपत्र
१५. केंद्र शासनाच्या श्रम मंत्रालयाने दिलेले आरोग्य विमा योजनेचे फोटोसहित कार्ड
१६. राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या आधीच्या तारखेपर्यंत दिलेली शिधापत्रिका (कुटुंबातील सर्व मतदारांनी मतदान करण्यासाठी एकत्र येणे आवश्यक असेल. तसेच जर शिधापत्रिकेवर एकाच व्यक्तीचे नाव असल्यास त्याने स्वतःच्या वास्तव्याचा अन्य पुरावा जसे वीज वापराचे देयक, दूरध्वनी वापराचे देयक, प्रॉपर्टी कार्ड किंवा घरपट्टी भरल्याची पावती सोबत आणणे बंधनकारक राहील.)
१७. आधार ओळखपत्र

उमेदवाराच्या मतदान प्रतिनिधींनी मतदाराच्या ओळखीबाबत आक्षेप घेतल्यास किंवा मतदाराने सादर केलेल्या ओळखीच्या पुराव्याबाबत कोणत्याही प्रकारची शंका असल्यास मतदान केंद्राध्यक्ष त्याबाबत संपूर्ण शहानिशा करेल व आवश्यकता वाटल्यास इतर ओळखीच्या पुराव्यांची मागणी करुन मतदाराच्या ओळखीची संपूर्णतः खात्री पटल्यानंतरच त्यांना मतदान करु देईल. जर एखादा मतदार असा ओळखीबाबतचा समाधानकारक पुरावा /कागदपत्रे सादर करु न शकल्यास त्यास मतदान करु देऊ नये. कोणत्याही परिस्थितीत तोतया मतदाराकडून मतदान होणार नाही याची संपूर्ण जबाबदारी संबंधित मतदान केंद्राध्यक्षांची असेल.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

धमाकानेड

( ध. मा. कानेड )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व महानगरपालिका आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
सर्व नगर परिषदा / नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
सर्व तहसिलदार
राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने

D:\DISK२_VOL२ (D)\OLD COMPUTER DATA\CORPORATION\orders.doc

T-12431e2597

जोडपत्र-१३

नमुना ८ (नियम ४१ पाहा)

हरकत घेण्यात आलेल्या मतांची यादी

....................... जिल्हा परिषद निवडणूक विभाग / .............पंचायत समिती निर्वाचक गण क्र.............

सार्वत्रिक/ पोटनिवडणूक सन ...........

**मतदान केंद्र क्रमांक..........**

| नांदीचा अनुक्रमांक | मतदाराचे नाव | मतदारांच्या यादीतील अनुक्रमांक | मतदाराची स्वाक्षरी किंवा अंगठयाचा ठसा व त्याचा पत्ता | ओळख पटवून देणा-याचे नाव कोणताही असल्यास | आक्षेप घेणाऱ्या इसमाचे नाव | अनामत ठेवलेली रक्कम आदेश | मतदान केंद्राध्यक्षाचा प्रत्येक बाबतीतील आदेश | अनामत रक्कम परत देण्यात येईल तेव्हा आक्षेप घेणाऱ्या इसमाची उक्त रक्कम मिळाल्याबद्दलची स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

दिनांक.....

मतदान केंद्राध्यक्षाची स्वाक्षरी

नमुना ७ (नियम ३८ पाहा)

हरकत घेण्यात आलेल्या मतांची यादी

....................... जिल्हा परिषद निवडणूक विभाग............../ पंचायत समिती निर्वाचक गण क्र................

सार्वत्रिक/ पोटनिवडणूक सन ...........

**मतदान केंद्र क्रमांक..........**

| अनुक्रमांक | मतदाराच्या यादीतील अनु.क्र. | मतदाराचे नाव | साक्षर असल्यास मतदाराची स्वाक्षरी किंवा निरक्षर असल्यास अंगठयाचा ठसा व पत्ता | ओळख पटवून देणाऱ्याचे नाव कोणताही असल्यास | आक्षेप घेणाऱ्या इसमाचे नाव | मतदान केंद्राध्यक्षाचा प्रत्येक बाबतीतील आदेश |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. |
| | | | | | | |
| | | | | | | |

दिनांक.....

मतदान केंद्राध्यक्षाची स्वाक्षरी

## जोडपत्र – १४

## आक्षेप फी

पुस्तक क्रमांक ................ पृष्ठ क्रमांक........................ जिल्हा परिषद / पंचायत समिती ........................ मतदान केंद्र क्रमांक ................... च्या मतदान केंद्राध्यक्षाचे कार्यालय.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक नियम १९६२ अन्वये उमेदवार / निवडणूक प्रतिनिधी / मतदान प्रतिनिधी श्री. ................ ............................... यांच्याकडून आक्षेपाबद्दल अनामत रक्कम म्हणून रु.२/- (रुपये रू.२ (रुपये दोन फक्त ) रोख मिळाले.

दिनांक .......................

शासनाने जप्त केले.

मतदान केंद्राध्यक्ष

निवडणूक घेण्याबाबत **जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक नियम १९६२** अन्वये रक्कम म्हणून रु.२ (रुपये दोन फक्त ) परत मिळाले.

दिनांक .......................

उमेदवार / निवडणूक प्रतिनिधी/ मतदान प्रतिनिधीचे
नाव व स्वाक्षरी

## ( आक्षेप फीची पावती )

पुस्तक क्रमांक .................. पृष्ठ क्रमांक ................... जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक नियम १९६२ / निवडणूक प्रतिनिधी / मतदान प्रतिनिधी श्री. ............................................... यांच्याकडून आक्षेपाबद्दल अनामत रक्कम म्हणून रु.२ (रुपये दोन फक्त ) रोख मिळाले.

दिनांक ............................

............................................... **जिल्हा परिषद / पंचायत समिती**

जिल्हा परिषद निवडणूक विभाग क्र. ................/ पंचायत समिती निर्वाचक गण क्र. ........
मतदान केंद्र क्र. ....................... च्या मतदान केंद्राध्यक्षाचे कार्यालय.

**दिनांक** **मतदान केंद्राध्यक्ष**

## जोडपत्र- १५
## (प्रकरण पंधरा, परिच्छेद ५)
## पोलीस ठाणे अधिकाऱ्यास पाठवावयाचे तक्रारपत्र

पोलीस ठाणे अधिकारी,
---------------------
---------------------
---------------------
यांस
**विषय :-** ------------------ जिल्हा परिषद निवडणूक विभाग / पंचायत समिती निर्वाचक गण क्र. ------------- मतदान केंद्र क्र.-------------------
मतदानाची तारीख ---------------------------- तोतयेगिरीबाबत

महोदय,

मी, याद्वारे कळवू इच्छितो की, श्री. -----------------------------------, वडीलांचे नाव -------------- ---------------------- राहणार ---------------------------- यांनी ----------------------------- यांच्या हवाली करण्यात येत असलेल्या व्यक्तींच्या ओळखीविषयी आक्षेप घेतला आहे. त्या व्यक्तीने, ------- ------------------------ जिल्हा परिषद / पंचायत समिती निवडणूक विभाग / निर्वाचक गण क्र. ------- (मतदान केंद्र क्र. --------------) च्या मतदारांच्या यादीतील भाग क्रमांक -------------- मधील अनुक्रमांक -------------- वरील ------------------------- या नावी व्यक्ती आपणच असल्याचा दावा केला. परंतु ती व्यक्ती स्वत:च मतदार आहे असे सिध्द करु शकलेली नाही. तरी माझ्या मते सदरहू व्यक्ती तोतया आहे त्यामुळे भारतीय दंड संहितेच्या कलम १७१ चे अनुसार आवश्यक ती कारवाई करावी, अशी मी आपणांस विनंती करतो.
आपला विश्वासू,

ठिकाण --------------                स्वाक्षरी---------------------
दिनांक ---------------
जिल्हा परिषद / पंचायत समिती मतदार संघाचे निर्वाचन अधिकारी व * यांना प्रत रवाना

स्वाक्षरी ---------------
( मतदान केंद्राध्यक्ष )

पावती

मतदान केंद्राध्यक्षाने पाठविलेले पत्र व त्यात जिचा उल्लेख केला आहे ती व्यक्ती-------------------------- (दिनांक ) रोजी -------------------- (वाजता ) माझ्या हवाली करण्यात आली.

स्वाक्षरी -------------------

* येथे संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचे पदसिध्द पदनाम घालावे.

## जोडपत्र –१६

## इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र वापरताना घ्यावयाची दक्षता.

**काय करावे**

१) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र वापरण्यापूर्वी प्रथम निदेशपुस्तिका लक्षपूर्वक वाचा.

२) त्यात दाखविल्याप्रमाणे पध्दतशीर व हळू बटणे दाबावीत.

३) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रास धूळ, उष्णता, पाऊस, आग तसेच अन्य नैसर्गिक आपत्तींपासून सुरक्षित ठेवा.

४) निवडणूक आयोगामार्फत पुरविलेल्या विशिष्ट प्रकारच्या बॅटरीचा वापर करा.

५) जर काही अडचण निर्माण झाल्यास निवडणूक आयोग किंवा ई.सी.आय.एल. यांच्याशी संपर्क साधावा.

६) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र अनिश्चित काळासाठी वापरावयाचे नसल्यास कंट्रोल युनिटपासून बॅटरी वेगळी करा.

७) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र उघडताना बॅलेटींग युनिट आणि कंट्रोल युनिटचे भाग समान पातळीवर राहतील याची खातरजमा करावी.

८) बटणे दाबण्यापूर्वी एकमेकांस जोडणारे बॅलेटींग युनिटचे केबल कलेक्शान व्यवस्थितपणे कंट्रोल युनिटच्या कनेक्शनशी जोडले आहे, याची खातरजमा करावी. हे केवळ एकाच दिशेला जोडले जाईल.

**हे करु नये.**

१) बटणे, खटके इत्यादींवर अतिरिक्त जोर देऊ नये.

२) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रास हिटर किंवा अन्य कुठल्याही गरम वस्तूजवळ ठेवू नये.

३) सील करतेवेळी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावर वितळलेले मेण पडू देऊ नये / पडता कामा नये.

४) निरनिराळया युनिटची झाकणे व दरवाजे जोर लावून उघडू नये.

५) कंट्रोल युनिटच्या वरील झाकण उघडू नये.

६) जोपर्यन्त बॅटरीचा वापर करण्याची आवश्यकता नाही तोपर्यन्त त्या बॅटरीचे सील उघडू नये.

७) एकमेकांस जोडणा-या केबलच्या टोकास जोडलेल्या कनेक्शनला कोणत्याही कठीण वस्तूचा घाव / धक्का लागता कामा नये.

जोडपत्र - सतरा

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्र.रानिआ /मनपा-२०१०/प्र.क्र.१०/का.०५,
नवीन प्रशासन भवन, पहिला मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १९.११.२०११.

निवडणूक तात्काळ
फॅक्स/ई-मेल

प्रति,

१. जिल्हाधिकारी,(सर्व),
(मुंबई व मुंबई उपनगर वगळून)

२. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)

विषय :- मतदाराच्या बोटाला लावावयाच्या न मिटणा-या शाईच्या बाटलीऐवजी मार्करपेनच्या वापराबाबत.

महोदय,

राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक/पोट निवडणुकांमध्ये मतदाराच्या हाताच्या बोटाला लावण्यात येणा-या शाईऐवजी आता मार्करपेनचा वापर करावयाचा असून सदरहू मार्करपेन वापरताना कोणती दक्षता घेणे आवश्यक आहे याबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. मतदाराच्या हाताच्या बोटाला (पृ.क्र.२/प.वि.वरील छायाचित्रात दर्शविल्याप्रमाणे) मार्करपेनने निशाणी करण्यात यावी. मतदाराच्या बोटाला मार्करपेनने निशाणी केल्यानंतर, मतदाराने मतदान केल्यानंतर त्याच्या बोटास केलेली निशाणी तशीच आहे याची खात्री मतदान अधिका-याने, मतदार मतदान केंद्र सोडण्यापूर्वी करावी.

२. मार्करपेन दाबून वापरावा.

३. मार्करपेन वापरात नसेल तेव्हा त्यास घट्ट टोपण लावून ठेवावे.

४. मार्करपेन वापरात नसेल तेव्हा आडवा (Horizontal) ठेवण्यात यावा.

२/-

निवडणूक निर्णय अधिका-यांनी मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांना निवडणुकीचे प्रशिक्षण देताना मार्कर पेनचा वापर कसा करावा याबाबत पूर्वपृष्ठावर नमूद केल्यानुसार स्पष्ट सूचना द्याव्यात. (सूचना मार्कर पेनवरही दर्शविण्यात आल्या आहेत.)


आदेशानुसार,

आपला

(ध.मा.कानेड)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

१. उभी रेघ

२. टिंब



योग्य

चुकीचे

जोडपत्र - अठरा

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका-२०१५
मतदान केंद्र निश्चिती व आदर्श मतदान केंद्र निर्मितीबाबत

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक -रानिआ-२०१५/प्र.क्र. ८ /प्रकल्प कक्ष,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २७/०५/२०१५.

प्रति,

सर्व जिल्हाधिकारी,
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

विषय:- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका-२०१५
मतदान केंद्र निश्चिती व आदर्श मतदान केंद्र निर्मितीबाबत...

संदर्भ:-१) राज्य निवडणूक आयोगाकडील मतदान केंद्रविषयक आदेश क्रमांक- रानिआ/जिपपंसनि/२०१०/प्र.क्र.०२/का-७, दिनांक-१२/७/२०१०.
२) क्रमांक-रानिआ/ग्रापनि-२०१०/प्र.क्र.२०/का-८,दिनांक-१४/१०/२०१० चे पत्र
३) क्रमांक-रानिआ/२०१०/प्र.क्र.४/का-०५, दिनांक ३०/७/२०११ चे पत्र
४) क्रमांक-रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र.०४/का-५, दिनांक-१५/९/२०११ चे पत्र
५) क्रमांक-रानिआ/मनपा-२०१०/प्र.क्र.४/का-५, दिनांक- ७/१/२०१५.

भारतीय राज्य घटनेच्या अनुच्छेद २४३ के, २४३ झेडए नुसार राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मुदतीत, निर्भय व मुक्त वातावरणात पार पाडणे तसेच या निवडणुकांचे नियंत्रण, संचालन व अधिक्षण करण्याची सांविधानिक जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर आहे.

२. निवडणुकांच्यावेळी "मतदान केंद्र" हा महत्वाचा विषय असून भारत निवडणूक आयोगाच्या निवडणुकीच्यावेळी घेण्यात येणारी सर्व दक्षता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्येही घेणे आवश्यक आहे.

३. राज्य निवडणूक आयोगाकडून यापूर्वी निर्गमित झालेल्या संदर्भाधीन आदेशामधील मतदान केंद्रविषयक सूचना अधिक्रमित करून मतदान केंद्र निश्चितीबाबत, भारत निवडणूक आयोगाची आदर्श मतदान केंद्राविषयीची तत्वे व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थाच्या अधिनियम व नियमातील तरतुदी लक्षात घेऊन खालील सूचना देण्यात येत आहेत :-

(i) स्थानिक स्वराज्य संस्थांचा मतदार संघ हा प्रभागात/निर्वाचन गट/ गणामध्ये विभागलेला असतो व प्रत्येक प्रभाग हा भौगोलिकदृष्ट्या सलग प्रदेश असतो. सबब, प्रत्येक प्रभाग, गट/गणाकरिता किमान १ मतदान केंद्र असणे आवश्यक आहे.

(ii) ग्रामपंचायतीमध्येच म्हणजेच बहुसदस्यीय पध्दती लागू असणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये एका मतदान केंद्रास जोडणाऱ्या मतदारांची संख्या ८०० हुन अधिक असू नये. परंतु, जिल्हा परिषद/पंचायत समिती, महानगरपालिका, नगर परिषदा सारख्या एक सदस्यीय पध्दती लागू असणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मतदारांची संख्या जास्तीत जास्त १२०० ते १४०० असण्यास हरकत नाही. परंतु, सदर मतदान केंद्रावर १४०० हून अधिक मतदार असू नयेत. तसेच मागील निवडणुकांतील मतदानाची टक्केवारी लक्षात घेऊन आवश्यकतेनुसार अशा केंद्रांवर अतिरिक्त मतदान अधिकारी नेमावा.

(iii) भौगोलिकदृष्ट्या मतदान केंद्र हे जोडलेल्या भागाच्या मध्यावर असावे. जेणेकरून, मतदान केंद्रास जोडलेल्या कोणत्याही मतदारास २ किमीपेक्षा अधिक प्रवास करावा लागू नये. सबब, विरळ लोकसंख्या/भौगोलिक कारणास्तव विखुरलेल्या /

विभागलेल्या वस्त्यांमध्ये कमी मतदारांसाठी देखील मतदान केंद्र तयार केल्यास हरकत नसावी. (निवडणूक निर्णय अधिकारी माहितीपुस्तिका २.२.१(ई))

(iv) कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने शक्यतोवर एका इमारतीत शहरी भागात जास्तीत जास्त ४ व ग्रामीण भागात जास्तीत जास्त २ केंद्रे ठेवावीत. (निवडणूक निर्णय अधिकारी माहितीपुस्तिका २.२.१(एफ))

(v) मतदान केंद्राची जागा किमान २० चौ. मीटर असेल. (निवडणूक निर्णय अधिकारी माहितीपुस्तिका २.२.१(सी))

(vi) मतदान केंद्रात जाणे-येणे कामी स्वतंत्र Entry-Exit असावे. जेथे अशी सोय नसेल तेथे दोरीच्या सहाय्याने तात्पुरती व्यवस्था करावी. (निवडणूक निर्णय अधिकारी माहितीपुस्तिका २.२.१(बी))

(vii) मतदान केंद्र हे पक्क्या इमारतीत असावे. तसेच शासकीय /निमशासकीय शाळा, कार्यालये किंवा अनुदानित शाळा/कार्यालयांच्या इमारतीतच असावे. जेणेकरून, टेबल-खुर्च्या व इतर सोयी निर्माण करणे सोपे जाते. सुरक्षिततेच्या दृष्टीनेदेखील सदर बाब योग्य होते. अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत खाजगी इमारतीत मतदान केंद्र स्थापन करावयाचे झाल्यास आयुक्त, महानगरपालिका व जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांनी सर्व कारणमिमांसा जाणून घेऊन मगच अशा मतदान केंद्रांना परवानगी द्यावी.

खाजगी इमारतीत मतदान केंद्र स्थापतेवेळी त्याच्या मालकाची लेखी संमती असणे आवश्यक राहील.

खाजगी इमारतीतील मतदान केंद्राच्या बाबत अंतिम उमेदवारांची यादी प्रसिध्द झाल्यानंतर इमारतीत कोणत्याही पक्षाचे कार्यालय/उमेदवार/हितचिंतक/पाठीराखा

रहात नसल्याची/मालकी नसल्याची खात्री करावी. असल्यास मतदान केंद्र अन्य ठिकाणी नेण्याची पर्यायी व्यवस्था करावी.

मतदान केंद्र खाजगी इमारतीत असल्यास मतदान प्रक्रिया सुरु होण्याच्या २४ तास अगोदर असे मतदान केंद्र निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी ताब्यात घ्यावे. (राज्य निवडणूक आयोगाकडील ०२/०३/१९९५ चे आदेश) (निवडणूक निर्णय अधिकारी माहितीपुस्तिका २.२.१(के),(एम),(एन))

(viii) मतदान केंद्राच्या २०० मीटर परिघ हा मतदान केंद्राध्यक्षाच्या ताब्यात राहील. मतदान केंद्र खाजगी इमारतीत असल्यास सदर मतदान केंद्राच्या २०० मिटर परिघात खाजगी इमारतीचा मालक व त्याचे सुरक्षा रक्षक प्रवेश करणार नाही. (निवडणूक निर्णय अधिकारी माहितीपुस्तिका २.२.१(एम))

(ix) कोणतेही मतदान केंद्र कोणत्याही स्थितीत पोलीस स्टेशन, हॉस्पिटल, देऊळ, धार्मिक इमारतीत नसेल. (निवडणूक निर्णय अधिकारी माहितीपुस्तिका २.२.१(ओ))

(x) मतदान केंद्रात खालील मुलभूत सुविधा पुरवण्यात याव्यात:- (निवडणूक निर्णय अधिकारी माहितीपुस्तिका तसेच भारत निवडणूक आयोगाकडील आदेश क्रमांक-४६४/INST- BMF/२०१३-EPS, दिनांक २७/१/२०१४)

(a) मतदान केंद्र शक्यतोवर तळमजल्यावर ठेवावे. शहरी भागात ते अपवादात्मक परिस्थितीत पहिल्या मजल्यावर असेल तर तेथे लिफ्टची सोय असावी वा मानवी डोलीची व्यवस्था करावी.

(b) मतदान केंद्रावर वृध्द/अपंग व्यक्तींना सोयीचे व्हावे म्हणून रॅम्पची सोय असावी. कायमस्वरुपी रॅम्प नसल्यास तात्पुरती व्यवस्था करावी.

(c) मतदान केंद्र सुरक्षित पक्क्या इमारतीतच असावे. खिडक्या, दरवाजे, पंखे आणि विद्युत पुरवठा यांची तपासणी करून घ्यावी.

(d) मतदान केंद्रावर भरपूर उजेड व हवा असेल याची तपासणी करावी. मतदान केंद्र निश्चितीपूर्वी तपासणीच्यावेळी या सर्व बाबींची नोंद घ्यावी. बल्ब, लाईट्स, फॅन्स, स्वीचेस, वायरिंग तपासणी करून घ्यावी. मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राच्या क्षेत्रात लोड शेडिंग असणार नाही याची खात्री संबंधित यंत्रणेला (MSEB/RELIANCE/TATA) आवश्यक आदेश देऊन करावी. तसेच आवश्यकतेनुसार जनरेटरचीही सोय ठेवावी.

(e) मतदान केंद्रावर स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय आहे याची खात्री करावी. उन्हाळयात प्रत्येक केंद्रावर मातीच्या मडक्यात (२ ग्लास सोबत ठेवावेत) स्वच्छ पिण्याचे पाणी ठेवावे. ते मडके सातत्याने भरलेले राहील याकडे लक्ष द्यावे.

(f) मतदान केंद्रावर किमान आवश्यक फर्निचर (टेबल, खुर्च्या, बेंच, मतदारांना रांगेत उभे राहतेवेळी सावलीसाठी शेडस) ची उपाययोजना करावी. Entry-Exit साठी आवश्यक तेथे बांबूची किंवा दोरीची बॅरीकेटिंग करून घ्यावी.

(g) स्त्री-पुरुषांसाठी स्वतंत्र शौचालये आहेत याची खात्री करावी. मतदानाच्यावेळी त्याच्या स्वच्छतेबाबतचीही काळजी घ्यावी.

(h) मतदान केंद्राच्या इमारतीच्या प्रवेशद्वाराजवळ "मतदार सहाय्य केंद्र" स्थापित करावे. त्यावरील कर्मचाऱ्यांकडे चिन्हांकित मतदार यादीची एक प्रत, मतदारांची वर्णानुक्रमे नावे असलेली एक यादी, मतदान केंद्राचा (मतदार अनुक्रमांक ................ ते ................. मतदान केंद्र क्रमांक) तपशील असावा. जेणेकरून मतदारांना त्यांची नावे शोधण्यासाठी व संबंधित मतदान केंद्रात पाठविण्यासाठी सहाय्य करणे सुलभ होईल.

(i) मतदान केंद्रावर मतदारांना माहिती देणारे फलक योग्य ठिकाणी लावावेत. उदा. मतदान केंद्राचा मार्ग दर्शविणारा नकाशा, मतदान केंद्रावरील सोयींबद्दलची (मतदान केंद्र सहाय्य शौचालय, पाणी) माहिती दर्शविणारे फलक

(j) उन्हाळ्यात होणाऱ्या निवडणुका लक्षात घेता उष्माघाताचा त्रास होऊ नये म्हणून आवश्यक ती प्रथमोपचार, औषधे (जसे De-hydration Medicine) मतदान अधिकाऱ्यांसोबत द्यावीत. सर्व मतदान अधिकारी-कर्मचाऱ्यांसोबत साखर-मीठाच्या पुडया मतदान साहित्यात द्याव्यात. (भारत निवडणूक आयोगाकडील आदेश क्रमांक-४५८/४/९८PLN-IV, दिनांक १/६/१९९८)

(k) भौगोलिक परिस्थिती व वातावरण यांचा अंदाज घेऊन उष्माघातात आवश्यकतेनुसार लोकांनी घ्यावयाच्या काळजीबाबतच्या सूचनांसह प्रसिध्दी द्यावी. "आरोग्य अधिकाऱ्यांच्या सेवा अधिग्रहित करून घ्याव्यात व त्यांना क्षेत्रीय अधिकाऱ्यांसोबत आवश्यक त्या औषधांसोबत फिरतीवर ठेवणे. जेणेकरून, गरजेनुसार ते उपचार करू शकतील. (भारत निवडणूक आयोगाकडील आदेश क्रमांक-४५८/४/९८PLN-IV, दिनांक १/६/१९९८)

(l) पावसाळयात मतदान केंद्राबाबत तितकीच काळजी घेणे आवश्यक असून मतदान केंद्रात छपरातुन पाणी गळणे वा चिखलसदृश्य परिस्थिती निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. त्यासाठी मतदान केंद्राच्या छपरावर आवश्यक असल्यास ताडपत्रीची व्यवस्था करण्यात यावी.

(xi) मतदार संघात कुष्ठरोग्यांसाठी वेगळे वसतिगृह/आश्रम असल्यास त्यांच्यासाठी स्वतंत्र मतदान केंद्र असण्यास हरकत नाही. त्यामध्ये काम करणारे अधिकारी/डॉक्टर्स/इतर कर्मचारी यांना मतदान केंद्राध्यक्ष/अधिकारी म्हणून नेमावे. (निवडणूक निर्णय अधिकारी माहितीपुस्तिका २.३.१)

(xii) परदानशीन स्त्रियांसाठी किंवा ज्या मतदार संघात स्त्री मतदारांची संख्या सरासरी जास्त असूनही केवळ संकोचामुळे स्त्रिया मतदानास येत नाहीत असे आढळत असल्याने प्रत्येक मतदान अधिकाऱ्यांच्या टीममध्ये एकतरी महिला अधिकारी/कर्मचारी असावी. परदानशीन स्त्रियांची ओळख पटविणेकामी अशा महिला कर्मचाऱ्यांचा उपयोग होईल. आवश्यकतेनुसार कमी खर्चाचे पार्टिशन (बेडशीट/चारपाईचा उपयोग) तयार करून घ्यावे. (भारत निवडणूक आयोगाकडील आदेश क्रमांक-५७६/११/ESO/२४/९४, दिनांक २१/१०/१९९४)

(xiii) शक्य असेल तेथे स्त्री-पुरुषांसाठी स्वतंत्र रांगा ठेवाव्यात, जिथे शक्य नसेल तिथे रांगेतील एका पुरुषामागे २ स्त्रिया याप्रमाणे मतदान करू द्यावे. (भारत निवडणूक आयोगाकडील आदेश क्रमांक-४६४/INST/२०११-EPS, दिनांक २६/१२/२०११)

(xiv) ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरीक/अपंग/गरोदर स्त्रिया यांना प्राधान्याने मतदान करू द्यावे. असे करीत असताना इतर मतदाराकडून सर्व प्रकारचे सहकार्य मिळविणेकामी राज्य निवडणूक आयोगाच्या सदरच्या सूचनांना माफक प्रसिध्दी द्यावी. तसेच या सर्व सूचनांबाबत मतदान कर्मचारीवृंदानाही प्रशिक्षणादरम्यान सूचित करावे. (भारत निवडणूक आयोगाकडील आदेश क्रमांक-४६४/२००९-EPS, दिनांक ३०/०४/२००९)

(xv) मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राच्या २०० मीटर परिघात कोणत्याही पक्षाचे/प्रतिनिधीचे कार्यालय राहणार नाही. २०० मीटर परिघाच्या बाहेर प्रत्येक उमेदवारास केवळ १ मतदार सहाय्य केंद्र उभारता येईल. सदर केंद्रावर केवळ १ टेबल, २ खुर्च्या, सावलीसाठी मोठी छत्री/ताडपत्री/कापड टाकण्याची परवानगी असेल. परंतु, सदर केंद्रास स्थानिक प्राधिकरणाकडून परवानगी घ्यावी लागेल.

सदर केंद्रावर ३ x ४ १/२ फुटापेक्षा जास्त लांबी रुंदी नसणारा फलक लावू शकतील. त्यावर उमेदवाराचे नाव, चिन्ह, पक्षाची माहिती असेल. त्याव्यतिरिक्त कोणताही अनधिकृत फलक लावल्यास तो फलक काढून टाकण्यात येईल.

मतदानाच्या दिवशी या केंद्रावर उमेदवाराचे नाव/चिन्ह नसलेल्या केवळ मतदाराचा मतदान क्रमांक, मतदान केंद्राचा तपशील दर्शविणाऱ्या चिठ्ठया दिल्या जाऊ शकतील. परंतु त्यावर इतर कोणताही तपशील असणार नाही.

येथे अनावश्यक गर्दी होणार नाही वा मतदारांना एखाद्या विशिष्ट उमेदवारास मत द्यावे म्हणून भरीस पाडले जाणार नाही याची दक्षता स्थानिक पोलिसांनी घ्यावी. प्राप्त तक्रारीवर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी तात्काळ कारवाई करावी. (भारत निवडणूक आयोगाकडील आदेश क्रमांक-४६४/INST/२००७-PLN-१, दिनांक १२/०१/२००७)

(xvi) मतदान केंद्राच्या १०० मीटर परिघात मतदान केंद्रावर कर्मचारीवृंद/पोलीसांव्यतिरिक्त कोणीही मोबाईल/कॉर्डलेस फोन/वायरलेस वापरणार नाही. (भारत निवडणूक आयोगाकडील आदेश क्रमांक-४६४/INST/२००७-PLN-१, दिनांक १२/०१/२००७)

(xvii) मागील निवडणुकीतील मतदान प्रक्रियेशी निगडित गुन्हे, मतदानाची सरासरी, मतदार यादीतील फोटो, ओळखपत्र प्राप्त मतदारांची सरासरी, कुटुंबविरहित न सापडणाऱ्या मतदारांची संख्या लक्षात घेऊन, भारत निवडणूक आयोगाच्या परिपत्रक क्रमांक-४६४/INST/२००८-EPS, दिनांक २४/१०/२००८ नुसार संवेदनशील /अतिसंवेदनशील मतदान केंद्रांची यादी तयार करावी.

अशी यादी पोलीस यंत्रणेशी समन्वय साधून क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या मदतीने जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी / मनपा आयुक्त यांनी तयार करावी व तद्नंतर अशा संवेदनशील/अतिसंवेदनशील मतदान केंद्रात अतिरिक्त पोलीसवृंद,

आवश्यकतेनुसार डिजिटल / व्हिडिओ कॅमेरे लावणे, मतदारांची ओळख पटविताना विशेष काळजी घेणे यासारख्या उपाययोजना कराव्यात.

(xviii) भारत निवडणूक आयोगाकडील परिपत्रक क्र. ४६४/INST/२००७-PLN-१, दिनांक १२/१०/२००७ नुसार मतदार संघात असणाऱ्या असुरक्षित/कमजोर मतदारांचा समूह/विभाग असल्यास तो शोधून काढणे, त्यांना जोडलेल्या मतदान केंद्रावर विशेष दक्षता घेणेबाबत काही महत्वाच्या सूचना पारित करण्यात आल्या आहेत, त्या सूचनांचे तंतोतंत पालन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांतही करण्यात यावे.

(a) तहसिलदार/गट विकास अधिकारी/पोलीस यंत्रणा, महानगरपालिका क्षेत्रात विभाग अधिकारी (ward officer) यांनी असे कमकुवत गट शोधून काढण्यात मदत करावी. अशा विभागात असुरक्षितता निर्माण करणाऱ्या गुंड प्रवृत्तींच्या व्यक्तींविरुध्द प्रतिबंधात्मक उपाययोजना पोलीस यंत्रणेला तात्काळ कळेल.

(b) अशा विभागात संबंधित मतदारांमध्ये विश्वास निर्माण होण्याकामी क्षेत्रीय अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी, पोलीस अधिकारी यासारखे अधिकारी वारंवार भेटी देतील. तेथील प्रतिष्ठित व्यक्तींशी संपर्क साधून होणाऱ्या घडामोडींचा आढावा घेतील.

(c) मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राध्यक्षांना अशा विभागातून होणाऱ्या मतदानाच्या आकडेवारीवर विशेष लक्ष देण्याचे सूचित करावे. अशा ठिकाणी मतदान कमी होत असल्याचे निदर्शनास आल्यास विशेष पथकाने तात्काळ भेट देऊन मतदारांना मतदान करण्याकामी प्रवृत्त करावे.

(d) असुरक्षित घटकांना मतदान प्रक्रियेमध्ये समाविष्ट करून घेण्याकामी आवश्यकतेनुसार स्वतंत्र मतदान केंद्र निर्माण करण्यास हरकत नसावी. (जरी असे मतदान केंद्र ५०० मतदारांपेक्षाही कमी असले तरी चालेल) अशा

कमकुवत मतदारांना जाणुन बुजून दूरवरच्या वा जिथे त्यांना मतदानास प्रतिबंध केला जाईल अशा विभागातील मतदान केंद्रास जोडले जाणार नाही याची काळजी घ्यावी.

उपरोक्त सूचनांचे पालन काटेकोरपणे केले जाईल याची जबाबदारी महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिका आयुक्त यांची राहील. तसेच महानगरपालिका वगळता इतर सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीत सदर जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील.

(xix) (a) मतदान केंद्रांची यादी नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या (संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अधिनियमातील तरतुदीनुसार) किमान मुदती अगोदर अंतिम होणे आवश्यक राहील. अंतिम मतदान केंद्राची यादी तयार करण्यापूर्वी सर्व तहसिलदार, महानगरपालिका आयुक्त यांनी मतदान केंद्राची प्रत्यक्ष पाहणी करावी. उपरोक्त सूचनांप्रमाणे सोयी सुविधा उपलब्ध आहेत वा कसे? याची तपासणी करून आवश्यक त्या सोयी सुविधा निर्माण करून घ्याव्यात.

(b) प्रारुप मतदान केंद्राच्या यादीस संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात तात्काळ (संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अधिनियमातील तरतुदीनुसार) प्रसिध्दी द्यावी. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील माजी पदाधिकारी/राजकीय पक्ष यांची बैठक आयोजित करून त्यांना ती यादी मोफत द्यावी. त्यांचे आक्षेप लेखी नोंदवून आवश्यक ते बदल (प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक तेथे ते) समाविष्ट करून अंतिम यादी तयार करावी.

(c) अंतिम मतदान केंद्रांची यादीनुसार मतदान केंद्र दर्शविणारा नकाशा तसेच त्यांना जोडणाऱ्या रस्त्यांचा नकाशा, वाहतूकविषयक आराखडा (Transport plan) तसेच मतदान केंद्राच्या जवळचे पोलीस स्टेशन, मतदान केंद्रावरील दूरध्वनी, संपर्क अधिकारी, क्षेत्रीय अधिकारी यांच्या संपर्क दूरध्वनीसह एक Communication Plan

तयार करावा. तसेच वॉटस् ॲप, एसएमएस, ई-मेल यांचा वापर जास्तीत जास्त करावा व त्यासाठी सर्व अधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांक व ई-मेल ॲड्रेस कम्युनिकेशन प्लॅनमध्ये समाविष्ट असावेत.

(d) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीकामी राज्य निवडणूक आयोगाकडून नेमण्यात येणाऱ्या निवडणूक निरीक्षकांना संवेदनशील/अतिसंवेदनशील मतदान केंद्रांच्या यादीसह उपरोक्त प्लॅन टिप्पणीसह पुरवावेत.

27-5-2015

( डॉ. प्रदीप व्यास )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

जोडपत्र - मुळोणीस

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
क्रमांक-रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र.३४/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- २४ डिसेंबर, २००५.

**आ दे श**

महाराष्ट्रातील अपंग मतदारांना मतदानाच्यावेळी काही सुविधा देण्याचा प्रश्न बरेच दिवस राज्य निवडणूक आयोगाच्या विचाराधीन होता. त्यावर राज्य निवडणूक आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

सार्वत्रिक निवडणुकीत अथवा पोटनिवडणुकीच्यावेळी मतदार यादी प्रथम जनतेच्या हरकती व सूचनांसाठी प्रसिध्द करण्यात येते. या हरकती व सूचना मुख्यत्वे करून एका प्रभागातील उमेदवाराचे नांव दुस-या प्रभागात तर आले नाही याबाबत असते. याच कालावधीमध्ये संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थातील अपंग मतदारांना आपली नांवे देण्याचे आवाहन करण्यात यावे. त्यांनी नाव देताना आपला मतदार यादी क्रमांक, भाग क्रमांक व मतदार क्रमांक नमूद करावा.

जे अपंग मतदार आपली नांवे देतील त्याबाबत संबंधित मतदार यादी करणारे अधिकारी यांची जबाबदारी राहील की, त्या मतदारांची नांवे तळमजल्यावरील मतदान केंद्रात येतील याची दक्षता घ्यावी. कारण ब-याचदा एका इमारतीमध्ये तळमजल्यावर व वरच्या मजल्यावर असे मतदान केंद्र असते. जर अपंग मतदाराचे नांव वरच्या मजल्यावरील मतदान केंद्राच्या मतदार यादीत असेल तर ते तेथून कमी करून तळमजल्यावरील मतदान केंद्राशी संबंधित मतदार यादीमध्ये पुरवणी म्हणून जोडण्यात यावे.

जर एखादया मतदान केंद्रावर ५ पेक्षा जास्त अपंग मतदार असतील तर त्या मतदान केंद्रावर चढाव (Ramp) पुरविण्यात यावा.

( नन्द लाल )
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व नगर परिषदा/नगर पंचायतीचे मुख्याधिकारी
राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी

J.12431(222)

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये
मतदान यंत्रावर "None of the Above" (NOTA)
बटनाची सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत...

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
क्रमांक-रानिआ-२०१३/प्र.क्र. ११/का-१२,
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- १२ नोव्हेंबर, २०१३.

संदर्भ:- १) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-मनप-२०११/प्र.क्र.२१/का-५, दिनांक- ५ डिसेंबर, २०११.
२) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-मनप-२०११/प्र.क्र.२१/का-५, दिनांक- ३१ जानेवारी, २०१२.
३) रिट याचिका (C) क्रमांक-१६१/२००४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २७/९/२०१३ रोजी दिलेले आदेश.
४) भारत निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-५७६/०३/२०१३/SDR, दिनांक ११/१०/२०१३.

## आ दे श

ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्रमांक-(C) क्रमांक-१६१/२००४, People's Union for Civil Liberties & other V/s. Union of India & other मध्ये दिनांक २७/९/२०१३ रोजी मतदान यंत्रात / मतपत्रिकेत 'None of the above' (NOTA) चा पर्याय उपलब्ध करून देण्याबाबत आदेश दिलेले आहेत. ज्यामुळे ज्या मतदारांना कोणत्याही उमेदवाराला मतदान करण्याची इच्छा नसेल तर तो त्याच्या मतदानाचा हक्क कोणत्याही उमेदवाराला मतदान न करता गोपनीयतेने बजावू शकेल.

आणि ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या वरील आदेशाच्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-५७६/०३/२०१३/SDR, दिनांक ११/१०/२०१३ अन्वये 'None of the above' (NOTA) चा पर्याय उपलब्ध करून दिलेला आहे.

आणि त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ मुंबई ३) च्या कलम १८ए(४), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ मुंबई ५९) च्या कलम १४(४), महाराष्ट्र नगर पालिका, नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १०ए (४), महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (सन १९६१ चा महा.५) च्या कलम ९ए (४), महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (सन १९५९ चा मुंबई ३) च्या कलम १०ए (४) अनुसार पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

(अ) राज्य निवडणूक आयोगाने यापूर्वी आदेश क्रमांक-मनप-२०११/प्र.क्र.२१/का-५, दिनांक- ५ डिसेंबर, २०११ तसेच आदेश क्रमांक-मनप-२०११/प्र.क्र.२१/का-५, दिनांक- ३१ जानेवारी, २०१२ अन्वये मतदान यंत्रावर 'End' बटन वापरण्याबाबत आदेश दिले होते. सदर आदेश याद्वारे रद्द करण्यात येत असून सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता 'End' बटन बंद राहील.

(ब) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्रमांक-(C) क्रमांक-१६१/२००४ मध्ये दिनांक २७/९/२०१३ रोजी दिलेल्या आदेशानुसार मतदारांना 'None of the above' (NOTA) बटनाची सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता पुढीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी :-

(१) महानगरपालिका, जिल्हा परिषद / पंचायत समिती, नगर परिषद /नगर पंचायत व ग्रामपंचायत निवडणुकांकरिता प्रत्येक मतपत्रिकेवर उमेदवारांच्या नावानंतर 'None of the above' / 'वरीलपैकी एकही नाही' हा पर्याय छापण्यात यावा.

अ) **महानगरपालिका-** महानगरपालिकेच्या निवडणुकीकरिता एका प्रभागातून दोन किंवा तीन उमेदवार निवडून दयावयाचे असतात. त्याकरिता दोन किंवा तीन वेगवेगळया मतपत्रिका मतदान यंत्रावर लावण्यात येतात. या दोन किंवा तीन मतपत्रिकांवर सर्व उमेदवारांच्या नावाच्या शेवटी 'None of the above' / 'वरीलपैकी एकही नाही' हा पर्याय छापण्यात यावा.

ब) **जिल्हा परिषद व पंचायत समिती**- जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीकरिता दोन स्वतंत्र मतपत्रिका मतदान यंत्रावर लावण्यात येतात. जिल्हा परिषदेच्या मतपत्रिकेवर सर्व उमेदवारांच्या नावाच्या शेवटी एक 'None of the above' / 'वरीलपैकी एकही नाही' हा पर्याय छापण्यात यावा. तसेच पंचायत समितीच्या मतपत्रिकेवरदेखील सर्व उमेदवारांच्या नावाच्या शेवटी एक 'None of the above' / 'वरीलपैकी एकही नाही' हा पर्याय छापण्यात यावा.

क) **नगर परिषद / नगर पंचायत** - नगर परिषद / नगर पंचायत निवडणुकीकरिता एका प्रभागातून तीन /चार किंवा पाच उमेदवार निवडून दयावयाचे असतात. त्याकरिता वेगवेगळया ३, ४ किंवा ५ मतपत्रिका वापरण्यात येतात. त्यानुसार प्रत्येक मतपत्रिकेवर उमेदवारांच्या नावाच्या शेवटी 'None of the above' / 'वरीलपैकी एकही नाही' हा पर्याय छापण्यात यावा.

ड) **ग्रामपंचायत**- ग्रामपंचायत निवडणुकांकरिता ज्यावेळी प्रभागातून वेगवेगळया प्रवर्गाचे उमेदवार निवडून दयावयाचे असतात त्यावेळी देखील प्रत्येक मतपत्रिकेत उमेदवारांच्या नावांच्या शेवटी 'None of the above' / 'वरीलपैकी एकही नाही' हा पर्याय छापण्यात यावा.

ज्यावेळी ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये एकाच मतपत्रिकेवर असलेल्या उमेदवारांमधून एकापेक्षा जास्त उमेदवार निवडून दयावयाचे असतात त्यावेळी जितके उमेदवार निवडून दयावयाचे आहेत तितके वेळा 'None of the above' / 'वरीलपैकी एकही नाही' हे पर्याय छापण्यात यावेत. उदा. ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये जर एका प्रभागातून दोन सर्वसाधारण महिला निवडून दयावयाच्या आहेत व त्याकरिता एकूण आठ उमेदवार निवडणूक लढवीत असतील तर अश्यावेळी आठ उमेदवारांची नावे छापून झाल्यानंतर दोन 'None of the above' / 'वरीलपैकी एकही नाही' हे पर्याय छापण्यात यावेत.

(२) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता मतदान यंत्र तयार करताना (Candidate setting) उमेदवारांची संख्या अधिक त्या मतपत्रिकेवर असलेले 'None of the above' / 'वरीलपैकी एकही नाही' पर्याय मिळून कँडिडेट सेटिंग करावे. उदा. -

(i) एका मतपत्रिकेवर पाच उमेदवार व एक 'None of the above' / 'वरीलपैकी एकही नाही' पर्याय ठरवावयाचा असल्यास कॅंडिडेट सेटिंग करताना जेणेकरून सहा उमेदवारांमधून एक उमेदवार निवडायचा आहे अशा प्रकारे मतदान यंत्र सेट करणे आवश्यक आहे.

(ii) एका मतपत्रिकेवर सात उमेदवार असून त्यापैकी दोन उमेदवार निवडून दयावयाचे असल्यास 'None of the above' / 'वरीलपैकी एकही नाही' असे दोन पर्याय ठेवावयाचे असल्याने कॅंडिडेट सेटिंग करताना नऊ उमेदवारांमधून दोन उमेदवार निवडायचे आहेत अशा प्रकारे मतदान यंत्र सेट करणे आवश्यक आहे.

विविध स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता कॅंडिडेट सेटिंग कश्याप्रकारे करण्यात येईल याचे उदाहरण मतपत्रिकेसह सोबतच्या परिशिष्ट-एक मध्ये दर्शविण्यात आले आहे.

(३) 'None of the above' / 'वरीलपैकी एकही नाही' हा पर्याय मतपत्रिकेवर छापताना उमेदवारांची नावे ज्या भाषेत छापली असतील त्या भाषेत छापण्यात यावा. तसेच उमेदवारांच्या चौकटीचा आकार तसेच सदर शब्दांचा आकार (Font Size) उमेदवारांच्या नावाच्या आकाराएवढाच छापण्यात यावा.

(४) मतमोजणीच्यावेळी उमेदवारांना मिळालेल्या मतांप्रमाणेच 'None of the above' / 'वरीलपैकी एकही नाही' या पर्यायासमोर नोंद झालेल्या मतांची गणना करण्यात येईल. मतमोजणीचा निकाल तयार करताना प्रत्येक मतदान केंद्रनिहाय तक्त्यामध्ये उमेदवारांच्या नावाच्या नंतर त्या मतपत्रिकेवर उपलब्ध करून दिलेल्या 'None of the above' / 'वरीलपैकी एकही नाही' या पर्यायांसमोर नोंद झालेल्या मतांची संख्या नोंदविण्यात येईल. तसेच त्याचा अंतर्भाव एकूण मतदानाच्या संख्येमध्ये करण्यात येईल.

(५) यानुसार योग्य त्या दुरुस्त्या करून निवडणुकांबाबतचे सर्व नमुने वापरण्यात यावेत.

(६) पोस्टल बॅलट पेपर / टपाली मतपत्रिका छपाई करतानादेखील 'None of the above' / 'वरीलपैकी एकही नाही' हे पर्याय मूळ मतपत्रिकेप्रमाणेच छपाई करण्यात यावेत. तसेच त्यावर नोंदविण्यात आलेली मते मतमोजणीचा निकाल तयार करताना संबंधित उमेदवार अथवा 'None of the above' / 'वरीलपैकी एकही नाही' या पर्यायासमोर नोंदविण्यात यावीत.

(७) निकाल जाहीर करताना 'None of the above' / 'वरीलपैकी एकही नाही' या पर्यायासमोर नोंदविलेल्या मतांची संख्या विचारात न घेता ज्या उमेदवारास / उमेदवारांना सर्वाधिक मते मिळाली असतील त्यांना विजयी उमेदवार म्हणून घोषित करण्यात यावे. म्हणजेच 'None of the above' / 'वरीलपैकी एकही नाही' या पर्यायासमोर नोंदविलेल्या मतांची संख्या सर्वाधिक मते मिळालेल्या उमेदवारांस मिळालेल्या मतांच्या संख्येपेक्षा जास्त असली तरी त्या उमेदवारास विजयी घोषित करण्यास प्रतिबंध राहणार नाही.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

धमाकानेड

( ध. मा. कानेड )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व महानगरपालिका आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
सर्व नगर परिषद / नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
सर्व तहसिलदार
राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासन

# परिशिष्ट-एक

(अ) महानगरपालिका निवडणूक -

उदा. -

(१) एका प्रभागामधून दोन उमेदवार निवडून दयावयाचे आहेत.

(२) एक उमेदवार सर्वसाधारण महिला व दुसरा उमेदवार अनुसूचित जाती.

(३) सर्वसाधारण महिला पदाकरिता पाच उमेदवारांमधून एक उमेदवार निवडून दयावयाचा असून अनुसूचित जातीकरिता चार उमेदवारांमधून एक उमेदवार निवडून दयावयाचा आहे.

(४) मतदान यंत्रावर दोन वेगवेगळया मतपत्रिका असतील.

**मतदान यंत्रावरील प्रत्येक मतपत्रिकेवर उमेदवारांच्या नावानंतर** 'None of the above' / 'वरीलपैकी एकही नाही' पर्याय **पुढीलप्रमाणे राहील :-**

**पहिल्या पदाची मतपत्रिका – सर्वसाधारण महिला**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | पहिल्या उमेदवाराचे नाव | चिन्ह | उमेदवाराचे बटन |
| २. | दुसऱ्या उमेदवाराचे नाव | चिन्ह | उमेदवाराचे बटन |
| ३. | तिसऱ्या उमेदवाराचे नाव | चिन्ह | उमेदवाराचे बटन |
| ४. | चौथ्या उमेदवाराचे नाव | चिन्ह | उमेदवाराचे बटन |
| ५. | पाचव्या उमेदवाराचे नाव | चिन्ह | उमेदवाराचे बटन |
| ६. | 'वरीलपैकी एकही नाही' (NOTA) | | (NOTA) बटन |

**दुसऱ्या पदाची मतपत्रिका -- अनुसूचित जाती**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | पहिल्या उमेदवाराचे नाव | चिन्ह | उमेदवाराचे बटन |
| २. | दुसऱ्या उमेदवाराचे नाव | चिन्ह | उमेदवाराचे बटन |
| ३. | तिसऱ्या उमेदवाराचे नाव | चिन्ह | उमेदवाराचे बटन |
| ४. | चौथ्या उमेदवाराचे नाव | चिन्ह | उमेदवाराचे बटन |
| ५. | 'वरीलपैकी एकही नाही' (NOTA) | | (NOTA) बटन |

**कँडिडेट सेटिंग** – पहिल्या पदाकरिता कँडिडेट सेटिंग करताना सहा उमेदवारांमधून एक तर दुसऱ्या पदाकरिता कँडिडेट सेटिंग करताना पाच उमेदवारांमधून एक याप्रमाणे करावे लागेल. त्यामुळे कँडिडेट सेटिंगकरिता प्रत्येक मतपत्रिकेवरील शेवटचा उमेदवार कोणत्या स्थानावर आहे हे दर्शविण्यासाठी 'वरीलपैकी एकही नाही' (NOTA) या पर्यायासमोरील बटन दाबावे लागेल.

**(ब) जिल्हा परिषद/ पंचायत समिती निवडणूक —**

उदा. —

१. जिल्हा परिषद मतदार गटाकरिता एक तसेच पंचायत समितीकरिता एक याप्रमाणे एकूण दोन स्वतंत्र मतपत्रिकांवर जिल्हा परिषदेकरिता एक व पंचायत समितीकरिता एक असे दोन स्वतंत्र उमेदवार निवडून दयावयाचे आहेत.

२. जिल्हा परिषदेचा उमेदवार सर्वसाधारण व दुसरा पंचायत समितीचा उमेदवार अनुसूचित जमाती.

३. जिल्हा परिषदेकरिता सर्वसाधारण चार उमेदवारांमधून एक उमेदवार निवडून दयावयाचा असून पंचायत समितीकरिता अनुसूचित जमातीच्या तीन उमेदवारांमधून एक उमेदवार निवडून दयावयाचा आहे.

**मतदान यंत्रावरील मतपत्रिकेवर उमेदवारांच्या नावानंतर** 'None of the above' / 'वरीलपैकी एकही नाही' पर्याय **पुढीलप्रमाणे राहील :-**

**जिल्हा परिषद मतपत्रिका — सर्वसाधारण**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | पहिल्या उमेदवाराचे नाव | चिन्ह | उमेदवाराचे बटन |
| २. | दुसऱ्या उमेदवाराचे नाव | चिन्ह | उमेदवाराचे बटन |
| ३. | तिसऱ्या उमेदवाराचे नाव | चिन्ह | उमेदवाराचे बटन |
| ४. | चौथ्या उमेदवाराचे नाव | चिन्ह | उमेदवाराचे बटन |
| ५. | 'वरीलपैकी एकही नाही' (NOTA) | | (NOTA) बटन |

**पंचायत समिती पदाची मतपत्रिका — अनुसूचित जमाती**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | पहिल्या उमेदवाराचे नाव | चिन्ह | उमेदवाराचे बटन |
| २. | दुसऱ्या उमेदवाराचे नाव | चिन्ह | उमेदवाराचे बटन |
| ३. | तिसऱ्या उमेदवाराचे नाव | चिन्ह | उमेदवाराचे बटन |
| ४. | 'वरीलपैकी एकही नाही' (NOTA) | | (NOTA) बटन |

**कँडिडेट सेटिंग** — पहिल्या पदाकरिता कँडिडेट सेटिंग करताना पाच उमेदवारांमधून एक तर दुसऱ्या पदाकरिता कँडिडेट सेटिंग करताना चार उमेदवारांमधून एक याप्रमाणे करावे लागेल. त्यामुळे कँडिडेट सेटिंगकरिता प्रत्येक मतपत्रिकेवरील शेवटचा उमेदवार कोणत्या स्थानावर आहे दर्शविण्यासाठी 'वरीलपैकी एकही नाही' (NOTA) या पर्यायासमोरील बटन दाबावे लागेल.

**(क) नगर परिषद / नगर पंचायत निवडणूक -**

उदा. --

१. एका प्रभागामधून चार उमेदवार निवडून दयावयाचे आहेत.

२. पहिला उमेदवार सर्वसाधारण महिला- पाच उमेदवारांमधून एक उमेदवार
दुसरा उमेदवार अनुसूचित जाती (महिला) - चार उमेदवारांमधून एक उमेदवार
तिसरा उमेदवार नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग --तीन उमेदवारांमधून एक उमेदवार
चौथा उमेदवार सर्वसाधारण - चार उमेदवारांमधून एक उमेदवार

३. वरीलप्रमाणे चार वेगवेगळया मतपत्रिका मतदान यंत्रावर असतील.
**मतदान यंत्रावरील प्रत्येक मतपत्रिकेवर उमेदवारांच्या नावानंतर** 'None of the above' / 'वरीलपैकी एकही नाही' पर्याय **पुढीलप्रमाणे राहील** :-

**पहिल्या पदाची मतपत्रिका -- सर्वसाधारण महिला**

| | | |
|---|---|---|
| १. पहिल्या उमेदवाराचे नाव | चिन्ह | उमेदवाराचे बटन |
| २. दुसऱ्या उमेदवाराचे नाव | चिन्ह | उमेदवाराचे बटन |
| ३. तिसऱ्या उमेदवाराचे नाव | चिन्ह | उमेदवाराचे बटन |
| ४. चौथ्या उमेदवाराचे नाव | चिन्ह | उमेदवाराचे बटन |
| ५. पाचव्या उमेदवाराचे नाव | चिन्ह | उमेदवाराचे बटन |
| ६. 'वरीलपैकी एकही नाही' (NOTA) | | (NOTA) बटन |

**दुसऱ्या पदाची मतपत्रिका -- अनुसूचित जाती (महिला)**

| | | |
|---|---|---|
| १. पहिल्या उमेदवाराचे नाव | चिन्ह | उमेदवाराचे बटन |
| २. दुसऱ्या उमेदवाराचे नाव | चिन्ह | उमेदवाराचे बटन |
| ३. तिसऱ्या उमेदवाराचे नाव | चिन्ह | उमेदवाराचे बटन |
| ४. चौथ्या उमेदवाराचे नाव | चिन्ह | उमेदवाराचे बटन |
| ५. 'वरीलपैकी एकही नाही' (NOTA) | | (NOTA) बटन |

**तिसऱ्या पदाची मतपत्रिका — नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग**

| | | |
|---|---|---|
| १. पहिल्या उमेदवाराचे नाव | चिन्ह | उमेदवाराचे बटन |
| २. दुसऱ्या उमेदवाराचे नाव | चिन्ह | उमेदवाराचे बटन |
| ३. तिसऱ्या उमेदवाराचे नाव | चिन्ह | उमेदवाराचे बटन |
| ४. 'वरीलपैकी एकही नाही' (NOTA) | | (NOTA) बटन |

**चौथ्या पदाची मतपत्रिका — सर्वसाधारण**

| | | |
|---|---|---|
| १. पहिल्या उमेदवाराचे नाव | चिन्ह | उमेदवाराचे बटन |
| २. दुसऱ्या उमेदवाराचे नाव | चिन्ह | उमेदवाराचे बटन |
| ३. तिसऱ्या उमेदवाराचे नाव | चिन्ह | उमेदवाराचे बटन |
| ४. चौथ्या उमेदवाराचे नाव | चिन्ह | उमेदवाराचे बटन |
| ५. 'वरीलपैकी एकही नाही' (NOTA) | | (NOTA) बटन |

**कँडिडेट सेटिंग** — पहिल्या पदाकरिता कँडिडेट सेटिंग करताना सहा उमेदवारांमधून एक तर दुसऱ्या पदाकरिता कँडिडेट सेटिंग करताना पाच उमेदवारांमधून एक याप्रमाणे करावे लागेल. तिसऱ्या पदाकरिता कँडिडेट सेटिंग करताना चार उमेदवारांमधून एक तर चौथ्या पदाकरिता कँडिडेट सेटिंग करताना पाच उमेदवारांमधून एक याप्रमाणे करावे लागेल. त्यामुळे कँडिडेट सेटिंगकरिता प्रत्येक मतपत्रिकेवरील शेवटचा उमेदवार कोणत्या स्थानावर आहे हे दर्शविण्यासाठी 'वरीलपैकी एकही नाही' (NOTA) या पर्यायासमोरील बटन दाबावे लागेल.

**(ड) ग्रामपंचायत निवडणूक --**

उदा. --

१. ग्रामपंचायतीकरिता एका प्रभागामधून तीन उमेदवार निवडून दयावयाचे असून त्यापैकी एक उमेदवार नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता तर दोन उमेदवार सर्वसाधारण महिला पदाकरिता निवडून दयावयाचे आहेत. नागरिकांच्या मागासवर्गाकरिता तीन उमेदवारांमधून एक उमेदवार निवडून दयावयाचा आहे. त्याकरिता नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या मतपत्रिकेवर उमेदवारांच्या नावाच्या शेवटी एक 'None of the above' / **'वरीलपैकी एकही नाही'** हा पर्याय छापावा लागेल. त्यानंतर एकाच मतपत्रिकेवर सर्वसाधारण दोन पदांकरिता मिळून एकूण सात उमेदवार असून त्यामधून **दोन** उमेदवावर निवडून दयावयाचे आहेत. त्यामुळे या सात उमेदवारांची एकच मतपत्रिका होईल. मात्र त्यावर **दोन** मते दयावयाची असल्याने 'None of the above' / **'वरीलपैकी एकही नाही'** हा पर्याय दोन वेळा सर्व उमेदवारांच्या नावाच्या शेवटी छापावा लागेल.

**मतदान यंत्रावरील मतपत्रिकेवर उमेदवारांच्या नावानंतर** 'None of the above' / 'वरीलपैकी एकही नाही' पर्याय **पुढीलप्रमाणे राहील :-**

**पहिली मतपत्रिका -- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (एक पद)**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | पहिल्या उमेदवाराचे नाव | चिन्ह | उमेदवाराचे बटन |
| २. | दुसऱ्या उमेदवाराचे नाव | चिन्ह | उमेदवाराचे बटन |
| ३. | तिसऱ्या उमेदवाराचे नाव | चिन्ह | उमेदवाराचे बटन |
| ४. | 'वरीलपैकी एकही नाही' (NOTA) | | (NOTA) बटन |

**दुसरी मतपत्रिका -- सर्वसाधारण महिला (दोन पदे)**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | पहिल्या उमेदवाराचे नाव | चिन्ह | उमेदवाराचे बटन |
| २. | दुसऱ्या उमेदवाराचे नाव | चिन्ह | उमेदवाराचे बटन |
| ३. | तिसऱ्या उमेदवाराचे नाव | चिन्ह | उमेदवाराचे बटन |
| ४. | चौथ्या उमेदवाराचे नाव | चिन्ह | उमेदवाराचे बटन |
| ५. | पाचव्या उमेदवाराचे नाव | चिन्ह | उमेदवाराचे बटन |
| ६. | सहाव्या उमेदवाराचे नाव | चिन्ह | उमेदवाराचे बटन |
| ७. | सातव्या उमेदवाराचे नाव | चिन्ह | उमेदवाराचे बटन |
| ८. | 'वरीलपैकी एकही नाही' (NOTA) - १ | | (NOTA) बटन |
| ९. | 'वरीलपैकी एकही नाही' (NOTA) - २ | | (NOTA) बटन |

**कँडिडेट सेटिंग** -- पहिल्या पदाकरिता कँडिडेट सेटिंग करताना चार उमेदवारांमधून एक तर दुसऱ्या पदाकरिता कँडिडेट सेटिंग करताना नऊ उमेदवारांमधून दोन याप्रमाणे करावे लागेल. त्यामुळे कँडिडेट सेटिंगकरिता मतपत्रिकेवरील शेवटचा उमेदवार कोणत्या स्थानावर आहे हे दर्शविण्यासाठी 'वरीलपैकी एकही नाही' (NOTA) या पर्यायासमोरील बटन दाबावे लागेल. मात्र ज्यावेळी एका मतपत्रिकेवर दोन मते दयावयाची असतात त्यावेळी 'None of the above' / 'वरीलपैकी एकही नाही' हा पर्याय दोनवेळा दयावयाचा आहे. अश्यावेळी मतपत्रिकेवरील शेवटचा उमेदवार कोणत्या स्थानावर आहे हे दर्शविण्यासाठी मतपत्रिकेवरील शेवटचे 'वरीलपैकी एकही नाही' (NOTA)-२ या पर्यायासमोरील बटन दाबावे.

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ-2013/प्र.क्र.11/का.12
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई 400 032
दिनांक - 26/11/2013

**प्रति,**

जिल्हाधिकारी सर्व,
आयुक्त, महानगरपालिका सर्व,
मुख्याधिकारी सर्व.

**विषय:-स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मतदान यंत्रावरील "वरील पैकी एकही नाही" (NOTA) बटणाच्या वापराबाबत पूरक आदेश...**

उपरोक्त विषयान्वये राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदारांसाठी मतपत्रिकेवर 'वरील पैकी एकही नाही' (NOTA) ही सोय उपलब्ध करून देण्याबाबत आदेश यापुर्वीच केले आहे. तथापि, एखादया उमेदवारास मतदान करण्याची इच्छा नसल्यास व त्याने 'वरील पैकी एकही नाही' (NOTA) हे बटन देखील दाबण्यास नकार दिला तर कोणती कार्यपध्दती अवलंबावी याबाबतचे आदेश सोबत जोडले आहेत.

तसेच मतदान यंत्रावर 'वरील पैकी एकही नाही' (NOTA) हा पर्याय उपलब्ध करून दिल्याने त्या अनुषंगाने या प्रक्रियेविषयी मतदारांना माहिती करून देण्याकरिता एक माहिती पट राज्य निवडणूक आयोगाने तयार केला आहे. हा माहिती पट राज्य निवडणूक आयोगाची **www.mahasec.com** या संकेतस्थळावर 'मतदार जागृती अभियान' या लिंकवर अपलोड केला आहे. तरी त्याचे अवलोकन व्हावे.

( अविनाश सणस )
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मतदान यंत्रावरील " वरीलपैकी एकही नाही " (NOTA) बटणाच्या वापराबाबत पूरक आदेश...**

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
क्रमांक- रानिआ-2013/प्र.क्र.11/का.12
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई 400 032
दिनांक - 26.11.2013

संदर्भ :- राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दि.12 नोव्हेंबर, 2013 चे आदेश.

**आदेश**

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदाराला मतपत्रिकेवरील कोणत्याही उमेदवाराला मतदान करण्याची इच्छा नसली तरी त्याला आपला मतदानाचा हक्क गोपनीयरित्या बजावता यावा याकरिता मतदान यंत्रावर 'वरीलपैकी एकही नाही' (NOTA) हा पर्याय संदर्भाधिन आदेशान्वये उपलब्ध करुन दिला आहे.

आणि ज्याअर्थी, मतदार त्यांना मतपत्रिकेवरील उमेदवारांना मतदान करण्याची इच्छा नसल्यास ते 'वरीलपैकी एकही नाही' (NOTA) या पर्यायासमोरील बटन दाबून आपला मतदानाचा हक्क गोपनीयरित्या बजावू शकतात. मात्र काही मतदार, मतदान कक्षात आल्यानंतर आपले मतदान पूर्ण करणार नाहीत अथवा कोणत्याही उमेदवाराला मतदान करण्याची इच्छा नसली तरी 'वरीलपैकी एकही नाही' (NOTA) या पर्यायासमोरील बटन दाबण्यासदेखील नकार देतील त्याठिकाणी कोणती कार्यपध्दती अवलंबावी याबाबत कार्यपध्दती ठरवून देणे आवश्यक आहे.

आणि त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 243 के व 243 झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, 1888 (1888 मुंबई 3) च्या कलम 18ए(4), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 1949 (1949 मुंबई 59)च्या कलम 14(4), महराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 च्या कलम 10ए (4), महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, 1961 (सन 1961 चा महा.5) च्या

कलम ९ए (4), महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, 1958 (सन 1959 चा मुंबई 3) च्या कलम 10ए (4) अनुसार पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

1. मतदार आपले मतदान पूर्ण न करता मतदान कक्षामधून बाहेर निघाला तर मतदान अधिकारी / मतदान केंद्राध्यक्ष यांना कंट्रोल युनिटवरील लाल दिवा न विझल्यामुळे तसेच बिप साऊंड न आल्यामुळे मतदाराने, मतदान पूर्ण केलेले नाही ही गोष्ट लक्षात येईल.
2. अशा परिस्थितीत मतदान केंद्राध्यक्षांनी संबंधित मतदाराला त्याचे मतदान पूर्ण न झाल्याबाबतची कल्पना देऊन पसंतीच्या उमेदवाराला मत देऊन अथवा 'वरीलपैकी एकही नाही' (NOTA) या पर्यायासमोरील बटन दाबून मतदान पूर्ण करण्याबाबत विनंती करावी.
3. जर मतदाराने पुन्हा मतदान कक्षात जाऊन त्यानुसार मतदान केल्यास, त्याठिकाणी त्या मतदाराची मतदान प्रक्रिया पूर्ण होईल.
4. मात्र जर एखाद्या मतदाराने पसंतीच्या उमेदवाराला मत देण्यास अथवा 'वरीलपैकी एकही नाही' (NOTA) या पर्यायासमोरील बटन दाबण्यास नकार दिला तर मतदान केंद्राध्यक्षांनी बॅलट युनिटवरील उमेदवारांचे नावासमोरील दिवे एखादा पुठ्ठा अथवा पुस्तक ठेवून झाकावेत. त्यानंतर मतदान केंद्रात उपस्थित असलेल्या सर्व मतदान प्रतिनिधींना बरोबर घेऊन त्यांच्या साक्षीने ज्या मतपत्रिकेवरील मतदान अपूर्ण झाले आहे त्या मतपत्रिकेवरील 'वरीलपैकी एकही नाही' (NOTA) या पर्यायासमोरील बटन / बटने दाबून मतदान प्रक्रिया पूर्ण करावी.
5. जर एखाद्या मतदाराने मतदान कक्षात जाण्यापूर्वीच मतदानास नकार दिला तर अशा मतदाराच्या मतदार नोंदवहीतील (व्हीएम-1) नोंदीसमोर अभिप्राय या रकान्यात मतदानास नकार दिल्याची नोंद घ्यावी. याठिकाणी नोंदविलेल्या मतांच्या हिशोबामध्ये (व्हीएम-3) अनुक्रमांक 3 येथे अशा मतदारांची संख्या नमूद करण्यात येईल.

राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

( अविनाश सणस )
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र